**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय ......

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात.)

**<u>पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष आणि अल्पसंख्यांक मंत्री बॅ. अंतुले यांनी काल लोकसभेत जे स्टेटमेंट केले आहे ते आणि काल आपल्या सभागृहात तसेच लोकसभा व राज्यसभेत माननीय केंद्रिय गृहमंत्र्यांनी केलेले स्टेटमेंट या सर्व वेगवेगळ्या स्टेटमेंटमध्ये विसंगती आहे. म्हणून राज्यातील जनता या वेगवेगळ्या स्टेटमेंटमुळे संभ्रमित झाली आहे. काल लोकसभेत माननीय अंतुले यांनी ज्या पध्दतीने आरोप केले त्या सर्व गोष्टींची चौकशी झाली पाहिजे आणि सभागृहासमोर सर्व गोष्टी आल्या पाहिजेत. म्हणून सभागृहाचे कामकाज थांबवून मा. अंतुले यांनी केलेल्या स्टेटमेंटच्या संदर्भात सभागृहात खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सर्व परिस्थितीमुळे एक घटनात्मक मुद्दा निर्माण झालेला आहे. मुंबईत झालेल्या हल्ल्यानंतर कसाब नावाचा आतंकवादी पकडला गेला आणि त्याने हे कबूल केले की मी गोळ्या मारल्या आणि त्यात श्री. हेमंत करकरे, श्री. विजय साळसकर आणि श्री. अशोक कामटे हे अधिकारी शहीद झाले. हे सर्व घडलेले असताना आपल्या शासनाने त्यासंदर्भात केस तयार केली आणि ती केस केंद्रशासनाकडे दिली. केंद्रशासनाच्या विदेश मंत्र्यांनी आणि माननीय प्रधानमंत्र्यांनी पाकिस्तानी उच्चायुक्तांकडे ती केस दिली व सांगितले की, आपल्या देशातून आलेल्या आतंकवाद्याने आमच्याकडे ही घटना घडविली. त्यानंतर ब्रिटीश राष्ट्राध्यक्ष आणि अमेरिकेचे परराष्ट्र सचिव भारतात आले व त्यांनी देखील पाकिस्तानला सांगितले की, ज्या अतिरेक्याने भारतातील मुंबईसारख्या शहरावर हल्ला केला त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, त्यानंतर पाकिस्तानने देखील यासंबंधी करावयाची कारवाई त्यांच्या शासनाला एन्डॉस केली. ब्रिटीश प्रधानमंत्र्यांनी देखील एन्डॉस केले. काल सभागृहात माननीय गृहमंत्री श्री.जयंत पाटील यांनीही मान्य केले.परंतु ज्यावेळेस केंद्रशासनातील मंत्री बोलतात त्यावेळेस ते त्याचे व्यक्तिगत मत

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

नसते तर "When ministers speaks it means that Government speaks" केंद्रशासनाच्या कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांनी वक्तव्य केले की, श्री. हेमंत करकरे यांची हत्या झालेली आहे, हे संशयास्पद प्रकरण आहे. अशा प्रकारे इनडायरेक्टली त्यांनी पाकिस्तानी अतिरेक्यांकडून नव्हे तर भारतातील काही लोकांकडूनच त्यांची हत्या घडली असावी, असे त्यांनी सांगितले. काल राज्यशासनाने जे स्टेटमेंट केले त्याच्याशी हे स्टेटमेंट कॉन्ट्रॅडिक्ट झालेले आहे तसेच ब्रिटीश सरकार आणि अमेरिकेने देखील अतिरेक्यांवर कारवाई करण्यास पाकिस्तानला सांगितले या सर्व गोष्टींना बॅ. अंतुले यांनी केलेल्या स्टेटमेंटमुळे छेद दिला गेला आहे, म्हणून आज ही संभ्रमाची स्थिती आहे. केंद्रीय मंत्रिमंडळातील एक जबाबदार मंत्री म्हणून त्यांनी जे वक्तव्य केले त्याबाबत अजून माननीय पंतप्रधानांनी सुध्दा बॅ. अंतुले यांचे मत त्यांचे व्यक्तिगत मत असल्यामुळे सरकार त्यांच्या मताशी सहमत नाही असे सांगितलेले नाही. केवळ प्रवक्त्यांनी व्यक्तिगत मत असल्याचे सांगून उपयोग नाही किंवा ते केंद्रसरकारचे मत आहे असेही होत नाही. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने काल मत व्यक्त केले ते आपल्या रेकॉर्डवर आहे, त्याला छेद देणारी केंद्रशासनाची भूमिका असून त्यामुळेच महाराष्ट्र राज्यात गोंधळ निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

पाकिस्तानी आतंकवाद्यांच्या संदर्भात केंद्र सरकारच्या मंत्र्यांनी राज्य सरकारच्या मता विरुध्द व केंद्रशासनाच्या मता विरुध्द तसेच संपूर्ण जगाच्या मताविरुध्द विधान केलेले आहे. त्यांनी कॉन्ट्रॅडीक्टरी मत व्यक्त केलेले आहे. पाकिस्तानी टी.व्ही. वर माननीय अंतुले साहेबांचा फोटो दाखवून त्यांचे मत कसे बरोबर आहे हे दाखवले जात आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. अंतुलेसाहेबांनी जे मत व्यक्त केलेले आहे त्यामुळे जागतिक स्तरावर भारताची बदनामी होत आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री तसेच गृहमंत्री उपस्थित आहेत त्यामुळे त्यांनी माननीय अंतुले साहेबांच्या संदर्भात राज्य सरकारची काय भूमिका आहे हे आताच्या आता जाहीर केले पाहिजे. जोपर्यंत शासनाकडून राज्यसरकारची भूमिका स्पष्ट केली जात नाही तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही.

**उपसभापती** : पुरवणी मागण्यांसाठी, विशिष्ट कामकाजासाठी सभागृहाची विशेष बैठक बोलावण्यात आलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना आपल्या ज्या काही भावना व्यक्त करावयाच्या असतील त्या भावना त्यांनी सभागृहाचे कामकाज रीतसर सुरु झाल्यानंतर करावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय केंद्रीय मंत्री यांनी जे स्टेटमेंट केलेले आहे त्यामुळे जागतिक स्तरावर भारताची बदनामी होत आहे. हा संवेदनशील विषय असल्यामुळे माननीय केंद्रीय मंत्र्यांच्या संदर्भात राज्यसरकारची भूमिका काय आहे हे समजले पाहिजे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, लोकसभेमध्ये कोणी वक्तव्य केले असले तरी त्या मताच्या संदर्भात आपण येथे बोलणे बरोबर होणार नाही. परंतु मी या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून सांगू इच्छितो की, श्री. करकरे, श्री.कामटे तसेच श्री.साळसकर यांची हत्या दहशतवाद्यांनीच केलेली आहे. आतापर्यंतच्या तपासणीवरुन केवळ हेच निष्पन्न झालेले असल्यामुळे श्री.करकरे, श्री. कामटे तसेच साळसकर यांची हत्या दहशतवाद्यांनीच केलेली आहे यामध्ये संदेह घेण्यास काहीच जागा उरलेली नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय केंद्रीय मंत्र्यांच्या संदर्भात राज्य सरकारचे काय मत आहे हे केंद्रसरकारला त्वरीत कळवले पाहिजे.

...2...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी श्री.करकरे, श्री.कामटे तसेच साळसकर यांची हत्या कोणी केलेली आहे यासंदर्भात खुलासा केलेला आहे. केंद्रीय मंत्री श्री. अंतुलेसाहेबांनी यासंदर्भात लोकसभेच्या बाहेर मुलाखत देऊन खुलासा केलेला आहे. त्यामुळे राज्य सरकारचे यासंदर्भात काय मत आहे हे केंद्र सरकारला, प्रेसला याच क्षणी कळवले पाहिजे. केंद्रीय मंत्र्यांनी जे स्टेटमेंट केलेले आहे त्यामुळे महाराष्ट्र सरकारची आणि हिंदुस्तानची जागतिक स्तरावर बदनामी होत आहे त्यामुळे यासंदर्भात राज्य सरकारचे काय मत आहे हे केंद्र सरकारला आणि प्रेसला त्वरीत कळवले पाहिजे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मुंबईमध्ये जी घटना घडलेली आहे त्यासंदर्भात चौकशी सुरु आहे. या चौकशीमध्ये केंद्रीय एजन्सीचा तसेच केंद्र सरकारचा सुध्दा समावेश आहे. या घटनेच्या संदर्भात केंद्र शासनाला सुध्दा चांगली माहिती आहे. ज्यावेळी या ठिकाणी अशा प्रकारचे वक्तव्य केले जाते तेव्हा ते वक्तव्य खात्रीलायक समजले जात असते. या ठिकाणी मी उपमुख्यमंत्री म्हणून जे काही वक्तव्य केलेले आहे ते आपोआप सगळीकडे जात असते. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासनाने अजून वेगळे काही करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते.

**उपसभापती** : ठीक आहे. आता पुरवणी मागण्यांवर चर्चा उपस्थित करण्यात येईल.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:सन 2008-2009 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**उपसभापती** : आता बुधवार, दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजीच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आज गुरुवार, दिनांक 18 डिसेंबर, 2008 रोजीच्या या विशेष बैठकीत घ्यावयाची आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्रांचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा शक्यतोवर या विशेष बैठकीतच पूर्ण करावयाची आहे, हे सदस्यांनी कृपया लक्षात घ्यावे.

<u>**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या.**</u>

**उपसभापती** : **खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.**

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-2, ए-3, ए-4, ए-5, ए-,6, बी-7,एफ-2, एफ-3, एफ-5, जे-1, के-3, के-7, के-10, क्यू-3, झेड इ-1-ए.

(2) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एल-2, एल-3, एल-5, झेड डी-4.

(3) परिवहन, विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-3, एन-3.

(4) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य भुकंप पुनर्वसन, शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1,सी-5,सी-6, इ-2, इ-3.

(5) गृहमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1,बी-5.

(6) सहकार, रोजगार हमी योजना, सांस्कृतिक कार्य व संसदीय कार्यमंत्री विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2,व्ही-5,झेड डी-2.

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

(7) राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-2.

(8) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक जी-1, जी-4, जी-6, जी-7, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-21,ओ-22, ओ-24, ओ-26, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-36, ओ-37, ओ-38,ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47.

(9) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या मागण्या क्रमांक एन -2,एन -3.

(10) वन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-7,सी-10

(11) कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के- 11,के-4

(12) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एम-2, एम-3.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावंरील चर्चेस सुरुवात करण्यापूर्वी मी एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, आम्हाला जी तपशीलपत्रिका दिलेली आहे त्यामध्ये विधी व न्याय विभाग दाखविण्यात आलेला आहे. परंतु आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये विधी व न्याय विभाग दाखविण्यात आलेला नाही. तेव्हा तो विषय सकाळच्या चर्चेत घेण्यात यावा.

**उपसभापती** : ठीक आहे.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

पृष्ठ क्रमांक 16, बाब क्रमांक 24, गृह विभाग - ता.धारुर ,जिल्हा बीड याठिकाणी पोलीस स्टेशन अस्तित्वात आहे. परंतु तेथील पोलिसांसाठी निवासस्थाने नाहीत. यासंदर्भातील निवेदन मंत्रिमहोदयांना दिलेले आहे. तेव्हा माझी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, धारुर तालुक्यात पोलिसांसाठी चांगल्या पध्दतीची निवासस्थाने बांधण्यात यावीत.

बीड जिल्हयातील आंबेजोगाई तालुक्यातील पोलीस निवासस्थानांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. बीड शहरातील बालेपेरी भागात पोलीस निवासस्थाने आहेत. त्या निवासस्थानांची देखील अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. त्या निवासस्थानांमध्ये कोणी राहू शकणार नाही इतकी वाईट अवस्था आहे. तेव्हा माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे त्याठिकाणी पोलिसांसाठी चांगली निवासस्थाने बांधण्यात यावीत.

पृष्ठ क्रमाक 29, बाब क्रमांक 52 - अप्परकुंडलका नदीमुळे रुई गाव पूर्णपणे पाण्यात जाते.ज्याठिकाणी त्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे. ज्याठिकाणी जलसाठा आहे त्या जलसाठ्यापासून फक्त 20 फूट अंतरावरील जागा पुर्नवसनासाठी घेतली जात आहे आणि हे सर्व तेथील काही स्थानिक नेत्यांच्या आग्रहावरुन केले जात आहे. या संदर्भात मंत्रिमहोदयांकडे अर्ज दिलेले आहेत. तसेच प्रशासनाकडे देखील अर्ज दिलेले आहेत. रुईमध्ये गायरान जमीन शिल्लक असताना जाणीवपूर्वक राजकीय द्वेषापोटी तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी बळकाविण्याचा घाट केला जात आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यानंतर एक बैठक झाली. त्या बैठकीत प्रोसिडींग्ज झाले ते बदलून श्री.नाईक,जिल्हाधिकारी यांनी निवृत्त होताना स्थानिक आमदारांच्या दबावाला बळी पडून



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..........

"ग्रामसभेचा जो निर्णय होईल त्या पध्दतीने पुनर्वसन करावे" अशाप्रकारचे प्रोसिंडीग्ज करुन घेतले. ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. रुई गावाचे पुनर्वसन कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध असलेल्या जागांवर झाले पाहिजे. अन्यथा जी.आर.च्या विरोधात ती कृती होईल. 50 मीटरच्या आत पुनर्वसन कसे करता येईल ? तेव्हा या प्रकरणी शासनाने गंभीरपणे पाहण्याची आवश्यकता आहे.

पृष्ठ क्रमांक 69, बाब क्रमांक 101- तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याचा शासनाचा 1996 चा जी.आर.आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील काही तालुक्यांमध्ये क्रीडा प्रशिक्षण केंद्रे सुरु झालेली आहेत. ज्या तालुक्यांमध्ये अशाप्रकारची क्रीडा केंद्र सुरु झालेली आहेत त्याठिकाणी वर्ग-2 अधिकारी नेमावा असा निर्णय झालेला आहे. परंतु त्याठिकाणी वर्ग-2 अधिकाऱ्यांचे पद भरलेले नाही. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, ज्याठिकाणी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र सुरु झालेली आहेत त्याठिकाणी वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांची पदे भरण्यात यावीत. कारण खेळाचा अधिकार फक्त शहरी भागातील लोकांना आहे असे नव्हे तर तो ग्रामीण भागातील लोकांना सुध्दा आहे.

पृष्ठ क्रमांक 59, बाब क्रमांक 102 - बीड येथील स्टेडीयममध्ये स्वीमिंग पूल बांधण्याचा निर्णय झालेला आहे. हा स्वीमिंग पूल पहिल्या मजल्यावर करण्याऐवजी तो दुसऱ्या मजल्यावर करण्याचा निर्णय झाला. या स्वीमिंग पुलाची उंची व रुंदी किती असावी यामध्ये स्वीमिंग पूलाचे काम अडकले आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती .उषा दराडे ...

या निमित्ताने मी शासनाला सांगू इच्छिते की, हा स्वीमिंग पूल ताबडतोब पूर्ण कसा करता येईल या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत.

सभापती महोदय, यानंतर मला बाब पान नंबर 141 बाब क्रामंक 171 संबंधी बोलावयाचे आहे .बीड जिल्हयात काही नवीन तालुके निर्माण करण्यात आले आहे. एका जिल्हा न्यायालयाचे तीन ॲडिशनल कोर्ट झालेले आहेत. आंबेजोगाई , माजलगाव ,परळी येथे ॲडिशनल न्यायालय सुरु करण्यात आले आहे. आंबेजोगाई येथील ॲडिशनल न्यायालय पुरेसे नाही तेथे न्यायाधीशांना राहण्यासाठी जागा नाही तेव्हा आंबेजोगाई येथे नवीन न्यायालयाची इमारत बांधणे आणि तेथे न्यायाधीशाना राहण्यासाठी निवासस्थान बाधणे ही काळाची गरज आहे. माजलगाव येथे ॲडिश्नल कोर्ट नव्याने सुरु करण्यात आलेले आहे. पूर्वी जेथे तालुका कोर्ट होते तेथे हे ॲडिशनल कोर्ट सुरु करण्यात आलेले आहे. ही जागा अत्यंत अपुरी आहे त्याचप्रमाणें ही इमारतसुध्दा मोडकळीस आलेली आहे. तेव्हा माजलगाव येथील तालुका कोर्ट आणि ॲडिशनल डिस्ट्रीक्ट कोर्ट या दोन्ही इमारतीचे बांधकाम त्वरित करण्यात यावे तसेच तेथील न्यायाधीशांना राहण्यासाठी निवासस्थानाचे बांधकामसुध्दा त्वरित करण्यात यावे. परळी नगरपरिषदेच्या रेस्ट हाऊसच्या इमारतीमध्ये परळी येथे न्यायालय भरविण्यात येते. ती इमारत पूर्णपणे गळत आहे त्यामुळे दुस-या इमारतमध्ये न्यायालय शिफट केले नाहीतर पुढच्या वर्षी न्यायालयाचे रेकॉर्ड पूर्णपणे भिजण्याची शक्यता आहे. गोदावरी खोरे विकास महामंडळ आणि जलसंपदा खात्याचे मी प्रथम आभार मानते . त्यांनी परळीचे सिंचन भवन न्यायालयाला भाडयाने देण्याचा निर्णय घेतला आहे. पाच सहा महिन्या पूर्वी त्यांनी हा निर्णय घेतला असून इमारतीचा ताबा दिला आहे परतु इमारतीच्या अंतर्गत दुरुस्तीच्या कामा साठी 45 लाख रुपये खर्च अपेक्षित आहे हा खर्च करण्याच्या संदर्भात जिल्हा न्यायाधीश बीड यानी उच्च न्यायालयाकडे मागणी केली आणि त्यांनी विधी व न्याय विभागाकडे मागणी केली होती परंतु 45 लाख् रुपये अजूनही देण्यात आलेले नाहीत दुस-या जिल्हयाचा अखर्चित असेल तर तो बीड जिल्हयाला दिला जाईल असे उत्तर विधी व न्याय विभागाकडून दिले गेले आहे. माझी शांसनाला अशी विनंती आहे की, त्या निधीची वाट न पहाता 45 लाख रुपये शासनाने तातडीने उपलब्ध करुन द्यावेत आणि परळी येथील सिंचनभवनाच्या इमारतीची दुरुस्ती करुन तेथे न्यायालय शिफ्ट करण्याची परवानगी द्यावी.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती .उषा दराडे ...

सभापती महोदय, केज वडवणी आणि धारुर हे नवीन तालुके झाले असून त्या ठिकाणी नवीन न्यायालये झालेली आहेत त्या ठिकाणी न्यायाधीशांचे निवासस्थान आणि इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.

सभापती महादेय, पान क्रमांक 206 बाब क्रमांक 272 संबंधी मला बोलावयाचे आहे. अनेक वेळा यासबंधी मागणी करण्यात आलेली आहे. उस्मानाबाद बीड रस्ता गावाच्या मध्य भागातून जातो त्यामुळे बांधकाम खात्याशी सुध्दा त्याचा संबंध येतो,तेथील रिंगरोडसाठी मदत करावी आणि बीड मधील नागरिकांची गैरसोय दूर करावी अशी बीड मधील नागरिकांनी अनेकदा मागणी केलेली आहे.नगरविकास मंत्र्यांना माझी विनती आहे की त्यांनी या रस्यासाठी पुरेसा निधी द्यावा

सभापती महोदय, त्यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. बीड शहरात डेंग्यूचे 18 रुग्ण आढळले आहेत तेथे मलेरियाची साथ आहे, त्याचबरोबर चिकनगुनिया आणि काविळची साथ आहे बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी माझ्या इतिहासात मी आमदार असतांनासुध्दा फोनवर किंवा कार्यालयामध्ये मला कधीही भेटत नाहीत तेव्हा त्या मुख्याधिका-यांची बदली करण्यात यावी आणि प्रशासनाला ताकीद देण्यात यावी. बीड जिल्हयात मोठया प्रमाणावर मच्छर आहेत घरामध्येहिट मारल्यानंतरसुध्दा मच्छरांमध्ये रेझिस्टन्स पॉवर वाढल्यामुळे हे मच्छर घराबाहेर जात नाही.तेव्हा तेथील आरोग्याच्या संदर्भात लक्ष देण्यासाठी शासनाने त्याना सूचना द्याव्यात.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 274 पान नबर 207 संबंधी मला बोलावयाचे आहे परळी येथील पशुवैद्यकीय दवाखन्याची कंपाऊन्ड वॉल बांधण्यासाठी 20 लाख रुपये देण्यात आले आहेत असे एका तारांकित प्रश्नाला उत्तर देण्यात आले होते. परंतु अजूनही हे पैसे दिले गेले नाहीत तेव्हा हे पैसे त्वरित देऊन परळी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची भिंत त्वरित बांधण्यात यावी अशी मी विनंती करते व माझे भाषण संपविते.धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ( विधान सभेने निवडलेले ) सभापती महोदय, सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पान नंबर 32 बाब क्रमांक 47 संबधी मला प्रथम बोलावयाचे आहे. रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यातील आरे खूर्द या गावात दरड कोसळली होती या दरडग्रस्त गावातील समस्येसंबंधी मी या ठिकाणी अनेकदा बोललो आहे . 2006 साली या गावातील दरडग्रस्ताना दुसरीकडे जागा देण्यासबंधी सातत्याने सभागृहात आश्वासने देण्यात आली आहेत परंतु अजूनही त्याची पूर्तता करण्यात आली नाही गेल्या अनेक वर्षा पासून अजूनही ही पूर्तता केली जात नाही तेव्हा दिलेल्या आश्वासनाच्या संदर्भात त्वरित पूर्तता करण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 96 पान नंबर 64 सबंधी बोलावयाचे आहे. शिक्षण् संचालकाच्या आस्थापनेवर गट क आणि ड ची रिक्त पदे भरण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे. त्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, रायगड जिल्हा परिषदे मार्फत शिक्षण सेवकाची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे जवळजवळ 2500 बी.एड. अर्हताधारक उमेदवारांची मुलाखत घें्ण्यात आली असून फक्त 21 स्थानिक उमेदवारांना बोलाविण्यात आले आहे. ..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

गेल्या महिन्यात मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन स्थानिकांना 80 टक्के प्राधान्य दिले आहे. परंतु या ठिकाणी 2500 पैकी 21 परीक्षकांना बोलाविले आहे त्यामुळे येथे भरपूर गोंधळ झाला. लोकांनी त्या विरोधात आंदोलन केल त्यामुळे ही प्रक्रिया पुन्हा झाली पाहिजे आणि त्यात स्थानिकांना प्राधान्य दिले गेले पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 206, पृष्ठ क्र.179, अन्न व नागरी पुरवठा विभाग - रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यामध्ये अन्न व नागरी पुरवठ्यामध्ये बराच घोटाळा झालेला आहे. आता या विभागाला नवीन मंत्री आलेले आहेत, ते ताज्या दमाचे आहेत म्हणून मी त्यांना या निमित्ताने विनंती करतो की, ज्या गावची लोकसंख्या एक हजार आहे तेथे एक हजार लोकांना रॉकेल दिले पाहिजे पण त्याठिकाणी दोन हजार लोकवस्ती असल्याचे दाखवून रॉकेल वितरित होते. त्या ठिकाणी खोटी कार्डे देऊन आणि दाखवून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. त्या ठिकाणी महिन्यामध्ये 15-20 रॉकेलचे टँकर्स विकले जातात. त्याबद्दल मी तक्रार करून कलेक्टरकडे माहिती मागविली तरी ती मिळत नाही. त्या ठिकाणी अधिकारी वर्ग पूर्णत: दबावाखाली आहे. त्यामुळे याबाबत उच्च पातळीवरून चौकशी होऊन योग्य लाभार्थींनाच रॉकेलचे वाटप दिले गेले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती मा. रामनाथ मोते )**

सभापती महोदय, बाब क्र.182, पृष्ठ क्र.162, ऊर्जा विभाग - आता या ठिकाणी माजी ऊर्जा मंत्री उपस्थित आहेत. गेल्या वेळेस देखील मी या संबंधात बोललो होतो. तालुकानिहाय मीटर रीडींग होते परंतु ज्या ठिकाणी मोठ्या कंपन्या, बँका आहेत तेथे त्यांना मीटर रीडींग करून बिले दिली जात नाहीत. चोंडी येथे रायगड जिल्हा बँकेची शाखा आहे, तेथे दोन कॉम्प्युटर्स चालतात पण तरीही तेथे दोन लाख रूपये बिल आले. या बाबतीत सातत्याने तक्रारी केल्या पण पहिल्यांदा बिल भरा आणि मगच तुमच्या तक्राराची दखल घेऊ असे अधिकारी सांगतात. मात्र प्रत्यक्षात काहीही दखल घेतली जात नाही. तेथील देवीचा पाडा आणि चोडी येथील बँकेच्या शाखा आहेत तेथे अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणात बिले येत आहेत. त्याबद्दल बँकेचा चेअरमन म्हणून आणि तेथील स्थानिक आमदार म्हणून देखील मी तक्रार केली तरी अधिकारी बेपर्वाईने उत्तरे देत असतात. ... सभापती महोदय, या ठिकाणी ऊर्जा विभागासंबंधात मी बोलत असताना संबंधित

..... इ 2 ...

श्री.जयंत प्र.पाटील...

विभागाचे कोणी मंत्री येथे उपस्थित असल्याचे दिसत नाही वा अन्य कोणी मंत्री मुद्दे टिपून घेत असल्याचे दिसत नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. कदाचित माजी ऊर्जा मंत्री ऊर्जा विभागासंबंधीचे मुद्दे टिपून घेत असतील असे मी समजतो.

सभापती महोदय, बाब क्र.334, पृष्ठ क्र. 268, सहकार विभागाच्या पूरक मागणीवर मला आता बोलावयाचे आहे. सभापती महोदय, राज्यातील कर्जदार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची केंद्र सरकारची योजना झाल्यानंतर आम्ही राज्य सरकारतर्फे योजना देऊ असे मागील पावसाळी अधिवेशनात मागील मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. पण जवळपास 39 लाख शेतकरी अजूनही या योजनेपासून वंचित आहेत. 1997 पासूनचे जे थकबाकीदार आहेत त्यांना माफी देण्याचे आश्वासन दिले होते पण त्याबाबतही अद्याप कार्यवाही झालेली नाही. सभापती महोदय, मच्छिमार आणि बलुतेदारांना देखील यामध्ये समाविष्ट करून घेण्यात यावे अशी मी सातत्याने मागणी केली आहे आणि आताही तिचा पुनरूच्चार करतो. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एफ 1 ...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 175 वरील बाब क्र. 202 मध्ये जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अनुदानाच्या थकबाकीचे प्रदान करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. याबाबत मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, रायगड जिल्हा परिषदेचे मुद्रांक शुल्काचे 70 कोटी 11 लाख 6 हजार एवढे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे. माननीय अर्थमंत्री मुद्रांक शुल्काची वसूली करतात परंतु ती रक्कम जिल्हापरिषदेला देत नाहीत. सन 2002 ते 2008 पर्यंत 1 टक्क्याप्रमाणे 117 कोटी 48 लाख 75 हजार रुपये शासनाला प्राप्त झाले, त्यापैकी 47 कोटी शासनाने जिल्हा परिषदेला दिले. आणि अजून 70 कोटी 11 लाख 6 हजार रुपये शासनाकडे बाकी आहेत. आपणाकडे जर देण्यासाठी पैसे नसतील तर माझ्याकडे मागा मी आपणास पैसे देतो. परंतु जिल्हा परिषदेचे हे पैसे जिल्हा परिषदेला ताबडतोब दिले पाहिजेत.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 73 वरील बाब क्रमांक 112 मध्ये राज्यातील नगरपरिषदांना सहायक अनुदान देणे याकरिता मागणी करण्यात आली आहे. यानिमित्ताने मी शासनाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, मुरुड नगरपालिकेने दिवा-बत्ती वाढीव कर आकारणी केली आहे. मुरुड नगरपालिका ही एक लहान "क" वर्ग नगरपालिका आहे. वाढीव कर आकारणीला तेथील जनतेचा विरोध आहे व आमसभेने देखील विरोध केला आहे. तेव्हा मुरुड नगरपालिकेच्या वाढीव कर आकारणीला शासनाने मान्यता देऊ नये अशी मागणी करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 8 वरील बाब क्रमांक 9 मध्ये हैद्राबाद मुक्ती संग्रामात रझाकारांच्या अत्याचाराने पीडित ग्रामस्थांना वित्तीय सहाय्य देणे याकरिता मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, या मागणीच्या निमित्ताने शासनाच्या हरवलेल्या संवेदनाचे हे एक अत्यंत उग्र असे उदाहरण मी आपणास देतो. तसेच, यानिमित्ताने सन्माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने आम्ही आमच्या मागण्या करतो, विचार मांडतो त्याची आपण नोंद करुन घेता. परंतु उत्तराच्या भाषणामध्ये आम्ही विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे न देता दोन वाक्यामध्ये भाषण पूर्ण करुन माझ्या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करुन भाषण संपविता. सभापती महोदय, आम्ही याठिकाणी बोलत असतांना जे प्रश्न उपस्थित करतो त्यांची उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजेत अशी आमची अपेक्षा असते. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण आमच्या प्रश्नांना उत्तरे दिली नाहीत तर आपली सुटका होणार नाही. एवढे आपण लक्षात ठेवावे. नाहीतर या चर्चेचा काहीही उपयोग होणार नाही.

सभापती महोदय, मी नम्रपणे शासनाला विचारु इच्छितो की, हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये रझाकारांच्या अत्याचार पीडित ग्रामस्थांमधील 450 कुटुंबाना मदत देण्यासंदर्भात मी वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असतांना मागणी केली होती. याठिकाणी सन्माननीय मंत्री श्री. राणा जगजितसिंह पाटील उपस्थित आहेत त्यांना याची कल्पना असावी. देवधानोरा, नांदगाव आणि चिखली या तीन गावामधील जळीत कुटुंबांना मदत देण्याबाबत मागणी केली होती. दिनांक 22 मे 1948 मध्ये ही तीन गावे रझाकारांच्या अत्याचारामध्ये बेचिराख झाली. या तीन गावातील 4 माणसे मृत्युमुखी पडली. जे लोक घराला कडी लावून आतमध्ये बसले ते जीवंत जळाले. रझाकार आले असे समजल्यानंतर बाकीची माणसे आपली भांडी-कुंडी टाकून शेताकडे पळाली. संपूर्ण गाव बेचिराख झाले. या मागणीचा पाठपुरावा 1960 साली ग्रामपंचायत प्रस्थापित झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रितसर करण्यात आला. परंतु शासनाकडून त्यांना कोणत्याही प्रकारची मदत देण्यात आली नाही. याबाबत गेल्या पाच-सहा वर्षापूर्वी या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्यसेनानी श्री.विजयसिंह काब्रा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. त्या समितीचा अहवाल आल्यानंतर मदत देण्यात येईल

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

असे शासनाने सांगितले. त्यानंतर काब्रा समितीने लोकांच्या मुलाखती घेऊन सुरुवातीला 50 स्वातंत्र्यसैनिक जाहीर केले. त्याव्यतिरिक्त समितीने अजून 135 स्वातंत्र्यसैनिक जाहीर केले व तसा अहवाल दिला.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पण आजपर्यंत त्यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून मान्यता मिळालेली नाही, त्यांना एक दमडीही दिली नाही. स्वातंत्र्य सैनिकांचे अनुदान मिळालेले नाही. जळीत गावासंबंधी समिती नेमली परंतु त्या गावक-यांची किती अवहेलना चालविली आहे, स्वातंत्र्य सैनिकांचा सरकारला विसर पडलेला आहे इतके संवेदनाहीन सरकार आहे. त्याचे कारण काय आहे ते मला कळत नाही. 3 गावांसंबंधी काब्रा समिती नेमली होती त्या समितीच्या अहवालाकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. 1948 साली घराची किंमत 5 रुपये असेल, 10 रुपये असेल असे समजा. आज त्यांना मदत दिली जात आहे त्यावेळच्या किंमती आणि आजच्या किंमतीची तुलना करता त्यांना दिली जात असलेली मदत योग्य आहे काय याचा शासनानेच विचार करावा. 1948 साली एक तोळा सोन्यासाठी 70, 75 रुपये द्यावे लागत होते, आता 14,500 रुपये द्यावे लागतात. या किंमतीची तुलना केली तर हे कोणत्या लॉजिकमध्ये बसते त्याचा खुलासा करण्यात यावा. त्या गावामध्ये लोकांच्या 3 पिढया गेल्या आहेत. एवढी वर्षे त्या लोकांवर रझाकारांनी त्यांच्यावर अत्याचार केले, अत्याचारामध्ये पिचलेल्या लोकांना न्याय देणारे सरकार संवेदनशील आहे असे म्हणता येते काय ? शासन त्या लोकांना 2 लाख रुपयांची मदत देणार आहे ती चुकीची आहे. सध्या त्यांना 2 लाख रुपये द्यावेत आणि पुन्हा मूल्यांकन करुन जे रझाकारांच्या विरोधात लढले आहे, ज्यांची घरे बेचिराख झालेली आहेत, उद्ध्वस्त झालेली आहेत त्यांचा स्वातंत्र्य सैनिक म्हणून सन्मान करावा. आतंकवादी हल्ल्याला जबाबदार असलेल्या अधिका-यांना वाचविण्यासाठी शासन धडपड करीत आहे, तशी धडपड या स्वातंत्र्य सैनिकांसाठीही दाखवावी. 1994 सालच्या कॅम्पमध्ये वेगवेगळया मंडळींनी सहभाग घेतला होता त्यांचा आदर करावा, त्यांना मदत करावी. स्वातंत्र्य सैनिकांची घोषणा करावी, काब्रा समितीच्या अहवालाचा आदर करावा. सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्री महोदयांनी या मागणीसंबंधी जरुर निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 16 वर मी माझे विचार मांडणार आहे. गुंगीकारक औषधिद्रव्ये व मन:प्रभावी अंमली पदार्थ यांची बेकायदेशीर वाहतूक रोखण्यासाठी अंमलबजावणी पथकांचे बळकटीकरण करण्यासाठी राज्याला सहाय्य देणे या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.दिवाकर रावते.....

मागणीखाली केंद्र सरकारने 2008 या वर्षामध्ये रुपये 11,60,000 एवढी रक्कम मंजूर केली आहे. हा पैसा केंद्र सरकारने दिलेला आहे. आपल्या राज्यामध्ये अंमली पदार्थ येत आहेत. आतंकवाद्यांचा मूळ गाभा या अंमली पदार्थांच्या विक्रीतून तयार होतो हे जगजाहीर आहे. चरस, अफू, गांजा यांच्या विक्रीतून 18 कोटी रुपयांचा मास्टर प्लॅन तयार करुन जगाला उद्ध्वस्त करण्याचे त्यांचे मनसुबे होते हे 3 दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात आले होते. यासंदर्भात सत्ताधारी पक्षाचा नाकर्तेपणा सदनाच्या माध्यमातून समोर आलेला आहे. सरकारकडून कर्तव्यात किती कसूर केली जात आहे ते दिसून आले आहे. याचे कारण असे की, सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी कालच या सभागृहामध्ये यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याचे उत्तर आले नाही म्हणून ती लक्षवेधी सूचना रोखून ठेवलेली आहे. त्या लक्षवेधी सूचनेचा विषय असा होता की, "राज्यात रिसॉर्ट तसेच पबमध्ये सर्रासपणे अंमली पदार्थांचे सेवन करुन रेव्ह पार्ट्यांचे आयोजन करण्यात येत असल्याचे नोव्हेंबर, 2008 मध्ये उघडकीस आलेली धक्कादायक माहिती" इतर सर्व त्यात नमूद केले होते. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये खुले आम अंमल पदार्थांची विक्री होत आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी देखील ही बाब सभागृहात उपस्थित केली होती. अनेक ठिकाणी रेव्ह पार्ट्या आयोजित केल्या जातात, अंमली पदार्थांचा सर्रास वापर होत असल्याचे या मागणीद्वारे सिध्द होत आहे. या मागणीमुळे शासनाची अब्रू वेशीवर टांगण्याचे काम झाले असल्याचे माझे मत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:35

(श्री. दिवाकर रावते...)

आम्हाला हे समजले पाहिजे की, आतंकवादाला निर्बंध घालण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध होणार आहे. त्याप्रमाणे ह्या अंमली पदार्थाच्या ज्या बाजारपेठा आहेत त्यांच्यावर निर्बंध कसे आणणार आहात ? केन्द्र सरकारचे हे पैसे आपण वापरणार आहात. म्हणून त्यासंबंधीची माहिती आम्हाला मिळणे आवश्यक आहे.

पान क्रमांक 19 वरील बाब क्रमांक 22 मध्ये विविध पोलीस वाहनांचे सांगाडे तयार करण्यासाठी आणि संगणक खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मागील पुरवणी मागण्यामध्ये आपण पोलिसांचे गणवेश आणि अन्य साहित्य खरेदी करण्याकरिता तरतूद केली होती. परंतु ते पैसे वापरलेच नाहीत. काल माननीय गृह मंत्र्यांनी पैसे वापरले असल्याचे आणि त्याचा संपूर्ण तपशील असल्याचे सांगितले. आताचे गृहमंत्री हे त्यावेळी वित्त मंत्री होते. पोलिसांचे बूट, कपडे आणि अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी 3.80 कोटीची मागणी या सभागृहामध्ये मंजूर करुन घेतलेली असताना तो निधी अजूनही वापरण्यात आला नाही. सभागृहामध्ये मागणी मंजूर करुन घ्यायची आणि ती वापरायची नाही याला कोण अधिकार जबाबदार आहे ?आता माझ्याकडे या संबंधीचे टाचण नाही. ते मिळाल्यानंतर मी जरुर माननीय मंत्री महोदयांना यासंदर्भात पत्र लिहून कळवीन. या सभागृहामध्ये मागणी मंजूर करुन घेतल्यानंतर अर्थ खात्याच्या संबंधीत अधिका-यांनी ती वापरली नसेल तर त्या अधिका-यावर आपण कारवाई करणार आहात की नाही हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 19 वरील बाब क्रमांक 23मध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व दहशतवादी विरोधी पथकासाठी विविध साधनसामग्री व शस्त्रे खरेदी करण्यासाठी 2007-08 या वर्षात आवश्यक ती तरतूद करण्यात आली होती. परंतु 2007-08 यावर्षात खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. संपूर्ण देशामध्ये आतंकवादाचा विषय चर्चिला जात आहे. टी.व्ही.वर कोणतेही चॅनल लावले तरी आतंकवादासंबंधीचे चित्रीकरण दिसते. आमचे हे सरकार संवेदना हरवलेले सरकार आहे हे सांगताना मला अतिशय खेद होतो. काल माननीय गृह मंत्री श्री. जयंत पाटील सांगत होते की हे पैसे वापरलेले आहेत आणि या ठिकाणी बाब क्रमांक 23मध्ये असे छापून आलेले आहे की हे पैसे वापरलेले नाहीत. राज्यातील दहशतवादाचा सामना

..2..

(श्री. दिवाकर रावते...)

करण्यासाठी रु. 2,83,28,377/- इतकी तरतूद करण्यात आली होती. ही छोटी तरतूद नव्हती. वेळेवर ही साधनसामग्री पोलिसांना न पुरविल्यामुळे आमच्या पोलिसांना आतंकवाद्यांशी नि:शस्त्र सामना करावा लागला याची जबाबदारी आपण कोणत्या अधिका-यावर टाकणार आहात ? माझे सरकार हे संवेदना हरवून बसलेले आहे. हे अधिकारी कोण लागतात ? त्यांना काय देणे-घेणे आहे ? माननीय मुख्यमंत्र्यांची मुलाखत मी वाचली. ते असे म्हणाले की, आम्ही राज्यकर्ते आहोत, आम्ही केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करणे हे अधिका-यांचे काम आहे.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री. भोगले 10:40

श्री.दिवाकर रावते...

पोलिसांसाठी अत्याधुनिक शस्त्रे खरेदी करण्यासाठी 2.33 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, ती तरतूद अडविणारे अधिकारी कोण आहेत याचा शोध घेऊन त्यांचे विरुध्द कारवाई केली गेली पाहिजे. आतंकवादा विरुध्द लढण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रे खरदी करावयाची होती, परंतु ती घेतली नाही ही अतिशय दुर्देवी बाब आहे. ही शस्त्रे खरेदी करण्यात आली नाहीत असे सरकारने पुरवणी मागण्यात नमूद केले आहे. अत्याधुनिक शस्त्रे खरेदी करण्यासाठी 2.33 कोटी रुपयांची तरतूद असतानाही शस्त्रे कोणत्या अधिका-यांनी खरेदी केली नाहीत या गोष्टीचा खुलासा सभागृहात झाला पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 19, बाब क्रमांक 39, महसूल प्रशासनाचे बळकटीकरण करणे यासाठी पुरवणी मागणी सभागृहात मांडण्यात आली आहे. महसूल विभागास तीन वर्षापूर्वी एक अर्ज दिलेला होता. त्या अर्जाची प्रत घेऊन मी जिल्हाधिकारी यांना भेटलो. मंत्रालयातील महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु महसूल विभागाचे अधिकारी मला जागेवर भेटले नाहीत. एका प्रॉपर्टीचे सब डिव्हीजन झालेले आहे मी 1976 साली शिक्क्यानिशी असलेली सर्व संबंधित कागदपत्रे महसूल विभागाच्या अधिका-यांना सादर केलेली आहेत. त्या प्रॉपर्टीचा टॅक्स भरला नाही म्हणून महसूल विभागाचे अधिकारी त्या प्रॉपर्टीचा लिलाव करण्यासाठी दरवाज्यासमोर येऊन उभे राहिले. सदर प्रॉपर्टीचा टॅक्स भरलेला आहे त्यासंबंधीच्या पावत्या महसूल अधिका-यांना दाखविल्या. एक डिव्हीजन प्रॉपर्टी आहे आणि दुसरी आमच्या एका शाळेची प्रॉपर्टी आहे. त्या दोन्ही प्रॉपर्टींचे टॅक्सचे पैसे भरलेले आहेत. परंतु त्या प्रॉपर्टींचे तुमच्याकडे सब डिव्हीजन झाल्यामुळे त्या प्रॉपर्टीवर पुन्हा टॅक्स लावून तो टॅक्स भरला नाही म्हणून विभागाचे अधिकारी त्या प्रॉपर्टीचा लिलाव करण्यासाठी वाजत गाजत प्रॉपर्टीच्या ठिकाणी आले. आम्ही टॅक्स भरुनही महसूल विभागाचे अधिकारी प्रॉपर्टीचा लिलाव करण्यास निघाले आहेत. मी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात गेलो, 1976 चे शिक्क्यानिशी असलेल्या सर्व कागदपत्रांचा संच त्यांना पुन्हा सादर केला. ती कागदपत्रे व अर्ज करुन जवळपास चार वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. परंतु त्याबाबतीत अजून काहीही कार्यवाही शासनाकडून केली गेलेली नाही. यानंतर मी या गोष्टीचा खोलात गेलो. मी संपूर्ण महाराष्ट्राच्या संदर्भात बोलू इच्छित नाही. मुंबई शहराच्या बाबतीत मी बोलणार आहे. महसूल विभागात फार मोठया प्रमाणांत अंधाधुंदी चाललेली आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

महसूल विभागाच्या एकाच अधिका-याकडे चार चार ठिक्‍ाणचे चार्ज देण्यात आलेले आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार मोठया प्रमाणात वाढत चालला आहे. नगर भूमापन विभागाचे मुंबई शहरात कुलाबा ते माहिम- सायन पर्यंत 1 ते 19 भाग आहेत. नगर भूमापन विभागातील 1 ते 19 भागात जवळपास 11 पदे रिक्त आहेत. आतापर्यंत ती रिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत. नगर भूमापन अधिका-यांची 2 पदे रिक्त आहेत. त्या ठिकाणी प्रभारी अधिकारी नेमलेले आहेत. मुंबई शहराचे दुर्देव असे आहे की, मुंबई जिल्हाधिकारी कार्यालय आणि नगर भूमापन कार्यालय यांचेकडे मुंबई शहराचा जमिनीचा नकाशा आजही उपलब्ध नाही. मुंबई शहराचा नकाशा तयार करुन घ्यावा यासाठी गेल्या चार पाच वर्षापासून पाठपुरावा केला जात आहे. मुंबईतील अनेक नागरिकांनी याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय आणि नगर भूमापन अधिकारी तक्रारी यांच्याकडे केलेल्या आहेत. नगर भूमापन विभागात जागा रिक्त ठेवण्यात आलेल्या आहेत, त्या जागा भरल्या जात नाहीत. ज्या जागा भरल्या आहेत त्यात कोणी क्वॉलिफाईड नाही. मुंबईतील एखाद्या जमीन मालकाने सांगितले की, माझ्या जागेचा सर्व्हे करुन द्यावा. तर या कार्यालयाकडे जमिनीचा सर्व्हे करणारे फक्त दोनच अधिकारी कार्यरत आहेत. इतर अधिकारी पदोन्नतीने आलेले आहेत. परंतु जे पदोन्नतीने आलेले आहेत, त्यांना जमिनीचा सर्व्हे करण्याचे ज्ञानच नाही. दोनच अधिका-यांना यासंबंधीचे ज्ञान आहे, इतर अधिकारी पदोन्नतीने आलेले आहे. त्यांना जमिनींचा सर्व्हे करण्यासंबंधी काहीही ज्ञान नसल्यामुळे जमिनींच्या सर्व्हेची कामे होत नाहीत. या अज्ञानाचा बिल्डर लोक मोठया प्रमाणात घेत आहेत या गोष्टीचा तुम्हीच शोध घ्यावा. भूमी आलेखन,अभिलेखन अद्ययावत करण्यासाठी संगणकांची खरेदी करण्यासाठी तरतूद मागितली आहे आणि प्रशासनाचे बळकटीकरण करण्यासाठी तरतूद मागितली आहे. नागपूर येथील सॅटेलाईट सर्व्हे विभागास मुंबई शहराचे नकाशे बनविण्याचे काम गेल्या चार वर्षापासून दिले आहे. ते नकाशे अद्यापपर्यंत का तयार झाले नाहीत? नकाशे बनविण्यासाठी एवढा विलंब का लागतो आहे ? मुंबई शहराचे नकाशे उपलब्ध करुन देत नसल्यामुळे भ्रष्टाचारास मोठया प्रमाणात वाव देत आहात असे मला वाटते. भ्रष्टाचाराला तुम्ही किती वाव देत आहात हे तुम्ही प्रथम समजून घ्यावे. नगर भूमापन अधिकारी कार्यालयातील मुंबईतील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील पदे कधी भरुन काढणार आहात असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

कारण आता तुमची मोठी भानगड झाली आहे. महसूलमंत्र्यांनी कॅबिनेटमध्ये जी भूमिका मांडली ती विचारात घेतली पाहिजे. ते योग्यच होते. तुमचे अधिकारी अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये प्रतिनियुक्तीवर घेतले आहेत. ते परत पाठवायचे ठरविले. त्या अधिकाऱ्यांच्या हातामध्ये पुरवठा विभागाचा कार्यभार आहे. घासलेटपासून सर्व पुरवठ्यामध्ये भ्रष्टाचार केला जातो. महाराष्ट्रातील डीएसओ हे किंग आहेत. त्यांना परत पाठवायचा निर्णय तत्कालीन अन्न व नागरी पुरवठामंत्री श्री.सुनील तटकरे यांनी घेतला. अन्न व नागरी पुरवठा खात्यामार्फत भरती करण्याचे ठरविले, त्याबाबत कॅबिनेटमध्ये वाद झाला. ओढाताण चालली आहे म्हणून महसूल खात्याचे बळकटीकरण करण्याचा निर्णय घेतला असेल तर चांगली गोष्ट आहे. मी मुंबई शहराचे उदाहरण दिले. उपनगरामध्ये तीच अवस्था आहे. ग्रामीण भागात तीच अवस्था आहे. हे बळकटीकरण कसे करणार आहात? मुंबईतील रिक्त पदे तातडीने भरणार आहात की नाही? आज प्रचंड प्रमाणात महसुली उत्पन्न मिळते, किमान त्याचा तरी आदर करावा एवढी नम्र विनंती करतो.

सभापती महोदय, वन विभागाची बाब क्र.54, पृ.क्र.35 वर अहमदनगर, सांगली वन उपविभागामध्ये बांधकाम करण्यासाठी निधीची मागणी केली आहे. या संदर्भातील दुर्दैव म्हणजे शासनाच्या संवेदना का हरवल्या? कशाला 100 कोटी रुपये खर्चून महाराजांचा पुतळा समुद्रात बसवावयास निघाला आहात? कोर्टाचा निकाल आला. काय विषय आहे? सातारा वन विभागातील महाबळेश्वर येथील वनक्षेत्रात अफजलखानाच्या कबरीसंदर्भात माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.142/02, रिट पिटिशन क्र.5408 /05 दाखल झाली होती. उच्च न्यायालयाने दिनांक 3.1.2008 रोजी निर्णय दिला. या निर्णयाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या दालनामध्ये दिनांक 5 मे, 2008 रोजी बैठक झाली. या बैठकीच्या अनुषंगाने जे आदेश देण्यात आले त्याप्रमाणे नोंद घ्यावयास सांगितले. हा जो अधिकारी आहे तो अल्पसंख्याक समाजाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल याच्या मनामध्ये तीव्र चीड आहे. त्याने सरकारी दस्तऐवजामध्ये हे लिहिले आहे. हे आजच्या आज काढून त्याच्यावर कारवाई करणार आहात की नाही? सन्माननीय वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी वन खात्याच्या या अधिकाऱ्यावर ताबडतोब कारवाई करावी. याठिकाणी जातीयवाद आणणार असाल तर आम्ही तो सहन करणार नाही. त्याने काय केले? मे महिन्यात आदेश दिल्यानंतर प्रॉजेक्ट डिटेल्स लिहिले ते देखील इंग्रजीत

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

आहेत. मराठीमध्ये नोंद न करण्याबद्दल खुलासा केला पाहिजे. त्याने काय नोंद घेतली हे सांगतो. त्यात असे म्हटले आहे की, "FORM-A (Form for seeking prior Approval under section - 2 of the proposals by the State Governments and authorities). PART-1 (To be filled up by the user agency). Project Details :- i) Short narrative of the proposals and project/Scheme for which the forest land is required." त्या अधिकाऱ्याने त्यात कारणे लिहिली आहेत ती अशी आहेत की, "The proposal of project for which the forest land is required is at "Pratapgad 3543 feet above sea level, is famous in Maratha history. Early in his carrier it was the seat of Shivaji the founder of the Maratha empire, and here in 1659 he treacherously murdered Afzalkhan." त्या अधिका-याने "treacherously murdered" हा शब्द वापरला आहे. शासनाच्या दस्तऐवजामध्ये त्याने हे शब्द वापरले. शासनामध्ये कसली अवलाद आणून बसविली आहे?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

त्याच्या पुढे सुध्दा असे म्हटले आहे की, "Early in his career it was the seat of Shivaji the founder of maratha empire" शिवाजी महाराज त्याला लिहावेसे वाटले नाही. आणि अफजलखानाचा उल्लेख करतांना तो म्हणतो की, "Afzalkhan, the commander of the Bijapur army" केवढा अभिमान आहे त्या अधिकाऱ्याला अफझलखानाचा ! मी जातीय भावना भडकवू इच्छित नाही. त्यात पुढे असेही म्हटले आहे की, "The fort was designed by Shivaji in 1656 and built by Moro Trimal Pingale. The tomb, a short distance outside of the fort, marks the spot where Afzal Khan's head was buried" त्याचं मुंडकं पुरलं, असे त्याने म्हटले आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "The place (Pratapgad) has been made much easier of access by a good road. The part of the tomb otta is in Ranadvagaund F.S.No.1A. The encroachment of 80.75 sq.mt on forest land may be regularized as per Hon. High Court Bombay dated 30-01-2008" यासंबंधीचे सर्व पेपर्स मी आपल्याकडे देणार आहे, त्या अधिकाऱ्यावर कारवाई करायची की नाही हा शासन म्हणून शेवटी आपला प्रश्न आहे. पण अशा प्रकारे कागदोपत्री ज्या अधिकाऱ्याने आणले आहे त्याला तातडीने बदलण्यात यावे, अशी मी विनंती करतो. नंतर समुद्रातील स्मारक करा.

सभापती महोदय, बाब क्र. 171, पृ.क्र. 157 या पुरवणी मागणीच्या रुपाने बॉम्बे उच्च न्यायाधीशासाठी 5 मोटारींची मागणी करण्यात आली आहे. या सभागृहात मी सातत्याने आग्रही राहिलो, दिल्लीपर्यंत सुध्दा मी बॉम्बे हायकोर्टाचे नामकरण मुंबई हायकोर्ट करण्याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. सभागृहात देखील मी त्यासाठी सन 2005 मध्येच विशेष उल्लेख उपस्थित केला होता, त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही याबाबत केंद्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. केंद्रशासनाच्या कायदा विभागाने यासंबंधीचा निर्णय ताबडतोब घ्यावा अशी मागणी केल्याचे त्यांनी सन 2005 मध्ये मला सांगतले होते. मला हे जाणून घेण्याची इच्छा आहे की, बॉम्बे हायकोर्टचे मुंबई हायकोर्ट असे नामकरण करण्यासंबंधी आपल्या कायदा खात्याने कोणते प्रयत्न केले ते देखील सभागृहात स्पष्ट करावे. एरवी केंद्रशासन आपल्याला लाथा घालते

...2/-

श्री. दिवाकर रावते ........

परंतु आपलाही कुठेतरी लत्ताप्रहार झाला पाहिजे. तसेच केंद्रशासनाकडे ज्यावेळेस राज्यांच्या प्रश्नांबाबत सर्व मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली जाते त्यावेळी देखील हा मुद्दा मांडल असेलच, यासंबंधीचे स्पष्टीकरण करावे. माझी खात्री आहे की, अशा प्रकारचा प्रयत्न आपल्या राज्याच्या अडचणीबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी केला असेल. कारण ही गोष्ट शासनाला तातडीची वाटत नाही. बॉम्बे हायकोर्टचे नाव मुंबई हायकोर्ट करण्यासंबंधी सतत पाठपुरावा केल्यानंतर आणि दिल्लीकडून ते करुन घेण्यात असमर्थता दर्शविली असेल तर ती कोणाची असमर्थता आम्ही समजावयाची ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्यामुळे "बॉम्बे हाय कोर्टाचे" नाव "मुंबई हाय कार्ट" असे करावे. तसेच भविष्यात देखील "बॉम्बे हाय कोर्टाचे" नाव "मुंबई हाय कोर्टच" राहील अशी विनंती आहे.

मी आता बाब क्रमांक 173,174,175 वरील पृष्ठ क्रमांक 158 व 159 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. उच्च न्यायालयाच्या कामकाजासाठी कर्मचारी वर्ग नेमणे यासाठी लघुलेखक, टंकलेखक ही पदे भरण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मराठी लघुलेखक, मराठी टंकलेखकांची जोपर्यंत पदे भरली जात नाही तोपर्यंत मराठी भाषेला न्याय मिळणार नाही. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, महाराष्ट्रातील वकील मंडळींनी आपले दिवसाचे काम सोडून न्यायालयाचे कामकाज मराठीतून व्हावे यासाठी निदर्शने केली होती. मी स्वत: त्या ठिकाणी गेलो होतो व त्यांच्याशी चर्चा देखील केली होती. त्यामुळे आता तरी न्यायालयाचे कामकाज मराठीतून व्हावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. न्यायालयाचे कामकाज मराठीतून चालावे यासाठी घटनात्मक तरतूद आहे त्यामुळे या तरतूदी अन्वये तरी न्यायालयाचे काम मराठीतून झालेच पाहिजे. त्यामुळे न्यायालयाचे कामकाज मराठीतून होण्यासाठी आपण काय करणार आहात याची माहिती आम्हाला या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 186 वरील दाभोळ वीज प्रकल्पाच्या संदर्भात माझ ो विचार व्यक्त करणार आहे. माजी ऊर्जा मंत्री आता वित्त मंत्री झालेले आहेत. ते ऊर्जा मंत्री असतांना त्यांची विजेची भाषणे खूप ऐकलेली आहे. आज गॅसचा लपंडाव हा विजेच्या लपंडावापेक्षाही मोठा झालेला आहे. दाभोळ वीज प्रकल्पाची जादा वीज निर्मितीची क्षमता आहे परंतु असे असतांनाही या प्रकल्पाला गॅस पुरवठा होत नसल्यामुळे आपण अधिक प्रमाणात वीज निर्माण करु शकत नाही. दाभोळ प्रकल्पाला गॅस मिळत नसल्यामुळे त्या ठिकाणावरुन वीज जास्त प्रमाणात निर्माण होत नसल्यामुळे आज महाराष्ट्र अंधारात गेलेला आहे. या प्रकल्पासाठी रिलायन्स कंपनीकडून गॅस घेण्यात येईल असे आम्ही मागे ऐकले होते त्याचे काय झाले याचीही माहिती या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 213, पृष्ठ क्रमांक 187 वरील मागासवर्गीयांच्या आश्रमशाळेच्या संदर्भात या ठिकाणी विचार व्यक्त करणार आहे. आश्रमशाळेतील शिक्षक थंडी वा-यात उपोषणाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

बसलेले आहेत. शिक्षक आमदार मात्र मस्त खातात पितात परंतु हे शिक्षक मात्र थंडीवा-यात उपोषणाला बसले आहेत. या शिक्षकांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. काही उपोषण कर्त्यांना तर रुग्णालयात देखील हलविण्यात आलेले आहे त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांचे उपोषण साडविण्यासाठी उपोषण कर्त्यांकडे जावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 377, पृष्ठ क्रमांक 304 वरील मुंबई येथे अखिल भारतीय भाषा परिषद भरविण्यावर झालेल्या खर्चासाठी अतिरिक्त तरतूद करणे यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. मुंबई येथे अखिल भारतीय भाषा परिषद भरविण्यामुळे झालेल्या खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य हिंदी अकादमीने ती परिषद भरवली होती. यासंदर्भात मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण जसे हिंदी भाषेच्या परिषदेसाठी खर्च करता तसा खर्च मराठी भाषेच्या परिषदेवर, साहित्य संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्थावर होतो असे आम्हाला ऐकिवात नाही. माजी शिक्षण मंत्री श्री. पुरके साहेब मिटींगसाठी दिल्ली येथे गेले होते त्यावेळी ही बैठक इंग्रजीमध्ये झाल्यामुळे माननीय पुरके साहेबांना तो विषय कळला नाही त्यामुळे त्यांनी सर्व मराठी शाळेमध्ये एक दिवस पूर्ण इंग्रजी विषय शिकवण्याचा फतवा काढला .

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

त्यांनी स्वत: इंग्रजीचे ज्ञान मिळविण्याऐवजी मुलांवर इंग्रजीची सक्ती लादली. हे वागणे गझनीच्या महंदमासारखे आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णया संदर्भात वर्तमानपत्रात लेख लिहून आले होते. त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री काही पाहत होते की नाही ? हे बरोबर नाही.

सभापती महोदय, माझी वन मंत्री श्री बबनराव पाचपुते यांना विनंती आहे की त्यांनी माहूल गडाच्या संदर्भात एक बैठक घ्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

पृष्ठ क्रमांक 32, बाब क्रमांक 37, पूरक मागणी सी-6, महसूल व वन विभाग- औरंगाबाद, नागपूर व अमरावतील विभागातील काही जिल्ह्यांमध्ये सोयाबीन आणि इतर पिकांवर लष्करी अळ्यांनी हल्ला केल्यामुळे पिकांच्या झालेल्या हानीसाठी शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी नगदी पिके म्हणून सोयाबीनची शेती केली. परंतु लष्करी अळ्यांच्या प्रादूर्भावामुळे 70 ते 80 टक्के पिकांचे नुकसान झाले. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाची पेरणी केल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत लष्करी अळींचा प्रादूर्भाव होऊन सोयाबीनची संपूर्ण पाने खराब झाली.

सभापती महोदय, मी मराठवाड्यातील रेणापूर येथे गेलो असता तेथील शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या शेतीची पाहणी केली. एक एकरातील पीक सुध्दा शेतकऱ्यांच्या हातात पडेल नाही की नाही अशी स्थिती होती. या संकटाची चाहूल लागल्यानंतर महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, तरुण भारत या वर्तमानपत्रात स्तंभ लिहण्यात आले. या संदर्भात आम्ही तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले की, ते परदेश दौऱ्यावर आहेत. परदेशात त्यांना या संकटाची चाहूल दिल्यानंतर त्यांनी ताबडतोब पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत. कृषी विभागाने नुकसानीचे पंचानामे करुन संबंधित विभागाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना सर्व्हेक्षण करुन निधीची मागणी करण्याबाबत आदेश दिले. प्रति हेक्टरी पाच हजार रुपये व दोन हेक्टरी असल्यास दहा हजार रुपये शेतकऱ्यांना मिळणार होते. या निर्णयामुळे शेतकऱ्यांची दिवाळी चांगली जाणार असे वाटत होते. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशानुसार पंचनामा करण्याचे काम सुरु झाले. परंतु पंचनामे झाल्यानंतरही शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही. फक्त लातूर, बीड, हिंगोली व उस्मानाबाद या चार जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदान मिळाले. परंतु विदर्भातील एकाही जिल्ह्याला अनुदान मिळाले

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

नाही. आता याठिकाणी सांगण्यात आले की, हिंगोली जिल्ह्याला सुध्दा अनुदान मिळाले नाही. नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली. काही ठिकाणी पंचनामे झाले. काही ठिकाणी पटवाऱ्यांनी घरी बसून पंचनामे केले तर काही ठिकाणी माणसे लावून पंचनामे झाले. त्यामुळे पंचनाम्यामध्ये अनेक त्रुटी राहिल्या. त्यामुळे तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी फेर पंचनामा करण्याचे आदेश दिले. परंतु आजतागायत पंचनामे न झाल्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळालेले नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

फक्त दोन जिल्हयामध्ये सोयाबीनचे अनुदान देण्यात आले होते. बाकीच्या जिल्हयात हे अनुदान देण्यात आलेले नाही. माननीय कृषी मंत्र्याना मी सांगू इच्छितो की, विदर्भातील एकाही जिल्हयातील शेतक-यांना सोयाबीनचे अनुदान दिलेले नाही तेव्हा विदर्भातील सोयाबीन पिकविणा-या सर्व शेतक-यांना अनुदान देण्यात येईल अशी घोषणा त्यांनी करावी .

सभापती महोदय, यानंतर शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाची बाब क्रमांक 102 पान नंबर 66 संबंधी मला बोलावयाचे आहे. राष्ट्रीय क्रीडा व खेळ यामध्ये राज्याच्या संघानी सहभागी व्हावे यासाठी 21लाख 88 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की , कबड्डी हा राष्ट्रीय स्तरावरील खेळ आहे तेव्हा कबड्डीचे आंतरराज्जीय सामने होत असताना या कबड्डीच्या खेळाडूंना प्रवास भाडयात सवलत देण्यात येते. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र येथील कबड्डीच्या खेळाडूंना प्रवास भाडयात सवलत दिली जाते. परतु विदर्भातील कबड्डी खेळाडूंवर ही सवलत देण्याच्या बाबतीत अन्याय केला जातो. विदर्भाच्या संदर्भात तर अनेकदा अन्याय केला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील कबड्डी खेळाडू मराठवाडयात वा मुंबईत गेला तर त्याला प्रवास भाडयात 50 टक्के सवलत दिली जाते मात्र विदर्भातील कबड्डी खेळाडू मराठवाडयात वा अन्य भागात गेले तर त्यांना प्रवास भाडयात ही सवलत दिली जात नाही मागच्या अधिवेशात विदर्भातील कबड्डी खेळाडुंना अशा प्रकारची सवलत दिली जात नसल्याची बाब माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती त्यावेळी त्यांनी मला एक पत्रही दिले होते आणि घोषणाही केली होती की, विदर्भातील कबड्डी खेळाडूना प्रवास भाडयात 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेंतला आहे. अशा प्रकारची घोषणा त्यावेळी त्यांनी केली होती व मला पत्रही दिले होते परंतु अजूनही विदर्भातील कबड्डी खेळाडूंना प्रवास भाडयात 50 टक्के सवलत दिली जात नाही. माजी शालेय शिक्षण आणि क्रीडा मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी याबाबतीत मला जे पत्र दिले होत आणि जो निर्णय घेतला होता त्या निर्णयाची अंमलबजावणी अजूनपर्यत न झाल्यामुळे विदर्भातील कबड्डी खेळाडूंवर अन्याय झालेला आहे हा अन्याय दूर करुन पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र इत्यादी ठिकाणच्या कबड्डी खेळाडूना ज्याप्रमाणे प्रवास भाडयात 50 टक्के सवलत दिली जाते तशाच प्रकारची सवलत विदर्भातील कबड्डी खेळाडूंना देण्यात येणार आहे किंवा नाही याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयानी स्पेसिफिक उत्तर द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्थ्ा ) :सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाची बाब क्रमांक 203 पान ंनबर 176 संबंधी मला बोलावयाचे आहे. अहमदनगर जिल्हयातील चौडी येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मस्थळी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी 2 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे त्याबद्दल मी शासनाचे प्रथम अभिनंदन करतो. नेवासे येथे ज्ञानेश्वर मंदीर परिसराचा विकास करण्याकरता आठ वर्षा पूर्वी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात 4 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते परंतु या कामासाठी गेल्या आठ वर्षात फक्त 76 लाख रुपये देण्यात आलेले आहेत. ज्याठिकाणी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली होती त्या भागाचा पायाभूत विकास करण्यासाठी पुरेसा निधी न दिल्यामुळे तो भाग वंचित राहिला आहे ग्राम विकास मंत्री श्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी त्याभागाला भेट देऊन पहाणीसुध्दा केली होती त्यावेळी या कामाचा सुधारित आराखडा करण्यात यावा अशा सूचना संबंधित अधिका-यांना दिल्या होत्या त्यानुसार अधिका-यांनी 3 कोटी रुपयांचा सुधारित आराखडा तयार करुन शासनाकडे पाठविला होता तेव्हा या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 11:10

श्री. गडाख .....

सभापती महोदय, सहकार खात्याची बाब क्र. 341, पृष्ठ 270 या संबंधात मला बोलावयाचे आहे. सभापती महोदय, जे साखर कारखाने को-जनरेशनमध्ये जात आहेत त्यांना अंशदान देण्यासाठी म्हणून या ठिकाणी तरतूद केलेली आहे. या निमित्तने माझी आपल्याला विनंती आहे की, शासनाने या बाबत निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्रात जवळ जवळ 10 ते 11 कारखान्यांनी राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज काढून को-जनरेशन सुरू केले आहे. तेव्हा त्यांचा विचार याबाबत अगत्याने व्हावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

***

.... ओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 11:10

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्र.8, पृ.8 यामध्ये स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना निवृत्ती वेतन तसेच वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची तरतूद केलेली आहे. ही अत्यंत चांगली बाब आहे. मी या निमित्ताने आपल्याला सुचवू इच्छितो की, या सदनाचा वा खालच्या सदनाचा सदस्य असलेल्या आमदाराचा मृत्यू झाल्यानंतर त्याची पत्नी वा पतीला वैद्यकीय सेवा आता बंद झालेली आहे. कारण पेन्शनमध्ये वाढ होऊन ती 5 हजार रूपये झालेली आणि आणि वैद्यकीय सेवेची प्रतिपूर्तीची मर्यादा देखील 15 हजार रूपये होत आहे. त्यामुळे माजी आमदाराचा मृत्यू झाल्यानंतर त्यामागे असलेल्या पती वा पत्नीच्या बाबतीत वैद्यकीय सेवेची प्रतिपूर्तीची मर्यादा वाढवून त्यांनाही वैद्यकीय मदत मिळू शकेल असे आपण करावे.

सभापती महोदय, पृष्ठ 20, बाब क्र. 25, 26 - नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यासाठी 60 लाख रूपयांची आणि मुख्यमंत्री सहाय्य निधीतून 27 लाख रूपयांची पूरक मागणी येथे सादर केली आहे. या संदर्भात मला अशी सूचना करायाची आहे की, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या पोलिसांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद करीत असतानाच पोलिसांचा खबऱ्या म्हणून काम करणाऱ्याना नक्षलवाद्यांनी ठार मारल्यास त्यांच्या नातेवाईकांचाही अशा प्रकारे नुकसान भरपाई देण्याच्यादृष्टीने विचार करण्यात यावा. कारण पोलिसांना नक्षलवाद्यांचा शोध घेण्यासाठी या खबऱ्यांची अतिमहत्त्वाची भूमिका असते. याचे जीवंत उदाहरण सांगावयाचे झाल्यास गोंदिया जिल्ह्यातील चिचगड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मगरडोह येथील कुमारदिसाराम उईके हा पोलिसांचा खबऱ्या म्हणून काम करायचा. परंतु दिनांक 2 नोव्हेंबर 2000 रोजी रात्री 11 वाजच्याच्या सुमारास 13-14 नक्षलवाद्यांनी त्याची गोळ्या झाडून हत्या केली. परंतु अद्यापही त्याच्या कुटुंबियांना कोणतीही आर्थिक मदत वा त्याच्या मुलाला वा पत्नीला रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे या पुढे कोणीही पोलिसांचा खबऱ्या म्हणून काम करण्यास पुढे येणार नाही आणि म्हणूनच नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये बळी पडलेल्या पोलिसांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याचा विचार करीत असतानाच पोलिसांसाठी खबऱ्या म्हणून काम करीत असलेल्यांची नक्षलवाद्यांनी हत्या केली असल्यास त्याच्या नातेवाईकांना देखील नुकसान भरपाई देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि माझ्या या मागण्यांचा शासनाने अवश्य विचार करावा असा आग्रह धरतो.

..... ओ 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी - माननीय उपसभापती )**

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे आणि मला आता प्रथमत: विधी व न्याय विभागाची बाब क्र. 173, 174 या संबंधात बोलावयाचे आहे. विधी व न्याय विभागाचे कोणी मंत्री येथे उपस्थित असतील तर त्यांनी माझ्या बोलण्याची कृपया दखल घ्यावी. सभापती महोदय, कौटुंबिक न्यायालयाची मागणी आम्ही गेली तीन वर्षे या सभागृहात करीत आहोत. त्यानुसार अकोला आणि रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे तसेच नाशिक या चार जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालय देण्याचा निर्णय घेण्यात आला त्याचे मी स्वागत करते. परंतु सभापती महोदय, या संदर्भात माझ्या ठरावावरील चर्चेच्या निमित्ताने 22 जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालये सुरू करणार अशी घोषणा तीन वर्षापूर्वी विधी व न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर हा विभाग संबंधित मंत्र्यांकडे नसल्यामुळे सातत्याने त्याबाबत काय होत आहे याचे उत्तर मिळत नव्हते. किंबहुना विधी व न्याय विभाग गेली दोन वर्षे अदृश्यच होता असे मला वाटते. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 18 जिल्हयांमध्ये कौटुंबिक न्यायालये व्हावीत यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली. त्याचबरोबर त्या न्यायालयांकरिता इमारती आणि कर्मचारी वर्ग यांच्यासाठी देखील तरतूद करणे आवश्यक आहे. म्हणून मी या मागणीच्या निमित्ताने शासनाचे लक्ष वेधते.

सभापती महोदय, याठिकाणी वन कामगारांच्या मागण्यांबाबत निवेदन करीत असतांना माननीय वनमंत्र्यांना सांगू इच्छिते की, पंढरपूरच्या आषाढी एकादशीकरिता जशी आपली नियमितपणे वारी असते त्याप्रमाणे हे वन कामगार आपल्या दर्शनासाठी नियमितपणे वाऱ्या करीत आहेत. पंढरपूरचा विठ्ठल आपल्याला पावेल, परंतु या वन कामगारांना वन विभागातर्फे आतापर्यंत न्याय मिळालेला नाही. म्हणून ते उपोषणाला बसले आहेत. तेव्हा त्यांच्या उपोषणाच्या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी भेट देऊन त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करते. या वन कामगारांना शासनाकडून एक महिन्यापूर्वी आश्वासन मिळून देखील त्याची पूर्तता झालेली नाही. एकूण 18959 वन कामगार गेल्या 12 वर्षापासून रोजंदारीवर आहेत. त्यांच्याकरिता अर्थ विभागाकडून तरतूद होणे आवश्यक आहे. माननीय नामदार श्री. दिलीप वळसे पाटील यांच्याकडे अर्थ विभागाची जबाबदारी आली आहे. ते अभ्यास करुन खूप विस्तृतपणे सभागृहात उत्तर देतात. ऊर्जा विभागाकडून अर्थ विभागाकडे जबाबदारी आलेली असल्यामुळे त्यांचा हा अभ्यास वन कामगारांचा प्रश्न सोडविण्यास उपयोगी होईल असे मला वाटते. या मागणीच्या निमित्ताने वन कामगारांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी अशी विनंती करते.

सभापती महोदय, ग्रामविकास व पर्यटन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 305 वरील बाब क्र 379 मध्ये पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. यानिमित्ताने मला असे सुचवावयाचे आहे की, मुंबई शहरावर दहशतवाद्यांच्या झालेल्या हल्ल्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. परंतु आपण जर लांब पल्ल्याच्या रेल्वे गाडयांमधून दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे प्रवास करावयास निघालात तर मध्यप्रदेशात कोणकोणती पर्यटन स्थळे आपल्याला पहाता येतील किंवा दक्षिणेकडील राज्यांमध्ये कोणकोणती पर्यटन स्थळे पहाता येतील यांची सुंदर छायाचित्रे व त्यासंबंधीची माहिती त्या त्या राज्यातील पर्यटन विकास विभागामार्फत महाराष्ट्रातील रेल्वेच्या डब्यांमध्ये व इतरत्र प्रसिध्द केलेली असतात. इतर राज्यातील किंवा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

परदेशातील पर्यटकांना महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे पहाण्यासाठी यावयाचे असेल तर त्या पर्यटन स्थळांची छायाचित्रांसह माहिती महाराष्ट्राच्या बाहेर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. खास करुन महाराष्ट्रातील शिर्डी संस्थान, तुळजापूर-पंढरपूरची तीर्थक्षेत्रे किंवा मुंबईतील सिध्दीविनायक मंदीर, वेरुळची लेणी या तीर्थस्थळांकडे पर्यटकांचा ओढा असतो. या तीर्थस्थळांची माहिती इतर राज्यांमध्ये सुध्दा पोहोचली पाहिजे. त्याकरिता इतर राज्यातील भाषांमध्ये याबाबत आपण प्रसिध्दी द्यावी अशी या मागणीच्या निमित्ताने विनंती करते.

सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 72 वरील बाब क्र. 110 मध्ये तुळजापूर यात्रा स्थळाच्या विकासाकरिता तरतूद करण्यात आली आहे. तुळजापूर येथील तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता गेल्यावर्षी माझ्या आमदार निधीमधून मी निधी दिला होता. त्यानंतर तुळजापूरच्या तीर्थक्षेत्राच्या विकासाला सुरुवात झाल्याचे वृत्त वर्तमानपत्रामध्ये वाचले होते. मी दर दोन-तीन महिन्यांनी तुळजापूर येथे दर्शनासाठी जाते. परंतु मला कुठेही विकास कामांना सुरुवात झ ााल्याचे दिसले नाही. तुळजापूर नगरपालिकेतर्फे जाण्या-येण्याकरिता रस्ते करण्यात आले नाहीत, कुठेही स्वच्छता नाही, स्वच्छ पाणी पुरवठा होत नाही. तेथील प्रसाद खाल्ला तर पोट बिघडेल की काय अशी परिस्थिती आहे. तेव्हा तुळजापूर तीर्थक्षेत्र विकासाचा कालबध्द कार्यक्रम शासनाने केला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 305 वरील बाब क्र. 380 मध्ये नांदेड जिल्हयातील श्रीक्षेत्र माहूरगड येथे पर्यटन विकासासाठी तरतूद करण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी माहूर गडासाठी मोठी योजना जाहीर केली आहे. ग्राम विकास विभाग आणि पर्यटन विकास विभागाच्या समन्वयातून या तीर्थक्षेत्राचा विकास होत आहे. या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्थानिक महिला बचत गटाकडे प्रसाद तयार करणे आणि खाद्यपदार्थ बनविण्याचे काम तेथील सेवाभावी संस्थेला उपलब्ध करुन द्यावे अशी माझी विनंती आहे. आज रांजणगाव येथील महागणपती तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी श्रीमती कमलताई शिंदे यांच्या संस्थेमार्फत अन्नपूर्णा भोजनालय चालविले जाते. सदरहू भोजनालयाचे काम महिला बचत गटामार्फत चालविण्यात येते. याठिकाणी माननीय अर्थमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील सभागृहात उपस्थित असून त्यांना याची पूर्ण माहिती आहे. हा एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

रांजणगाव पॅटर्न म्हणून ओळखला जात असून तो जर आपण स्वीकारला तर तेथील स्थानिक पातळीवर महिला बचत गटांना रोजगार मिळेल या निमित्ताने मी या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधते.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या पृष्ठ क्र.227 वरील बाब क्र.280 मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास सहायक अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या सभागृहामध्ये माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे या प्रश्नावर पोटतिडिकीने बोलत असतात.

(यानंतर श्री.खंदारे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ श्री.सरफरे नंतर 11:20

डॉ.नीलम गोऱ्हे....

परंतु गृहनिर्माण धोरणाचे प्रतिबिंब या मागण्यांमध्ये किंवा अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. एका बाजूला आर्थिक मंदी आलेली आहे. त्यामुळे घरांच्या किंमती खाली येणार आहेत असे सर्वत्र बोलले जाते. प्रत्यक्षात स्वस्त व छोटी घरे कोठेच उपलब्ध होत नाहीत. नागरी निवारा परिषदेच्या पुरस्कर्त्या श्रीमती मृणाल गोरे आणि त्यांच्या सहका-यांनी या प्रकल्पासाठी जमीन देण्याची वारंवार मागणी केलेली आहे. परंतु या मागणीकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. 10-15 वर्षे काही रक्कम गोळा करुनही या प्रकल्पाला शासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. या मुद्याकडेही शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल, मदत व पुनर्वसन, शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. मी अनेक वेळा या सभागृहामध्ये हा मुद्दा मांडला आहे. 12 जुलै, 1993 साली झालेल्या बॉम्ब स्फोटाचा तपास करणाऱ्या पोलिसांना सहाय्य करण्याची तरतूद केलेली आहे. 1993 सालातील बॉम्ब स्फोटाचा तपास करणा-या पोलिसांना आता सहाय्य दिले जात आहे, त्यांच्या पुनर्वसनाचे पॅकेज तयार केले जाते आहे त्यामुळे मनामध्ये प्रश्न निर्माण होतात. बॉम्ब स्फोटात सापडलेल्या लोकांचे पुनर्वसन, भूकंपग्रस्त लोकांचे पुनर्वसन यासाठी जी वेगवेगळी कार्यपध्दती अनुसरली जाते, त्यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार केली जातात. परंतु आता मुंबईतील हल्ल्यामध्ये सापडलेल्या लोकांचे पुनर्वसन करण्याचा, त्यांना मदत करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या हल्ल्यात सापडलेल्या जखमींना जे.जे.रुग्णालयातून घरी जाताना 50 हजार रुपयांची मदत मिळाली आहे. त्यापैकी 16 जणांच्या घरी मी गेले होते. त्या लोकांना पुन्हा हॉस्पिटलमध्ये जाणे आणि नंतर औषधोपचारासाठी जो खर्च होतो तो या मदतीपेक्षा जास्त आहे. दुसरे असे की, असंघटित लोक जखमी झाले आहेत, त्यांच्या विम्याच्या तरतुदीबाबत शासन काय निर्णय घेणार आहे, जो मेकॅनिक असेल अशा व्यक्तीचा हात पाय तुटला असेल तर तो माणूस पुन्हा तेच काम करु शकतो किंवा नाही याचाही विचार करावा आणि जिल्हाधिका-यांकडून त्यासंबंधीची योजना राबविली जावी.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांपैकी वित्त विभाग, सामाजिक न्याय या विभागांच्या मागण्यांवर वेळेअभावी विचार मांडता येत नाही, परंतु या विभागांकडे शासनाने दुर्लक्ष न करता या विभागाद्वारे घेतलेल्या निर्णयांची चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी करावी असे सांगून मी माझे भाषण संपविते.

---------

2...

18-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.राजेन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 6 वर मी माझे विचार मांडतो. नागरी विमानचालन संचालनालयासाठी अतिरिक्त तरतूद करण्याची ही मागणी आहे. शासनाने राज्यातील विविध शहरांमधील विमानतळांसाठी पैसा मंजूर केला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील चिपी येथील विमानतळाचा प्रश्न मी सातत्याने 3 वर्षे उपस्थित करीत आहे. या विमानतळासाठी एकदा निविदा काढण्यात आली होती. या विमानतळासाठी शासनाने आवश्यक तेवढी तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे ते सांगावे.

त्यानंतर गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 17 वरील बाब क्रमांक 15 मागणीवर माझे विचार मांडतो. मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याबाबत सभागृहात दोन दिवस चर्चा झाली आहे. 1993 साली मुंबईत बॉम्ब स्फोट झाले त्याच्या तपासामध्ये जे पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते, त्यांनी जे शौर्य गाजविले त्यांना 16 वर्षांनी बक्षीस देण्याचे ठरविले आहे. हा चेष्टेचा विषय आहे. गृह विभागातील अधिकारी अशाप्रकारच्या विषयांना किती गांभीर्याने घेतात ते यावरुन दिसून येते. सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र.20, 21 द्वारे चांगल्या तरतुदी केलेल्या आहेत.

यानंतर गृह विभागाच्या बाब क्र.38 कडे मी शासनाचे लक्ष वेधतो. वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड नवीन रेल्वे मार्गाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. 2 वर्षापासून कोकणातील सर्व आमदारांनी चिपळूण ते कोल्हापूरला जोडणा-या रेल्वे मार्गाची मागणी केलेली आहे. त्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

यानंतर महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 47 वर माझे विचार मांडतो. औरंगाबाद, नागपूर व अमरावती विभागातील काही जिल्हयांमध्ये सोयाबीन आणि इतर पिकांवर लष्करी अळयांनी हल्ला केल्यामुळे झालेल्या हानीसाठी शेतक-यांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद केलेली आहे. कोकणामध्ये भात शेतीवर सुध्दा असाच रोग पडला होता. कोकणातील आम्ही सर्व आमदार कोकणातील हा महत्वाचा प्रश्न सातत्याने मांडत आहोत. त्याचप्रमाणे वणव्यामुळे बागायतींचे नुकसान होते, त्याच्या नुकसान भरपाईसाठी शासनाने तरतूद करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:25

(श्री. राजन तेली..

सभापती महोदय, पान क्रमांक 33 वरील बाब क्रमांक 51 मध्ये जंगली हत्तीच्या प्रवेशास प्रतिबंध करण्यासाठी सौर ऊर्जेचे कुंपण व हत्तींना इजा होणार नाही असे खंदक खोदणे यासाठी रु. 57.03 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. जंगली हत्तींचा प्रश्न आपण गेल्या 7 वर्षापासून सोडवू शकलो नाही. माननीय वने मंत्री श्री. बबनराव पाचपुते हे त्यासाठी प्रयत्न करीत आहेत. या जंगली हत्तींच्या आक्रमणामुळे आतापर्यन्त 12 लोकांचे बळी गेलेले आहेत. या प्राणहानी बरोबरच शेतक-यांची मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झालेली आहे. शेतकरी हवालदील झालेले आहेत. तेव्हा या जंगली हत्तींचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे की नाही हा माझा प्रश्न आहे.

पान क्रमांक 35 वरील बाब क्रमांक 55 मध्ये मृद व जलसंधारणासाठी रु.6.01 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या मृद व जलसंधारणाच्या कामांचे कोकणातील नॉर्म्स बदलण्याची आवश्यकता आहे. तसेच कोकणातील मृद व जलसंधारणाच्या कामांसाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

पान क्रमांक 46 वरील बाब क्रमांक 65 मध्ये डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठासाठी अतिरिक्त सहायक अनुदानाकरिता तरतूद केलेली आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी दापोली हे फार लांब पडते. त्यामुळे सिंधुदुर्गामध्ये एक उपकेंद्र व्हावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

पान क्रमांक 51 वरील बाब क्रमांक 81मध्ये कोकण विकास कार्यक्रमांतर्गत मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मच्छिमारांना सानुग्रह सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. कोकण विकास कार्यक्रमांतर्गत मच्छिमारांसाठी पॅकेज दिले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. या मच्छिमारांसाठी रेशनिंगवर रॉकेलचा पुरवचठा करावा अशी दोन वर्षापासून मागणी करण्यात येत आहे. ही मागणी शासनाने मान्य करावी. तसेच गुजरात सरकारने मच्छिमारांना ज्याप्रमाणे गॅसकिट बसविण्याची परवानगी दिलेली आहे त्या प्रमाणे राज्यातील मच्छिमारांना ते बसविण्याची परवानगी द्यावी अशी माझी मागणी आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली..

सभापती महोदय, सागरी मार्ग चांगल्या प्रकारे करण्याची इच्छा अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केली. हे करीत असताना प्रथम तेथील गाळ काढण्याची नितांत आवश्यकता आहे. मागील चार वर्षापासून गाळ काढण्यासाठी टेंडर काढण्यात आलेले नाही. तेव्हा हे गाळ काढण्याचे टेंडर काढावे आणि मच्छिमारांना कमी दराने कर्ज पुरवठा करुन त्यांना दिलासा द्यावा अशी माझी मागणी आहे.

पान क्रमांक 51 वरील बाब क्रमांक 82मध्ये केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत महात्मा फुले कृषी विद्यापीठाला वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. काल माननीय शिक्षण मंत्र्यांनी कोकण विभागासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापण्याबाबत निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

पान क्रमांक 95 वरील बाब क्रमांक 136मध्ये मार्ग व पुलांच्या बांधकामारिता रु.142.59 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणासाठी विशेषकरुन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील साकवासाठी या वर्षी फक्त 3 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता यासाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे. सागरी महामार्ग दोन वर्षामध्ये पूर्ण होईल असे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. आता या कामास तीन वर्षे झ ालेली असून ते निश्चित केव्हा पूर्ण होईल यासंबंधीचे नियोजन केलेले नाही. तेव्हा हा सागरी महामार्ग लवकरात लवकर पूर्ण करावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

पान क्रमांक 305 वरील बाब क्रमांक 380 मध्ये श्रीक्षेत्र माहूरगड येथे पर्यटन विकासासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पर्यटनासाठी 1 हजार कोटीचे वाढीव बजेट असल्याचे माननीय पर्यटन मंत्र्यांनी जाहीर केलेले आहे. 1997मध्ये शासनाने कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले. परंतु त्यानंतर त्याकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. कोकणामध्ये पर्यटन व्यवसायाला चालना मिळण्यासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..



MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:25

(श्री. राजन तेली..

पान क्रमांक 129 वरील बाब क्रमांक 157 मध्ये प्रादेशिक असमतोल दूर करणे या अंतर्गत मार्ग व पुलांच्या बांधकामासाठी अतिरिक्त अनुदानाची तरतूद केलेली आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, कोकणातील मध्यम व छोट्या पाटबंधा-यांच्या कामांचे ठेकेदारांचे 560 कोटी रु. मागील तीन वर्षापासून शासनाने दिलेले नाहीत त्यामुळे कोकणातील पाटबंधा-याची कामे पूर्णपणे ठप्प झ ालेली आहेत. कोकणातील प्रकल्प निदान या वर्षी तरी सुरु होणार आहेत की नाहीत, तसेच ठेकेदारांचे 560 कोटी रु. शासन देणार आहे की नाही असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, कोकणातील पाटबंधा-यांच्या कामासाठी, पर्यटनासाठी, रस्त्यांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेत भाग घेण्यासाठी आम्ही कालच नावे दिलेली आहेत.

**उपसभापती** : आपले नाव नाही असे मी म्हटलेले नाही. माझ्याकडे जी नावे आलेली आहेत त्याप्रमाणे मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

सभागृहाची वेळ दुपारी 11.50 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थाव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 15, गृह विभाग या पूरक मागणीच्या अनुषंगाने मी प्रथम बोलणार आहे. या पूरक मागणीच्या अनुषंगाने शासनाचे अभिनंदन करतो की, दहा, बारा वर्षानंतर का होईना 1993 या वर्षी झालेल्या अमानुष बॉम्बहल्ल्याचा तपास करणा-यांना अधिका-यांना बक्षीस देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या मुंबई बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल जवळपास 13 वर्षानंतर लागला आहे. या बॉम्बस्फोटाचा तपास करणा-या अधिका-यांना बक्षीस देत आहात ही अभिनंदनीय गोष्ट आहे. ही योजना कायम स्वरुपी चालू ठेवावी. ही जागरुकता आगीच्या बंबासारखी होता कामा नये. आग लागल्यानंतर अग्निशमनचा बंब आग विझविण्यासाठी जातो आणि ती आग विझविल्यानंतर पुन्हा आपल्या केंद्रात परत येतो. अशी या योजनेची परिस्थिती होऊ नये. दहा बारा वर्षापूर्वी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या तपासामध्ये ज्या पोलीस अधिकारी आणि कर्मचा-यांनी चांगली कामगिरी केल्यामुळे बॉम्बस्फोटाच्या खटल्यातील त्या आरोपींना न्यायालयाने शिक्षा केली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात हायकोर्टाला किंवा सुप्रीम कोर्टाला मेन्शन करुन, एक्सपीडाईट करुन, या सगळया वातावरणामध्ये सगळया नराधमांना फाशी कशी होईल , किंवा या खटल्यातील आरोपींना शिक्षा कायम कशा होतील, ज्यांना जन्मठेपेची शिक्षा झालेली आहे, त्यांना फाशी कशी होईल हे बघितले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी यानंतर गृह विभागाची पृष्ठ क्रमांक 19 बाब क्रमांक 20 आणि 21 वर माझे विचार मांडतो. बाब क्रमांक 20-पदहशतवाद विरोधी पथकात नव्याने निर्माण केलेल्या 236 पदांसाठी प्रोत्साहनात्मक रक्कम देण्यासाठी 2 कोटी 25 लाख रुपयांची मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. मुंबई शहरात नुकत्याच झालेला अतिरेक्या हल्ल्यात अतिशय चांगले अधिकारी मारले गेले हे आपल्या लक्षात आले आहे. पोलीस दलाला अद्ययावत शस्त्रास्त्रे देण्यासाठी ही मागणी सभागृहात आणली आहे त्याबदल शासनाचे अभिनंदन करतो. मुंबईत अतिरेक्यांच्या हल्ला झाल्यानंतर दुस-याच दिवशी माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी जाहीर केले की, नॅशनल सिक्युरिटी गार्डच्या धर्तीवर स्टेट सिक्युरिटी गार्डस् निर्माण करणार आहोत व

श्री. मधुकर चव्हाण...

त्यासाठी तातडीने तरतूद करणार आहोत. 1993 च्या बॉम्बस्फोट गुन्हयाच्या तपास अधिका-यांना बक्षीस दिले. परंतु स्टेट सिक्युरिटी गार्डची निर्मिती करण्यासाठी पुरवणी मागणी का मांडण्यात आली नाही यासंबंधीचा माननीय गृह मंत्र्यांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 65,बाब क्रमांक 19 ही बाब शालेय शिक्षणाची आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती यासाठी 6 कोटी 80 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अल्पसंख्यांक समाजातील मुलांनी शिकून मोठे व्हावे, राष्ट्रीय प्रवाहात त्यांनी सामील व्हावे या गोष्टी मला मान्य आहेत. परंतु या शासनाने अल्पसंख्यांकाची व्याख्या काय केली आहे याचा खुलासा या ठिकाणी केला गेला पाहिजे. या संबंधीचा खुलासा केला नाही तर अनेक धोरणात्मक तसेच घटनात्मक प्रश्न निर्माण होवू शकतील. घटनेमध्ये तुमची ही मागणी बसते आहे काय ? अल्पसंख्यांक समाजातील जे मागासवर्गीय असतील त्यांच्या मुलांनाच शिष्यवृत्तीची सवलत देण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 157,बाब क्रमांक 171 ही विधि व न्याय विभागाची मागणी आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या माननीय न्यायाधीशांकरिता 5 मोटारगाडया खरेदी करण्यासाठी 40 लाख 63 हजार रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना मोटार गाडया निश्चितपणे द्याव्यात त्यास हरकत घेण्याचे कारण नाही. परंतु न्यायालयाचा पूर्ण आदर ठेवून न्यायालयाला असेही सांगितले पाहिजे की, गेल्या अनेक वर्षापासून प्रचंड खटले प्रलंबीत आहेत. 25-25 वर्षे खटल्यांचे निकाल लागत नाहीत. गुजरात सरकारने प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा व्हावा म्हणून सेकंड शिफ्ट् न्यायालये सुरु केली आहेत. शाळेत सकाळी एक शिफ्ट असते व दुपारची एक शिफ्ट असते. त्याप्रमाणे न्यायालयाची प्रथम शिफ्ट सकाळी 8.00 ते 4.00 पर्यंत चालते आणि दुसरी शिफ्ट दुपारी 4.00 ते रात्री 10.00 पर्यंत चालते. गुजरातमध्ये अशा प्रकारे कोर्टाचे कामकाज होत असल्यामुळे कोर्ट प्रकरणे लवकर निकाली निघत आहेत. तशी पध्दत या राज्यातही सुरु करावी अशी माझी माननीय विधि व न्याय राज्यमंत्र्यांना विनंती आहे. आपण न्यायालयाला सवलती जरुर द्याव्यात. परंतु या ठिकाणी न्यायाधीश सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत बसतात काय ? प्रत्येक प्रकरणासंदर्भात कोर्टात तारखावर तारखा दिल्या जातात. सर्व कोर्टामध्ये मोठया प्रमाणात प्रकरणे प्रलंबीत आहेत, ती लवकर निकाली कशी काढता येतील यासंबंधी शासनाने गांभीर्याने पावले उचलावीत अशी माझी विनंती आहे.



ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. भोगले 11:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 227, बाब क्रमांक 280, गृहनिर्माण विभागाची बाब आहे आणि त्यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. या ठिकाणी गृहनिर्माण विभागाचे राज्यमंत्री उपस्थित आहेत. महाराष्ट्र शासनाने नव्याने गृहनिर्माण धोरण जाहीर केले. त्या धोरणाची अंमलबजावणी जाहीर केली. परंतु त्या धोरणासाठी एक रुपयांची तरतूद शासनाने केलेली नाही. पैशाशिवाय धोरणाची अंमलबजावणी होऊ शकते काय ? गृहनिर्माण विभागाकडे अल्लाउद्दीनचा जादूचा दिवा आहे काय ? जादूच्या दिव्याने गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पैसे उपलब्ध करुन घेणार आहात काय ? या मागणीच्या अनुषंगाने माननीय वित्तमंत्र्यांचे मी लक्ष वेधू इच्छितो. किती रुपयांची मागणी पुरवणी मागणी होऊ शकते ? महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास सहाय्यक अनुदानासाठी 38 कोटी रुपयांची मागणी केली आहे. मूळ अर्थसंकल्पाच्या 35 टक्के पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या आहेत. आकस्मिक मागणी मी समजू शकतो. परंतु ज्यात धोरणात्मक निर्णय घेतले आहेत, त्या धोरणांचे पुढील पाच वर्षाचे प्लॅनींग झ
ाालेले आहे अशा बाबीसाठीची तरतूद मूळ अर्थसंकल्पात करण्यात आली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ 11:35

श्री.मधुकर चव्हाण............

ही जी 38 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद आहे, ही पुरवणी मागणीमध्ये कशी आली हे सांगावे. तुम्ही धोरण जाहीर केले की, सगळी घरे मध्यमवर्गीयांसाठी बांधू. शासनाने उत्तरात काय म्हटले आहे, यापैकी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे ही ना नफा ना तोटा तत्वावर विकसित करण्यात येतात. ही वस्तुस्थिती विचारात घेता मुंबई शहरातील शासकीय गृहनिर्माण योजनेत 50 टक्के घरे मध्यमवर्गीयांना सवलतीच्या दराने देणार नाही. तुम्ही हे धोरण निवडणुकीच्या तोंडावर लेखी जाहीर करा, आम्ही प्रेसला ही माहिती देऊ. धोरण जाहीर करताना सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मध्यमवर्गीयांना घरे देऊ. परंतु याठिकाणी म्हटले आहे की, 50 टक्के घरे मध्यमवर्गीयांना बांधून देऊ शकत नाही. फक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना देणार आहोत. महाराष्ट्र राज्याच्या 10 कोटी जनतेपैकी 48 टक्के जनतेचे अर्बनायझेशन झालेले आहे. देशाचे शहरीकरण 28 टक्के आणि महाराष्ट्राचे शहरीकरण 48 टक्के झाले आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेपैकी 4.90 कोटी जनता शहरामध्ये राहते. म्हणून घरांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. अशा वेळेला शासन मध्यमवर्गीयांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून माझ ी शासनाला विनंती आहे की, गृहनिर्माण योजना अंमलात आणण्याचे ठरविले आहे त्यासाठी पैशाची तरतूद का केली नाही? एवढे बोलून मी माझे बोलणे पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली नाही तरी माझ ी हरकत नाही. परंतु मी वेल इन ॲडव्हान्स पत्र दिले असून माझ्याजवळ शिक्का असलेली प्रत उपलब्ध आहे. मी आज सकाळी सभागृहात पुन्हा चिठ्ठी पाठवून मला बोलण्याची संधी मिळावी अशी विनंती केली आहे. आपण कृपया तपासून घ्यावे.

**उप सभापती** : मी आपल्याला परवानगी दिली नाही किंवा देणार नाही असे नाही. माझ्याकडे जी नावे उपलब्ध आहेत त्यात आपले नाव नाही असे म्हटले. आपल्याला विचार मांडण्यासाठी परवानगी दिली जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, विशेष बैठकीची वेळ संपली असेल तर पुन्हा चर्चा सुरु होईल त्यावेळी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जावी. ज्या ज्या माननीय सदस्यांना बोलायचे असेल त्यांना संधी मिळाली पाहिजे. वित्तीय बाबीवरील चर्चेसंबंधी घटनात्मक प्रथा अशी आहे की, नो टाईम लिमिट.

**उप सभापती** : मी कोणत्याही माननीय सदस्याला बोलायची परवानगी दिली नाही असा भाग नाही. माझ्याकडे जी नावे आली आहेत त्यांना मी अगोदर बोलण्याची संधी देत आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी म्हटले की, वित्तीय कामकाज असल्यामुळे वेळेचे बंधन घालू नये. खरे तर या ठिकाणी पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु आहे त्या पुरवणी मागण्या कालच्या कामकाज पत्रिकेतील आहेत. काल ज्यावेळेला सत्ताधारी पक्षाच्या बाजूने आग्रह केला जात होता की, उशिरापर्यंत बसून पुरवणी मागण्यांसह सर्व कामकाज पूर्ण करावे. त्यावेळेला विरोधी पक्षाच्या बाजूने सांगितले गेले की, सकाळी 10.00 ते 11.30 या वेळेत विशेष बैठकीमध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण करु. आज दुपारी पुन्हा उर्वरित विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी येणार आहेत. वित्तीय कामकाज पुढे ढकलणे योग्य होणार नाही. आज कोणत्याही परिस्थितीत सर्व पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण होणे जरुरीचे आहे. त्यानंतर विनियोजन विधेयक आणावे लागेल. आजचे कामकाज दुसऱ्या दिवसावर जाणे योग्य होणार नाही. विधानसभेत आज गिलोटीन आहे. हे कामकाज विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निश्चित केलेले आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय अर्थमंत्री महोदय, आपण ज्यावेळी विरोधी पक्षात होतात त्यावेळी आज जे बोलत त्याच्या उलट भूमिका घेतली जात होती. त्या काळात कामकाज कसे ढकलले जायचे हे आम्ही पाहिलेले आहे. आम्ही आज विरोधी पक्षात आहोत तेव्हा तेच बोलत आहोत. शक्यतो सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये हीच आमची भूमिका आहे. काही वेळेला अपवादात्मक घटना घडते आणि चर्चा लांबते. परंतु तुम्हाला घड्याळ लावून बाहेर जायचे आहे म्हणून चटावरचे श्राध्द उरकू नये. सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांनी जी भावना व्यक्त केली ती महत्वाची आहे. ते शिक्षक आमदार आहेत. त्यांनी अर्थसंकल्पीय संवेदनशील विषय मांडावयाचा आहे. तो त्यांचा अधिकार आहे. परंतु तुम्ही आजच्या आज झाले पाहिजे असे म्हणत आहात. तुम्ही विरोधी पक्षात असताना आजच्या आज किती केले होते? आम्ही जरुर सहकार्य करु. वेळ वाढवून देण्यास सहकार्य करु.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, मी असे म्हणालो की, काल आपली तयारी होती तरी माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की आता पुरवणी मागण्यांवर चर्चा करु नये. म्हणून काल जर आणखी चार तास आपण बसलो असतो तर आणखी चांगला न्याय देता आला असता.

----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पृ.क्र. 6, बाब क्र. 4- सह्याद्री आणि नंदगिरी अतिथीगृहांचे नुतनीकरण करण्यासाठी ही तरतूद या पुरवणी मागणीच्या माध्यमातून करण्यात आली आहे. ही तरतूद जरी योग्य असली तरी सामान्य प्रशासन मंत्र्यांनी जरा नागपूर येथील आमदार निवासाची स्थिती किती हलाखीची झालेली आहे ती पहावी, अशी मी त्यांना विनंती करतो. आमदार निवासात आमदार राहतात, अनेक तक्रारी सुध्दा केल्या परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही. आमदार निवासाचा दौरा माननीय मंत्री महोदयांनी तसेच माननीय सभापती व माननीय अध्यक्षांनी केला त्यावेळेस माननीय अध्यक्षांच्या व माननीय सभापतींच्या निदर्शनास काही गोष्टी आणून दिल्या. पण तीन चार दिवसातही दुर्देवाने काहीच सुधारणा त्यात झालेली नाही. अशा प्रकारे आमदार निवासाकडे लक्षच द्यायचे नसेल तर सांगावे की, हे आमदार निवास तोडून दुसरे बनविणार की कसे, नेमके काय आहे हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे. तसेच पुढच्या अधिवेशनापर्यंत आमदार निवासाची व्यवस्था तरी चांगली होणार की नाही हेही जाणून घेण्याची आमची इच्छा आहे.

यानंतर बाब क्र. 15, पृ.क्र. 17 - मुंबई येथे दिनांक 12 मार्च, 1993 रोजी झालेल्या बॉम्ब स्फोटाच्या तपासात सहभागी झालेले पोलीस अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना "विशेष बाब " म्हणून बक्षिसे देण्यासाठी ही 20.99 लाखाची पुरवणी मागणी आलेली आहे. वास्तविक ही रक्कम अत्यंत तुटपुंजी आहे परंतु एवढ्या वर्षात देखील ती तरतूद करता आली नाही याचे कारण काय ? परवाच्या अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाने 25 लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. हे पैसे या लोकांच्या नावावर डिपॉझिट म्हणून ठेवावयाचे आहेत. परंतु माझी कालपर्यंतची माहिती आहे की, ही रक्कम या मृतांच्या कुटुंबियांच्या खात्यावर जमा झालेली नाही. ही रक्कम त्यांच्या खात्यात कधी जमा होणार याचीही माहिती मिळाली पाहिजे. कारण या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा या महिन्याचा पगार त्यांना मिळणार नाही म्हणून त्यांच्या कुटुंबियांनी पुढचे आयुष्य कसे काढावे, हा प्रश्न आहे. त्यांचे पुढील आयुष्य या 25 लाखातून मिळणाऱ्या व्याजावर चालणार आहे. त्याचप्रमाणे जखमींना 50 हजार रुपये शासनाने मदत केली. परंतु अनेक जखमी लोक तसेच निघून गेले, त्यांची कुठेही नोंद नाही. अशा जखमींना प्रत्येकाला 50 हजार रुपयांची रक्कम मिळाली की नाही यासंबंधी मी मुंबई जिल्हाधिकाऱ्यांना एक पत्र लिहून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

मदत दिलेल्या लोकांची यादी मिळावी म्हणून विनंती केली होती. परंतु ती यादी मला अद्यापही मिळाली नाही, हे दुर्दैव आहे. एखाद्या सेन्सेटिव्ह विषयावर जबाबदार आमदाराने पत्र दिले तरी मुंबईचे जिल्हाधिकारी मात्र त्याला उत्तर देण्याची तसदी घेत नाही, हा एकप्रकारे लोकप्रतिनिधींचा अवमान आहे त्यामुळे खरोखरच मुंबई जिल्हाधिकाऱ्यांवर हक्कभंग दाखल केला तर ते चुकीचे होणार नाही. या गोष्टीचा खुलासा होणे आवश्यक आहे.

महोदय, यानंतर बाब क्र 19, पृ.क्र. 18 - जे.जे. शवविच्छेदन केंद्राच्या आस्थापनेवर 23 नवीन पदांची निर्मिती करणे यासाठी ही पुरवणी मागणी सभागृहात आलेली आहे. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य अतिरेकी हल्ल्यानंतर जखमींना पाहण्यासाठी जे.जे. हॉस्पिटलमध्ये गेले असतील. अतिरेकी हल्ल्याच्या दरम्यान माननीय मंत्री महोदय सुध्दा तेथे गेले होते. वास्तविक जे.जे. मधील शव विच्छेदनगृहाची स्थिती अत्यंत खराब आहे. तेथील अे.सी. मशिनची कॅपेसिटी संपलेली आहे. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे. तसेच या ठिकाणी जे 9 अतिरेक्यांचे मृतदेह ठेवलेले आहेत त्यांची स्थिती सुध्दा तीच असावी, असा माझा कयास आहे. त्या अे.सी. प्लांटचे डिकंपोझिशन सुरु झालेले आहे. कारण अे.सी. साठी आवश्यक यंत्रणा तेथे उपलब्ध नाही. त्यामुळे तेथे काम करणारे कर्मचारी देखील आजारी पडण्याची भीती आहे. ही अे.सी. प्लांटची कॅपेसिटी वाढविण्यासंदर्भात मी माननीय मंत्र्यांकडे अनेक वेळा मागणी केली आहे तसेच सभागृहात सुध्दा मुद्दे उपस्थित केले आहेत, म्हणून या प्लांटच्या कॅपेसिटीचाही यामध्ये समावेश करण्यात यावा.

यानंतर श्री. अजित .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.खर्चे... 11:45

डॉ.दीपक सावंत...

पृष्ठ क्रमांक 65, बाब क्रमांक 100 - महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स व गाईडस, मुंबई यांच्यासाठी 90 टक्के अनुदानाऐवजी 100 टक्के सहायक अनुदानाची तरतूद करणे अशी मागणी करण्यात आलेली आहे. सध्याची परिस्थिती पाहता मुंबईतील सर्व शाळांमध्ये स्काऊट्सचे आणि कॉलेजेसमध्ये एन.सी.सी.चे प्रशिक्षण बंधनकारक करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व शाळा व कॉलेजेसमध्ये असे प्रशिक्षण बंधनकारक करणार आहात काय ?

पृष्ठ कमांक 187,बाब क्रमांक 215- शिक्षण व परीक्षा फीची प्रतिपूर्ती करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यासाठी मागणी केलेली आहे. राज्य शासनाने अनेक मोठमोठ्या घोषणा करताना सांगितले की, राज्यातील मागासवर्गीय मुलांची फी शासनामार्फत भरली जाईल. यामध्ये कायम विनाअनुदानित शाळांतील मागासवर्गीयांचा मुलांचा देखील समावेश आहे. माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार मुंबईतील विक्रोळी येथील "विद्या विकास एज्युकेशन सोसायटी" या शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी भरण्यात आलेली नाही. ही रक्कम जवळपास 16 लाखांच्या घरात आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. ती चर्चेसाठी केव्हा येईल हे मला माहीत नाही. या विभागाचे मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे हे संवेदशनशील आहेत असे माझे मत आहे.16 लाख रुपयांचा बॅकलॉग ठेवून एखादी संस्था कशी काम करेल ? या संदर्भात सुप्रीम कोर्टात निर्णय झालेला आहे. तेव्हा या संदर्भात त्यांनी लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालया संदर्भात एक मुद्दा आहे. एक वर्षापूर्वी या सभागृहात स्व.प्रमोद नवलकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम झाला. त्यावेळी झालेल्या शोक प्रस्तावाच्या वेळी राज्य सरकारने म्हटले होते की, स्व.प्रमोद नवलकर यांनी सभागृहात केलेल्या भाषणांचा संग्रह करुन तो प्रकाशित करण्यात येईल. परंतु अजूनपर्यंत स्व.प्रमोद नवलकर यांच्या भाषणांचे पुस्तक प्रकाशित झालेले नाही. तेव्हा या संदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी अशी आपल्यामार्फत माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.50 वाजता दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----------

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( **सभापतीस्थानी माननीय सभापती** )

<u>नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेबाबत</u>

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये एक प्रस्ताव दिला असून त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि श्री.नितीन गडकरी याची नावे आहेत....

<u>सभागृहात शिक्षक प्रतिनिधीबद्दल काढलेल्या अनुद्‌गाराबाबत</u>

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दोन मिनिटामध्ये मी आपले लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो काल सभागृहात चर्चा करीत असताना शेवटच्या तासामध्ये शिक्षक प्रतिनिधीबद्दल काही उद्‌गार या सभागृहात काढले होते. सभागृहात बोलण्यासाठी आपआपल्या गटाना जो काही वेळ मिळतो त्याचे नियोजन आपण करतो, एकमेकांना बोलण्यासाठी प्राधान्य देतो.

सभापती महोदय, नागझरी येथे पूर्वी गोळीबार झाला होता. त्या चळवळीमध्ये मी भाग घेतला होता. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन त्या गोळीबाराच्या विषयावर चर्चा करण्यासबंधीचा प्रस्ताव मला मांडण्याचा अधिकार प्रा. एन.डी.पाटील व कै. ग.प्र.प्रधान यानी मला दिला होता. त्यावेळी सभागृहात येऊन मला एक वर्षसुध्दा झाले नव्हते. सभागृहामध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांनी विदर्भातील अनुशेषासंबंधीचे कितीतरी प्रस्ताव मला मांडण्याची परवानगी दिली होती याचे मला भान आहे. परवाच्या दिवशी शोक प्रस्तावावर मी बोललो होतो . सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील म्हणाले की माझ्या गावातील एक प्रश्न असल्यामुळे आपण माननीय सभापतींना भेटू आणि त्यांच्याशी चर्चा करुन वेळ मागू या. त्यावेळी मी त्याना सांगितले की या विषयासंबंधी तुम्ही बोलावे असे झालेले असतांना काल संध्याकाळी उशिरा शिक्षक प्रतिनिधीबद्दल उद्‌गार काढण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते शिक्षकांचे प्रश्न मांडत असतांना समोरचे सन्माननीय सदस्य बोलत नाहीत असे अनेकदा होत असते....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .....

काल देखील ठराव सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी मांडला होता. एवढेच नव्हे तर शोक प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. रावते यांच्या ऐवजी त्यांच्याच पक्षाच्या सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे या बोलल्या. तेव्हा शिक्षक प्रतिनिधी एखाद्या विषयावर बोलले नाहीत म्हणजे त्यांना त्या विषयामध्ये रस नाही असे होत नाही. परंतु तसे समजून त्याबाबत काही भाष्य करणे हे बरोबर नाही, ती एक वाईट प्रथा पडेल. तरी माझी आपल्याला विनंती आहे की, काल शिक्षक प्रतिनिधींच्या संबंधात तो जो भाग प्रोसिडींगमध्ये आलेला आहे तो प्रोसिडींगमधून आपण काढून टाकावा.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, काल शेवटी जी काही चर्चा येथे झाली ती मी स्वत: तपासून पाहतो आणि तसे असल्यास तो भाग सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येईल. तसेच माझी सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, ज्याप्रमाणे आपण आपले मुद्दे हिरीरीने येथे मांडता त्याप्रमाणे सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांना आपले आपले मुद्दे हिरीरीने मांडण्याचा नैतिक अधिकार आहे आणि ते त्यादृष्टीने प्रयत्न करीत असतात. अशा परिस्थितीत कोणी सदस्य एखाद्या विषयावरील चर्चेत बोलले नाहीत तर ते त्यात भागच घेत नाहीत असे म्हणणे म्हणजे त्यांच्यावर आपण अन्याय करीत असतो. तेव्हा आपल्या सभागृहाच्या ज्या चांगल्या परंपरा आहेत त्या जतन करीत असताना अशा पद्धतीची वक्तव्ये करणे आपण सर्वांनी टाळण्याची गरज आहे एवढेच मी सांगू इच्छितो.

आता मी नियम 289 खाली जी सूचना आली आहे त्या संबंधात माननीय विरोधी पक्षनेत्यांना काही सांगावयाचे असल्यास ते सांगण्याची परवानगी देतो.

...... एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेबाबत.</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, आम्ही जी नियम 289 अन्वये सूचना आपल्याकडे दिली आहे आणि त्याद्वारे सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारून सूचनेमध्ये नमूद केलेल्या विषयावर चर्चा आपण घडवून आणावी अशी विनंती मी आपल्याला करणार आहे. सभापती महोदय, आम्ही ही जी सूचना दिली आहे तिची पार्श्वभूमी अशी आहे की, मुंबईमध्ये 26 नोव्हेंबरला झालेल्या महाभयंकर घटनेसंबंधात या सभागृहात जवळपास 9 तास चर्चा आपण केली आणि त्या साऱ्या चर्चेचा सूर असा होता की, ही जी घटना घडली आहे त्याला प्रामुख्याने सर्वस्वी जबाबदार कोण असेल तर महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त हे आहेत. ज्याप्रमाणे या घटनेनंतर त्याची जबाबदारी घेऊन राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा आणि उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांचा राजीनामा मागण्यात आला आणि त्यांनाही तो नैतिक जबाबदारी म्हणून द्यावा लागला त्याच पद्धतीने राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त यांचीदेखील यामध्ये तितकीच नैतिक जबाबदारी होती. 22 नोव्हेंबरला केंद्रीय गृहमंत्र्यांनी संपूर्ण देशातील पोलीस महासंचालकांची एक कॉन्फरन्स घेऊन त्यात स्पष्टपणे .....

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती करीन की, नियम 289 अन्वये आपण जी सूचना दिली आहे ती मी स्वीकारली आणि चर्चेला परवानगी दिल्यानंतर ही सर्व सविस्तर माहिती आपणास सभागृहाला सांगता येईल. परंतु आता आपण दिलेली सूचना नियम 289 च्या निकषांमध्ये कशी बसते आणि ती मी का स्वीकारावी एवढ्यापुरतेच आपण सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी तेच आपल्याला सांगतो आहे. तर मी आपल्याला सांगत होतो की, केंद्रीय गृहमंत्र्यांनी देशातील सर्व राज्यांच्या पोलीस महासंचालकांची कॉन्फरन्स घेतली होती आणि त्यात 'अतिरेकी समुद्र मार्गे येणार आहेत' अशी सावधगिरीची सूचना देऊनही त्याबाबतीत कोठलीही खबरदारी राज्याचे पोलीस महासंचालक तसेच मुंबईचे पोलीस आयुक्त यांनी घेतली नाही आणि त्यामुळेच अतिरेक्यांकडून हा हल्ला झाला. केंद्रीय गृहमंत्र्यांनी सूचना देऊनही आपले पोलीस महासंचालक आणि पोलीस आयुक्त बेसावध राहिले आणि परिणामत: अतिरेकी हल्ल्यामध्ये 195 जणांचा मृत्यू झाला तर 300 च्यावर लोक जखमी झाले. या घटनेस संपूर्णत: हे दोन्ही अधिकारी सर्वस्वी जबाबदार आहेत आणि म्हणूनच त्यांना ताबडतोब कामावरून बडतर्फ करायला पाहिजे होते परंतु त्याबाबत काल सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या

...... एक्स 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

चर्चेला दिलेल्या उत्तरामध्ये माननीय गृहमंत्र्यांनी कोठलाही खुलासा न करता केवळ त्यांची उच्च स्तरीच चौकशी करण्याचे मान्य केले आहे. म्हणजे एखाद्या सबइन्स्पेक्टरची चौकशी करावी इतकेच महत्त्व त्यांनी याला दिले आहे. सभापती महोदय, घटनेमधील कलम 311 मध्ये असे नमूद केलेले आहे की, ....

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना पुन्हा एकदा विनंती करतो की, नियम 289 खाली दिलेली सूचना त्या नियमाच्या निकषांना कशी लागू होते इतकेच आपण सांगावे आणि मी ही सूचना स्वीकारून आपल्याला चर्चेला परवानगी दिल्यानंतरच या बाकीच्या साऱ्या गोष्टी आपण सांगाव्यात.

( यानंतर श्री.सरफरे ...वाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पोलीस महासंचालक आणि पोलीस आयुक्तांना निलंबित करण्याची आम्ही मागणी केली आहे. या घटनेकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. आणि ती मागणी मान्य न झाल्यामुळे त्यांना निलंबित करणे कसे आवश्यक आहे हे आपणास पटवून देण्यासाठी आम्ही नियम 289 चा वापर केला आहे. तेव्हा आपण या प्रस्तावाला मान्यता द्यावी आणि सभागृहातील माननीय सदस्यांना यावर आपले मत व्यक्त करण्याची संधी ध्यावी अशी मी विनंती करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबईतील आतंकवाद्यांच्या हल्ल्यामध्ये 195 लोकांच्या झालेल्या मृत्यूला या राज्याचे पोलीस महासंचालक कसे जबाबदार आहेत, आपल्याला ही गंभीर घटना कशी टाळता आली असती, त्यासंदर्भात आमच्याकडे असलेले पुरावे आपल्यासमोर सांगण्यासाठी आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करुन या प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी. आणि त्या संदर्भात सरकारने कारवाई करावी म्हणून हा प्रस्ताव मांडला आहे. सभापती महोदय, हा प्रस्ताव कसा स्वीकारता येईल यासंबंधी पाच मुद्दे आपणासमोर सांगणार आहे. कुलाबा पोलीस स्टेशनच्या इन्स्पेक्टरनी पोलीस महासंचालकांना पत्र पाठविले होते की, समुद्रातून हल्ल्याची घटना घडण्याची शक्यता असून तसा आय.बी. चा रिपोर्ट आला आहे. जवळपास 300 जणांची फौज अत्याधुनिक शस्त्रांसह...

**सभापती** : या प्रस्तावावर यापूर्वी जवळ जवळ सात तास चर्चा झालेली असल्यामुळे माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये हा प्रस्ताव कसा मांडता येऊ शकतो एवढे सांगावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्या चर्चेच्यावेळी या मुद्दयांवर आम्ही बोललो नाही.

**सभापती** : मुंबईवर अतिरेक्यांकडून झालेल्या हल्ल्यासंबंधी चर्चा होती...

श्री. नितीन गडकरी : त्या हल्ल्यासंबंधी मला काही सांगावयाचे नाही, मला वेगळे सांगावयाचे आहे...

**सभापती** : सभागृहामध्ये या विषयावर सात तास चर्चा झाली त्यावेळी सुध्दा आपणास हे मुद्दे सांगता आले असते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला मुंबई शहरावर आतंकवाद्यांनी केलेल्या आक्रमणासंबंधी काही बोलावयाचे नाही. मी भारतीय घटनेतील तरतुदीप्रमाणे बोलत आहे. माझ्याकडे भारतीय घटना आहे. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मी आपणास भारतीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

संविधानाच्या कलम 311 मधील तरतूद वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, " Dismissal, removal or reduction in rank of persons employed in civil capacities under the Union or a State.- (1) No person who is a member of a civil service of the Union or an all-India service or a civil service of a State or holds a civil post under the Union or a State shall be dismissed or removed by an authority subordinate to that by which he was appointed." अशाप्रकारे राष्ट्रहिताच्या दृष्टीने एखादी धटना घडली तर आपल्याला कारवाई करता येईल. यापूर्वी आपण श्री. रणजितसिंह शर्मा यांना चार वर्षे निलंबित केले आहे. देशहिताच्या दृष्टीने तुम्हाला निलंबित करण्यात येत आहे, अशाप्रकारे एका वाक्याचे पत्र देऊन त्यांना निलंबित करण्यात आले. त्याचप्रमाणे श्री. मोमीन आणि श्री.प्रदीप शर्मा यांना देखील दाऊद इब्राहीमचा भाऊ इब्राहीम कासकर याचा फोन आला, फोनमध्ये "तुझे जेवण झाले काय" असे विचारले. त्यासाठी या कलमाचा वापर करुन त्यांना निलंबित करण्यात आले, आणि आज ते निलंबनामध्ये आहेत. त्यामध्ये काहीही आक्षेपार्ह मिळाले नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राचा मोक्का कायदा आहे. The Maharashtra Control of Organised Crime Act, या कायद्याच्या कलम 24 चा वापर सरकार करीत नाही,आणि याठिकाणी आम्हाला चुकीचे उत्तर दिले जात आहे. मोक्का कायदयाचे कलम 24 मी आपल्याला येथे वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, " Punishment for public servants failing in the discharge of their duties.- Whoever being a public servant renders any help or support in any manner in the commission of organised crime as defined in clause (e) of section 2, whether before or after the commission of any offence by a member of an organised crime syndicate or abstains from taking lawful measures under this Act or intentionally avoids to carry out the directions of any court or of the superior police officer in this respect, shall be punishable with imprisonment of either description for a term which may extend to three years and also with fine"

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी मी आपणास सांगू इच्छितो की, ज्यावेळी सभागृहामध्ये सात तास चर्चा झाली त्यावेळी आपणास हे मुद्दे मांडता आले असते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. परंतु आम्ही कारवाई करण्याची मागणी केली असता चौकशीशिवाय कारवाई करता येत नाही असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आपल्याला पुरावे ध्यावे लागत आहेत. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावून राहिला आहे" Director General of Police and Police Commissioner are directly responsible for this incident. केंद्रीय गृहमंत्र्यांनी 4 दिवस अगोदर 22 तारखेला कॉन्फरन्समध्ये सांगितले होते की, ताज हॉटेल टारगेट आहे. आय.बी. चा रिपोर्ट राज्य सरकारला आला होता की, 16 नॉटिकल मैलावर आतंकवादी येत आहेत, तसेच रॉ चा रिपोर्ट आहे की, मुंबईमध्ये आतंकवादी घुसू लागले आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

सभापती महोदय, आपण मंत्री होता. आपण मला सांगावे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेब, आपण गृहमंत्री होता, माझे चुकले तर दुरुस्त करा. राज्याच्या इंटेलिजन्सच्या कमिशनरने किंवा डायरेक्टरने रोज सकाळी उठल्यानंतर मुख्य सचिवांना आणि मुख्यमंत्र्यांना रिपोर्टीन्ग केले पाहिजे असा नियम आहे की नाही ? मग पाच-पाच, सहा-सहा वेळा रिपोर्ट आल्यानंतर हे सन्माननीय सज्जन कोणाला काही सांगत नाहीत. कारवाई करीत नाहीत. सगळा निष्काळजीपणा झालेला आहे. त्यामुळे माणसे मेली.

**सभापती** : सात तासाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांना हे सर्व सांगता आले असते.

श्री. नितीन गडकरी : आपण मुद्दा समजून घ्यावा.

**सभापती** : हा विषय नियम 289 चा कसा होतो एवढेच आपण सांगितले पाहिजे. जर मी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मान्य केला तर आपल्याला या सर्व गोष्टी मांडता येऊ शकतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. हे सगळे मुद्दे मला काल मांडता आले असते. मी काही मुद्दे मांडले. माझी अशी अपेक्षा होती की, माननीय गृहमंत्री त्यावर निर्णय घेऊन घोषणा करतील. हे सगळे नियम असताना त्यांनी काहीच केले नाही. म्हणून मला नाईलाजाने आपला आणि सभागृहाचा वेळ घेण्याकरिता कॉन्स्टिट्यूशन, मोका ॲक्ट, इंडियन पिनल कोड हे सर्व मांडावे लागत आहे. या सगळ्या जबाबदाऱ्या घटनेने निश्चित केलेल्या आहेत. त्याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांनी डोळ्यावर पट्टी बांधली. ते त्यांच्यावर कारवाई करण्यास तयार नाहीत. म्हणून आम्ही आपल्याकडे न्याय मागावयास आलो आहोत. हे प्रकरण गंभीर आहे. 195 लोकांच्या मृत्यूला हे डी.जी. जबाबदार आहेत, हे कमिशनर जबाबदार आहेत. म्हणून आपण 289 अन्वये सभागृहाचे इतर कामकाज स्थगित करावे. ही घटना टळली असती तर या सगळ्याचे प्राण वाचले असते. कुलाब्याच्या पोलीस इन्स्पेक्टरचे ऐकून जर शासनाने पोलीस पाठवले असते तर ही घटना झाली नसती. आय.बी.चे दोन दोन रिपोर्ट कळलेले आहेत. तरीही यांनी काम केले नाही. तरीही आपले गृहमंत्री त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत. म्हणून नाईलाजाने सभागृहाचे आजचे इतर कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा करावी अशी आम्ही कायदेशीर मागणी केलेली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

आहे. आपण या गंभीर मुद्याचा विचार करावा आणि सभागृहाचे आजचे इतर कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्वाचा तास मानला जातो.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, शासनाने यासंदर्भातील उच्चस्तरीय चौकशी करु असे सांगितल्यामुळे आता 289 च्या प्रस्तावाचा आग्रह धरणे उचित होणार नाही असे मला वाटते. जर शासनाने असे म्हटले असते की, आम्ही काहीही कारवाई करणार नाही तर आपण यासंदर्भात जे आर्टिकल 311 वगैरे सांगितले तो मुद्दा आला असता. परंतु शासनाने असे म्हटले आहे की, आम्ही यासंदर्भात चौकशी करु. त्यामुळे शासनाने त्यांची जबाबदारी पार पाडलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुख्य सचिव जबाबदार आहेत, डी.जी. जबाबदार आहेत. रोज रिपोर्टीन्ग घेण्याची त्यांची जबाबदारी आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माझे जे मत होते ते मांडलेले आहे की, शासनाने या ठिकाणी चौकशी करण्याच्या संदर्भात शब्द दिलेला आहे, आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे आपण सन्माननीय सदस्यांनी आर्टिकल 311, 312 च्या संदर्भात जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात आपण बोलू शकाल. आपल्याला कोणीही ती माहिती देऊ शकतील आणि चौकशीच्या माध्यमातून आपल्याला जे हवे ते आपण मिळवू शकू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत त्याचप्रमाणे मी भारतीय जनता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष आहे. आपली चौकशी आपण अध्यक्ष असताना होईल काय ? माझी चौकशी मी अध्यक्ष असताना होईल काय ? त्यांना त्या पदावर ठेऊन चौकशी करण्याला काही अर्थ आहे काय ?

श्री. अरुण गुजराथी : किमान मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली.....

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, काल माननीय गृह मंत्र्यांनी जे निवेदन केले त्यामध्ये 2002 पासून आतापर्यंत आलेल्या आय.बी.च्या सगळ्या ॲडव्हायजरीज त्यांनी वाचून दाखवल्या. त्यांनी जो जो ॲडव्हाईस दिला होता तो सगळा वाचून दाखवल्यानंतर असा कोणताही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. जितेंद्र आव्हाड ......

ॲडव्हाईस आला नाही जो नियम 289 च्या माध्यमातून नवीन मुद्दा होऊ शकतो. सन्माननीय सदस्य रॉ च्या रिपोर्टच्या संदर्भात उल्लेख करु इच्छित आहेत. रॉ चा जर असा रिपोर्ट असेल तर त्या एकाच मुद्यावर आपण माननीय गृह मंत्र्यांना बोलावयास लावू. या एकाच मुद्यावर बोलावयास लावू. अशा प्रकारे ऐकीव माहितीच्या आधारे ते 14 नॉटिकल माईल्सवर होते, 16 नॉटिकल माईल्सवर होते असे म्हणता येत नाही. त्यांनी सगळ्या ॲडव्हायजरीज वाचून दाखवल्या. त्या कोणत्याही ॲडव्हायजरीमध्ये आक्षेपार्ह काही नव्हते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : आपण सर्व सन्माननीय सदस्य जर अशा प्रकारे उभे राहून बोललात तर आपल्याला काय सांगावयाचे आहे ते सभागृहाला समजणार नाही. सभागृहातील गोंधळाच्या वातावरणात कामकाज करणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.20 ते 12.35 पर्यंत स्थगित झाली. )

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपणाला नम्र विनंती आहे. या सभागृहामध्ये जेव्हा कायद्याची आणि न्यायाची चर्चा होते त्यावेळी कायद्याने निर्णय देणारे सभापती म्हणून आपला लौकिक आहे.

**उपसभापती** : मी निर्णय देतो.

श्री. नितीन गडकरी : माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : मी 10 मिनिटाकरिता सभागृहाची बैठक तहकूब करीत आहे.

(दुपारी 12.37 ते 12.47 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

( विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 12.49 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : माननीय सभापतींच्या दालनामध्ये विरोधी पक्षनेत्यांसमवेत चर्चा सुरु आहे. तोपर्यंत कामकाज सुरु करण्यास सभागृहाची अनुमती आहे का? पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करु.

श्री.दिवाकर रावते : विधानसभेची बैठक दुपारी 4.00 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री श्री.अंतुले यांनी केलेल्या विधानाबद्दल निंदाव्यंजक ठराव पारित करुन तो केंद्र सरकारकडे पाठवायचे ठरले आहे.

**उपसभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करण्यासाठी मला सभागृहाने सहकार्य करावे.

श्री.दिवाकर रावते : सकाळच्या बैठकीमध्ये अपूर्ण राहिलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करावी.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माझी अशी विनंती आहे की, आपण मधले कामकाज काढून बाकीचे कामकाज घ्यायला हरकत नाही. कृपया विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे.

श्री. दिवाकर रावते (बसून) : महोदय, आमची अशी विनंती आहे की, सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करावी.

**उपसभापती** : दोन वाजता सभागृहाची बैठक सुरु झाल्यानंतर तरी सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे, अशी मी त्यांना विनंती करतो. मी सभागृहाची बैठक दुपारी 1.45 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.12 ते 1.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सभागृहाची बैठक मी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 1.47 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.)

-------------

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राणा जगजितसिंह पाटील (संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मयादित, औरंगाबाद यांचा सन 2004-05 चा 38 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

डॉ.सुनील देशमुख ( वित्त व नियोजन मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश 1994 चा परिच्छेद 6 (ड) नुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळांनी माननीय राज्यपालांना सादर केलेला सन 2007-08 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 1 एप्रिल, 2007 ते 31 मार्च 2008 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळ्या विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास तसेच उभारलेल्या कर्ज रोख्यांस देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश वरपुडकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन 2006-07 चा 38 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** :वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

--------

डॉ.सतीश पाटील (जलसंपदा राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबादचा सन 2007-08 चा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

डॉ.सुनील देशमुख ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सन 2005-06 व 2006-07 चे वार्षिक अहवाल सभागृसमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचे दिनांक 1-4-2006 ते 31.3.2007 चे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचा सन 2006-07 चा दुसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचे सन 2006-07 चे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

------------

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ( वने मंत्री ) : सभापती महोदय, फॉरेस्ट डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा सन 2006-2007 चा 34 वा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहा समोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

**पृ.शी. मु.शी** अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.दिलीपराव सोनावणे ( समिती सदस्य ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा आठवा व नववा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा आठवा व नववा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

यानंतर नियम 93 च्या सूचना घेण्यात येतील.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी " दिनांक 12 डिसेंबर, 2008 रोजी नांदेड येथील तरोडा जिल्हा परिषदेच्या मुख्याध्यापिका श्रीमती ज्ञानेश्वरी फड यांना मारण्यास आलेल्या शीलानंद याला त्यांनी आपल्या पिस्तुलाने 4 गोळया झाडून ठार करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता होत असून निविदांबाबत जिल्हयातील वृत्तपत्रात जाहिरात न देता जिल्हया बाहेरील व राज्याबाहेरील वृत्तपत्रामध्ये जाहिराती देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरग फुंडकर नितीन गडकरी यांनी " सन 2006-2007 मध्ये पूर्णा नदीला आलेल्या महापूराचे पाणी मौजे पलसोडा ता. नांदुरा , जिल्हा बुलढाणा या गावातील नदीकाठी राहणा-या सुमारे 165 शेतक-यांच्या शेतात घुसून सुमारे 400 ते 500 एकर जमिनीवरील संपूर्ण पीक वाहून जाणे, सदर शेतक-यांनी गेल्या 2 वर्षापासून शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करुनही त्यांना अद्याप नुकसान भरपाई न मिळणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर , पांडुरंग फुंडकर यांनी " दिनांक 16 डिसेंबर 2008 रोजी आमगाव जिल्हा गोदिंया येथे जनावरांची कत्तल झाल्याबाबतची माहिती पोलिसांना मिळूनही पोलिसांनी कत्तल करणा-यावर वेळीच कारवाई न करणे " या "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर यांनी " वलगाव, जिल्हा अमरावती येथील बाबाराव बोबडे या धनगर समाजातील तरुणाचा दिनांक 20 ऑक्टोबर 2008 रोजी पोलिसानी केलेल्या बेदम मारहाणीमुळे पोलीस कस्टडीत मृत्यू झाल्यामुळे संबंधित पोलिसाना निलंबित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्यानंतर मयत बोबडे यांच्या कुटुंबियास शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत न मिळणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी " कुंदन कटलरीच्या मालकाने सौंदर्य प्रसाधनाचा व्यवसाय करतांना ही प्रसाधने जर्मनीहून आयात केल्याचे भासवून अनेक लोकांची फसवणूक केली असून अन्न व औषध प्रशासनाने त्यांच्या कंपनीवर धाड टाकली असता सदर सौंदर्य प्रसाधने कोणताही परवाना न घेता अंधेरी व गोरेगाव येथे तयार केल्याचे आढळणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर यांनी " दिनांक 31 ऑक्टोबर 2005च्या शासन निर्णयानुसार दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पासून नव्याने नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर योजना 2005 पूर्वी सेवेत असलेल्या कर्मचा-यांना लागू करणे अन्यायकारक असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सवश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी " सिडकोच्या नवी मुंबई स्थित वाशी, घनसोली, कोपरखैरने , सानपाडा, ऐरोली, नेरुळ आदी भागातील महत्वाच्या ठिकाणच्या कोटयावधी रुपयांच्या भूखंडावर सर्रासपणे अतिक्रमण केले असून डॉ.शंकर समितीच्या अहवालानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकाच्या कारकिदी्र्त 350 कोटीचा
झालेला घोटाळा"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

4..



VTG/ KGS/ KTG

उपसभापती .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "जिल्हा परिषदेमध्ये असलेल्या हातपंप, वीज पंप दुरुस्ती करणा-या एकूण 1246 कर्मचा-यांना जिल्हा परिषदेने सेवेत कायम करणे, 100 टक्के पाणीपट्टीची वसुली होऊनही त्यांना वेळेवर पगार न मिळणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यासने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, पाशा पटेल यांनी "राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना सरळसेवा भरतीद्वारे शासकीय सेवेत विनाअट सामावून घेण्याच्या मागणीसंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 11 सप्टेंबर 2008 रोजी आदेश देऊनही शासनाने याबाबत कार्यवाही न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, पाशा पटेल यांनी "दिनांक 23 मार्च 1994 च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या इतर मागासवर्गीय संवर्गास देण्यात येणाऱ्या आरक्षणामध्ये राज्यात विविध ठिकाणी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण न ठेवल्याने इतर मागासवर्ग समाजावर होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "केंद्राच्या सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे वित्त विभगाच्या दिनांक 6 ऑक्टोबर 2008 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा 10 हजार रूपये मिळालेले असणे, तथापि या लाभापासून नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षक कर्मचारी वंचित असणेबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारण्यात आली आहे.

आता यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये "खामगाव नगरप9रिषदेला 2007-08 या आर्थिक वर्षात सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेंतर्गत मिळालेल्या 7.3 लाख रूपयांच्या निधी मिळाला असता त्यातून व्यवसाय अनुरूप कीट देताना झालेला भ्रष्टाचार" या विषयासंबंधात सूचना दिली होती. मागील अधिवेशनामध्येदेखील मी याच विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली असता त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, दोन महिन्यात याबाबत

..... आयआय 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.फुंडकर ....

चौकशी करून ताबडतोब कारवाई करू. दोन महिन्यात चौकशी करून कारवाई करण्याचे त्यांनी आश्वासन दिलेले होते पण अजून त्याबाबत काहीच झालेले नाही. तरी आपण मी आज दिलेल्या नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवर शासनाला निवेदन करण्यास सांगावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. मी शासनाला त्याबाबत निवेदन करण्यास सांगतो.

***

**पृ.शी./मु.शी.** : मंत्र्यांचा परिचय.

श्री. छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.विजयकुमार गावित यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

***

**कार्यक्रम पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्र. 1 बाबत.**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझ्या या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन आम्हाला अजून वितरित करण्यात आलेले नाही तसेच या ठिकाणी संबंधित मंत्री देखील उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.आता यानंतर क्र.2 वरील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

***

...... आयआय 3 ...





**पृ.शी.** : म.रा.रस्ते विकास महामंडळाने सायन-पनवेल हायवे प्रकल्पासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सा.बां.विभागाची परवानगी न घेता नव्याने निविदा काढण्याचे दिलेले आदेश.

**मु.शी.** : म.रा.रस्ते विकास महामंडळाने सायन-पनवेल हायवे प्रकल्पासाठी सा.बां.विभागाची परवानगी न घेता नव्याने निविदा काढण्याचे दिलेले आदेश याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. ..

" मुंबई शहरातील 55 उड्डाणपुलांचे बांधकाम व मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हे दोन्ही प्रकल्प युती शासनाच्या कालावधीत खाजगीकरणामधून करण्यात आले असणे., उड्डाणपूल प्रकल्पाच्या वसुलीसाठी मुंबई शहराच्या हद्दीवर 5 ठिकाणी 25 वर्षांसाठी टोल लावण्यात येणे, त्यामधील 17 वर्षांचा कालावधी अद्यापि शिल्लक असणे, सदर खर्चाची वसुली पूर्ण होण्यापूर्वीच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सायन-पनवेल हायवे प्रकल्पाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी न घेता पुनश्च नव्याने निविदा काढण्याचे आदेश निर्गमित करणे, महामंडळ अगोदरच 9000 रूपये कोटींच्या कर्जाच्या बोजाखाली असून पुढील तीन वर्षात मामंडळाला रूपये 2500 कोटी एवढ्या मोठ्या रकमेची परतफेड करावयी असणे, परंतु शासनाने राजकीय दबावाखाली सायन-पनवेल रस्ता बीओटी तत्त्वावर बांधण्यासाठीच्या निविदा अवैधरित्या काढण्यात येणे, सदर निविदेमुळे महामंडळावर 600 कोटी रूपयांचा अतिरिक्त कर्जाचा प्रचंड बोजा प्रत्यक्षात पडणार असणे, अगोदरच महामंडळ कर्जबाजारी होऊन दिवाळखोरीत निघण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, परिणामी कर्मचारीवृंदामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना व नाराजी, सदर महामंडळावरील कर्ज निरंक करण्याच्या दृष्टीने व महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीकोनातून दिनांक 27 नोव्हेंबर 2008 रोजी काढलेली निविदा रद्द करून तसेच सदर 5 पथकर नाक्यावरील उत्पन्नांचे सिक्युरिटायझेशन करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

डॉ.सुनील देशमुख (सा.बां.(सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री) : महोदय, या लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापण्यात यावे. )

... आयआय 4 ..



( लक्षवेधी सूचनेवरील मा.सा.बां.(सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या लक्षवेधी सुचनेवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय येथे उपस्थित नाहीत, मात्र राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत. पण खरे तर मंत्री या चर्चेला उत्तर देण्यास येतील अशी माझी अपेक्षा होती. ते नागपूरात असतील तर त्यांनी सभागृहात यायला पाहिजे होते. असो. सभापती महोदय, भ्रष्टाचाराचे हे एक सुंदर प्रकरण आहे. मुंबईतील 5 उड्डाणपुलांचे टोल नाके आहेत आणि त्यांचे सिक्युरिटायझेशन करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करायला पाहिजे होती परंतु तसे न करता सायन-पनवेल रस्ता बांधण्याचा प्रस्ताव या विभागाने कॅबिनेट सबकमिटीमध्ये मंजून करून न घेताच केवळ मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्री यांनी एकत्रित बसून निर्णय घेऊन मंजूर केला आहे आणि रस्ते विकास महामंडळानेही या रस्त्याच्या कामाच्या त्वरित निविदा देखील काढण्यात आल्या. हे खरे आहे काय ? हा प्रस्ताव कॅबिनेट सबकमिटीने मंजूर केला नसेल तर हे काम आपल्याला कसे काय करता येईल ? अशा प्रकारे आपल्याला हे काम करता येणार नसल्याने आपण या निविदा रद्द करणार आहात काय ? ` किंबहुना हा रस्ता अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागाच्याच ताब्यात आहे तो या विभागाने रस्तेविकास महामंडळाकडे हस्तांतरित देखील केलेला नाही अशी माझी माहिती आहे आणि हे खरे असेल तर या रस्त्याच्या निविदा महामंडळाने कशा काय काढल्या ? कोणत्या अधिकारात काढल्या ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या 26 नोव्हेंबरच्या पत्रान्वये हे टेंडर काढण्यासाठी मान्यता दिली आहे. तसेच ही टेंडर्स कशा प्रकारे काढायची याचीही डिटेल्स त्यांनी त्यात दिली आहेत ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पण कॅबिनेट सबकमिटीने याचा प्रस्तावच मंजूर केलेला नाही तर हे आपल्याला कसे काय करता येईल ? ज्या मुलीचे लग्नच झालेले नाही तिच्या मुलाचे बारसे कसे काय आपण करता ? आपण आम्हाला अगोदर हे सांगावे की, हा रस्ता सा.बां.विभागाकडून आपल्या महामंडळाकडे हस्तांतरित झालेला आहे काय ? सभापती महोदय, या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री माननीय श्री.भुजबळ साहेब उपस्थित आहेत. तेव्हा मी त्यांना विचारू इच्छितो की, त्यांच्या विभागाने हा रस्ता रस्ते विकास महामंडळाला हस्तांतरित केलेला आहे काय ? चुकीचे उत्तर रेकॉर्डवर येऊ नये यासाठी माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांनी याबाबत खुलासा येथे केला पाहिजे असे मला वाटते. शिवाय माननीय मंत्री श्री.भुजबळ हे या सभागृहाचे नेतेदेखील आहेत. ...

( यानंतर श्री.सरफरे ....जेज 1 ...

श्री. नितीन गडकरी...

आपण सभागृहाचे नेते आहात. हे जे काळेबेरे चालले आहे त्यामध्ये आपला संबंध काय आहे? दोन्ही बांधकाम मंत्र्यांशी संबंधित ही लक्षवेधी सूचना आहे. सभापती महोदय, मला आपणाकडून संरक्षण पाहिजे. सायन-पनवेल हा रस्ता एम.एस.आर.डी.सी.ला ट्रान्सफर झालेला नाही. कॅबिनेटच्या सब कमिटीची मिटींग झाली नाही. त्या सब कमिटीमध्ये माननीय श्री. भुजबळ साहेब आपण, माननीय श्री. जयंत पाटील, माननीय श्री. अजित पवार हे मंत्री सदस्य आहेत. त्या समितीची बैठक झालेली नसतांना टेंडर काढण्याचे डायरेक्शन कसे देता? सभापती महोदय, ही महाराष्ट्राची लूट सुरु आहे. याबाबत माननीय श्री. भुजबळ साहेबांकडून खुलासा झाला पाहिजे. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे...

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मला उत्तर द्यावयाचे आहे. यामध्ये शासनाचा फायदा होत असल्यामुळे माझी भूमिका माननीय सदस्यांनी समजून घेतली पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : तुम्ही हे काम ईलिगली करणार काय? माननीय श्री. जयंत पाटील साहेबांच्या हस्ताक्षरातील पत्र माझ्याकडे आहे ते मी याठिकाणी वाचून दाखवितो. माननीय श्री. देशमुख साहेब आपण खाली बसावे..

डॉ. सुनील देशमुख : मला खाली बसण्यासाठी माननीय सभापती सांगतील, आपण मला सांगू शकत नाही...

श्री. नितीन गडकरी : माननीय श्री. देशमुख साहेब आपण माझे मित्र आहात म्हणून मी आपणास खाली बसण्यासाठी सांगतो. "कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे", पाप भलत्यानेच केले आणि उत्तर देण्यासाठी तुम्हाला पाठविले आहे. ही संपूर्ण बांधकाम विभागाची नोट आहे, ती मी आपणास वाचून दाखवितो. हा विषय इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीमध्ये घेण्यात आला नाही असे माननीय अर्थमंत्री आपल्या हस्ताक्षरामध्ये लिहितात. त्यांना आपल्या चेंबरमध्ये बोलवा, माननीय मंत्री श्री. अजित पवार यांनाही आपल्या चेंबरमध्ये बोलवा. "कॅबिनेट सब कमिटीची मिटींग झालेली नाही. अधिकृतपणे बो.ओ.टी. आणि एम.यू.टी. यामधील फरक काय आहे याबाबत सचिव, वित्त विभाग यांनी अभिप्राय देणे अपेक्षित आहे, ते त्यांनी त्वरीत करावे. व त्यांच्या मताचा विचार करुनच निर्णय घ्यावा. हा निर्णय मुख्यमंत्री स्तरावर घेतला असला तरी इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीमध्ये अधिकृतपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. तोपर्यंत त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. मा. मुख्यमंत्री

...2/-





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

परदेश दौऱ्यावरुन परत आल्यानंतर त्याबाबतीत चर्चा करता येईल. म्हणून निर्णय माझ्यासमोर आलेला नसल्यामुळे आणि धोरणात्मक असल्यामुळे जोपर्यंत कॅबिनेट सब कमिटीपुढे येत नाही आणि त्याठिकाणी मंजूर होत नाही तोपर्यंत अशाप्रकारचा निर्णय घेऊ नये. संबंधित विभागाला याबाबत अभिप्राय कळवावा." अशी माननीय श्री. जयंत पाटील साहेबांच्या हस्ताक्षरातील नोट आहे.

माननीय श्री. भुजबळ साहेब आपण धृतराष्ट्रासारखे बनू नका. एम.एस.आर.डी.सी. स्थापन करणारा मी संस्थापक अध्यक्ष आहे. मी 9 हजार कोटी रुपयांचे कर्ज उभे केले होते. या प्रकल्पामुळे 2200 कोटी रुपये वाढणार आहेत. माझी आपणास विनंती आहे की, "दूध का दूध आणि पानीका पानी" होऊ द्या. कॅबिनेटच्या सब कमिटीमध्ये हा प्रस्ताव आला होता काय? याचे आपण उत्तर द्यावे. आपण धृतराष्ट्रासारखे कां बसता? आपण उत्तर कां देत नाही? तुम्हाला एम.एस.आर.डी.सी. वाचवायची आहे की नाही? मी तुमच्यावर गंभीर आरोप करतो. तुम्ही याठिकाणी कां खरे बोलत नाही? सभापती महोदय, मला उत्तर मिळाले नाहीतर मी "वेल"मध्ये येऊन बसेन. मी सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. कॅबिनेट सब कमिटीमध्ये माननीय वित्त मंत्री, माननीय पाटबंधारे मंत्री आणि माननीय श्री. भुजबळ साहेब सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि या राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यावेळचे उद्योगमंत्री श्री. अशोक चव्हाण हे सदस्य असून या सर्व खात्याचे सचिव देखील आहेत. या कॅबिनेट सब कमिटीची मिटींग झाली नाही. त्यावेळचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. अनिल देशमुख यांची मिटींग झाली त्यामध्ये त्यांनी या प्रस्तावाला विरोध केला. तसेच, श्री. संगीतराव साहेबांनी पाठविलेल्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. सी.एम.सेक्रेटरिएटचे 26 नोव्हेंबरचे पत्र आहे त्यात असे म्हटले आहे की, "Sub : Securitisation of 5 Mumbai Entry Points implementation of Sion-Panvel Expressway Project on BOT (Toll) basis. In the Cabinet Sub-Committee meeting on infrastructure held on August 30, 2008, a decision was taken to implement the Sion-Panvel Expressway Project on BOT (Toll) basis along with securitisation of 5 Mumbai Entry Point Naka. The minutes of the meeting has been forwarded to M.D., MSRDC by Public Works Department under its letter dated October 15, 2008."

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

हे डायरेक्शन्स माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहेत. हे डायरेक्शन्स कोणत्या दिवशी दिले ? ज्या दिवशी ताज आणि ओबेराय हॉटेल पेटत होते त्या दिवशी लक्ष्मीदर्शनाचा जो महाकार्यक्रम आहे त्यावर सही करण्याचे काम झाले. खरे म्हणजे हे राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसमधील भांडण आहे. माननीय राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो की, आपल्याला माहीत नाही. यामध्ये आणखी पुष्कळ डिटेलमध्ये जावयाचे आहे. यामध्ये दिल्लीचे वगैरे बरेच लोक गुंतलेले आहेत. इंडिया बुल नावाची कंपनी आहे. हे मोठे रॅकेट आहे. दिल्लीच्या एका पक्षाच्या नेत्याने एम. डी. ला फोन करुन सांगितले की, श्री. शरद पवार यांचे ऐकावयाचे नाही. हे फार भयंकर प्रकरण आहे. यामध्ये 2 हजार कोटी रुपयांचा घोटाळा आहे. आपण जर खरे बोलला नाहीत तर मी सगळी नावे जाहीर करीन. सभापती महोदय, या पत्रामध्ये पुढे असे लिहिले आहे की, "I am directed to inform you that action needs to be promptly initiated by MSRDC, strictly in accordance with the approved minutes of the Cabinet Sub-Committee. Considering the enormous delay already occurred and resultant time and cost over-runs, necessary Tender Notice should be finalized by to-day evening.." 26 तारखेला फायनल करा आणि 27 तारखेला टेंडर काढा. तुमच्या एम.डीं.नी टेंडर काढले. कशाला आपण गरीब लोकांचे बळी घेता ? त्या गवई साहेबांचा काही संबंध नाही. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "and issued and should appear in all leading newspapers shortlisted by MSRDC tomorrow and compliance report be sent to the hon'ble C.M.'s office." पुढे श्री. सी.एस. संगीतराव, मुख्यमंत्र्यांचे सचिव यांची सही आहे. सभापती महोदय, या राज्यामध्ये काय चालू आहे ? 2000 कोटी रुपयांचा हा विषय आहे. त्यातून होणारे 800 कोटी रुपयांचे काम आहे. पुढच्या 26 वर्षाच्या टोलपैकी 7 वर्षे गेली म्हणजे मुंबईचा 18 वर्षाचा टोल सिक्युरिटाईज होणार. मला सांगताना लाज वाटते. मी 5 कोटीच्या इक्विटीवर 5 हजार कोटी रुपयांची कामे केली. माझे दोन प्रोजेक्ट फायदेशीर आहेत. एक्स्प्रेस हायवेचे कर्ज फिटले. मात्र यांनी सुरु केलेले सर्व प्रकल्प तोट्यात आहेत. हे वरळी आणि ब्रांदा येथे जाऊन टोप्या घालून फोटो काढत होते. 420 कोटीचा प्रोजेक्ट 1900 कोटीवर गेला. आता हे

..2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

एमएसआरडीसी बंद करण्याकरिता, कॅबिनेट सब कमिटीमध्ये श्री. अशोक चव्हाण अनुपस्थित होते. श्री. छगन भुजबळ साहेब आपण अनुपस्थित होता. श्री. जयंत पाटील अनुपस्थित होते. ही कॅबिनेट सबकमिटीची मिटींग नव्हती. हे सर्व खोटे रेकॉर्ड तयार करुन पाठवले. मी माझ्या पदाचा राजीनामा देण्यास तयार आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ साहेबांमध्ये हिंमत असेल तर मी त्यांना आव्हान देतो. त्यांनी उभे राहून सांगावे की, कॅबिनेट सबकमिटीची मिटींग झाली आहे. मी माझे शब्द मागे घेतो. माझ्या आमदारकीचा राजीनामा देऊन मी निघून जातो. हा काय खोटेपणा सुरु आहे ? माननीय श्री. भुजबळ साहेब, आपल्याला खरे बोलावयाचे आहे की नाही ? माझा प्रश्न माननीय राज्यमंत्र्यांना नाही. आपण या सभागृहाचे नेते आहात. आपण या कॅबिनेट सबकमिटीचे सदस्य आहात. हा प्रश्न विचारताना बांधकाम मंत्री म्हणून मी आपल्याला हा प्रश्न विचारलेला आहे. केवळ त्यांना हा प्रश्न विचारलेला नाही. मला आपल्याकडून उत्तर पाहिजे. सायन -पनवेल रस्ता बांधकाम विभागाने एमएसआरडीसीला ट्रान्सफर केला आहे का ? दुसरा प्रश्न असा की, इन्फ्रॉस्ट्रक्चरल कॅबिनेट सबकमिटीची मिटींग होऊन हा निर्णय झाला आहे का ? या दोन प्रश्नाचे उत्तर मी आपल्याकडे मागत आहे. आपण मला याबाबत उत्तर द्यावे अशी माझी मागणी आहे. तोपर्यंत पुढचे कामकाज होणार नाही.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. मी आपल्यावर आरोप करीत आहे. यामध्ये खरे काय आहे ते सांगावे. माझी लक्षवेधी सूचना बांधकाम विभागाच्या बाबतीत आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रातील मोठे स्कँडल यामधून उघडे होऊ शकते एवढे मोठे पोटेन्शियल यामध्ये आहे. आपण जे म्हणत आहात त्यावर आपण ठाम राहावे. यामध्ये जे सापडतील त्यांना राजीनामा द्यावा लागेल. ही गोष्ट आपण मान्य करावी. सभापती महोदय, हे महाराष्ट्रातील मोठे स्कँडल आहे. ते स्कँडल मी या ठिकाणी ओपन करु शकतो. आपण मला असेच म्हणत राहिलात तर मी ते ओपन करीन. मग त्याची जबाबदारी आपली पण राहील. मी त्या खात्याचा मंत्री असल्यामुळे मला सगळे माहीत आहे. माझा नाईलाज करु नका.

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज स्थगित करुन माझे डॉक्युमेंट तपासावेत.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना वारंवार सांगू इच्छितो की, कृपया आपण त्याबाबत चर्चा करु नका. मी उत्तर देण्यास समर्थ आहे. आपण त्यांना कशाला सांगता ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झालेली नाही, त्यामुळे एमएसआरडीसीला टेंडर काढण्याचा अधिकार नाही.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी स्वत:च वाचून दाखविले आहे. ते असे म्हणाले होते की, "In the Cabinet Sub-Committee meeting on infrastructre held on August 30, 2008, a decision was taken" तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवांनी लिहिले आहे. ते जबाबदार अधिकारी आहेत. त्यांनी स्वत: लेखी कबूल केले आहे. त्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने.....

श्री.नितीन गडकरी : ते त्यांनी लिहिले आहे. माझे म्हणणे असत्य असेल तर मी माझ्या पदाचा राजीनामा देतो आणि माझे म्हणणे बरोबर असेल तर माननीय राज्यमंत्री महोदय डॉ.सुनील देशमुख यांनी राजीनामा द्यावा.

डॉ.सुनील देशमुख : माझी तयारी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाची बैठक कागदपत्रे तपासण्यासाठी तहकूब करावी. मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झालेली नाही. तत्कालीन वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांनी डिसेंट नोट दिलेली आहे. मी माननीय राज्यमंत्र्यांचे आव्हान स्वीकारले आहे. सभापती महोदय, सभागृहाची बैठक आपण काही काळ तहकूब करावी. मी राजीनामा देण्यास तयार आहे. कॅबिनेट सब कमिटीची बैठक झालेली नाही, मंत्री महोदय सभागृहात चुकीचे बोलत आहेत.

**उपसभापती** : आपण दोघांनीही कृपया खाली बसावे. येथे कोणाच्याही राजीनाम्याचा प्रश्न नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मेरीटवर प्रश्न विचारावेत. मंत्री महोदयांकडून योग्य ती उत्तरे घ्यावीत. आपण याठिकाणी कोणाचाही राजीनामा घेण्यासाठी बसलेलो नाही आणि कोणीही राजीनामा देऊ नये.

( सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे माननीय उपसभापतींच्या आसनाकडे जाऊन त्यांना कागदपत्रे दाखवितात आणि तेथूनच माननीय उपमुख्यमंत्र्यांना उद्देशून वक्तव्ये करीत असतात. त्यानंतर ते आपल्या जागेवर जातात. )

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी मला सांगावे की, आपण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीला गेला होता काय, आपण येथे का बोलत नाही, तुम्ही बोलण्याची हिंमत का दाखवित नाही ?

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या सचिवांनी दिनांक 30 ऑगस्ट रोजी अशी बैठक झाली असल्याचे लिहिले आहे. याबाबतचे पत्र सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनीच वाचून दाखविले आहे. माझ्याजवळ असलेली कागदपत्रे खरे आहेत की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्याकडे असलेली कागदपत्रे खरे आहेत ? तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या सचिवांनी लिहिलेले कागदपत्रे खरे आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ती बैठक तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आणि तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.अनिल देशमुख या दोघांमध्ये म्हणजे दोन देशमुखांमध्ये झाली होती. त्या बैठकीला वित्त विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीचे परिपत्रक काढण्यात येते. या दोघांनी अशाप्रकारे हे काम केले जाईल आणि त्याला अशी अशी मान्यता द्यावी. सरकारने मंत्रिमंडळ उपसमितीचे अधिकार निश्चित केले होते काय ? विद्यमान सन्माननीय मुख्यमंत्री आणि तत्कालीन उद्योग मंत्री श्री.अशोक चव्हाण, तत्कालीन सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ, सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार, सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील, हे त्या उपसमितीचे सदस्य होते. या चारही मंत्र्यांना त्या बैठकीचे निमंत्रण नव्हते, काही अधिका-यांना निमंत्रण नव्हते. त्यामुळे ती बैठक मंत्रिमंडळ उपसमितीची होती असे म्हणता येत नाही, श्री.विलासराव देशमुख आणि श्री.अनिल देशमुख या दोघांमध्ये ही बैठक झाली होती. सभापती महोदय, आतापर्यंत मी 10 वेळा माननीय श्री.छगन भुजबळ यांचे नाव घेऊन बोललो आहे, परंतु ते उठून काहीच बोलत नाहीत. त्यांच्या सारख्यांकडून अशी अपेक्षा नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मला तारीख दिली तर त्या तारखेला ती बैठक झाली किंवा नाही याची चौकशी करता येईल. सभापती महोदय, आपण मला थोडासा अवधी द्यावा. त्यानंतर मी त्या बैठकीला उपस्थित होतो किंवा नाही ते मला सांगता येईल. अशाप्रकारे अचानकपणे मला विचारले तर त्या तारखेबाबत मी कसे काय सांगणार ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि आपण आम्हाला आपल्या चेंबरमध्ये बोलवावे. माझ्याकडे 101 टक्के सर्व कागदपत्रे आहेत. राज्यमंत्री महोदयांनी जबाबदारीने बोलावे. सभागृहाची दिशाभूल होता कामा नये.

...3/-





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सभागृहामध्ये दोन्ही बाजूचे ऐकून घेतले पाहिजे. या निर्णयामुळे शासनाच्या तिजोरीत पैसा येत असेल, शासनाचा आर्थिक फायदा होत असेल तर त्याच्या तांत्रिक मुद्यांचा उहापोह करणे योग्य नाही. शासनाच्या या निर्णयामुळे शासनाचा जर फायदा होत असेल तर ते योग्य आहे. महाराष्ट्र शासनाचा फायदा होतो किंवा नाही त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी बोलावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:30

(डॉ. सुनील देशमुख ....)

उलट जनतेचा फायदा होत असेल, 1400 कोटी रु. एक रकमी मिळत असतील तर....

श्री. नितीन गडकरी : ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन विरोधात आहे..

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय राज्य मंत्री डॉ. सुनील देशमुख या दोघांनीही आपल्या जागेवर बसावे.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : या लक्षवेधीवर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी काही प्रश्न विचारले. त्या प्रश्नांना माननीय राज्यमंत्री महोदय उत्तर देत होते. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी माननीय उपमुख्य मंत्री श्री. छगन भुजबळ यांना प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, आपण जो तपशील विचारात आहात तो तपासून पाहिल्या शिवाय सभागृहात उत्तर देऊ शकणार नाही. तेव्हा या लक्षवेधीच्या संदर्भात संबंधित मंत्री महोदय, राज्यमंत्री महोदय, सचिव, अध्यक्ष आणि एम.डी. यांनी सर्व तपशील तपासून घ्यावा. या लक्षवेधीच्या संदर्भात येत्या सोमवारी दुपार पर्यन्त तपशीलवार उत्तर सभागृहामध्ये होईल.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासंबंधी**</u>

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 3 पुढे ढकलण्यात आलेली आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:30

**पृ. शी.** : सोलापूर जिल्ह्यातील विडी उत्पादकांनी कामगारांना कपातीच्या दिलेल्या नोटीसा

**मु. शी.** : सोलापूर जिल्ह्यातील विडी उत्पादकांनी कामगारांना कपातीच्या दिलेल्या नोटीसा यासंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, सतीश चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजीया खान,श्री. अरविंद सावंत, व डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकरण संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विशेषत: सोलापूर जिल्ह्यातील विडी उत्पादकांनी धुम्रपानविरोधी कायद्यातील वेष्टण कायद्याला विरोध दर्शवून कामगारांना कपातीच्या नोटीसा देणे, या कामगार कपातीच्या विरोधात विडी कामगारांनी विशेषत: महिलांनी कामगार आयुक्त कार्यालय, सोलापूर येथे दिनांक 24 नाव्हेबर 2008 रोजी निषेध मोर्चा काढणे, सोलापूर शहरातील कामगारांचा रोजगार गेल्यामुळे पसरलेले नाराजीचे वातावरण, धुम्रपान विरोधी कायदा झाल्यामुळे विडी उद्योगातील कामगारांचे रोजीरोटीचे साधन गेल्यामुळे विडी कामगारांचे संसार उद्ध्वस्त होणे, यावर लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे हस्तक्षेप करुन कामगारांच्या चरितार्थासाठी पर्यायी व्यवस्था करुन देण्याची केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. श्री.नवाब मलिक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, राज्यात नागपूर, सोलापूर, भिवंडी, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर विडी उद्योग चालतो. या सगळया उद्योगामध्ये आदिवासी आणि विशेषत: महिला मिळून दीड लाख लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. यापैकी 62 हजार लोक सोलापूर जिल्हयातील आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये या उद्योगात महिला कामगारांचे प्रमाण जास्त आहे. तेंदू पत्त्यापासून ह्या विड्या बनविल्या जातात. 2003मध्ये वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने काही सूचना केल्या आणि काही अटी घातल्यामुळे विडी उत्पादकांना कामगार कपातीचा निर्णय करावा लागला. या विडी उद्योगामध्ये कोणत्याही मशिनरीचा वापर केला जात नाही. मात्र सिगारेट उद्योगामध्ये मशिनरीचा आणि केमिकल्सचा मोठ्या प्रमाणार वापर केला जातो. या उद्योगामध्ये महिला कामगार जास्त संख्येने असून ते आपल्या कुटुंबाकरिता रोजीरोटी मिळवतात. या विडी उद्योगाला शासनाचा कामगार कायदा देखील लागू आहे. देशाचे पंतप्रधान हे 2007मध्ये सोलापूरमध्ये आले होते त्यावेळी त्यांच्याहस्ते विडी कामगारांना घरकुलाच्या चाव्या वाटप करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला होता. हा उद्योग सुरक्षित राहील याची देखील हमी त्यांनी त्यावेळी दिली होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील...

या ठिकाणी देखील धुम्रपान प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. विडी उद्योग, विडीचे उत्पादन बंद करण्याचा निर्णय दिनांक 30 नोव्हेंबर,2008 घेतला गेला. पहिला टप्पा म्हणून 40 टक्के कामगारांची कपात देखील झालेली आहे. दिनांक 20 नोव्हेंबर, 2008 पासून विडीचे उत्पादन बंद करावे अशा प्रकारची विडी उद्योग मालकांना नोटीस दिली. त्या विरुध्द विडी कामगारांनी दिनांक 24 नोव्हेंबर, 2008 रोजी मोठा मोर्चा सोलापूर शहरात काढला. प्रत्येक विडीवर जाहिरात झ ाली पाहिजे अशा प्रकारचे वर्ड ट्रेड ऑर्गनायझेशनचे म्हणणे आहे. परंतु प्रत्येक विडीवर जाहिरात करणे तांत्रिकदृष्टया शक्य नाही ही एक मोठी अडचण आहे. या अडचणीमुळे एवढा मोठा रोजगार संकटात आलेला आहे. विडीवर जाहिरात छापण्यासंबंधी जी अट टाकण्यात आलेली आहे ती अट शिथील गरज आहे. सोलापूर जिल्हयातील 65 हजार महिला विडी उद्योगामध्ये काम करीत आहेत. त्यांचा उद्योगाला संरक्षण देण्याच्या संदर्भात व विडीवरील जाहिरातीसबंधीची अट शिथील करण्यासंदर्भात राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करील काय ?

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, केंद्र शासनाने धुम्रपान प्रतिबंधक कायद्यांतर्गत विडीचे जे बंडल असते, त्यावर काही चित्र काढून त्यानंतरच विडी बंडलाची विक्री करावी अशी अट टाकली आहे. विडीच्या बंडलावर खोपडी आणि हाडे यांचे चित्र काढून विडी ओढणे हे आरोग्यास धोकादायक आहे अशी टीप त्यावर छापावी अशी अट काढून टाकण्यात आली होती. त्यांनतर केंद्राने फुफ्फुस आणि त्याखाली विडी ओढल्यानंतर कॅन्सर होऊ शकतो अशी टीप टाकावी अशी अट टाकली आहे. विडीच्या विक्रीमध्ये 40 टक्के घट झालेली आहे आणि भविष्यात हा उद्योग धोक्यात येऊ शकतो अशी साधारणत: भीती विडी उत्पादक मालकांनी व्यक्त केलेली आहे. विडी उद्योग बंद झाला तर महिला विडी कामगारांना काम देता येणार नाही विडी उत्पादक मालकांनी कामगार उप आयुक्तांकडे विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी विडी कामगारांना समवेत घेऊन मोर्चाचे देखील आयोजन केलेले आहे. केंद्र शासनाने विडी उत्पादनाच्या संदर्भात जी अट टाकून दिली होती, त्या अटीला सहा महिन्यांसाठी म्हणजे दिनांक 30 मे, 2009 पर्यंत स्थगिती दिलेली आहे. तरीही विडी कामगार आणि विडी उत्पादक उद्योगाचे मालक केद्र शासनाच्या या निर्णयाच्या बाबतीत संतुष्ट नाहीत ही बाब खरी आहे. परंतु आता परिस्थिती बदलते

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक...

आहे. राज्यातील लोकांचे आरोग्य चांगले रहावे यासंबंधीची जबाबदारी शासनाची आहे. विडी कामगारांना कामे मिळाली पाहिजेत ही खरी परिस्थिती आहे. यासंदर्भात कामगार संघटनेच्या प्रतिनिधींशी आमचे बोलणे झालेले आहे. कामगारांच्या प्रतिनिधींनी राज्य शासनाला निवेदन दिले आहे की, हा उद्योग बंद पडू नये, त्या उद्योगातील कामगार बेरोजगार होऊ नयेत म्हणून आमच्या मागणीसाठी राज्य शासनाने माननीय पंतप्रधान यांची भेट घ्यावी. कामगार प्रतिनिधींची मागणी घेऊन आम्ही माननीय पंतप्रधान यांना भेटण्याची प्रक्रिया पूर्ण करणार आहोत. विडीचा खप का कमी होतो आहे यामागे दुसरीही कारणे आहेत. राज्यात, देशात लिट्रेसी वाढते आहे. लोकांचे राहणीमान दिवसें दिवस वाढत चालले आहे. त्यामुळे विडी ओढणा-या लोकांची संख्या दिवसें दिवस कमी होत चालली आहे. त्यामुळे विडीचा खप कमी होत चालला आहे. अशीच परिस्थिती राहिली तर भविष्यात हा उद्योग संपुष्टात येणार आहे. विडी बनविणा-या महिलांना इतर उद्योगाकडे कसे डायव्हर्ट करता येईल, त्या महिलांना रोजगार मिळेल अशी कोणती कामे देता येतील, यासंदर्भात टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्स या संस्थेला एखादे सर्वेक्षण करण्यासंबंधी शासनाच्या माध्यमातून विनंती करण्यात येईल.

श्रीमती नीलम गोऱ्हे : गेली अनेक वर्षे विडी कामगार संघटनांची आंदोलने चालू आहेत. विडी कामगारांचा विषय हा काही प्रथमच या सभागृहात चर्चेला आलेला नाही. सोलापूर जिल्हयाप्रमाणे महाराष्ट्रातील इतर जिल्हयातही विडी बनविण्याच्या व्यवसाय चालतो. विडी कामगारांच्या ब-याच समस्या आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, लोकांची आवड बदलत चालली आहे. यासंदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. धूम्रपान प्रतिबंधक कायद्यातील जाचक अटीत शिथीलता मिळावी व विडी उद्योगाला संरक्षण मिळावे म्हणून गेल्या काही वर्षापासून विडी कामगारांचे शेकडो मोर्चे निघाले आहेत. हा केंद्र सरकारच्या अखत्यारितील विषय आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही माननीय पंतप्रधानाना भेटणार आहोत. ही चर्चा या सभागृहात गेल्या सहा,सात वर्षापासून चालू आहे.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सन्माननीय माजी खासदार याठिकाणी सभागृहात बसले आहेत. म्हणून नक्की कोणती अडचण आहे ज्यामुळे विडी बनविणाऱ्या धरगुती स्वरुपाच्या उद्योगाला संरक्षण मिळत नाही. त्यासंबंधी काय उपाय शोधला आहे? दुसरा प्रश्न असा की, आज कॉटन किंग नावाने कॉटन बाजारात आले तर ते खरेदी केले जाते. परंतु सोलापूरमधील आणि मुंबईमधील कापड गिरण्या बंद पडल्या. आपण मार्केटिंग करण्यात कमी पडतो ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मंत्रीमहोदयांनी टाटा इन्स्टिटयूटचे जे उदाहरण दिले ते आम्हाला मान्य नाही. सोलापूरमधील हा बंद पडणारा उद्योग आहे, अन्य उद्योग बंद पडत आहेत अशा स्थितीमध्ये सोलापूरमधील विडी कामगारांना पर्याय म्हणून कोणता उद्योग आणता येईल?

श्री.नबाब मलिक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विचारले की, माननीय पंतप्रधानांकडे केव्हा जाणार आहात? 30 मे, 2009 पर्यंत मुदत आहे. ही मुदत संपण्यापूर्वी महाराष्ट्र शासन पंतप्रधानांकडे जाऊन विडी उत्पादक आणि विडी कामगारांच्या संघटनांचे म्हणणे मांडून त्यांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विडीचा खप 40 टक्के कमी झाला आहे. विडी ओढणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यासाठी सोलापूरमध्ये 51 हजार महिला विडी कामगार आहेत, इतर भागातही महिला विडी कामगार आहेत, त्यांना इतर उद्योगाकडे कसे वळविता येईल यासाठी अभ्यास झाला पाहिजे. त्यांनी चांगले पदार्थ तयार करावेत, त्या पदार्थांना मार्केट तयार करता येईल, त्यांना घरामध्ये काम देता येईल, याबाबत अभ्यास गटाचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी विभागाच्या उदात्त हेतूचे अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या परंपरेमध्ये महाराष्ट्रात लाखो विडी कामगार आहेत. प्रत्येक विडी ही हाताने वळली जाते. त्या विडीवर आरोग्याच्या धोक्याबाबतची सूचना कशी लिहिली जाईल? सिगारेटला हा नियम लागू नाही. विडीला लागू केला आहे. याबाबत कोणती लॉबी कार्यरत आहे का? या उद्योगावर बंदी येऊन सिगारेटचा खप वाढावा म्हणून गरीब माणसे हाताने विडी वळतात त्यावर अशा प्रकारची धोक्याची सूचना लिहिण्याची सक्ती केले जात आहे का? नेमका हेतू काय आहे?यामध्ये कोणाचा तरी व्हेस्टेड इंटरेस्ट दिसून येतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नबाब मलिक : सभापती महोदय, प्रत्येक विडीवर सूचना लिहिण्याचे बंधन नाही. संभाजी विडी, चावी छाप विडी यांचे जे बंडल असते त्यावर छापील कव्हर असते त्या कव्हरवर सूचना लिहिण्याचे बंधन आणलेले आहे. उत्पादकांचे म्हणणे आहे की, हे बंधन असू नये. याकरीता 6 महिने स्थगिती दिली आहे. विडी उत्पादक आणि कामगार यांचे म्हणणे केंद्र सरकारकडे राज्य शासनामार्फत मांडले जाईल आणि त्यांना समजावण्यासाठी जे करावयाचे ते प्रयत्न करुन या विडी उत्पादक व कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ KTG/ KGS/ 14:40

## <u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

**पृ. शी.** : राज्यामध्ये डी.एड.च्या जागांमध्ये झालेली अनावश्यक वाढ

**मु. शी.** : राज्यामध्ये डी.एड.च्या जागांमध्ये झालेली अनावश्यक वाढ याबाबत ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यामध्ये डी.एड.च्या जागांमध्ये 72 हजार जागांची वाढ केली असून त्यापैकी केवळ 12 हजार प्रशिक्षितांनाच नोकऱ्या उपलब्ध असणे, महाविद्यालयांना व अनावश्यक वाढीव जागांना राष्ट्रीय शिक्षण परिषद भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन अनावश्यक हजारो जागा देऊन डी.एड.विद्यार्थ्यांची करीत असलेली फसवणूक" या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तिलारी (जि. सिंधुदुर्ग) प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरु करणे

**मु. शी.** : तिलारी (जि. सिंधुदुर्ग) प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरु करणे याबाबत श्री. राजन तेली वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी मुख्य प्रकल्पाचे काम सुरु आहे. तसेच कालव्याच्या पाण्याचा वापर करुन छोटे 5 व 10 मेगावॅटचे प्रकल्प निर्माण होऊ शकतात यासाठी हायड्रो नागपूर विभागातील अधिकाऱ्यांनी पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर केला आहे. या प्रकल्पातून 250 मेगावॅट वीज निर्माण होऊ शकते. यामुळे या जिल्ह्यात भारनियमन काही प्रमाणात कमी होऊन त्याचा फायदा जिल्ह्यातील छोट्या मोठ्या लघुउद्योजकांना तसेच शेतीसाठीही पाणी मिळण्यासाठी उपयोग होऊ शकतो. तसेच शेतकरी व छोट्या मोठ्या लघुउद्योगातील शेतकरी, नागरिक व लघु उद्योगातील कामगार यांच्या जिव्हाळ्याचा व महत्वाचा असल्यामुळे या वीज निर्मिती प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरु करण्यात यावे, याबाबत मी अतिशय महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे". कृपया स्वीकृत करण्यात यावी, ही विनंती.

-----------

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ KGS/

**पृ. शी.** : गोंदिया जिल्ह्यात वेतन पथक नेमणे

**मु. शी.** : गोंदिया जिल्ह्यात वेतन पथक नेमणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीला आज नऊ वर्षे लोटूनही गोंदिया जिल्ह्यात वेतन पथक कार्यालय नसणे, यासंबंधी विधानपरिषदेतून लक्षवेधीच्या माध्यमातून सदर प्रश्न सोडवून वेतन पथक सुरु करण्यासंबंधी मान्यता प्राप्त होणे, तसेच सदर वेतन पथक कार्यालयाकरिता 14 ऑगस्ट 2008 चे शासन निर्णय क्र. वि.शि.उ.1001/(108/01) प्र.शा.5 व माननीय शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक 15 सप्टेबर, 2008 अन्वये फक्त अधीक्षक, कनिष्ठ लेखा परीक्षक आणि लेखाधिकारी या पदांची निर्मिती होणे, तसेच सदर तिन्ही पदांकरिता आर्थिक तरतूदही करण्यात आली असल्याचे दिनांक 24.6.2008 चे आदेश निर्गमित करणे, परंतु सदर वेतन पथक कार्यालयाचे काम सुरळीत चालण्याच्या दृष्टीने फक्त गट "अ" आणि गट "ब" पदांची निर्मिती करणे योग्य नसणे, त्या अनुषंगाने मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे 25 सप्टेबर, 2008 च्या पत्रान्वये सदर वेतन पथक कार्यालयाकरिता गट"क" आणि गट "ड" या पदांची मागणी शासनाकडे करण्यात येणे, तरी अद्याप गट "क" आणि गट "ड" या पदांना मंजुरी प्राप्त न होणे, त्यामुळे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच सदर पदे मंजूर न झाल्यास 1 जानेवारी, 2009 रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदियासमोर साखळी व आमरण उपोषण करण्यासंबंधीचे निवेदन लक्षात घेता शासनाने तातडीने सदर पदे मंजूर करण्याची कार्यवाही व शासनाचे निवेदन."

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदित्य दंत महाविद्यालय, बीड च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप न होणे

**मु. शी.** : आदित्य दंत महाविद्यालय, बीडच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप न करणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□य सदस्या श्रीमती उषाताई दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"आदित्य दंत महाविद्यालय, बीड येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन 2006-07 व सन 2007-08 या दोन वर्षांची राज्यसरकार शिष्यवृत्ती (1) शासन निर्णय क्र. इ.मा.व. 2007/प्र.क्र.150/मा.व क.-3, मंत्रालय, विस्तार भवन, दिनांक 26.3.2008 व शासन निर्णय क्र. इ.बी.सी./प्र.क्र.213, मा.व क.-2 मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई दिनांक 27.3.2008 असतांना, सदर महाविद्यालयाने संबंधित प्रस्ताव विशेष समाज कल्याण अधिकारी, बीड यांचेकडे दाखल केलेले असताना अद्याप शिष्यवृत्ती वाटप न करणे, सर्वोच्च न्यायालयाने आदित्य दंत महाविद्यालयासोबत सिंहगड दंत महाविद्यालय, पुणे, एमआयटीआयएसआर दंतमहाविद्यालय, लातूर यांनाही मान्यता दिली. त्या दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. पण बीडचे समाजकल्याण अधिकारी कार्यालयातील सब ऑर्डिनेट श्री. कुलकर्णी हे त्यांना मिसगाईड करीत असल्यामुळे हे वाटप अद्यापही झालेले नाही. म्हणून श्री. कुलकर्णी यांच्यावर कारवाई करावी व शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात यावे.

--------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कृष्णा खोऱ्याच्या अपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करणे

**मु. शी.** :कृष्णा खोऱ्याच्या अपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करणे याबाबत श्री.विलासराव शिंदे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. विलासराव शिंदे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विलासराव शिंदे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"कृष्णा खोऱ्याच्या अपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक 25 ऑगस्ट, 2008 रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व माननीय उपमुख्यमंत्री, वित्तमंत्री, पाटबंधारे मंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मंत्री महोदयांनी कार्यकर्त्यांना आश्वासन देणे, परंतु अद्यापही आश्वासनाची परिपूर्ती न केल्याने तेथील जनतेने आटपाडी जि. सांगली येथील तहसील कार्यालयावर दि. 17.12.2008 रोजी मोर्चा काढला असता पोलिसांनी सुमारे 300 आंदोलकर्त्यांना अटक करणे, त्यामुळे आंदोलन कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेलाअसंतोष, कृष्णा खोऱ्यातील अपूर्ण कामे तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

----------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोलापूर जिल्हयात सामुहिक शेततळयांची योजना न राबविणे.

**मु. शी.** : सोलापूर जिल्हयात सामुहिक शेततळयांची योजना न राबविणे याबाबत श्री.प्रतापसिंह मोहिते - पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाअंतर्गत शेतक-यांसाठी सामुहिक शेततळयांची योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे शेतक-यांना फळबागांसाठी मोठी मदत होऊन त्यांच्या दृष्टीने त्यांना ही योजना फारच लाभदायक आहे. परंतु सन 2008-2009 या वर्षासाठी ही लाभदायक असलेली योजना सोलापूर जिल्हयात राबविण्यात आली नाही. त्यामुळे सोलापूर जिल्हयातील शेतकरी या योजनेपासून वंचित रहात असल्यामुळे त्यांच्यात तीव्र संताप व असंतोष पसरला आहे. ही योजना शेतक-यांना अतिशय लाभदायक व फाद्याची असल्यामुळे हा विषय सार्वजनिक दृष्टया अतिशय महत्वाचा असल्याने मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. कृपया हा विशेष उल्लेख स्वीकृत करावा हा विनंती.

---------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या.**

**पृ.शी.** : सन 2008-2009 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

( चर्चा पुढे सुरु .....)

**उपसभापती** : आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे. सकाळच्या आणि दुपारच्या चर्चेला एकत्र सुरुवात करण्यात येत असून दोन्ही चर्चेला मंत्रीमहोदयांनी एकत्रच उत्तर द्यावयाचे आहे. दुपारच्या चर्चेच्या पुरवणी मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

(1) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-5,एच-1,एच-5, एच-6,एच-7, एच-8, एच-9, एन-3.

(2) जलसंपदा ( कृष्णा खोरेपाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3, आय-5, वाय-2.

(3) अल्पसंख्यांक विकास, वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण, रोजगार व स्वयंरोजगार, क्रिडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ई-3, व्ही-2, झेड ए-3, झेड ई-1-ए.

(4) कृषी, जलसंधारण व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-2, डी-3, एल-3, एल-7.

(5) अन्न व औषधे प्रशासन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एस-4.

(6) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-2, टी-3, टी-5, टी-6.

(7) ऊर्जा( अपारंपारिक ऊर्जा वगळून ) मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-11

(8) जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ ) मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-5.

(9) अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्यापूरक मागण्या क्रमांक डी-3.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(10) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्यापूरक मागण्या क्रमांक आर-1.

(11) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, बंदरे व खार जमीन विकास मंत्र्यांच्या विभागाच्यापूरक मागण्या क्रमांक डी-1, डी-4, डी-5, डी-6, डी-9, डी-9 ए.

(12) उच्च व तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एस-1,एस-4, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6, डब्ल्यू-7.

(13) पणन, महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एक्स-1

सभागृहाचे काम व्यवस्थित चालण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे व आपले विचार थोडक्यात मांडावेत अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. सकाळच्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेला सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे ऑन लेग होते परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी चर्चेला सुरुवात करावी.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. पृष्ठ क्रमांक 19, बाब क्रमांक 22 वर मी माझे विचार सुरुवातीला व्यक्त करणार आहे. गत 2006 सालामध्ये 4 गस्ती नौका केंद्रसरकारने राज्यसरकारला दिल्या होत्या परंतु त्या गस्ती नौकांना इंधन आणि कर्मचारी वर्ग न पुरवल्यामुळे गस्ती नौका केंद्र सरकारला परत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या नौका परत राज्यशसनाला मिळणार आहेत अशा प्रकारची माहिती कोकण विभागाचे डी.जी. श्री. पाठक यांनी वर्तमानपत्रात दिलेली आहे. यामध्ये आपल्याला एकूण 24 गस्ती नौका मिळणार असून या नौकांना इंधन तसेच कर्मचारी मिळणार असून यासाठीच हा खर्च करण्यात आलेला आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

सभापती महोदय, मी आता पृष्ठ 21 व बाब क्रमांक 32 वरील राज्य उत्पादन विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्य उत्पादन शुल्क आणि पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून गोवा हद्दीवर सीमा शुल्क तपासणी नाका आहे त्या ठिकाणावरुन महाराष्ट्रात मोठया प्रमाणात गोवा बनावटीची दारु येत असते. या गोवा बनावट दारुमुळे महाराष्ट्र शासनाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते. काही दिवसापूर्वी गोवा बनावटीची करोडो रुपये किंमतीची दारु सुध्दा पकडण्यात आलेली आहे. ज्या प्रमाणे गोवा-महाराष्ट्र नाक्यावरुन गोवा बनावटीची दारु महाराष्ट्रात येते तसेच येथून स्फोटक वस्तू सुध्दा येण्याचा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे या गस्ती नाक्यावर अधिक कडक व योग्य रितीने तपासणी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 33, बाब क्रमांक 51,पर्यावरण, वनीकरण व वन्यजीवन याविभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. हत्तींमुळे जे नुकसान होते त्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. गेल्या 4-5 वर्षात कोकणात मोठया प्रमाणात हत्तींनी शेतक-यांचे कोटयावधी रुपयांचे नुकसान केलेले आहे. परंतु असे असतांना हत्तींना रोखण्यासाठी कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना होत नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.......

कोकणात आता हत्ती घरांचे नुकसान करु लागला आहे. परंतु घरांची नुकसान भरपाई देण्यात येत नाही असा नियम असल्यामुळे वन विभागाकडून हत्तींकडून झालेल्या घरांच्या नुकसानीची भरपाई मिळत नाही. तेव्हा माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हत्तींकडून नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे करुन संबंधितांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

पृष्ठ क्रमांक 34, बाब क्रमांक 53- वन्य प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे झालेल्या हानीबाबत नुकसान भरपाई देण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. कोकणात हत्तींबरोबर आता मगर, गवा,रेडे आणि माकड या प्राण्यांकडून नुकसानी होत आहे. परंतु या प्राण्यांनी केलेल्या हानीबाबत नुकसान भरपाई मिळत नाही. तेव्हा या प्राण्यांकडून झालेल्या हानीबाबत देखील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 51, बाब क्रमांक 81- कोकणातील रायगड,रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील मच्छिमारांना दिनांक 20 जुलै 2004 रोजीच्या शासन निर्णयानुसार सानुग्रह अनुदान दिले. परंतु अजूनपर्यंत अनेक संस्थांना अनुदान मिळाले नाही. तेव्हा वेंगुर्ला, देवगड, मालवण इत्यादी ठिकाणच्या संस्थातील लोकांना उपोषणास बसावे लागले होते. छोट्या बोटींसाठी दहा हजार रुपये अनुदान मिळणार होते. परंतु ते अद्यापपर्यंत मिळालेले नाही. मच्छिमार करणारे, जाळे टाकून मच्छिमार करणारे, मासे सुकविणारे तसेच त्याची वाहतूक करणारे अशा अनेक घटकांना पॅकेजमधून वगळण्यात आलेले आहे. तेव्हा या घटकांचा सुध्दा पॅकेजमध्ये समावेश करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, ज्यांना अनुदान मिळाले नाही त्यांना ते लवकरात लवकर देण्यात यावे तसेच मी वर सांगितलेल्या घटकांना सुध्दा सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 15- बक्षिसांसाठी अतिरिक्त तरतूद करण्याची मागणी केलेली आहे. माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते पुणे येथे निर्मल ग्राम पुरस्कार स्वीकारणासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यांतून प्रतिनिधींना बोलाविले जाते. त्यासाठी राज्य शासनाने परिपत्रक काढलेले आहे की, त्यांना खाजगी आराम बसमधून प्रवास करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. एस.टी.तोट्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.......

असताना खाजगी आराम बसने प्रवास करण्याची मुभा देणे बरोबर नाही. सिंधुदुर्ग जिल्हापरिषदेतील काही प्रतिनिधी पुरस्कार स्वीकारण्यासाठी पुणे येथे गेले होते. त्यांनी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हापरिषदेमध्ये वित्त समितीची बैठक झाली त्यामध्ये 15 लाख रुपये झालेला खर्च 25 लाख रुपये दाखविण्यात आला. तेव्हा याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे.

पृष्ठ क्रमांक 157, बाब क्रमांक 173 - विधी व न्याय विभाग- सिंधुदुर्ग जिल्हा होऊन 25 वर्षे झाली. नवीन दोडामार्ग तालुका होऊन 9 वर्षे झाली तर वैभववाडी तालुका होऊन 20 वर्षे पूर्ण झालेली आहेत. या दोन्ही तालुक्यांच्या ठिकाणी न्यायालये नसल्यामुळे तेथील लोकांना 70-80 कि.मी.अंतर जावे लागते. यामुळे त्यांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे भाड्याच्या जागेत न्यायालय सुरु केलेले आहे. तेव्हा माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, या दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी न्यायालय सुरु करण्यासाठी लवकरात लवकर तरतूद करण्यात यावी. सरकारने नवीन तालुका निर्माण करताना पदे मंजूर केली होती. परंतु ती अद्याप न भरल्यामुळे लॅप्स होण्याची शक्यता आहे. तेव्हा याबाबीकडे देखील माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष द्यावे अशी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 305, बाब क्रमांक 369 - पर्यटन विभाग - शासनाने मोठा गाजावाजा करुन कुणकेश्वर पर्यटन स्थळ घोषित करुन नारळ फोडला. त्यासंबंधी सर्वत्र पाट्या लावल्या. परंतु नंतर त्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही केली नाही. आता तेथील काम बंद आहे अशा वर्तमानपत्रात बातम्या येत आहेत.

सभापती महोदय, कोकणात प्रकल्प येण्याबाबत दोन मंत्र्यामध्ये वेगवेगळी मते आहेत. एका मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे की, कोकणात खनिज प्रकल्प आणले तर पर्यटनावर काही परिणाम होणार नाही. तर दुसऱ्या मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे की, अशाप्रकारचा प्रकल्प आणल्यास पर्यटक पाठ फिरवतील. तेव्हा या संदर्भात एकमत होणे आवश्यक आहे. कारण केंद्र सरकारने सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ SBT/ KTG/ MMP/ प्रथमश्री.शिगम 15.00

श्री.परशुराम उपरकर ...

त्या पर्यटन जिल्हयामध्ये अशा प्रकारचे प्रकल्प येणार नाहीत याची दक्षता शासन घेणार आहे किंवा नाही याबाबत खुलासा करण्यात यावा . पर्यटन विकासाच्या कामासाठी जो निधी देण्यात येईल तो निधी योग्य जागाचे सौंदर्यीकरण करण्यासाठी खर्च न करता इमारती बांधल्या जातात तेव्हा तसे न करता पर्यटन स्थळाच्या सौंदर्यीरणासाठी खर्च करण्यात यावा असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. वेंगुर्ला येथे जी इमारत बांधण्यात आलेली आहे त्या इमारतीकडे जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आलेला नाही त्याचबरोबर ज्या इमारती बांधण्यात आलेल्या आहेत त्या सुध्दा पडायला आल्या आहेत तेव्हा या पूरक मागण्याच्या निमित्ताने मी जे थोडक्यात विचार मांडलेले आहेत त्याबाबत सहानुंभूतिपूर्वक विचार करुन माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सभागृहासमोर माडण्यात आलेल्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 5 पान नंबर 6 सबंधी मला बोलावयाचे आहे. सामान्य प्रशासन विभागाने 39 नवीन गाडया खरेदी करण्यासाठी तरतूद केलेली आहे या नवीन गाडया खरेदी करीत असतांना जुन्या गाडयांचे काय केले जाते? जुन्या गाडयांचा लिलाव करण्यात येतो काय ? यासंबंधी तपासणी होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात अनेक खात्यात जुन्या गाडया पडून आहेत काही गाडया भंगारमध्ये आहेत. राज्यातील ज्या विविध खात्यात ज्या गाडया भंगारात पडून आहेत त्याची विक्री केली तर शासनाला मोठया प्रमाणावर महसूल मिळू शकेल म्हणून मी या मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो की, नवीन गाडया खरेदी करीत असतांना जुन्या गाडया डिस्पोज ऑफ केल्या आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 8 पान नंबर 8 संबंधी मला बोलावयाचे आहे स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना निवृत्ती वेतन वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यात वाढ केलेली आहे परंतु राज्यामध्ये अजूनही काही स्वातंत्र्य सैनिकाना प्रमाणपत्र आणि निवृत्ती वेतन मिळालेले नाही तेव्हा त्याना प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच निवृत्ती वेतन देण्यात यावे यासाठी ते सतत शासन दरबारी खेटे मारत आहेत. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव आपण साजरा केला आहे परंतु अजूनही काही स्वातंत्र्य सैनिक प्रमाणपत्रापासून आणि निवृत्ती वेतना पासून वंचित आहेत तेव्हा जे स्वातंत्र्य सैनिक शासनाकडे सातत्याने पाठपुरावा `करीत आहेत त्यांचा प्रश्न शासनाने तातडीने निकाली काढावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 9 पान नंबर 9 संबंधी मला बोलावयाचे आहे हैद्राबाद मुक्ती संग्रामात रझाकाराच्या अत्याचाराने पीडित झालेले उस्मानाबाद जिल्हयातील देवधानोरा, नांदगाव, चिलवड येथील 450 कुटुबियांना प्रत्येकी 2 लाख रुपये वित्तीय सहाय्य देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी माननीय मंत्र्याचे अभिनंदन करतो परंतु हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या इतिहासाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यात यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

3..



VTG/ KGS/ SBT/ KTG/ MMP/ प्रथमश्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ...

सभापती महोदय, या नंतर बाब क्रमांक 11 पान नंबर 9 सबंधी मला बोलावयाचे आहे छत्रपती शिवाजी महाराजावर आधारित दूरचित्रवाणी मालिका काढण्यासाठी पूरक मागणी्मध्ये तरतूद करण्यात आली आहे त्याचप्रमाण् शाहू महाराजावर देखील दूरचित्रवाणी मालिका काढण्यात आली पाहिजे व त्यासाठी आर्थिक तरतूद राज्य शासनाने केली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पान नंबर 19 , बाब क्रमांक 22 संबंधी बोलावयाचे आहे.राज्यातील विविध पोलीस खात्याचे संगणकीकरण करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी या चर्चेच्या निमित्ताने अशी मागणी करीत आहे की, राज्यातील सामान्य माणूस आपली तक्रार पोलीस स्टशनमध्ये घेऊन जातो परंतु पैसे घेतल्याशिवाय त्याची तक्रार नोंदवून घेतली जात नाही. म्हणून पुढच्या काळात सर्व पोलीस स्टेशन्स संगणकाने जोडण्यात आली पाहिजेत. एखादी व्यक्ती पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन गेल्यानंतर मुंबईमध्ये बसलेल्या अधिका-याला सुध्दा त्या ठिकाणी तक्रार नोदवून घे्तली आहे किंवा नाही याची माहिती तातडीने उपलब्ध होऊ शकेल तेव्हा ही माहिती त्यांना तातडीने उपलब्ध होण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस स्टेशनचे संगणकीकरण व्हावयास पाहिजे व ती संगणकाने जोडण्यात आली पाहिजेत असे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 38 पान नंबर 23 संबधी मला बोलावयाचे आहे. वर्धा - यवतमाळ - पुसद- नांदेड हा नवीन रेल्वे मार्ग रेल्वे मंत्रालयाने मंजूर केला आहे त्यातील 40 टक्के खर्च राज्य शासनाने उचलावयाचे ठरविलेले आहे त्याकरता तरतूद देखील पूरक मागण्यांमध्ये केलेली आहे. त्याचबरोबर परळी - बीड - अहमदनगर हा रेल्वे मार्गाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. बीड जिल्हयातील बांधवाच्या दृष्टीने हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्वाचा आहे

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 15:05

श्री. विक्रम काळे ......

या रेल्वे मार्गासाठीदेखील येणारा खर्च महाराष्ट्र शासन उचलेल अशी घोषणा यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली आहे परंतु त्याची तरतूद या ठिकाणी झालेली दिसत नाही हे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, बाब क्र.39, पृ.20 - महसूल प्रशासन बळकट करण्यासाठी आणि भूमि अभिलेखांचे अद्ययावतीकरण करण्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु आज आमचा सामान्य बांधव, गरीब शेतकरी बांधव प्रत्येक तालुक्याला, जिल्ह्याच्या ठिकाणी जी भूमि अभिलेख कार्यालये आहेत तेथे त्यांच्या जमिनीची मोजणी करून घेण्याच्या उद्देशाने खेटे घालत असतो. तातडीची फी भरूनदेखील त्याच्या जमीन मोजणीचे काम देखील केले जात नाही. म्हणून आता या संबंधात जमीन मोजणीचे जे मशीन निघालेले आहे ती मशीन्स प्रत्येक भूमिअभिलेख कार्यालयाला शासनाने पुरविल्या पाहिजेत. जेणे करून शेतकऱ्यांच जमिनी मोजण्याचा प्रश्न हा कायमचा निकाली निधणार आहे.

सभापती महोदय, बाब क्र.84, पृ.60 - शासकीय, अशासकीय शाळा,कनिष्ठ महाविद्यालये यांच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि इतर राज्य शासकीय कर्मचारी वर्ग यांच्या 7 टक्के महागाई भत्त्यासाठी तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासन याचे आदेश काढते आणि पैसे देखील पाठविते परंतु हे पैसे संबंधित कर्मचाऱ्यांपर्यंत 6-6, 7-7 वर्षे पोहोचत नाही. हे पैसे शासनाने पाठवूनही त्या कर्मचाऱ्यांपर्यंत का वेळेवर पोहोचत नाही हे कळत नाही, यामध्ये अधिकाऱ्यांच्या खिशातील पैसे जातात असेही नाही. परंतु हे पैसे देण्यात उशीर का लागतो? आमचे शासन निर्णय घेते, पण संबंधित लोकांपर्यंत या योजना पोहोचत नाहीत. यामध्ये जे कोणी अधिकारी हयगय करीत असतील तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या पुढील काळामध्ये त्याच्यावर कारवाई देखील करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्र.86, पृ.60 - शालेय पोषण आहार कार्यक्रमांतर्गत 38048 स्वयंपाकगृह व भांडारगृह बांधण्याचा निर्णय घेऊन त्यसाठी यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. परंतु आज ही मध्यान्ह भोजन देण्याची योजना सबंध राज्यात राबविली जाते. सुरूवातीस ही योजना 5 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनाच लागू करण्यात आली होती पण आता तिची व्याप्ती वाढवून 8वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना म्हणजे 1ली ते 8वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू करण्यात आली

...... टीटी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. काळे ....

आहे. आज ज्या मोठ्या मोठ्या खाजगी शाळा आहेत, माध्यमिक शाळा आहेत त्यामध्ये देखील या शाळांना हे कोठे शिजवावे याचा प्रश्न पडलेला आहे. म्हणून खाजगी शाळांना देखील ही योजना राबविण्याच्यादृष्टीने स्वयंपाकगृह बांधून देण्याचे काम महाराष्ट्र शासनाने यापुढील काळात केले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्र.89, पृ.62 - अंतर्वासिता (इंटर्नशीप) करणाऱ्या शिक्षणशास्त्र पदविका विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. अंतर्वासिता विद्यार्थ्यांना गेल्या वर्षीपासून आपण 1500 रूपये मानधन देण्याचे सुरू केले आहे. त्याचे वाटप होत असताना देखील त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होऊ लागला आहे. अनेक महाविद्यालये आमची अमुक फी राहिली, तमुक फी राहिली असे सांगून त्या पैशातून पैसे कापून घेऊन विद्यार्थ्यांना पैसे देऊ लागली आहेत. विद्यार्थ्यांना देखील मुकाटपणे महाविद्यालयाने कापून घेऊन उरलेले पैसे घ्यावे लागतात. म्हणून मी या निमित्ताने आपल्याकडे मागणी करतो की, हे जे 1500 रूपये विद्यावेतन विद्यार्थ्यांना आपण देतो आहोत ते यापुढील काळामध्ये चेकने देण्याचे धोरण स्वीकारावे.

सभापती महोदय, बाब क्र.91, पृ.62 - विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी दरवर्षी शासन करोडो रूपयांची तरतूद करीत असते. प्राथमिक पासून वरिष्ठ महाविद्यालयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती आपण देत असतो. परंतु आज तेथे वर्ष पूर्ण झाल्यानंतर देखील, अगदी विद्यार्थी शिकून बाहेर पडल्यानंतरदेखील त्याच्या हाती या शिष्यवृत्तीची रक्कम पडत नाही. आपले शासन एवढे चांगले निर्णय घेत असताना त्यांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत नाही. म्हणून शैक्षणिक वर्ष सुरू झाल्या पासूनच म्हणजे अगदी ऑगस्ट-सप्टेंबर पर्यंतच यासाठी तरतूद करून विद्यार्थ्यांना त्याच वर्षात शिष्यवृत्तीची रक्कम मिळेल या दृष्टीने व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.93, पृष्ठ क्र.63 - इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील मुलींना विनामूल्य सायकली पुरविण्यासाठी तरतूद आपण केलेली आहे. मी असे म्हणेन की, ज्यांच्यामुळे या राज्यामध्ये नव्हे देशामध्ये मुलींना शिक्षण देण्याची सुरूवात झाली, ज्यांच्यामुळे या महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू झाली आणि मुलींना शिक्षण घेण्याची व देण्याची व्यवस्था सुरू झाली त्या सावित्रीबाई फुले यांचा आदर्श ठेवून आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये मुलांपेक्षादेखील जास्त संख्येने मुली शिक्षण घेत असल्याचे आम्हाला दिसते आहे. तेव्हा

...... टीटी 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



KBS/SBT/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 15:05

श्री. काळे ....

आठवी इयत्तेमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींना मग त्या कोणत्याही घटकातील, कोठल्याही जाती-जमातीच्या समाजातील मुली असतील त्या सर्वांनाच सायकल पुरविण्याचा निर्णय शासनाने या पुढील काळामध्ये घेतला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.96, पृ.64 - शिक्षण संचालकाच्या आस्थापनेवरील गट क व ड ची रिक्त पदे भरण्यासाठी तरतूद यात करण्यात आली आहे. परंतु शिक्षण संचालकाचेच पद आज प्रभारी आहे. जो राज्याचा मुख्य शिक्षण संचालक आहे त्यांचेच पद प्रभारी आहे इतकेच नव्हे तर कित्येक जिल्ह्यामध्ये शिक्षणाधिकारी नाहीत. प्राथमिक शिक्षणाधिकारी नाहीत. आज माझ्याच लातूर जिल्ह्याचे उदाहरण घ्यायचे झाले तर जे बोर्ड आहे की जे 10-12वी च्या परीक्षा घेत असते, अतिशय महत्त्वाच्या या परीक्षा असतात पण या बोर्डाला अध्यक्ष आज नाही. त्या अध्यक्षाचा प्रभार शिक्षण संचालकाकडे दिलेला आहे. म्हणजे त्याने पूर्ण राज्याचा, विभागाचा कार्यभार सांभाळायचा आणि शिवाय लातूरच्या बोर्डाच्या अध्यक्षाचा कार्यभार देखील सांभाळायचा अशी अवस्था या शिक्षण खात्याची आहेत. त्यामुळे ही जी सगळी महत्त्वाची पदे आहेत ती त्वरित भरण्याचा कार्यक्रम नवीन आलेल्या शिक्षण मंत्र्यांनी जलद गतीने हाती घेतला पाहिजे. ..

( यानंतर श्री. सरफरे .... यूयू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपवितो. पृष्ठ क्रमांक 64-65 वरील बाब क्र. 98, 99 मध्ये अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती देण्याचा क्रांतिकारी धोरणात्मक निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. त्याकरिता विद्यार्थी संख्या 36,800 ठेवण्यात आली असून ती आणखी 20 हजारांनी वाढविली पाहिजे. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकडून ज्यावेळी अर्ज करण्यात येतात, त्यावेळी पात्र ठरलेल्या सर्वांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 72 वरील बाब क्र.110 मध्ये तुळजापूर तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. माननीय राज्यमंत्री श्री. राणा जगजितसिंह पाटील सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्याकडे या खात्याचा कार्यभार असतांना त्यांनी या कामासाठी आमदारांचा निधी उभा केला होता. महाराष्ट्र शासनाने त्या मंजूर केलेल्या निधीचा परिपूर्ण वापर होण्यासाठी एक प्राधिकरण स्थापन करावे आणि हे काम जलद गतीने करावे. आणि कृती कार्यक्रम राबवून ही योजना पूर्ण करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्र. 11 च्या अनुषंगाने कोकणामध्ये संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारखे छत्रपती संभाजी महाराजांचे देखील महाराष्ट्रामध्ये प्रेरणा स्थान आहे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी आपले भाषण 5 ते 7 मिनिटामध्ये संपवावे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी शासनाने 13 लाख रुपये दिले होते. तो निधी कमी पडल्यामुळे चार-पाच वर्षे स्मारकाचे काम अर्धवट राहिले. त्यामुळे 15 लाखाचा प्रस्ताव तेथील प्रशासनाने राज्य सरकारकडे पाठविला. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, पर्यटनाच्या दृष्टीने हे एक ऐतिहासिक ठिकाण आहे. त्यामुळे शासनाने 15 लाखाच्या प्रस्तावाला त्वरीत मंजूरी ध्यावी अशी मागणी करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 174, बाब क्र. 197 च्या अनुषंगाने असे सांगू इच्छितो की, ठाणे जिल्हयात माझ्यासारख्या अनेक लोकप्रतिनिधींनी यशवंत ग्राम समृध्दी योजनेच्या माध्यमातून अनेक कामे सुचविली. परंतु कोणतेही काम मंजूर झालेले नाही. त्याकरिता आर्थिक तरतूद करण्यात आली नाही काय? सुचविण्यात आलेल्या कामांवर किती पैसे खर्च झाले? याची माहिती देण्यात यावी. सभापती महोदय, पृष्ठ क्र. 174, बाब क्र. 199 च्या अनुषंगाने मी सुचवू इच्छितो की, ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीच्या पाण्याची देयके न दिल्यामुळे त्याठिकाणी पाणीपुरवठा योजना बंद करुन टाकल्या आहेत. त्या सुरु करण्यासाठी शासनाला अनुदान ध्यावे लागत आहे. या योजना पुन्हा सुरु करण्यासाठी आम्हाला मागणी करावी लागते. याबाबत माझी अशी विनंती आहे की, जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनांची देण्यात आलेली कामे अतिशय निकृष्ट दर्जाची असतात. त्याकरिता वापरण्यात येणारे साहित्य अतिशय भंगार असते. त्यामुळे या योजना नीटपणे चालत नाहीत. तेव्हा सुरुवातीची तीन वर्षे ही योजना जीवन प्राधिकरणाने चालवावी आणि त्यानंतर ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावी अशी मी विनंती करतो.

..... यूयू 3 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 186 वरील बाब क्र. 211 च्या अनुषंगाने मी असे सुचवू इच्छितो की, इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी, आणि मुलांच्या वसतिगृहासाठी निधी दिला जातो. याबाबत मी अनेक वेळा पाठपुरावा केला आहे. रत्नागिरी जिल्हयातील डोरले येथे मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहासाठी 2001 सालापासून इमारत बांधण्यासाठी पाठपुरावा केला जात असून त्याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केली गेली नाही. मी यावर्षीच्या दोन्ही अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित केला होता. तेव्हा डोरले येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहासाठी शासनाने त्वरित निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 29 व बाब क्र. 41 मध्ये भूमि अभिलेखाच्या संगणकीकरणासाठी तरतूद करण्यात आली आहे. आज ग्रामीण भागामध्ये जमिनीच्या मोजणीचे काम अतिशय महत्वाचे मानले जाते. शासनाने संगणकीकरणाच्या माध्यमातून जमिनीच्या अभिलेखाचे काम अद्ययावत केले आहे. परंतु जमिनीच्या मोजणीचे काम त्याठिकाणी तेथील अधिकाऱ्यांच्या मर्जीवर चालते. जर जमिनीची मोजणी करुन घ्यावयाची असेल तर त्यांना पैसे दिल्याशिवाय नीटपणे मोजणी करीत नाहीत. म्हणून माझी अशी मागणी आहे की, तेथील शेतकऱ्यांना जमिनीचे उतारे देण्याबरोबर शेत जमिनीचा नकाशा देखील दिला पाहिजे. यामुळे संगणकीकरणाचे काम सार्थकी लागेल.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 31 वरील बाब क्रमांक 45 बाबत बोलावयाचे आहे. दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या लोकांना अर्थसहाय्य करणे यासंदर्भात ही बाब आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये देखील याबाबत पहिलाच प्रश्न होता परंतु आज प्रश्नोत्तराचा तास झाला नाही. या दंगलग्रस्त भागामध्ये वेळेवर निधी पोहोचत नाही. ठाण्याला राबोडी भागामध्ये दंगल झाली. त्यांना अजूनही चेक मिळालेले नाहीत. त्या ठिकाणी दुकानांचे नुकसान झाले, घरांचे नुकसान झाले. त्यांना वेळच्या वेळी पैसे मिळाले नाहीत, त्यांना चेक मिळालेले नाहीत तर ते योग्य होणार नाही. त्यांना ताबडतोब चेक दिले जावेत अशी माझी मागणी आहे. माझी दुसरी मागणी अशी आहे की, शासनाने ही रक्कम किती असावी हे फार पूर्वी ठरवले आहे. घरासाठी 4800 रुपये देण्यात येतात. ज्या घराचे लाखो रुपयांचे नुकसान झाले त्यांना 4800 रुपये शासनाच्या जी.आर. प्रमाणे आपण देणार. याबाबत शासनाने निकष बदलावेत अशी मागणी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 60 वरील बाब क्रमांक 86 बाबत बोलावयाचे आहे. मुरबाड तालुक्यामध्ये ज्या अंगणवाड्या आणि बालवाड्या आहेत त्यांना पोषण आहार पुरविण्याची जबाबदारी महिला बचत गटांना दिली जाते. परंतु सहा सहा महिने त्यांचे पैसे किंवा देयक दिले जात नाही. एका बाजूला हे महिला गट चांगले काम करीत आहेत आणि दुसऱ्या बाजूला त्यांना सहा सहा महिने देयक दिले नाही तर हे महिला बचत गट काम करु शकणार नाहीत किंवा हे महिला बचत गट काम स्वीकारणार नाहीत. त्यामुळे त्यांना ताबडतोब देयके दिली जावीत अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 64 वरील बाब क्रमांक 97 बाबत बोलावयाचे आहे. डी.एड. कॉलेजमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप दिली जाते. ही चांगली योजना आहे. आजही ठाणे जिल्ह्यामध्ये शहापूरमधील अध्यापक कॉलेजमधील विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप मिळाली नाही पण त्यांनी आशा सोडली नाही. त्यांनी आंदोलनाची भूमिका धेतल्यानंतर त्यांना स्कॉलरशीप दिली गेली. यासंदर्भात संस्थेवर व्हिजिलंस ठेवला पाहिजे. त्या संस्थेने दुसरीकडे पैसे वापरले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कर्ज काढून शिक्षणाचे पैसे देण्याची पाळी आली. याबाबतीत व्हिजिलंस ठेवला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

...2...

अंसुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. संजय केळकर ....

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 21 वरील बाब क्रमांक 31 बाबत बोलावयाचे आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये होमगार्डकरिता निधी दिला जातो. प्रत्येक जिल्ह्यामध्ये नागरी संरक्षण दल आहे. डिझास्टर मॅनेजमेंटसाठी ते उपयोगी दल आहे. त्यांचे काम चांगले चालते. त्यामुळे नागरी संरक्षण दलाला देखील होमगार्ड प्रमाणे प्रशिक्षणाचा भत्ता आणि आवश्यक ते साहित्य दिले जावे अशा प्रकारची माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 38 बाबत बोलावयाचे आहे. नवीन रेल्वेमार्गाकरिता राज्य शासनाने आपला हिस्सा उचललेला आहे. कोकणामध्ये कोकण रेल्वे वरदान ठरलेली आहे. त्या ठिकाणी दुसऱ्या मार्गाकरिता शासनाकडून निधी दिला जावा. तसेच कल्याण व्हाया मुरबाड- अहमदनगर या मार्गाचा सर्व्हे झालेला आहे. त्या रेल्वेमार्गाचे काम सुरु करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रयत्न करावा.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 20 वरील बाब क्रमांक 27 बाबत बोलावयाचे आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये संगणकीकरण करावयाचे आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनला दूरध्वनी देण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे. हे दूरध्वनी बसवले जातात परंतु ते बंद पडतात. याचे कारण असे की, त्या दूरध्वनीचे बिल भरलेले नसते. त्यामुळे शासन यासंबंधात काय तरतूद करणार आहे याचा शासनाने खुलासा करावा.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 13 बाबत बोलावयाचे आहे. ठाणे जिल्हा विस्ताराने मोठा होत आहे. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्या निमित्ताने पोलीस स्टेशनची मागणी वेळोवेळी होत आहे. शासन प्रशासकीय मंजुरी देते परंतु प्रत्यक्ष त्या ठिकाणी पोलीस स्टेशनची स्थापना होत नाही. भाईंदरमधील नवघर पोलीस स्टेशन असेल किंवा कळवा पोलीस स्टेशन असेल, ते हद्दीच्या बाहेर आहे. गृह विभाग शासनाकडे मागणी करते मी आम्हाला 1 एकर, 2 एकर जमीन द्या. पोलीस स्टेशन हद्दीमध्ये असले पाहिजे. पोलीस स्टेशनच्या निर्मितीकरिता ताबडतोब व्यवस्था केली जावी अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, मला विधी व न्याय विभागाचे अभिनंदन करावयाचे आहे. वसई न्यायालयाकरिता त्यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच माणगाव, गुहागरसाठी मान्यता दिलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

लोकसंख्या वाढत असल्यामुळे तेथील लोकांची दिवाणी न्यायालयाची मागणी आहे. 4 दिवसापूर्वी भिंवडी येथील वकील संघटनेने काम बंद केले होते. भिवंडी येथे वरिष्ठ न्यायालय, सत्र न्यायालय सुरु होण्याची त्यांनी मागणी केली आहे. त्यांना 30 कि.मी.पर्यंत ठाण्याला जावे लागते. पद निर्मितीची मागणी विधी व न्याय विभागाने मंजूर केली तर तेथे न्यायालये सुरु होऊ शकतात. पनवेलचाही असाच प्रश्न आहे. तो प्रश्न सुध्दा सोडवावा.

सभापती महोदय, कोकणामध्ये पर्यटन स्थळे अधिक असल्यामुळे कोकणात मोठया प्रमाणावर पर्यटक जातात. तेथे परशुरामाचे मंदिर, मार्लेश्वर मंदिर, गणपतीपुळे, जयगड मंदिर, कुणकेश्वर मंदिर आहे. कोकणातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याचे शासनाने धोरण ठरविलेले आहे. या सर्व ठिकाणी सध्या पाण्याची व शौचालयांची व्यवस्था नसल्यामुळे ही व्यवस्था प्रथम केली पाहिजे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या पान क्र.73, बाब क्रमांक 112 बाबत मी माझे विचार व्यक्त करतो. राज्यातील नगरपालिका व नगरपरिषदांना सहाय्यक अनुदान देणे याकरिता तरतूद केली आहे. या मागणीद्वारे शासनाने नगरपरिषद क्षेत्रात वैशिष्टयपूर्ण कामासाठी राज्यातील नगरपरिषदांना 55 कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे ठरविले आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. परंतु मी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. विदर्भातील नगरपालिकांना वा नगरपरिषदांना अनुदान देण्याच्या बाबतीत हे शासन कमी पडत आहे. या पुरवणी मागणीद्वारे संपूर्ण राज्यातील नगरपालिकांसाठी अनुदान मंजूर केले आहे. शासन काही नगरपालिकांचे प्रस्ताव मान्य करते. परंतु त्यांना अनुदानाचा दुसरा,तिसरा हप्ता मिळत नाही. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा या नगरपालिकांनी जकात कर बंद केलेला आहे. मुंबई, नाशिक व पुणे या महानगरपालिकांमध्ये मालमत्ता कर जमा होतो त्या प्रमाणात विदर्भातील नगरपालिकांमध्ये मालमत्ता कर जमा होत नाही. त्यामुळे विदर्भातील नगरपालिकांना जास्तीत जास्त अनुदान द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल व वन विभागाच्या पान क्र.32, बाब क्रमांक 47 वर बोलत आहे. चंद्रपूर जिल्हयामध्ये 2006-07 व 2007-08 या दोन वर्षामध्ये पूर आला होता. शासनाने तेथील पूरग्रस्तांसाठी या कामासाठी 20 ते 22 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला, त्यापैकी पहिला 2 कोटीचा हप्ता दिलेला आहे, दुसरा, तिसरा हप्ता दिलेला नाही. या पूरग्रस्तांसाठी 50-60 कोटींचा प्रस्ताव विभागाकडे गेला होता, त्यापैकी 20 कोटी रुपये मंजूर केले आणि या 20 कोटींपैकी केवळ 2 कोटी रुपये मिळाले आहेत. उर्वरित निधी अद्याप मिळालेला नाही. हा सर्व नक्षलग्रस्त व आदिवासी भाग आहे. या भागातील रस्त्यांची दुरुस्ती, शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करणे, काही लोकांच्या घरांची दुरुस्ती करणे यासाठी हा निधी मंजूर केला होता. अनेक लोक आमदार, खासदार आणि जिल्हाधिका-यांकडे चकरा मारत आहेत. त्यामुळे शासनाने या कामासाठी जेवढा निधी मंजूर केला होता तेवढा संपूर्ण निधी द्यावा अशी विनंती करतो.

यानंतर वन विभागाच्या पान क्र.33 वरील बाब क्र.50, 51, 52 व 53 वर माझे विचार मांडतो. ताडोबा, कोळसा येथे आरक्षित वन क्षेत्र आहे. त्याठिकाणी काही वर्षापासून पँथर्स, वाघ व इतर जनावरे जंगल सोडून शहरामध्ये सातत्याने येत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:25

(श्री. जैनद्दिल जव्हेरी....)

या वर्षी 18 वाघ आणि चित्ते शहरात आले होते. त्यातील काही पकडले गेले आणि काही मारले गेले. आपण वाईल्ड लाईफ विकासासाठी निधीची तरतूद केलेली आहे. परंतु वन्य प्राण्यांना चारा आणि पाणी मिळेल याची देखील व्यवस्था करावी जेणे करुन ते शहरामध्ये येणार नाहीत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 50 ते 55 मध्ये तरतूद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार जंगलामध्ये चारा आणि पाण्याची व्यवस्था होईल यादृष्टीने विकास करावा. ताडोबा, कोळसा, लोहारा येथील वन जमिनीवर उद्योगासाठी परवानगी देण्यात येत असेल तर मग जनावरे शहराकडे जाणार नाहीत काय ? तेव्हा वन जमिनीवर उद्योग करण्यास परवानगी देऊ नये अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड अनिल परब (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2008-09च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 1, पृष्ठ क्रमांक 5. मतदार याद्यांचे पुनरीक्षण करणे, त्या तयार करणे व त्यांचे मुद्रण यासाठी रु. 15.39 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. मतदार याद्या चुकीच्या आहेत, त्यामध्ये घोळ आहे. या याद्या बनविण्याच्या संदर्भात मध्यंतरी ज्याला कॉन्ट्रॅक्ट दिले त्याने किती जणांना सबकॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. चुका करणाऱ्या लोकांची पेनल्टी वाढवावी जेणेकरुन पुरवणी मागणीवरील अतिरिक्त भार कमी होईल.

बाब क्रमाक 11, पृष्ठ क्रमांक 9. "छत्रपती शिवराय" या हिन्दी दूरचित्रवाणी मालिकेस वित्तीय सहाय्य देण्यासाठी रु. 3.54 लाख खर्चाची मागणी करण्यात आलेली आहे. या मालिकेची निर्मिती 52 भागामध्ये करण्यासाठी रु. 50 लाख मंजूर करण्यात आलेले आहेत. मालिकेच्या 38 भागापैकी 34 भागासाठी रु. 34 लाख चुकते करण्यात आलेले आहेत. उर्वरित 34 भागासाठी रु. 3.54 लाख एवढी रक्कम देणे आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आलेले आहे. यामुळे मालिका 52 भागाची आहे की,68 भागाची आहे ? 34 भागासाठी 34 लाख देण्यात आले आहेत. मग उर्वरित 34 भागासाठी 3.54 लाख एवढी कमी रक्कम कशी ? असे प्रश्न उद्‌भवतात. या प्रश्नांची माहिती कृपया द्यावी.

बाब क्रमांक 12, पृष्ठ क्रमांक 9. सामान्य माणसासाठी घेतलेल्या कल्याणकारी निर्णयांच्या प्रसिध्दीसाठी प्रसार माध्यमाद्वारे प्रसिध्दी देण्यासाठी रु. 2.75 कोटीची मागणी करण्यात आलेली आहे. हा खर्च दिलेले प्रयोजन विचारात घेता जास्त व अनाठायी वाटतो. गावपातळीवर शासनाच्या विविध खात्याचे कर्मचारी नियुक्त आहेत. तालुका ते जिल्हास्तरावर ही यंत्रणा कार्यरत आहे. जिल्हास्तरावर हा खर्च वेगळा दाखविला जातो त्याच प्रमाणे तालुकास्तरावर हा खर्च वेगळा दाखविला जातो. तेव्हा प्रसिध्दी व कार्यान्वयानाचा खर्च मुख्य बजेटमध्ये दाखविण्यात यावा.

बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 17. सन 1993मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या तपासात सहभागी झालेल्या पोलीस कर्मचारी/अधिकारी यांना बक्षिस देण्यासाठी रु. 20.99 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद करण्यासाठी 15 वर्षे विलंब का झाला ? तपासात सहभागी

..3



MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. अनिल परब...)

झालेल्या लोकांना की तपासामध्ये विशेष कामगिरी करणा-या लोकांना हे बक्षित देण्यात येणार आहे ? हा एक चांगला उपक्रम आहे. ज्यांनी विशेष कामगिरी केली त्यांना विशेष इन्सेटिव्ह देण्यात यावे.

बाब क्रमांक 25, पृष्ठ क्रमांक 20. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यासाठी ही मागणी केलेली आहे. नक्षलवादी हल्ला असो अथवा अतिरेकी हल्ला असो. त्या हल्ल्यामध्ये मृत पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकास भरपाई देण्याबाबत एकच धोरण निश्चित करण्याची आवश्यकता आहे. नुकत्याच झालेल्या अतिरेकी हल्ल्यामध्ये मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना भरपाई देताना कोणते निकष वापरण्यात आले ? त्यांना भरपाई देण्यात आलेली आहे काय ? दिलेली नसेल तर ती त्यांच्या कुटुंबियांकडे लवकरात लवकर जाणे आवश्यक आहे.

...नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 15:30

श्री. अनिल परब...

सभापती महोदय, पृ.क्र.18, बाब क्रमांक 18, गृह विभागाच्या नियंत्रणाखालील शवविच्छेदन केंद्राच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी व दुय्यक कर्मचारीवर्ग यांना प्रोत्साहक रकमा देण्यासाठी 25 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. गृहविभागाच्या नियंत्रणाखाली शवविच्छेदन केंद्राच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना ज्या प्रमाणे प्रोत्साहक रक्कमा देण्यात येतात, त्याप्रमाणे शासकीय रुग्णालयामधील अधिकारी व कर्मचा-यांना सुध्दा अशाचप्रकारे प्रोत्साहक भत्ता देण्यात यावा अशा प्रकारची माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 18, बाब क्रमांक 17, पोलीस बँड पथकासाठी वाद्ये व गणवेश यांची खरेदी करण्यासाठी 33.38 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी योग्य आहे, त्याबाबतीत हरकत घेण्यासारखे काही नाही. मात्र पोलीस शिपाई यांना शासनातर्फे गणवेशाचे दोन जोड वर्षातून एक वेळा दिले जातात. त्यातही गणवेशाच्या कपडयाची प्रत हलक्या दर्जाची असते. हे गणवेश देखील वेळेवर दिले जात नाहीत. पोलीस शिपाई त्या दोन गणवेशाचा वापर जास्त करतात. पोलिसांना दोन गणवेशावर वर्ष काढणे कठीण जाते. त्यामुळे पोलिसांना प्रतिवर्षी चांगल्या प्रतीच्या कापडाचे चार गणवेश देण्यात यावेत अशा प्रकारची माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने मी ज्या सूचना केल्या आहेत त्याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी प्रकारची पुनःश्च विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्रीमती मधु जैन (विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित) :सभापति महोदय, मैं वर्ष 2008-09 की पूरक मांगों पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. मैं ऊर्जा विभाग के अन्तर्गत आयटम नंबर 186,187 एवम् 188 के संबंध में अपने विचार रखना चाहती हूं. महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी द्वारा रत्नागिरी गॅस व बिजली प्राईवेट लिमिटेड में विनियोग के लिए प्रावधान किया गया है. यहां पर तीन विषय हैं. थर्मल पावर जनरेशन के लिए करीब 250 करोड़ रुपये की तरतूद की गई है. ट्रांसमिशन एवम् डिस्ट्रीब्यूशन के लिए करीब 500 करोड़ की पूरक मांग रखी गई है. सभापति महोदय, राज्य में कुल 13500-14000 मेगावाट बिजली की मांग है लेकिन राज्य केवल 9500 मेगावाट बिजली का उत्पादन कर रहा हैं. गोडबोले समिति ने करीब 6 साल पहले वर्ष 2002 में बिजली के संबंध में रिपोर्ट पेश की थी. जिसमें वर्ष 2002 से 2010 तक की जानकारी दी गई थी कि किस तरह से बिजली का उत्पादन कर सकते हैं. बिजली का किस प्रकार से नियोजन किया जाए, इस की भी जानकारी दी थी. इस रिपोर्ट के अनुसार राज्य में 13500 मेगावाट बिजली का उत्पादन होना चाहिए था. लेकिन इतनी बिजली का उत्पादन नहीं हुआ है. इसका अर्थ यह है कि हमारा राज्य बिजली उत्पादन में पीछे रह गया है. हमारे राज्य ने बिजली उत्पादन में कोई प्रगति नहीं की है. आवश्यकता के अनुसार बिजली प्रोजेक्ट नहीं हुए है. इसलिए मेरा अनुरोध है कि इस विषय में ध्यान दिया जाए. राज्य सरकार ने बिजली के जितने प्रोजेक्ट मंजूर किए हैं, जैसे रिलायंस, जिंदल, टाटा कंपनी के जो प्रोजेक्ट मंजूर किए हैं, उन प्रोजेक्ट की क्या प्रगति है ? मैं यह भी जानना चाहती हूं कि ये प्रोजेक्ट पूरे हो जाने के बाद क्या हमारा राज्य बिजली के क्षेत्र में आत्मनिर्भर हो सकेगा ? बिजली के विषय में ज्यादा से ज्यादा ध्यान दिया जाए क्योंकि बिजली की कमी के कारण औद्योगिक उत्पादन पर विपरीत असर होता है. आज हमारा देश आर्थिक मंदी के दौर से गुजर रहा है. विश्व भी आर्थिक मंदी के दौर से गुजर रहा है. मंदी के कारण उद्यागों पर खराब असर हो रहा है. लोडशेडिंग के कारण भी उद्योग पर खराब असर हो रहा है. पहले 8-12 घंटे तक लोडशेडिंग की जाती थी जिससे उद्योग बंद पड़े रहते थे. आज स्थिति यह है कि 15 से 20 घंटे तक लोडशेडिंग है. अगर उद्योगों को पर्याप्त बिजली नहीं मिलेगी तो उत्पादन पर असर हो कर वह कम हो जाएगा. दूसरा विपरीत परिणाम यह होगा कि हम विश्व के दूसरे देशों के साथ स्पर्धा नहीं कर पायेंगे. इसलिए उद्योगों को पर्याप्त बिजली मिलनी चाहिए. दूसरी बात यह है कि पर्याप्त बिजली न मिलने के कारण कृषि

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्पादन पर भी विपरीत असर हो रहा है. सिंचाई के प्रकल्प पूरे हो गए हैं लेकिन बिजली न होने के कारण किसान बिजली का उपयोग नहीं कर पा रहे हैं जिसकी वजह से कृषि उत्पादन पर खराब असर हो रहा है. बिजली की कमी से किसानों को काफी नुकसान उठाना पड़ रहा है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि समुचित नियोजन किया जाना चाहिए और प्रोजेक्ट समय पर पूरे किए जाने चाहिए. आज सिंचाई प्रकल्पों की क्या स्थिति है ? दूसरी बात यह है कि बिजली क्षेत्र में बहुत नुकसान हो रहा है. क्या यह सही है कि बिजली के वितरण क्षेत्र में 35 प्रतिशत नुकसान हो रहा है ? इस नुकसान को दूर करने के लिए सरकार क्या कदम उठा रही है ? सरकार कितनी तेजी से कदम उठा रही है, इसकी जानकारी दें.

सभापति महोदय, गावठाण स्वतंत्र उपमार्ग ( फिडर ) योजना बनाई गई है. मैं यह जानना चाहती हूं कि इस योजना से अभी तक कितने गांवों को फायदा हुआ है, सरकार ने इस संबंध में क्या नियोजन किया है और क्या सरकार इस योजना को समय पर पूरा कर सकेगी ?

सभापति महोदय, गुजरात में कुल पावर लॉस 12 प्रतिशत है. अंतर्राष्ट्रीय स्तर पर बिजली में 5 प्रतिशत लॉस है. लेकिन हमारे राज्य में बिजली में 35 प्रतिशत लॉस है. इसलिए मैं यह कहना चाहती हूं कि इसके आगे हमारा अच्छी तरह से नियोजन होना चाहिए और योजनाएं समय पर पूरी होनी चाहिए. हमारा नियोजन समयबध्द होना चाहिए ताकि बिजली के क्षेत्र में हमारा राज्य जल्द से जल्द आत्मनिर्भर हो सके.

सभापति महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग के अन्तर्गत आयटम क्रमांक 126 के संबंध में मैं यह कहना चाहती हूं कि रोड और ब्रीज के निर्माण के लिए 5 करोड़ 30 लाख रुपये की तरतूद प्रस्तावित की गई है और आयटम क्रमांक 127 के अन्तर्गत 1 करोड़ 60 लाख रुपये की तरतूद प्रस्तावित की गई है. मैं इस विषय में यह कहना चाहती हूं कि सड़क दुर्घटनाएं बहुत ज्यादा हो गई है. इसका एक कारण रोड का खराब होना भी है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि खराब रस्तों का जल्द पुनर्निमाण किया जाए और समय के अन्दर निर्माण कार्य हो. क्या यह सही है कि पिछले साल केन्द्रीय सरकार से प्राप्त करीब 4500 रुपये का उपयोग राज्य सरकार द्वारा न किए जाने के कारण वह धन राशि वापस चली गई ? मेरा सरकार से अनुरोध है कि इस वर्ष केन्द्रीय सरकार की ओर से जो धन राशि मिली है, वह पूरी खर्च की जाए, उसका पूरा उपयोग किया जाए और समय के भीतर निर्माण कार्य पूर्ण किए जाए ताकि जनता को उसका फायदा हो सके. इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद.

.....

श्री.गोपीकिशन बाजोरिया (अकोला-वाशिम-बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

बाब क्र.380, पृष्ठ क्र.305 नांदेड जिल्हयातील माहूरगड येथे पर्यटन विकासासाठी शासनाने 4.91 कोटी रुपयांची तरतूद केली आहे त्याचे मी स्वागत करतो. या अनुषंगाने पर्यटन मंत्री श्री.मोहिते-पाटील यांना मी सांगू इच्छितो की, सिध्दपेठ-आळंदी येथे मागील दोन अधिवेशनात 400 कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला असून त्यामध्ये ज्ञानेश्वर माऊलीच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी 25 कोटी रुपये दिले जातील असे आश्वासन देण्यात आले होते. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असताना हेच आश्वासन देण्यात आले होते. परंतु आतापर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, पर्यटन विकासाच्या माध्यमातून आळंदीसाठी किमान 5 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले तर विकासाचे काम सुरु होईल.

सभापती महोदय, बाब क्र.23, पृ.क्र.19 वर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शस्त्र खरेदी करण्यासाठी रु.2.83 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 1993 च्या बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासात सहभागी झालेल्या पोलिसांना बक्षिस देण्यासाठी 20 लाखाची तरतूद केली आहे. या निर्णयाचे सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले आहे. परंतु 1993 पासून आजपर्यंत 15 वर्षाचा विलंब का झाला हा एक प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, बाब क्र.28, पृ.क्र.20 वर महात्मा गांधी तंटामुक्तीसाठी लेखणी खरेदी करण्यासाठी 3.12 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकीकडे शस्त्र खरेदीसाठी 2.83 कोटी रुपये आणि दुसरीकडे लेखणी खरेदीसाठी 3.12 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत, यामध्ये योग्य तो समन्वय दिसून येत नाही. शस्त्र खरेदीसाठी भरीव तरतूद शासनाने करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्र.46, पृ.क्र.31 वर राज्यामध्ये निकडीच्या पाणीपुरवठा योजनांसाठी अतिरिक्त तरतूद म्हणून 30 कोटी रुपये मागितले आहेत. अकोला जिल्हयात अकोला महानगरपालिकेच्या क्षेत्रात फक्त एकच काटेपूर्णा धरण आहे. यावर्षी पुरेसे पाणी या धरणात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया.............

साठलेले नाही. या अनुषंगाने मी आपल्यामार्फत माननीय नगरविकास मंत्र्यांना निवेदन करतो की, अकोल्यामध्ये भीषण पाणी टंचाई यावर्षी निर्माण होणार आहे. त्यामुळे 5 कोटी रुपयांची विशेष तरतूद निकडीच्या पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून करण्यात यावी अशी विनंती आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया .......

सभापती महोदय, बाब क्र. 41, पृ.क्र. 29 या मागणीच्या माध्यमातून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख विभागासाठी महसूल विभागाची पुरवणी मागणी आलेली आहे. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, सन 1927 पासून संपूर्ण राज्यातील सेटलमेंट सर्व्हे झालेला नाही. कुठल्याही शहरात पाहिले तरी जागांचे ऑर्गनायझेशन मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. परंतु सर्व्हे नंबर, गुंठेवारी ले-आऊट अशा प्रकारे संपूर्ण इललिगली डेव्हलपमेंट होत आहे. म्हणून संपूर्ण राज्यात एकदा सेटलमेंट सर्व्हे होण्याची गरज आहे. तो सर्व्हे लवकरच करावा.

यानंतर बाब क्र. 115, पृ.क्र. 73 आणि बाब क्र. 116, पृ.क्र.74 महानगरपालिका व नगरपालिकांना अनुक्रमे पायाभूत सुविधांसाठी 40 कोटी आणि 3 कोटीची तरतूद केली आहे. अकोला, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यात इंटेरियरमध्ये "क" व "ड" नगरपालिका आहेत, त्यांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा पुरविल्या जात नाहीत. महानगरपालिकांकडे ऑक्ट्रॉयसारखे उत्पन्नाचे साधन असते परंतु "क" व "ड" नगरपालिकांकडे अशी साधने नसतात, त्यासाठी भरीव तरतूद करण्याची गरज आहे. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MMP/

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांबाबत बोलत असताना प्रामुख्याने बाब क्र. 84, पृ.क्र.60 बाबत मी माझा मुद्दा मांडणार आहे. शासनाने जुलै, 2008 पासून नुकताच जो 7 टक्के महागाई भत्ता दिलेला आहे त्यासाठी 214 कोटी 97 लाख 93 हजाराची ही पुरवणी मागणी दिलेली आहे. वेतनाच्या संदर्भात शासनाने दिवाळीपूर्वी दोन महिन्याच्या बेसिकएवढी रक्कम अग्रीम म्हणून दिली आहे. ही अग्रीमाची रक्कम वेतनाच्या निधीतून दिलेली असल्यामुळे जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांचा पगार देण्यासाठी रक्कम अपुरी पडत आहे. म्हणून काही शाळांमध्ये जानेवारी व फेब्रुवारीचे वेतन होणार नाही, कारण त्यासाठी निधी अपुरा पडत आहे. यासाठी तातडीने निधी देण्यात यावा, अशी मी मागणी करतो.

यानंतर बाब क्र. 36, पृ.क्र. 60 शालेय पोषण आहाराच्या संदर्भातील मागणी असून शासनाने एक निर्णय चांगला घेतलेला आहे की 38048 प्राथमिक शाळांमध्ये स्वयंपाक खोली म्हणजे भांडारगृह बांधण्याची ही योजना आहे. ज्याप्रमाणे प्राथमिक शाळांमध्ये ही व्यवस्था आहे तशीच खाजगी माध्यमिक शाळांमध्ये सुध्दा आहे. परंतु त्या शाळांची नॉन सॅलरी ग्रँट बंद असल्यामुळे अशा शाळांमध्ये सुध्दा स्वयंपाकगृहे बांधण्याची गरज आहे. त्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी मागणी करतो.

यानंतर बाब क्र. 87, पृ.क्र.61 च्या माध्यमातून शालेय शिक्षण विभागाने मध्यान्ह भोजन योजना सप्टेबर, 2008 पासून संपूर्ण राज्यात सुरु केली असून सहावी ते आठवीच्या वर्गातील मुलांसाठी ही योजना आहे. पण प्रत्यक्षात 80 टक्के शाळांमध्ये ही योजना लागू झालीच नाही. काही ठिकाणी तांदूळ नाही तर काही ठिकाणी निधी दिलेला नाही. म्हणून यासाठी ताबडतोबीने निधी उपलब्ध करुन द्यावा व या योजनेची अंमलबजावणी सर्व शाळांमध्ये सुरु करावी तसेच तांदूळ उपलब्ध करुन द्यावा.

यानंतर ग्रामविकास विभाग, बाब क्र. 189 पृ.क्र.172 च्या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, सन 2006-07 मध्ये जिल्हापरिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या त्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अद्यापही मोबदला दिलेला नाही. उदा. भंडारा जिल्ह्यातील 10 ते 15 लाखाची रक्कम थकित आहे. यासाठी तरतूद 23 लाखाची केली आहे परंतु ती कमी असल्यामुळे तसेच दोन-दोन, तीन-तीन वर्षांपासून निवडणुकीचा मोबदला देत नसाल तर हे योग्य नाही. हा मोबदला तातडीने देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MMP/

(**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड. अनिल परब**)

यानंतर बाब क्र. 191, पृ.क्र.172 भंडारा जिल्हयाचाच एक महत्वाचा प्रश्न आहे. जिल्हापरिषदेच्या माध्यमिक शाळांतील शिक्षकांचे निवृत्ती वय दि. 31.12.1965 पूर्वी सेवेत होते त्यांना 60 वर्षे निवृत्तीचे वय आहे. पण हायकोर्टातून जे लोक रिलीफ घेऊन आले, त्यांना मात्र 60 वर्षे निवृत्तीचे वय देण्यात आले आहे.

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.व्ही.यु.डायगव्हाणे....

परंतु जे कोर्टात गेले नाहीत त्यांना 60 वर्षाच्या सेवेचा फायदा मिळालेला नाही. अशा प्रकारच्या जवळजवळ 20-25 केसेस भंडारा जिल्हयामध्ये आहेत. माननीय मंत्रीमहोदय हे भंडारा जिल्हयाचेच असल्यामुळे तसेच त्यांना जिल्हापरिषदेचे अधिक नॉलेज असल्यामुळे ते या बाबतीत निश्चितपणे लक्ष घालतील अशी आशा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 213, पृष्ठ क्रमांक 187 वरील सामाजिक न्याय व विशेष विभागाच्या संदर्भात मी विचार व्यक्त करणार आहे. या विभागात तर फार गोंधळ आहे. या ठिकाणी पैशांची तरतूद केली जाते परंतु हुंडीने पगार दिला जातो. म्हणजे 12 महिन्याचे पगार चार वेळेस जाणून बुजून दिले जातात. हे मॅनेजमेंटच्या फायद्याचे आहे. एकदम पैसे दिले म्हणजे वसूली सुध्दा एकदमच होऊ शकते. त्यामुळे माझी विनंती आहे आहे की, आपण दर वर्षी तरतूद करीत असतात, यावर्षी तर पेमेंट आणि परीरक्षण अनुदानासाठी 2.51 कोटी दिलेले आहेत. पेमेंट आणि परीरक्षण अनुदान वेळेवर दिले गेले पाहिजे. पेमेंट आणि परीरक्षण अनुदानासाठी तरतूद केली जाते परंतु प्रत्यक्षात जिल्हयापर्यंत हा निधी पोहचत नाही त्यामुळे परीरक्षण अनुदान त्या त्या जिल्हयांमध्ये तातडीने पोहचले पाहिजे. तसेच अनुज्ञाप्तीच्या नावाखाली अनेक शाळेमधील शिक्षकांना पगार मिळत नाहीत. वेळेवर पगार होण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी मागे एक चांगला निर्णय घेतला होता. आता एक एक वर्षाची अनुज्ञाप्ती देण्याऐवजी एकदम 3 वर्षाची अनुज्ञाप्ती दिली जाते. परंतु अनेक शाळांना ही अनुज्ञाप्ती दिली जात नाही. त्यामुळे माननीय हंडोरे साहेबांनी या विषयाकडे लक्ष देऊन तीन वर्षासाठी सर्व शाळांना अनुज्ञाप्ती दिली आणि पगारात नियमितता आणली तर अधिक चांगले होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 215, पृष्ठ क्रमांक 187 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. अनुसूचित जातीच्या विर्द्यासाठी शिक्षवृत्ती दिली जाते. परंतु इयत्ता 10 वी आणि 12 वी वर्गाची परीक्षा उत्तीर्ण होऊन जेव्हा विद्यार्थी बाहेर जातात त्याच्या नंतर वर्ष दोन वर्षानंतर या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. काही मुख्याध्यपकानी तर खोटया सहया करुन शिष्यवृत्ती तसेच परीक्षेची फी उचलल्यामुळे यासंदर्भात तक्रारी झाल्या व त्यामध्ये काही मुख्याध्यापकांवर कारवाई सुध्दा झालेली आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती आणि परीक्षा फी तातडीने दिली तर अधिक योग्य होईल.

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.व्ही.यु.डायगव्हाणे....

सभापती महोदय, बाब क्रमांक 112, पृष्ठ क्रमांक 73, नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण कामासाठी सहाय्यक अनुदान यासंदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण कामासाठी सहाय्यक अनुदान दिले जाते त्यासाठी आता 55 कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आलेली आहे. मी यासंदर्भात आपल्याला उदहरण देऊन सांगतो की, वर्धा नगरपरीषदेला मागच्या वर्षी एक कोटी रुपये देण्यात आले होते परंतु शासनाने लगेच सहा महिन्यांनी या निधीवर बॅन आणून हे पैसे लॉक केले व या एक कोटीतील एक रुपया सुध्दा तुम्हाला खर्च करता येणार नाही असे शासनाने या नगरपरिषदेला सांगितले. शासकीय योजनेसाठी हे पैसे वर्धा नगरपरिषदेला दिले आहे परंतु या निधीवर शासनाने बॅन आणलेला असल्यामुळे हे पैसे नगरपारिषदेला काढता येत नाहीत. या नगरपरिषदेचे अध्यक्ष आणि सदस्य एक कोटी रुपयांचा निधी त्यांच्या नगरपरिषदेला मिळावा या कारणासाठी आज पासून उपोषणाला बसणार होते. त्यामुळे वर्धा नगरपरीषदेला जे एक कोटी रुपयांचे अनुदान मिळणार होते ते अनुदान तातडीने देण्यात यावे अशी विनंती अहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 29, महसुल विभागाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. वर्धा नगरपरीषदेच्या रामनगर एरियामध्ये गेल्या 50-60 वर्षापासून घराची मालकी असलेल्या नागरीकांना प्रॉपर्टी कार्ड मिळत नाही. भूमी अभिलेख्याच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाहीत. त्यामुळे या ठिकाणी खरेदी विक्रीचे सर्व व्यवहार थांबलेले आहेत. हा विषय फार महत्वाचा आहे. या विषयाच्या संदर्भात अनेक अंदोलने झाली परंतु तरी सुध्दा अद्यापपर्यंत हा विषय निकाली निघालेला नाही. त्यामुळे वर्धा नगरपरीषदेच्या रामनगर एरियातील लोकांना तातडीने प्रॉपर्टी कार्ड मिळण्याची व्यवस्था करावी एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

यानंतर फौजिया खान यांचे हिंदी भाषण श्री. तालेवार यांच्याकडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, मैं वर्ष 2008-09 की पूरक मांगों पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. बाब क्रमांक 47 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि औरंगाबाद,नागपुर और अमरावती में सोयाबीन व अन्य फसलों पर लष्कर इल्ली (कीड़े) का हमला होने के कारण फसलों का भारी नुकसान हुआ है. इस नुकसान की पूर्ति के लिए 272 करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. लेकिन परभणी के किसानों को अभी तक अनुदान प्राप्त नहीं हुआ है. पिछले सप्ताह तक तो पंचनामे का काम भी नहीं हुआ था. इसलिए मैं यह मांग करती हूं कि किसानों को जल्द से जल्द अनुदान दिया जाए.

बाब क्रमांक 53 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि वन्यप्राणियों के हमले के कारण फसलों का भारी नुकसान होता है. इस स्थिति में सरकार की ओर से जो अनुदान दिया जाता है, वह बहुत कम है. इसलिए मेरा यह सुझाव है कि अनुदान की राशि में वृध्दि की जाए.

बाब क्रमांक 211 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि राज्य में एस.टी.,एस.सी. के विद्यार्थियों के लिए काफी संख्या में होस्टल है और इस कार्य के लिए करोड़ों रुपये खर्च किए जा रहे हैं. लेकिन क्या इन होस्टलों का दर्जा ठीक है, इस सवाल का उत्तर 'नहीं ' है. यह मैं बहुत जिम्मेदारी के साथ कह रही हूं. इसलिए मेरी यह मांग है कि होस्टल के इंसपेक्शन के लिए हाई लेवल कमेटी नियुक्त की जाए. इसके साथ ही मैं यह भी मांग करती हूं कि होस्टल के लिए पर्याप्त निधि दिया जाए.

बाब क्रमांक 93 के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि, छात्राओं के लिए सायकल देने का प्रावधान किया गया है. मुझे ऐसा लगता है कि स्कूल से छात्राओं का ड्राप आऊट का रेट कम करने के लिए सायकल देने का प्रावधान किया गया है. लेकिन मैं एक बहुत गंभीर बात की तरफ सरकार का ध्यान खींचना चाहती हूं. सर्व शिक्षा अभियान की जो सर्वे रिपोर्ट है, उसके अनुसार परभणी जिले में करीब 2200 छात्राओं ने स्कूल से ड्राप आऊट किया है. लेकिन हाल ही में परभणी को मायनारिटी कॉन्सेन्ट्रेटेड डिस्ट्रिक्ट घोषित किये जाने के कारण वहां पर घर घर जाकर जो सर्वे किया गया है, उस सर्वे के अनुसार करीब 22 हजार बच्चों ने स्कूल से ड्राप आऊट किया है. यह सर्वे कलेक्टर द्वारा करवाया गया था इसलिए यह आंकड़ा अधिकृत है. यह आंकड़ा ग्रामीण भाग के अल्पसंख्याक समाज का है. अगर अन्य समाज का सर्वे किया जाए तो यह आंकड़ा 40-50 हजार तक जा सकता है. इसलिए मेरी यह मांग है कि परभणी जिले की सर्वे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASS/ SBT/ 15:50

श्रीमती फौजिया खान ...

रिपोर्ट मंगाई जाए और उसकी तुलना सर्व शिक्षा अभियान की रिपोर्ट से की जाए. शासन इस दिशा में क्या कदम उठाएगा, यह मेरा सवाल है. क्यों कि इस सवाल से बहुत बड़ा गंभीर प्रश्न जुड़ा हुआ है. शिक्षा विभाग की ओर से ठोस उत्तर मिलना चाहिए कि शासन इस दिशा में क्या करेगा. क्योंकि दो सर्वे हुए हैं. एक सर्वे में 2200 संख्या दी जा रही है और दूसरे सर्वे में 22 हजार की संख्या दी जा रही है. अत: कौनसी संख्या सही है और शासन इस दिशा में क्या करेगा, इसके बारे में मैं सरकार से उत्तर चाहती हूं.

बाब क्रमांक 155 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं परभणी के ग्रामीण अस्पतालों की इमारतों के लिए बहुत कम प्रावधान किया गया है. ग्रामीण अस्पताल, पालम,जिला परभणी के अस्पताल की इमारत के लिए 94 लाख 19 हजार रुपये अनुमानित खर्च है और 8 लाख रुपये की तरतूद प्रस्तावित की गई है. ग्रामीण अस्पताल पूर्णा, जिला परभणी के अस्पताल की इमारत के लिए 1 करोड़ 14 लाख 93 हजार रुपये अनुमानित खर्च है और 10 लाख 43 हजार रुपये की तरतूद प्रस्तावित की गई है और ग्रामीण अस्पताल, पाथरी, जिला परभणी के अस्पताल की इमारत के लिए 95 लाख 18 हजार रुपये अनुमानित खर्च है और 8 लाख 70 हजार रुपये की तरतूद प्रस्तावित की गई है. मेरी यह मांग है कि यह काम बहुत दिनों से पेंडिंग है इसलिए इस काम को जल्द किया जाए और तरतूद की राशि बढ़ाई जाए.

बाब क्रमांक 335 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूं कि मैं पिछले तीन अधिवेशनों में यह मांग करती आ रही हूं कि जले हुए गन्ने के लिए आर्थिक मदद दी जाए. लेकिन वह मांग पूरी नहीं हो रही है. मंत्री महोदय के आश्वासन के बावजूद और पाठपुरावा करने के बावजूद अभी तक किसानों तक पैसा पहुंचा नहीं है. इसलिए यह सहायता तुरन्त किसानों को दी जाए, ऐसा मेरा अनुरोध है.

यानंतर श्री शर्मा ...

अस्वाधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ . . . . श्रीमती फौजिया खान का भाषण जारी, पूर्वी तालेवार 15.55

सभापति महोदय, बाब क्रमांक 381 के बारे में मैं यह कहना चाहती हूॅं कि अल्पसंख्यक विभाग की स्थापना करने के बाद केवल इन्फ्रास्ट्रक्चर पर ही ध्यान केन्द्रित किया गया है. इस विभाग के लिए कुल 167 करोड़ रूपए का प्रावधान किया गया है. ऐसा प्रतीत हो रहा है कि केवल अपलिपफ्टमेंट के लिए इस निधि का प्रावधान है. अल्पसंख्यकों के विकास के लिए इतनी छोटी सी निधि पर्याप्त नहीं है. कम से कम 2 हजार करोड़ रूपए इस विभाग के लिए होने चाहिए. जिस तरह से एस.सी., एस.टी और आदिवासी विकास विभाग के लिए बजट में प्रावधान किया जाता है, उसी तरह से अल्पसंख्यक विभाग के लिए प्रावधान होना चाहिए. सरकार ने आदिवासी विकास विभाग के लिए 2 हजार करोड़ रूपए का प्रावधान किया है. सच्चर कमेटी की रिपोर्ट ने साबित किया है कि अल्पसंख्यक एस.सी., एस.टी. से भी अधिक पिछड़े हुए हैं. इसलिए मैं ऐसी मांग करती हूॅं कि अल्पसंख्यक विभाग के लिए 2 हजार करोड़ रूपए का प्रावधान होना चाहिए. दूसरी बात यह है कि शासन ने अल्पसंख्यक विभाग बनाया है, यह एक स्वागत योग्य कदम है, लेकिन वक्फ बोर्ड को अलग से माननीय मुख्य मंत्री के पास क्यों रखा गया है. वक्फ बोर्ड अल्पसंख्यक विभाग के अन्तर्गत होना चाहिए. अगर यह विभाग एक अम्ब्रेला की तरह से है तो फिर वक्फ बोर्ड की जमीन के संरक्षण की जिम्मेदारी अल्पसंख्यक विभाग को दी जाए, ऐसी मेरी मांग है.

सभापति महोदय, कृषि विभाग की बाब क्रमांक 68 और 69 के बारे में मैं कहना चाहती हूॅं कि इसमें जो प्रावधान किया गया है, वह परभणी के मराठवाडा कृषि विद्यापीठ के लिए किया गया है, लेकिन परभणी के लिए एक धेला भी नहीं है, पूरा निधि लातूर जिले के लिए है, नाम सिर्फ परभणी का है. परभणी में महिलाओं के लिए परिवर्तन कार्यक्रम के लिए 2006 से प्रस्ताव प्रलंबित है. प्रस्ताव यह है कि सेरीकल्चर ट्रेनिंग इन्सटिट्यूट यूनिवर्सिटी में बने. यह प्रस्ताव मूव हुआ, लेकिन इस बारे में आगे क्या हुआ ? इसको मान्यता मिलने की आवश्यकता है. महिला बचत गट के लिए सेरीकल्चर ट्रेनिंग इन्सटिट्यूट परभणी में बने, ऐसी डिमांड मैं करना चाहती हूॅं.

सभापति महोदय, अन्त में मैं नगर विकास विभाग की मांग क्रमांक 115 के अन्तर्गत यह डिमांड करना चाहती हूॅं कि जिस तरह से लोक प्रतिनिधियों को, आमदारों को, खासदारों के लिए

. . . 3 डी 2



VTG/ SBT/ MMP/ . . . . श्रीमती फौजिया खान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक निधि है और उनको सेलरी है, उनको टी.ए., डी.ए. मिलता है, उसी तरह से कॉरपोरेशन, म्युनिसपल कॉंसिल में भी नगरसेवकों के लिए प्रावधान किया जाना चाहिए और उनके लिए सेलरी तथा टी.ए., डी.ए. की सुविधा होनी चाहिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूॅं. धन्यवाद.

. . . . . भाषण पूर्ण, 3डी- 3

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) :सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाची बाब क्रमांक 86 पान नंबर 60 संबंधी मला बोलावयाचे आसहे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत 38048 स्वयंपाक गृह नि भाडांरगृह बांधण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत हे अत्यंत चागले आणि महत्वाचे काम आहे त्यासाठी निधी उपलब करुन देण्याची आवश्यकता आहे . ही तरतूद करीत असताना या पूर्वी त्याना जो निधी दिला होता तो निधी त्या त्या शाळांमध्ये खर्च केला आहे किंवा नाही हें पहाणे आवश्यक आहे. ज्या शाळांना निधी देण्यात आला आहे त्या शाळांनी स्वयंपाकगृह आणि भांडारगृह बांधले आहेत किंवा नाहीत हे पाहिले पाहिजे एवढया मोठया प्रमाणावर निधी दिल्यानंतरसुध्दा त्याचा विनियोग योग्य प्रकारे केला जातो किंवा नाही याची चौकशी करणे आवश्यक आहे तसेच त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

नंतर श्री सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, बाब क्र. 87, पृष्ठ क्र.61 मध्ये मध्यान्ह भोजनाची योजना विस्तारीत झाली आहे. इयत्ता 1 ते 5 ऐवजी 6 ते 8 पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देखील या योजनेत सामावून घेतले आहे. ही जरी केंद्र सरकारची योजना असली तरी राज्य सरकारच्या सहाय्याने ही योजना चालू आहे. आतापर्यंत फक्त अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना ही योजना लागू केली आहे. ज्या विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित शाळा आहेत किंवा अनुदानित शाळांतील काही तुकडया विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित आहेत त्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन मिळत नाही. एका बाजूला शासनाच्या धोरणाप्रमाणे भेदभाव कमी करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. दुस-या बाजूला मात्र भेदभाव निर्माण करणारी आपली कृती आहे. याचे कारण एका शाळेत 8 वीचे तीन वर्ग असतील तर त्यातील दोन वर्ग अनुदानित तर एक वर्ग विना अनुदानित आहेत. त्या दोन वर्गातील विद्यार्थ्यांना दुपारी खिचडी मिळते तर एका वर्गातील विद्यार्थ्यांना खिचडी मिळत नाही. त्यांचे दुर्दैव असे की, ते इयत्ता 8 वीला "क" तुकडीमध्ये गेले किंवा तीन नंबरच्या तुकडीमध्ये गेलेतर जी तुकडी विना अनुदानित आहे. त्यांच्यासमोरच्या विद्यार्थ्यांना खिचडी मिळते. परंतु आपल्याला खिचडी मिळत नाही. हा भेदभाव त्यांच्या मनामध्ये निर्माण होत आहे. या संदर्भात केंद्र शासनाने पैसे दिले नाही तरी चालतील. राज्य शासनाने ही महत्वाकांक्षी योजना हाती धेणे आवश्यक आहे. आणि आपण हा निर्माण केलेला भेदभाव संपविला पाहिजे. शेवटी या शाळांमध्ये कुणाची मुले शिकत आहेत? गोरगरिबांची, कष्टकऱ्यांची व शेतकऱ्यांची मुले शिकत आहेत. त्या विद्यार्थ्यांना सुध्दा या योजनेचा लाभ आपल्याला कसा देता येईल याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.62 बाब क्र.89 मध्ये अंतर्वासिता करणाऱ्या शिक्षणशास्त्र पदविका विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. तीन वर्षाचा डी.एड. चा अभ्यासक्रम संपल्यानंतर सहा महिन्यांची अंतर्वासिता विद्यार्थ्यांना करावी लागते. त्याकरिता विद्यावेतन देण्याची सुरुवात केली आहे. ते विद्यावेतन चेकने देण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती माझ्याकडे आहे. सभापती महोदय, डी.एड. झालेल्या विद्यार्थ्याने केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न रहाता सहा महिने अंतर्वासिता करुन प्रॅक्टिकल ज्ञान सुध्दा मिळवावे. त्याकरिता त्यांनी सहा महिने शिक्षक म्हणून काम केल्यानंतर प्रत्यक्षपणे शिक्षकी पेशामध्ये काम करीत असतांना त्याला कोणतीही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

अडचण येणार नाही. याचे कारण अंतर्वासिता करीत असतांना तेथील वातावरणाचा त्याला अनुभव मिळालेला असेल हा त्यामागील उद्देश आहे. या राज्यामध्ये गेली दहा-दहा वर्षे नोकरी करणारे अनट्रेंड शिक्षक डी.एड. चे प्रशिक्षण घेत आहेत.त्यांना सुध्दा आपण अंतर्वासिता लागू करीत आहात. ते प्रत्यक्षपणे अध्यापनाचे काम करीत असतांना त्यांना अंतर्वासिता लागू करण्याचे कारण काय? त्यांना या नियमामध्ये कशासाठी अडकवित आहात? जे शिक्षक सेवेत असतांना डी.एड. चा अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत त्यांना अंतर्वासिता योजना लागू करु नये. त्यांना या योजनेमधून वगळण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 90, पृष्ठ क्र. 62 मध्ये प्राथमिक शाळांना अनुदान देणे याकरिता मागण्री केली आहे. मी मागील वेळी हा विषय उपस्थित केला होता. ते मला उद्या यादी देतो असे म्हणाले होते. आतापर्यंत चार महिने होऊन गेले तरी मला यादी मिळाली नाही. यापूर्वी देण्यात आलेले अनुदान कोणकोणत्या शाळांना मिळाले आहे? यामध्ये असे होते की, दहा शाळांना अनुदान देय असेल तर त्यातील 2 शाळांना अनुदान दिले जाते. परंतु 8 शाळांना अनुदान दिले जात नाही. त्यापेक्षा या नॉन सॅलरी ग्रँटचे सर्वच्या सर्व दहा शाळांना समान वाटप होणे आवश्यक आहे. ते होत नसल्यामुळे मी यादी मागितली असतांना ती मला देण्यात आली नाही. हे वेतनेतर अनुदान सर्व शाळांना समान मिळावे अशी मी मागणी करतो. सभापती महोदय, बाब क्र. 94, पृष्ठ क्र. 63 मध्ये माहिती व दळणवळण तंत्रज्ञान योजना केंद्र सरकारच्या मदतीने राज्यामध्ये आली आहे. हे करीत असतांना ग्रामीण भागातील ज्या शाळा आहेत. त्याठिकाणी खरोखर या सुविधा पोहोचतात काय? शहरी भागातील शाळांना या सुविधा पोहोचू शकतात. परंतु ग्रामीण भागातील शाळांमध्ये या सुविधा पोहोचू शकत नाहीत. म्हणून ही योजना राबवितांना प्राधान्याने ग्रामीण भागातील शाळांचा विचार करावा.

सभापती महोदय, बाब क्र. 96, पृष्ठ क्र. 64च्या बाबतीत सांगत असतांना मला खूप वाईट वाटते. महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रेसर असे राज्य आहे. दुर्दैवाने या राज्यात आपल्याला पूर्ण वेळ शिक्षण मंत्री मिळू शकत नाही. गेले एक वर्षापेक्षा अधिक काळ या राज्याला आपल्याला पूर्ण वेळ संचालक मिळू शकलेला नाही. प्रभारी संचालक, प्रभारी कार्यभार दिलेले शिक्षणमंत्री असल्यामुळे या विषयाकडे खरोखरच लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मा. सदस्या श्रीमती फौजिया खान यांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. रामनाथ मोते...

काल अर्धा तास चर्चा सभागृहाच्या कामकाजामध्ये होती. या राज्यामध्ये किती पदे रिक्त आहेत? या राज्यात 50 टक्के पदे रिक्त आहेत. या शासनाचा कारभार आपण कशारितीने करणार आहात?आणि गुणवत्ता वाढविण्याचा आपण कसा प्रयत्न करणार आहात? मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना क आणि ड वर्गाची पदे किती आणि केव्हा भरणार आहात हे सभागृहाला सांगावे. ही भरती प्रक्रिया केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे हे त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

केवळ 'क' आणि 'ड' श्रेणीतीलच नव्हे तर इतर पदे भरण्याच्या संदर्भात सुध्दा शासनाने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 187 वरील बाब क्रमांक 215 बाबत बोलावयाचे आहे. सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात ही बाब आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी हा विषय उपस्थित केलेला आहे. हा केवळ एका विद्या विकास संस्थेचा प्रश्न नाही किंवा विकास हायस्कुलचा विषय नाही किंवा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कुलचा विषय नाही. हा विषय संपूर्ण राज्याचा आहे. 16 कोटी 59 लाख रुपयांची मोठी तरतूद केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेमध्ये 600 ते 700 मागासवर्गीय विद्यार्थी आहेत. एका बाजूला मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी घ्यावयाची नाही असे आपण म्हणतो आणि दुसऱ्या बाजूला त्या फी ची भरपाई चार पाच वर्षे करीत नाही. त्यामुळे संस्था चालकांपुढे अडचण निर्माण होते. हा केवळ एका संस्थेचा किंवा एका शाळेचा प्रश्न नाही. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 255 वरील बाब क्रमांक 312 बाबत बोलावयाचे आहे. 45 नवीन माध्यमिक शाळा, 120 तुकड्या आणि 23 माध्यमिक शाळा, 70 तुकड्या या सर्वांना आपण या पुरवणी मागणीच्या माध्यमातून अनुदान मंजूर केलेले आहे. या शाळा आणि तुकड्या किती दिवसांपूर्वी अनुदानावर आल्याचे शासनाने घोषित केले. एक तर शासन वेळेवर अनुदान देत नाही. अनुदानावर आल्याचे घोषित केल्यानंतरही पुरवणी मागणी मंजूर होईपर्यंत अनुदान देत नाही. उशिरा अनुदान देत असलो तरी जेव्हा पासून ती तुकडी अनुदानास पात्र ठरली तेव्हापासून त्या तुकडीला किंवा त्या शाळेला शासनाने अनुदान द्यावे. संस्थांवर आणि शिक्षकांवर या माध्यमातून अन्याय होता कामा नये अशा प्रकारची मागणी करतो. आपण मला संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**तालिका सभापती ( ॲड. अनिल परब )** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर बोलतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला एक शंका आहे त्याचे निराकरण व्हावे. या पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपल्यानंतर सकाळच्या सत्रातील मागण्यांच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर होईल. त्यानंतर दुपारच्या सत्रातील पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु होणार आहे काय ?

**तालिका सभापती** : सकाळी असे ठरले होते की, दोन्ही मागण्यांवर एकत्रित चर्चा करावयाची.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही सकाळी चर्चा करीत असताना सकाळच्या सत्रातील मागण्यांवर बोललो. सकाळी असे ठरले नव्हते.

**तालिका सभापती** : माननीय सभापतींनी जे सांगितले त्याप्रमाणे मी आपल्याला संगितले.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास या विषयावर या सभागृहातील कोणीही सन्माननीय सदस्य बोललेले नाहीत. असे अनेक विभाग आहेत की ज्याबाबत सन्माननीय सदस्य बोललेले नाहीत. या मागण्या अशाच मंजूर करावयाच्या काय ? तसे करणार असाल तर करा, आम्ही बाहेर जातो.

**तालिका सभापती** : मी माननीय सभापतींना बोलविण्यासाठी निरोप पाठविला आहे. तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर बोलतील.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, आम्ही असे म्हणत होतो की, सकाळच्या सत्रातील ज्या मागण्या आहेत त्यावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांनी बोलावे. सकाळच्या सत्रातील मागण्यांवर उत्तर झाल्यानंतर दुपारच्या सत्रातील मागण्यांवर चर्चा सुरु करावी. परंतु माननीय सभापतींनी असे सांगितले की, दोन्ही मागण्या एकत्रित करुन चर्चा करावी.

डॉ. दीपक सावंत : इतर विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : मला असे वाटते की, दुपारी जे ठरले त्याच्या अगोदर जे सन्माननीय सदस्य फक्त सकाळच्या सत्रातील मागण्यांवर बोलले होते परंतु दुपारच्या सत्रातील मागण्यांवर बोलावयाचे राहिले आहेत त्यांनी थोडक्यात आपले बोलणे संपवावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना प्रथम मला सहकार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 268 वरील बाब क्रमांक 332 वर बोलावयचे आहे. यामध्ये विशेष थेट भरती मोहिमेच्या जाहिरातीसाठी 8 लाख 13 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. सहकार विभागामध्ये किती पदे रिक्त होती आणि किती पदे विशेष थेट मोहिमव्दारे भरली तसेच वरिष्ठ लिपिक, असिस्टंट रजिस्ट्रार, डी.डी.आर, सुपरवायझर तसेच उच्च पदांमध्ये किती पदे भरली गेली हा खरा प्रश्न आहे. यासंबंधी मागच्या अधिवेशनामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बिलाच्या वेळी मी सांगितले होते. ही पदे भरणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

सहकार विभागामध्ये प्रचंड गोंधळ सुरु आहे. कर्मचारी नसल्यामुळे तेथे भ्रष्टाचार सुरु आहे. निवडणुकीचा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने हे विधेयक आणले होते परंतु हा उद्देश सफल होऊ शकला नाही. ते कर्मचारी निवडणूक घेण्यासाठी अकार्यक्षम आहेत. ही गोष्ट सत्य आहे आणि ती मी सिध्द करुन दाखवू शकतो. त्याठिकाणी प्रशिक्षित कर्मचा-यांची भरती करणे आवश्यक आहे. सहकार खाते दीन, दुबळे झाले आहे. तेथील विभागाला वेतनेतर अनुदान मिळत नाही. अनेक ठिकाणी वीज नाही, साहित्य नाही, प्राथमिक सुविधाही नाहीत. त्यामुळे शासनाने त्यांचे वेतनेतर अनुदान मंजूर करण्याबाबत विचार करावा.

सभापती महोदय, यानंतर शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र.90, पान क्र.62 वर मी माझे विचार मांडणार आहे. सन 2007-08 या वर्षासाठी खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. मी यासंदर्भात दिनांक 16.12.2008 रोजी सभागृहात तारांकित प्रश्न 46277 विचारला होता. त्या प्रश्नाला शासनाने असे लेखी उत्तर दिले आहे की, '2004 पासून या शाळांचे अनुदान बंद केलेले आहे. परंतु दिनांक 22.1.2008 पासून पुन्हा हे अनुदान सुरु करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक नवीन सूत्र तयार करण्यासाठी उपसमिती तयार केलेली आहे.' या उपसमितीचा निर्णय केव्हा होणार आहे असा माझा प्रश्न आहे. शासनाने खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांचे वेतनेतर अनुदान केव्हापासून देणार आहे ते जाहीर करावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2008-09 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र.283, पान क्र.233 वर मी माझे विचार मांडतो. महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परळ या रुग्णालयासंबंधी मी या सभागृहात अनेकदा प्रश्न विचारले आहेत. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे देखील या विषयी आग्रही होते. महात्मा गांधी स्मारक रुग्णालय आणि राज्य कामगार विमा रुग्णालय या दोन्ही रुग्णालयांच्या काही विभागांचे खाजगीकरण करणे आवश्यक आहे. त्याबाबत मागील काळात काय झाले ते समजले नाही. कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाचे काय झाले ते समजले पाहिजे. कारण तत्कालीन आरोग्य मंत्री यांनी आम्हाला असे सांगितले होते की, यासाठी केंद्र सरकारचे अधिकारी येणार आहेत, केंद्र सरकारकडून त्याचा निर्णय होणार आहे. त्याचे नेमके काय झाले ते समजणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 288 संबंधी मी माझे विचार व्यक्त करतो. राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना व उपकेंद्रांना औषधे व आयुर्वेदिक औषधांचे संच पुरविण्याकरिता तरतूद करण्यासाठी ही मागणी केलेली आहे. नुकतीच बातमी आली होती की, मेळघाटच्या जंगलामध्ये एक्सपायरी झालेल्या शेकडो औषधांच्या बाटल्या फेकलेल्या आढळल्या आहेत. या बाटल्यांची किंमत करोडो रुपये आहे. एक तर लोकांना शासकीय रुग्णालयांमध्ये औषधे मिळत नाहीत, त्यामुळे त्यांना बाहेरुन औषधे विकत घ्यावी लागतात. अनेकदा शॉर्ट तारखेची औषधे एखाद्या कंपनीकडून घेतली जातात, ती औषधे दाबून टाकतात, यामध्ये कोणाचे तरी लागेबांधे असते. आदिवासी गरीब लोकांना जेवणासाठी पैसे नसतात. त्या लोकांना मजुरीसाठी स्थलांतर करावे लागते. अशा लोकांसाठी खरेदी केलेली औषधे कचराकुंडीत फेकली जातात, जंगलात फेकली जातात. आरोग्य संचालक डॉ.डोके यांनी मी पत्र लिहिले होते. त्यांनी मला असे उत्तर पाठविले होते की, ही औषधे जास्त किंमतीची नाहीत. परंतु मला मिळालेल्या माहितीनुसार फेकण्यात आलेल्या शेकडो बाटल्या होत्या. हिंदुस्थान ॲण्टीबायोटिक्स कंपनीकडून ही औषधे घेतली होती. राज्यातील प्रत्येक आदिवासी भागामध्ये ही परिस्थिती आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:15

(डॉ. दीपक सावंत...

यामध्ये बी कॉम्प्लेक्स सिरप, प्रोटीन सिरप आणि कफ सिरप आहे. किती सिरप आणि अशा प्रकारची औषधे फेकून दिलेली आहेत ? या औषधांच्या किंमती अव्वाच्या सव्वा आहेत. शॉर्ट एक्सपायरी डेटची ही औषधे आहेत. म्हणजे मे महिन्याची एक्सपायरी डेट असलेली औषधे जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यामध्ये पुरविण्यात आलेली आहेत. याबाबतीत विचारणा केल्यानंतर त्या लोकांनी सांगितले की, आमच्याकडे खूप रुग्ण आहेत. हे रुग्ण इतके आहेत की मेडिकल कॅम्प किंवा शिबीर घेऊन ही औषधे वाटली असती तरी ती त्या लोकापर्यंत पोहोचण्याकरिता तुमच्याकडे यंत्रणा नाही. केवळ कोणाला तरी फेव्हर करण्यासाठी ही औषधे खरेदी केली जातात. सभापती महोदय, माझ्याकडे सार्वजनिक आरोग्य खात्याचा औषधे खरेदी करण्यासंबंधीचा जी.आर.आहे. त्यामध्ये ही औषधे हाफकीन, अजंठा फार्मास्युटिल, केन्द्र, पीएसयू यांच्या पैकी कोणाकडूनही खरेदी केली तरी ज्यांच्याकडून ही औषधे खरेदी करायची असतात त्यांच्याकडे डब्ल्यूएचओचे जीएनपी सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. केन्द्रातील एकही कंपनी स्वत: औषधे बनवित नाही. ते छोट्या छोट्या कंपन्यांकडून औषधे बनवून घेतात आणि त्यावर टॅक्स आणि आपले कमिशन लावून ती औषधे राज्य शासनाला विकतात. अशा प्रकारे कोणाकडून औषधे घ्यायची, कोणाला औषधे विकायची यासंबंधीचे रॅकेट ठरलेले आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रातील पीएसयू युनिट नामशेष करुन कर्नाटकातील ॲण्टीबायोटिक्स कंपनीला वर आणण्याचा घाट घातलेला आहे. कर्नाटक ॲण्टीबायोटिक्स औषधे बनवित नाही. त्यांच्याकडे एकही म्युन्युफॅक्चरींग युनिट नाही. या औषध खरेदीमध्ये कोणीही लक्ष घातले तर करोडो रुपयाची औषधे कर्नाटक ॲण्टी बायोटिक्स आणि हिंदुस्थान ॲण्टीबायोटिक्सकडून घेतली जात असल्याचे दिसून येईल. कर्नाटक ॲण्टीबायोटिक्सने कोणाकडून औषधे बनवून घ्यायची आणि कोणाला ती विकायची हे ठरलेले आहे. ही सगळी मिलिभगत आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचे आरोग्य धोक्याच्या वळणावर आहे. आता आपण आयुर्वेदिक औषधे घेण्यास सांगता. सभापती महोदय, इमर्जन्सीमध्ये आयुर्वेदिक औषधे उपयोगी पडतात काय ? मग लिव्हर टॉनिक का घेता ? पीएचसी आणि रुरल हॉस्पिटलमध्ये लाखो रुपयांची औषधे धूळ खात पडलेली असतात. सभापती महोदय, हे राज्य कोणासाठी चालविले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

(डॉ. दीपक सावंत...

जाते ? गरीब, आदिवासी, सर्वसामान्यांसाठी हे राज्य आपण चालवितो. मग ही औषधे केन्द्राकडून का खरेदी करण्यात येतात. महाराष्ट्रामध्ये हॉफकिन सारखी चांगली नावाजलेली संस्था आहे. 50 कोटीचे अर्थसहाय्य केले तर ती चांगल्या प्रकारे चालेल. ही संस्था बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अजंठा फार्मास्युटिकल ही हाफकिनची सिस्टर कन्सर्न आहे ती देखील आपण बंद करायला निघाला आहात.

सभापती महोदय, ॲण्टीनेटल केअरमध्ये महिलांसाठी किट दिले जाते. त्या किटची किंमत फक्त 700 रु. आहे. त्यासाठी साडेतीन ते 4 हजार रु. दिले जातात. याबाबतीत विचारणा केली तर आयसीडीएसकडून पुरवठा केला जातो असे सांगितले जाईल. औषधे खरेदी करण्याबाबत रेट कॉन्ट्रॅक्ट केले जाते हे रेट कॉन्ट्रॅक्ट कोण करते ? वैद्यकीय शिक्षण विभाग सांगेल की आमचे फक्त रेट कॉण्ट्रॅक्ट बनविण्याचे काम आहे. सभापती महोदय, मला एवढेच सांगायचे आहे की, ज्या माणसाला ही औषधे द्यायची आहेत स्टॅण्डर्डची असली पाहिजे. बाजारातील ॲण्टी बायोटिक्स औषधांच्या आणि आपल्या रेट कॉण्ट्रॅक्टच्या किंमती यामध्ये तिप्पट फरक आहे. याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. मेळघाट तसेच वाडा, मोखाडा या ठिकाणी जाऊन मी जी जी औषधे शाधून काढलेली आहेत त्या सर्वांच्या बाबतीत चौकशी होणे आवश्यक आहे.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

श्री. विवेक पंडीत यांनी अशा प्रकारची औषधे शोधून काढलेली आहेत. या सर्व गोष्टींची सी.आय.डी. चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी राज्य शासनाकडून सांगितले जाते की, आम्ही पोलिओचे पूर्णपणे निर्मूलन केलेले आहे. या राज्यात काही दिवसापूर्वी तिसरा पोलिओचा रुग्ण सापडला आहे. पोलिओ कसा येतो ? पोलिओची लस एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेली जाते, त्यावेळी त्या लसीसाठी लागणारे टेम्प्रेचर व्यवस्थित ठेवले जाते किंवा नाही ? पोलिओची लस देताना ती व्यवस्थितपणे दिली जाते आहे किंवा नाही या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. पोलिओचे उच्चाटन करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी मोठया प्रमाणात येतो आहे. राज्यात लसीकरणाचे कार्यक्रम होत आहेत. अनेक स्थलांतरीत कुटुंबे या राज्यात येत आहेत, रोड साईड कुटुंबे वाढत आहेत, या सर्वांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 256 वर आदिवासी विकास विभागाची मागणी आहे. राज्यातील आदिवासी क्षेत्रातील वैद्यकीय युनीटच्या वाहनांसाठी पेट्रोल आणि दुरुस्तीसाठी तरतूद मागण्यात आली आहे. आज महाराष्ट्रातील आदिवासी विभागाच्या अनुदानित आणि विना अनुदानित आश्रमशाळा आहेत, त्यांची अवस्था फारच दयनिय झालेली आहे. या राज्याचे माननीय राज्यपाल यांनी नुकताच मेळघाट या आदिवासी विभागात दौरा केला आणि तेथील आश्रमशाळांना भेटी दिल्या. त्यांना देखील या आश्रमशाळांचे स्ट्रन्डर्ड कसे आहे याची चांगल्या प्रकारे माहिती झाली आहे. या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नधान्य पुरविले जात आहे, त्यात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. सन 2004 ते 2007 पर्यंत अन्नधान्य पुरवठा करण्यामध्ये 100 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे अशा प्रकारची मोठया प्रमाणात चर्चा होत आहे. आश्रमशाळेतील मुलांसाठी देण्यात येणारा तांदूळ, गहू, मुगाची डाळ, तूरडाळ, खाद्यतेल, साबण, दंतमंजन यामध्ये तर मोठया प्रमाणात भ्रष्टाचार आहेच. परंतु विद्यार्थ्यांना कपडे व त्यांचे साहित्य ठेवण्यासाठी लोखंडी ट्रंक पुरविले जातात. परंतु आदिवासी विकास विभागाच्या अधिका-यांनी त्या लोखंडी ट्रंकची साईज लहान करुन भयानक असा भ्रष्टाचार केलेला आहे. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांपर्यंत गणवेश दिले गेले नव्हते. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात येतात, आदिवासी विभागाच्या अधिका-यांकडून नवीन पुस्तकांची खरेदी केली असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

दाखविले जाते. परंतु प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना जुन्याच पुस्तकांचे वाटप करण्यात येते. पुस्तक खरेदीमध्ये देखील मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो आहे. आदिवासी विकास विभागास आदिवासींचे कल्याण करण्यासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जातो, परंतु आदिवासींच्या हातामध्ये प्रत्यक्षात काहीही पडत नाही. आदिवासी विकास विभागात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे व होत आहे याची देखील सखोल चौकशी करण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागावर बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. आजच वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सात प्रोग्रॅम दिले आहेत. ते मी आपल्याला वाचून दाखवितो त्यात असे म्हटले आहे की "1. Filling of all vacant teaching non-teaching staff, 2. Out sourcing or privatisation of kitchen, house keeping and security function, 3. System of annual maintenance contracts for equipment costing over Rs. 50,000/-, 4. Drug inventory system to ensure purchases before it goes out of stock, 5. Deans to get powers within 10 days to buy drugs worth more than Rs. 50,000/-, 6. System of clearing pending bills via new procedures like letters of credit etc., 7. Starting D.M. and M.C.H. courses." गेल्या अधिवेशनामध्ये पी.जी.च्या सिटस् कमी झाल्या यासंदर्भात प्रचंड मोठी चर्चा झाली होती. आपल्याकडे अध्यापक वर्ग कमी आहे. आपण मंत्री म्हणून आल्याबरोबर सांगितले की, वैद्यकीय क्षेत्रातील रिक्त पदे तात्काळ भरली जातील. सदरहू रिक्त पदे भरण्यासाठी कोणती पध्दत अवलंबिणार आहात ? वैद्यकीय क्षेत्रातील पदे भरताना उमेदवारांची निवड वॉकींग इंटरव्हयूने करणार आहात काय वा अन्य प्रकारे भरणार आहात ? एम.पी.एस.सी.च्या माध्यमातून ही पदे भरण्याची स्वप्न पहात असाल तर जे 13 हजार मेडीकल ऑफिसर बाहेर आहेत. त्यांच्याकडे प्रथम बघितले पाहिजे. त्याचे कारण असे की, एम.पी.एस.सी.दोन दोन वर्षे परीक्षा घेत नाही. परीक्षा घेतल्या तर त्याचा निकाल लावण्यासाठी एक वर्ष,दीड वर्षाचा कालावधी लावला जातो. प्रथम एम.पी.एस.सी.ने वैद्यकीय अधिका-यांच्या परीक्षा परीक्षा दहा वर्षापूर्वी घेतली होती. त्यानंतर एम.पी.एस.सी.ने 2005 वैद्यकीय अधिका-यांच्या परीक्षा घेतल्या आहेत. परंतु परीक्षांचे निकाल

...3/-



ABG/

डॉ.दीपक सावंत...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लावण्यास खूपच विलंब केला जातो ही दुर्देवाची गोष्ट आहे. माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारच्या लोकप्रिय घोषणा करण्यापूर्वी त्यासंबंधीची सखोल माहिती घेतली पाहिजे. आपण एम.पी.एस.सी.चा बडगा दूर का करीत नाही ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...........

आपण कॅबिनेटमध्ये का निर्णय घेत नाही? महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला का फाटा देत नाही? डायरेक्ट रिक्रूट का करीत नाही? असा प्रयत्न यापूर्वी झालेला आहे. डी.एम.आणि एम.सी.एच. सुरु करावयाचे असेल तर असिस्टन्ट प्रोफेसर, प्रोफेसरची पदे भरली गेली पाहिजेत. आज मेडिकल कॉलेजमध्ये हजारो पदे रिक्त आहेत. पुण्याशेजारी खाजगीकरणातून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्यात आले असून ती इमारत बंद अवस्थेत आहे. त्याकडे लक्ष देणार आहात की नाही? त्या हॉस्पिटलसाठी शासनाने पैसा दिलेला असल्यामुळे आम्हाला त्याबद्दल बोलण्याचा हक्क आहे. शासनाने ते हॉस्पिटल विकसित केले असून जागा देखील दिलेली आहे. परंतु आज ते हॉस्पिटल बंद आहे. तसेच जी.टी.हॉस्पिटलच्या संकुलात 7 मजली हॉस्पिटल तयार असून युती सरकारच्या काळापासून ते बंद अवस्थेत आहे. तेथे कबुतरे रहात आहेत. सर्वसामान्य माणूस यामुळे भरडला जात आहे. सामान्य माणसाला सुपर स्पेशालिटी ट्रिटमेंट मिळत नाही याचे दुःख आहे. सर्वप्रथम जे.जे.सारख्या चांगल्या हॉस्पिटलच्या डीनची बदली करावी आणि तेथे चांगला डीन नियुक्त करावा अशी मागणी करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

-----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पृ.क्र.42, बाब क्र.57 अन्वये कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य करण्यासाठी केलेली तरतूद ही कमालीची अल्प आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठया प्रमाणात होत असून त्याच्या बातम्या वाचून आपण व्यथित होतो. परंतु त्यासाठी केलेली तरतूद फार कमी आहे. वितरण प्रणाली कमालीची सदोष असून ती विलंबाने होणारी आहे. त्याचाही परिणाम होऊन थेट लाभार्थ्यांपर्यंत सहाय्य पोहोचत नाही. लाभार्थ्यांपर्यंत नीटपणे सहाय्य पोहोचल अशी पध्दत लागू करावी तसेच तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्र.69, पृ.क्र.43 वर केंद्र पुरस्कृत योजनांपैकी कडधान्य विकास कार्यक्रम, एकात्मिक मका उत्पादन कार्यक्रम, कापूस विकासासाठी तंत्रज्ञान अभियान असे अनेक उपक्रम केंद्र पुरस्कृत असून या योजनांसाठी काही ठिकाणी 75 टक्के, काही ठिकाणी 80 टक्के याप्रमाणे सरासरी 80 टक्के रक्कम केंद्राकडून दिली जाते व राज्याला 20 टक्के सहभाग घालावा लागतो. या सर्व योजनांचे महत्व आणि महात्म्य लक्षात घेतले तर ज्या पध्दतीने तरतूद व्हावयास पाहिजे, त्या पध्दतीने ती केलेली नाही. यामध्ये सुधारणा करता आली तर जरुर करावी आणि या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी कशी करता येईल याकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, बाब क्र.65 वर सलग 3-4 बाबी महत्वाच्या आहेत. महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठामध्ये संशोधनाचे उपक्रम सुरु आहेत. त्यासाठी तरतूद केलेली आहे. अलिकडे निरनिराळी संकरित बियाणे, रासायनिक शेती, प्रदुषित वातावरण या सर्वांचा परिणाम आणि भ्रष्ट पध्दतीने दिली जाणारी बियाणे यामुळे शेती पध्दतीवर ताण येत आहे. त्यामुळे निरनिराळ्या प्रकारच्या संशोधनाची गरज वाढते आहे. हे लक्षात घेऊनच निरनिराळे संशोधनाचे उपक्रम चालू असतात. त्या उपक्रमांना चालना देण्यासाठी केलेली तरतूद फार कमी आहे. ती कशी वाढविता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सहकाराच्या माध्यमातून सहकारी साखर कारखान्यांना अनेक प्रकारची अनुदाने देण्याची तरतूद आहे. परंतु आज ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला आहे. यावर्षी ऊसाचे उत्पादन कमालीचे घटले आहे. त्याचा परिणाम लवकरच दिसून येणार आहे. अनेक कारखाने अद्याप सुरु होऊ शकले नाहीत. शासनाच्या धोरणामुळे किंवा

...3..

श्री.भगवानराव साळुंखे.........

कारखान्याच्या व्यवस्थापनाचा परिणाम म्हणून असेल परंतु ऊस उत्पादक शेतकऱ्यांना थेट कसा लाभ देता येईल यासाठी काहीही तरतूद केलेली दिसत नाही. ती तरतूद करण्याची नितांत आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृ.क्र.12, बाब क्र. 13, आजच पोलीस पाटलांचा मोर्चा निघालेला आहे. वास्तविक कोतवालापेक्षा कमी पैसे या पोलीस पाटलाला मिळतात म्हणून त्यांच्या मानधनात वाढ करणे गरजेचे आहे, कारण त्यांची मागणी रास्त असून कोतवालांच्या मानधनात शासनाने वाढ करावी अशी मी मागणी करते.

यानंतर बाब क्र. 69, पृ.क्र. 42 कृषी विभाग, यासंदर्भात मी मागे अनेक वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. सेंद्रिय शेती हा विषय कृषी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात घ्यावा अशी मागणी शासनाने मान्य केली होती. पण त्यासंबंधीचा अभ्यासक्रम कसा असला पाहिजे, स्टाफिंग पॅटर्न काय असावा आणि तो कसा राबविला जाईल यासंबंधीची माहिती दिली पाहिजे. तसेच या सेंद्रिय शेती अभ्यासक्रमात बी.डी.501 व बी.डी.502 या खतांचा अभ्यासक्रम समाविष्ट करावा, तसेच सीपीटीचा समावेश असणार काय याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. कारण आज मराठवाड्यात सोयाबीनचे पीक पूर्णत: उद्ध्वस्त झालेले आहे. लातूरला यासंबंधीचे अनुदान वाटप झाले होते त्यावेळेस तेथे सर्व्हे देखील पूर्ण झालेला नव्हता. आणि आमच्या बीड जिल्ह्यात मात्र अद्यापही अनुदान वाटप करण्यात आलेले नाही, तेंव्हा हे प्रशासकीय फेवरेटिझम आहे की काय याची गांभीर्याने दखल घ्यावी आणि बीड जिल्ह्यालाही समान वागणूक देऊन सोयाबीनचे अनुदान ताबडतोब वाटप करावे. माझ्या जिल्ह्यात साधारणपणे 1.81 लाख हेक्टरवर कापसाची लागवड झालेली आहे. राज्यात कापसाची लागवड करणारा बीड जिल्हा हा पहिला मानला जातो. या जिल्ह्यात 1200 हेक्टर कापसाची लागवड 25 मे च्या दरम्यान झाली होती. आमच्याकडे श्री. चांडक म्हणून कृषी अधिकारी आहेत, त्यांचा खरे तर सन्मानाने सत्कार करायला पाहिजे. कारण त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ज्यांनी ज्यांनी कापसाची लागवड केली त्यांच्या कापसावर लाल्या रोग आला नाही. 12 हजार हेक्टरवर मे महिन्यात लागवड करण्यात आली. जुलै ते ऑगस्ट 10 पर्यंत 1.79 लाख हेक्टरवर कापसाची लागवड झाली. उशिरा झालेली पेर व कमी पावसात कसे बियाणे असावे यासंबंधीचे अज्ञान यामुळे शेतकऱ्याच्या कापसाचे पीक धोक्यात आले. त्यानंतर पुन्हा 1 सप्टेबर ते 15 सप्टेबर या काळात सतत पाऊस पडला. त्यामुळे मागील वर्षी तरी कापसाची सरासरी एकरी 7 क्विंटल एवढी होती परंतु यावर्षी सरासरी या पावसामुळे मात्र ही सरासरी फक्त 2 क्विंटलही होण्याची शक्यता नाही.अशा प्रकारे पहिल्या वर्षी सोयाबीनचे पीक

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

गेले, नंतरच्या कापसाचेही पीक गेले. अशा प्रकारे शेतकरी पूर्णपणे मोडण्याच्या अवस्थेला आला आहे. म्हणून निदान लाल्या रोगाचे पंचनामे ताबडतोब करावे आणि कापसाच्या पिकाचे अनुदान शेतकऱ्यांना द्यावे, अशी मागणी मी करते.

यानंतर बाब क्र. 140, पृ.क्र.91 च्या संदर्भात मला अशी मागणी करावयाची आहे की, आमच्याकडे पंचायती राज समिती आली होती. त्या समितीने जिल्ह्यातील रस्त्यांची पाहणी केली असता त्यात पालसिंगन ते नेकनूर या रस्त्याची पाहणी केली असता समितीला आश्चर्याचा धक्काच बसला. या पाहणीनंतर समितीने त्यावेळेस असे सांगितले होते की, कामे न करता फक्त पैसे उचलण्यात बीड जिल्हा हा राज्यात पहिल्या नंबरवर असेल म्हणून या पालसिंगन ते नेकनूर रस्त्याच्या कामाची आणि "अ" व "ब" विभागामार्फत दुरुस्त करण्यात आलेल्या सर्व कामाची चौकशी करावी, अशीही मी मागणी करतो.

यानंतर बाब क्र. 128, जलसंपदा विभागाच्या बाबतीत मला अभिनंदन करुन असे सांगायचे आहे की, जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण राईट कॅनॉलच्या दुरुस्तीसाठी शासनाने या पुरवणी मागणीच्या माध्यमातून निधी उपलब्ध केला आहे, म्हणून त्या मागणीलाही मी पाठिंबा देते.

यानंतर पृ.क्र. 130 व बाब क्र. 158 च्या संदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, आमच्याकडे मध्यम प्रकल्प 16 असून त्यांच्या दुरुस्तीसाठी दरवर्षी 1 लाख एवढी रक्कम मिळते, मध्यम प्रकल्प 105 असून त्यासाठी फक्त 50 हजार रुपये दिले जातात, मायनर टँक 42 असून त्यांच्या दुरुस्तीसाठी सुध्दा 50 हजार रुपये या कॅनॉलच्या सफाईसाठी दिले जातात. या कॅनॉलमध्ये रानटी बाभळी मोठया प्रमाणात वाढलेल्या आहेत आणि तलावात गाळ साचलेला असल्यामुळे आमच्या हक्काचे पाणी वाहून जाते. म्हणून लॉर्ज मिडियम टँक, पाझर तलाव आणि गाव तलावाच्या दुरुस्तीसाठी पुरेशा प्रमाणात निधी देण्यात यावा. त्यानंतर नव्याने घ्यावयाच्या कामांच्या सर्व्हेसाठी सुध्दा निधी दिला जात नसल्यामुळे नवीन तलाव घेता येत नाहीत, त्याचीही व्यवस्था करावी, अशी माझी मागणी आहे. मनकरणा नदीवर तलाव पूल तयार करण्याचीही मी या निमित्ताने मागणी करीत आहे. त्याचबरोबर मोहा, वागी, आमला, उन्नळा, वाका, तांबवा, निकडा, पाटेगाव, हिवरसिगा, आवरगाव, तागडगाव आणि शिंदेवाडी या गावांसाठी असलेले लघुसिंचन

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

तसेच लार्ज, मिडियन व मायनर टॅंक्स आहेत त्यातील गाळ काढणे आवश्यक आहे. तसेच बाभळगांव आणि वंजारवाडी येथेही उंची वाढविण्याची गरज आहे.

महोदय, आमच्या बीड जिल्ह्यात एक खजाना विहीर गेल्या 500 वर्षांपासून कार्यरत आहे. सन 1517 साली निजामाचा जहांगीरदार प्रधान सलामत खान याने स्वत:च्या खर्चातून ही विहीर बांधलेली आहे. त्या विहिरीला तीन मोऱ्या असून त्यावर 250 हेक्टर सिंचन चालू होते. तसेच बीडची खासबाग आणि कारंजा सुध्दा याच विहिरीवर होती. या विहिरीची अवस्था आज काय झालेली आहे ?

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

सभापती महोदय, निजामकालीन पर्यटन स्थळ म्हणून महाराष्ट्रातील आणि परदेशातील अनेक पर्यटक या ठिकाणी भेट देण्यासाठी येत असतात त्यामुळे या ठिकाणच्या मो-या तसेच खजाना विहिरी दुरुस्त करणे व त्या ठिकाणचा गाळ काढणे गरजेचे आहे. वंजारवाडी, एमआय टँक , बाभळगाव यांची ऊंची वाढवणे गरजेचे आहे. यासंदर्भात मी सतत दोन वर्षापासून मागणी करीत आहे त्यामुळे माझ्या मागणीकडे गांभीर्याने लक्ष दिले जावे अशी विनंती आहे. बाभळगावच्या धरणाची ऊंची वाढवण्यामध्ये तांत्रिक अडचण मांजरा खो-यात आहे. त्यामुळे बीड जिल्हयाचे पाणी मांजरा खो-याला दिले जात नाही. त्यामुळे खास बाब म्हणून आपल्याला हे काम करावे लागेल. याच पध्दतीने अनेक नवीन तलाव करणे गरजेचे आहे त्या नवीन तलावांची यादी मी या ठिकाणी वाचून दाखविते. मांडवा, लेंडेवाडी, दौंडवाडी 7 एमएमक्यू पाणी बोरना खो-यात शिल्लक आहे त्यामुळे हे पाणी तिन्ही साठवण तलावाला देण्यात यावे. पिंपरवाडा, कासारी, मैंदवाडी, जहांगीर मोहो, दहीफळ, वडमाऊली, मांडवा पठाण, येल्डा, उजनी, बेलगाव, आरगाव, केळगाव, शिंदेवाडी, लेंडेवाडी, दौंडवाडी क्रमांक (3), मांडवा, परळी, हनुमानगड, वामनभाऊ गढ, रेवली, जेगाव या ठिकाणचे तलाव पूर्ण करण्यात यावेत. शेवटची इरिगेशनची मागणी आमच्या परळीच्या दृष्टीने फार महत्वाची आहे. 90 एमएमक्यू पाणी लोणी सांगवी येथून माजलगाव मध्ये टाकावे व तेथून ते पाणी कुंडलीका मध्ये टाकून, कुढलीकातून ते पाणी परत मांजरामध्ये टाकावे त्याच बरोबर त्याचा एक पाट जमले तर बुटेनाथ पासून मांड धरणात सोडावा असे केले तर परळी तालुक्याचे भविष्य सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठयाच्या संदर्भातील बाब क्रमांक 206 व 207 नुसार ग्राहक आयोग आणि ग्राहक मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय झालेला आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांवर नवीनच जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. मला असे वाटते की, ग्राहक हक्क आयोग आणि ग्राहक मंडळामध्ये महिलांचा सहभाग वाढवून खास करुन भेसळीच्या संदर्भात ज्या तक्रारी आहेत त्याची ठिकठिकाणी दखल घेण्यासाठी एखादा कृती कार्यक्रम राबवण्यात यावा. माझा अन्न व नागरी पुरवठयाच्या संदर्भात दुसरा मुद्दा असा आहे की, अनेक वेळेला गोदामात धान्य साठवले जाते परंतु अनेक वेळा गोदामातील धान्य खराब होऊन धान्याची नासाडी होत असते. धान्य कोणत्या ठिकाणावरुन कोठे चालले आहे याची माहिती घ्यावयाची झाली तर ही जबाबदारी केंद्राची आहे की, राज्यसरकारची आहे याची माहिती नसल्यामुळे नंतर वर्तमानपत्रात बातम्या येऊन विरोधाभास निर्माण होतो. त्यामुळे माझी आपल्याला विनंती राहील की, आपल्या विभागात धान्याची गोदामे कोठे कोठे आहेत व त्याची वाहतूक कोठून कोठे होत आहे यासंदर्भात जर उच्च स्तरावरुन देखरेख झाली तर धान्याचा नाश होण्याचे टळू शकेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 228 सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या संदर्भात मी माझ ो विचार व्यक्त करणार आहे. ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या शाळेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे परंतु ही तरतूद अतिशय अपूर्ण आहे. महाराष्ट्रातील ऊस तोड कामगारांची संख्या पाहिली तर याच्या निदान 25 ते 30 पट तरतूद करावी लागेल. एवढया मोठया प्रमाणात तरतूदीची आवश्यकता आहे. याच्यापूर्वी देखील यासंदर्भात आम्हाला आश्वासन मिळून देखील ऊस तोड कामगारांची मुले शाळेपासून वंचित होत आहेत. यासंदर्भात असेसमेंट करुन किती मुलांसाठी शाळेची गरज आहे हे बघून त्यासाठी तरतूद करणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 231, श्रावण बाळ सेवा योजनेमार्फत वयोवृध्द लोकांना औषध पाण्याचा खर्च मिळू शकतो. या योजनेचे आपण आता स्वरुप बदलले आहे. पूर्वी वयोवृध्द जरी दारीद्रय रेषेच्या खाली नसला व आर्थिक दृष्टया कमकुवत असला तरी त्याला मदत मिळत होती आता श्रावण बाळ योजनेतून अनेक वृध्द निराधार झालेले आहेत. त्यामुळे या वयोवृध्दांना आपण मदत मिळून द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण आणि क्रीडा या विभागाची बाब क्रमांक 105 वर माझे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे......

विचार व्यक्त करणार आहे. क्रीडा संकुलामध्ये मुले आणि महिलांसाठी सुरक्षितता असणारी क्रीडा संकुले उभारणे आवश्यक आहे. कृषी आणि पशू संवर्धन यामध्ये लाल्या रोगाचा उल्लेख झालेला आहे. परंतु जुलै महिन्याच्या अधिवेशनात शासनाला दुष्काळाच्या प्रश्नावर काम करावयाचे आहे असे सांगून आपण ते अधिवेशन गुंडाळले होते. परंतु आज उडीद, मूग, सुर्यफूल,सोयाबीन याचे जे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात कोठेच उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणून मला कृषी विभागाला विचारणा करावीशी वाटते की, सध्या विदर्भामध्ये अधिवेशन होत आहे, ऊस उत्पादक शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, लाल्या रोगाच्या संदर्भात उल्लेख आहे परंतु पॅकेजच्या अंमलबजावणीच्या संदर्भात ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्यासंदर्भात चर्चा किंवा निर्णय झालेला नाही. संत्र्याचा, धानाचा प्रश्न आहे तसेच ज्या ठिकाणी दुष्काळ पडलेला आहे अशा भागातील शेतक-यांना पैसे देखील मिळालेले नाहीत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

संपूर्ण मराठवाड्यातील आणि उत्तर महाराष्ट्रातील विभागांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे त्याबाबत कोणत्या संरक्षक उपाययोजना करण्यात आल्या त्याबाबत स्पष्टीकरण करण्यात आले नाही. तेव्हा कृषी विभागाने जी निराशा केलेली आहे त्यामुळे दुर्दैवाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या दिसतील असा मला शासनाला इशारा द्यावासा वाटतो.

महिला व बाल विकास विभागाकडे लक्ष वेधायचे झाले तर बाल हक्क आयोगाची धोषणा केलेली आहे. या विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. .

**तालिका सभापती ( श्री.रामनाथ मोते ):** माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे विचार थोडक्यात मांडावेत..

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्यावरील प्रेशर समजू शकते....ज्ञानेश्वरी फडने जसे हातात पिस्तुल घेऊन खून केला तसे प्रकार गावोगावी होणार आहेत कारण सभागृहाला कशासाठीही वेळ नाही. मी शेवटी एवढेच सांगेन की, "समर्थन" या संस्थेने ठाणे जिल्ह्यातील आरोग्य सेवा आणि आदिवासी सेवा या संदर्भात एक पंचनामा पुस्तिका काढलेली आहे. सरकारला जनाची आणि मनाची विवेकबुध्दी असेल यावर श्वेतपत्रिका काढून दाखवावी असे माझे सरकारला आव्हान आहे. या काढलेल्या पुस्तिकेवर सरकारचे काय म्हणणे आहे ते सांगावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय भीम, जय महाराष्ट्र.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ( नगर विकास,पशुसंवर्धन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नगर विकास, अल्प संख्याक, वक्फ, विधी व न्याय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यविकास आणि बंदरे या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो.

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी बीड जिल्ह्यातील स्वीमिंग पूल ताबडतोब सुरु करण्याबाबत,अंबेजोगाई, माजलगाव येथे कोर्टाची इमारत आणि निवासस्थाने नसल्याबाबत, परळी, धारुर हे नवीन तालुके निर्माण झालेले आहेत त्याठिकाणी न्यायालयासाठी इमारत बांधावी अशा विविध मागण्या केलेल्या आहेत. एकूण 53 तालुक्यांपैकी 32 तालुक्यांमध्ये न्यायालय सुरु करण्याबाबत विधी व न्याय विभागाने प्रयत्न सुरु केलेले आहेत. जशा जागा उपलब्ध होतील व माननीय उच्च न्यायालयाकडून परवानगी मिळेल त्याप्रमाणे इमारती बांधण्यात येतील.माजलगावसाठी 25 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी बीड तालुक्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बदली करण्याची मागणी केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्या प्रकारच्या तक्रारी आहेत हे जाणून घेऊन त्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बॉम्बेचे नामकरण मुंबई असे झाल्यानंतरही मुंबईतील उच्च न्यायालयाचे नामकरण अजून "बॉम्बे हायकोर्ट" आहे ते बदलून "मुंबई हायकोर्ट" करावे अशी मागणी केलेली आहे. "बॉम्बे हायकोर्टचे" "मुंबई हायकोर्ट" असे नामकरण करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दिनांक 17.1.2005 रोजी प्रस्ताव पाठविलेला आहे. जोपर्यंत लोकसभेत याची दुरुस्ती होत नाही तोपर्यंत आपणास नाव बदलण्यात अडचण आहे. तरी सुध्दा पुन्हा एकदा माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या सहीने माननीय पंतप्रधान व केद्रींय विधी व न्याय विभागाचे मंत्री यांना पत्र पाठविण्यात येईल.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे नेहमी त्यांच्या भाषणात कौटुंबिक न्यायालयाचा विषय मांडत असतात. एकूण 22 जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यापैकी 11 जिल्ह्यात कार्यवाही सुरु झालेली आहे. त्यामध्ये नाशिक, कोल्हापूर, अकोला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**</u>

श्री.हसन मुश्रीफ.....

आणि अमरावती याठिकाणी कौटुंबिक न्यायालय सुरु करण्यासाठी शासनाने आदेश काढलेले आहेत.

सभापती महोदय, तीर्थक्षेत्र तुळजापूरसाठी आपण प्राधिकरण केलेले आहे. या प्राधिकारणाने 315 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. तीर्थक्षेत्र तुळजापूर प्राधिकरणच हा निधी खर्च करणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी न्यायालयात लाखो खटले प्रलंबित आहेत असा मुद्दा उपस्थित केला. या संदर्भात विधी व न्याय विभागाने उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाशी पत्रव्यवहार केलेला आहे. गुजरात राज्याच्या धर्तीवर शिफ्टमध्ये न्यायालय सुरु करण्यास शासनाची संमती आहे. त्याबाबत उच्च न्यायालयास व सर्वोच्च न्यायालयास कळवून त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन तालुक्यांमध्ये न्यायालय सुरु करण्याची मागणी केलेली आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे प्रत्येक तालुक्यात न्यायालय सुरु करण्याचे शासनाचे धोरण आहे. न्यायालयाच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध झाल्यास आणि त्यास माननीय उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने परवागनी दिल्यास त्याप्रमाणे लगेच कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी भिंवडी येथे सत्र न्यायालय सुरु करण्याची मागणी केलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी विदर्भातील नगरपरिषदांना आणि सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी अकोला,वाशिम जिल्ह्यातील नगरपरिषदांना पायाभूत सुविधांसाठी निधी द्यावा अशा प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ..

त्याच बरोबर सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी अल्पसंख्याक समाजासाठी 171 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून तो निधी कमी आहे त्याऐवजी 2000 कोटी रुपयाची तरतूद करण्यात यावी असे त्यांनी सांगितले आहे. अनुसूचित जाती आणि आदिवासी विभागाच्या तुलनेने अल्पसंख्याकांची संख्या मोठी असल्यामुळे 2000 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. तेव्हा याबाबत शासन निश्चितपणे विचार करील. आमदार ,खासदार याना जे मानधन आणि टी.ए. डी.ए.ची रक्कम दिली जाते त्याप्रमाणे महानगरपालिका,नगरपालिका , नगरपंचायतीच्या नगरसेवकांना सुध्दा टी.ए. डी.ए आणि मानधन देण्यात यावा अशी त्यांनी मागणी केलेली आहे त्याबाबतीतसुध्दा शासन निश्चितपणे विचार करील. नगरविकास, वक्फ, अल्पसंख्याक, विधी व न्याय विभाग, पशुसंवर्धन मत्स्यव्यवसाय, दुग्ध व्यवसाय विकास, बंदरे या विभागाच्या पूरक मागण्याला सभागृहाने मंजुरी द्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

श्री.मधुकर चव्हाण :न्यायालयामध्ये अनेक केसेस प्रलंबित आहेत त्यामुळे दोन शिफटमध्ये न्यायालयाचे कामकाज चालविण्यात आले पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ : गुजराथ राज्याप्रमाणे न्यायालयाचे कामकाज सुध्दा शिफटनुसार चालवावे अशा प्रकारची सूचना करण्यात आली होती आणि शासनाने तत्वत: ती सूचना मान्य केली आहे.त्याचबरोबर उच्च न्यायालयाला असे सांगितले होते की यासाठी लागणारा जो काही खर्च असेल तो आम्ही देऊ.

श्री.राजन तेली : रॉकेलच्या संदर्भात उत्तर देण्यात आलेले नाही.

श्री. हसन मुश्रीफ :मच्छिमारांच्या बोटी सुरु करण्यासाठी लागणारे रॉकेल देण्यासंबंधी शासन निश्चितपणे गंभीरपणे विचार करील.

श्री.परशुराम उपरकर : सुरक्षिततेच्या दृष्टीने सागरी गस्ती नौका आवश्यक असून त्या नौकांच्या संदर्भात उल्लेख केलेला नाही

श्री.हसन मुश्रीफ : संरक्षणाच्या दृष्टीने योग्य ती काळजी घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (महसूल आणि पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन, उद्योग , महसूल आणि पुनर्वसन विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबतीत मी खुलासा करु इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी रुई गावच्या पुनर्वसनासबंधी आपले म्हणणे मांडले आहे. त्यांनी लेखी स्वरुपातही मागणी केलेली आहे तेव्हा त्याबाबत निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल. कोतवालाच्या मागण्याच्या सदर्भात सुध्दा त्यांनी आपले म्हणणे माडलेले आहे तेव्हा कोतवालाच्या मागण्यासबंधी एक निवेदन शासनाला प्राप्त झाले असून त्यावर कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मंत्रिमंडळासमोर हा विषय नेऊन लवकरात लवकर त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये उस्मानाबाद जिल्हयातील जी तीन गावे बेचिराख झाली होती त्याचा उल्लेख केला आहे. काबरा समितीच्या अहवालाचासुध्दा त्यांनी उल्लेख केला होता. काबरा समितीच्या अहवालात 135 व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करण्यात आला होता त्या पैकी 118 लोकांना मदत देऊ शकलो आहे. उरलेल्या प्रकरणातील वारसाचा मुद्दा उपस्थित झाल्यामुळे त्यांना रक्कम देता येणे शक्य झालेले नाही. सभापती महोदय, स्वातंत्र्य सैनिकांना शासनाकडून पेन्शन देण्यात येते त्यात 2000 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे तसेच त्यांना इतर वैद्यकीय मदत करण्याचे ठरविले असून त्याकरता 20 कोटी रुपयांची तरतूद बाब क्रमांक 8 मध्ये करण्यात आली आहे त्याचबरोबर हैद्राबाद मुक्ती संग्रामात बेचिराख झालेल्या तीन गावातील 450 लोकांना मदत देण्याचे शासनाने ठरविले आहे त्यासाठी 9 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे त्यासाठी बाब क्रमांक 9 मध्ये उल्लेख करण्यात आला आहे सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे होते की, ही रक्कम कमी असून त्यात वाढ करण्यात आली पाहिजे तेव्हा दोन लाख रुपये मदतीची रक्कम ठरविण्या मागे नेमके काय लॉजिक होते याचा अभ्यास करुन त्या सबंधी निर्णय घेण्यात येईल. काबरा समितीने जी 135 नावे दिली होती ती नाव वेगळी असून त्या व्यतिरिक्त 450 लोाकांना मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

श्री.दिवाकर रावते (बसून ) :या संदर्भात एक बैठक घेण्यात यावी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील :त्या संदर्भात बैठक घेण्याची शासनाची तयारी आहे त्याप्रमाणे मुंबईमध्ये महसूल विभागात ज्या रिक्त जागा आहेत त्या बाबतीत आणि
डिजीटीलायझेशनच्या बाबतीत येथे उल्लेखं करण्यात आला होता. डिजीटीलायझेशनचे काम कमी वेगाने सुरु आहे त्याला गती देण्याचे शासनाचे नियोजन आहे हे मला आवर्जून सांगावयाचे आहे तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मोठया प्रमाणावर काही रिक्त पदे आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

आपण म्हटल्याप्रमाणे मोठया प्रमाणावर रिक्त पदे असून ती लवकरात लवकर भरण्यासाठी प्रयत्न केले जातील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा महसूल विभागाचा विषय आहे. महसूल विभागाचे काम ठप्प झाले आहे. तुमच्याकडे मालमत्तेचे डॉक्युमेंट रजिस्टर झाल्यानंतर त्याचे वेळेवर फेरफार होत नाहीत. त्यामुळे महसूल विभागाचे काम थांबले आहे. यामध्ये दोनच असे लोक आहेत ज्यांना रेव्हेन्यूच्या सर्व्हेचे ज्ञान आहे. बाकीचे लोक प्रमोशन होऊन आल्यानंतर ते सर्व्हेकडे जात नाहीत. त्यामुळे प्रमोशनने माणसे भरण्यापेक्षा सर्व्हेचे ज्ञान असलेली माणसे आपण किती दिवसात भरणार आहात? गेल्या चार वर्षापासून प्रचंड काम थांबले आहे. चार वर्षात एकही डॉक्युमेंट रजिस्टर करण्यात आले नसल्यामुळे लोकांची किती अडचण होत आहे? तेव्हा शहर आणि उपनगरामध्ये 19 लोकांची आवश्यकता आहे त्याठिकाणी विहित अर्हताधारक माणसांची अमूक इतक्या दिवसात नेमणूक करु असे आपण सभागृहाला सांगणार काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याकरिता एक बैठक घेण्यात येईल. आणि त्या बैठकीसाठी माननीय सदस्यांना निमंत्रित करुन यासंबंधी निर्णय घेण्यात येईल. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये विमानतळ उभारण्यासंबंधी उल्लेख केला. त्या कामासाठी केंद्र सरकारने दोन महिन्यापूर्वी तत्वत: मान्यता दिली आहे. आणि तेथील औद्योगिक विकासाचे काम यापुढील काळात एम.आय.डी.सी. च्या माध्यमातून होईल. सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी माजी सदस्य कै. प्रमोद नवलकर साहेबांनी केलेली भाषणे संकलित करुन त्यांचे प्रकाशन करण्याबाबत सुचविले होते. त्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन, महसूल व उद्योग विभागाच्या मागण्या या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, विशेष न्याय विभागाच्या दोन मागण्या याठिकाणी आहेत. त्यापैकी बाब क्रमांक 231 मध्ये श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना यामध्ये योजनेतर 128.16 कोटी आणि संजय गांधी निराधार अनुदान योजना याकरिता 100.28 कोटीची मागणी केली आहे. तसेच, योजनेंतर्गत श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार योजनेंतर्गत मागील वर्षातील बाकी रु.28.16 कोटी व रु.26.62 कोटी तसेच दोन्ही योजनांकरिता वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेतल्याने या वाढीव अनुदानाकरिता लागणारा खर्च भागविण्याकरिता ही पुरवणी मागणी याठिकाणी सादर करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षा, सामाजिक कल्याण, विकलांक व निराधार व्यक्तींच्या कल्याणासाठी 88.35 कोटींची मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मागील वर्षीची थकबाकीची रक्कम 44.28 कोटी असून लाभार्थींच्या संख्येत वाढ झाल्यामुळे चालू वर्षी आवश्यक असलेल्या अतिरिक्त अनुदानाची मागणी सुध्दा या विशेष सहाय्य विभागामार्फत करण्यात आली आहे. या मागण्यांवर कोणत्याही माननीय सदस्यांनी भाग घेतलेला नाही.

त्याचप्रमाणे सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एकंदर 33 पूरक मागण्या आहेत. त्यामधून जवळ जवळ 488 कोटींच्या मागण्या प्रस्तावित केल्या असून भारीत मागण्यांसाठी 3 कोटी 32 लक्ष व दत्तमत मागण्यांसाठी उर्वरित 485 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, रस्ते व पूल याकरिता असलेल्या पूरक मागण्यांची संख्या 6 असून त्यासाठी 325.15 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, इमारत बांधकाम यासाठी पूरक मागण्यांची संख्या 2 असून 9 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यंत्रसामग्रीसाठी 2 पूरक मागण्या असून त्यासाठी 10.12 लक्ष आणि इतर विभागाच्या इमारत बांधकामाच्या पूरक मागण्या 22 असून त्यासाठी जवळ जवळ 149 कोटी 26 लक्ष, व्याज प्रदानसाठी 3.23 लक्ष अशी एकूण 488.63 कोटींची मागणी करण्यात आली आहे. बाब क्र. 126 वर केंद्रीय निधीसाठी 303.84 कोटीं किंमतीच्या एकूण 69 नवीन कामांसाठी 5.30 कोटींची तरतूद केली आहे. तसेच, बाब क्र.127 मध्ये राज्यातील मार्ग व पूल यांचे परिरक्षण व दुरुस्तीसाठी अतिरिक्त तरतूद 160 कोटींची करण्यात आली असून त्यामध्ये राज्य क्षेत्रासाठी 120 कोटी व स्थानिक क्षेत्रासाठी 40 कोटींच्या मागण्यांचा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

डॉ. सुनील देशमुख...

अंतर्भाव केला आहे. मराठवाडा विकास कार्यक्रम 2008 अंतर्गत मंजूर झालेल्या 364.20 कोटींची अंदाजित किंमतीची नवीन कामे अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी 5 कोटींचा अतिरिक्त नियतव्यय ठेवलेला आहे. तसेच, रस्त्यांच्या नवीन कामांसाठी विभागाच्या उपलब्ध नियतनातून 2.59 कोटी मिळून 142 कोटींची तरतूद बाब क्र. 131 वर केली आहे. अशातऱ्हेने रस्ते व पूलाशी संबंधित एकूण 6 मागण्या असून त्यासाठी 325 कोटींची मागणी याठिकाणी केली आहे.

सभापती महोदय,मा.सदस्या श्रीमती मधू जैन यांनी केंद्र सरकारकडून केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत साडे चार हजार कोटींचा निधी खर्च न करता तो परत गेला काय? असा प्रश्न उपस्थित केला.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ....

केंद्र शासनाकडून केंद्रीय मार्ग निधी म्हणजे सेंट्रल रोड फंड अंतर्गत कामे मंजूर केली जातात. या कामांसाठी राज्य सरकार तरतूद करते व खर्च करते आणि झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र आपण केंद्र शासनाला पाठवतो मग आपल्याला त्याचे रिएम्बर्समेंट मिळते. त्यामुळे खर्च झाला नाही असे म्हणणे उचित होणार नाही. सन 2004-05 मध्ये केंद्र शासनाकडून फक्त 91.60 कोटी रुपये तरतूद मिळाली होती ती या वर्षी वाढून जवळजवळ 170 कोटी रुपये झालेली आहे. एकूण 1463 कोटी रुपयांची कामे सुरु असून आतापर्यंत 923 कोटी रुपये खर्च केलेला आहे. मला सभागृहाला सांगताना अत्यंत आनंद होतो की, ही योजना राबविण्यामध्ये देशात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांनी अनुशेषांतर्गत पालम,पूर्णा व पाथरी येथील ग्रामीण रुग्णालयासाठी तरतूद कमी असल्याबद्दल मुद्दा उपस्थित केला. सदर कामे नवीन आहेत. त्या कामांना प्रशासकीय मान्यता नुकतीच ऑक्टोबर, 2008 मध्ये दिलेली आहे. आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीमध्ये 10 टक्केपर्यंत खर्च होऊ शकेल ही बाब लक्षात घेऊन तरतूद केलेली आहे. पुढील वर्षी कामाच्या प्रगतीनुसार आपण त्यामध्ये तरतूद करु. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेकडील ग्रामीण मार्गाच्या दुरुस्तीच्या कामात भ्रष्टाचार होत असल्याबद्दल या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्यांनी जर विशिष्ट नावे दिली तर दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद येथून त्याच्या चौकशीचे आदेश देऊ.

सभापती महोदय, ऊर्जा विभागच्या बाब क्रमांक 83 ते 86 अशा तीन मागण्या या ठिकाणी आहेत. या मागण्यांच्या बाबतीत कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपली मते व्यक्त केलेली नाहीत. मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभाग, विशेष सहाय्य विभाग व ऊर्जा विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. नितीन राऊत ( गृह, तुरुंग, उत्पादन शुल्क आणि कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या गृह विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि कामगार विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. गृह विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आणि महत्वाचे काही मुद्दे या ठिकाणी मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी पोलीस भरतीसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या मागण्यांचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तो निश्चितपणे तपासून घेण्यात येईल आणि त्याची पूर्तता करण्यात येईल. त्यांनी या ठिकाणी बालेपीठ, बीड, परळ या ठिकाणच्या पोलीस क्वार्टर्सच्या दुरुस्तीसंबंधीचा प्रस्ताव मांडला आणि धारवर येथे नवीन पोलीस क्वार्टर्स बांधून देण्यासंबंधीचा मुद्दा मांडला. निश्चितपणे आम्ही ही बाब तपासून घेऊ. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर साहेबांनी या ठिकाणी होमगार्डच्या धर्तीवर नागरी संरक्षण दलातील लोकांकरिता सुध्दा आपण काही करावे, त्यांना सुध्दा सुधारित दराने भत्ता आणि प्रशिक्षण वगैरे जे काही असेल तो निधी दिला जावा अशी मागणी केली. या बाबतीत मी सांगू इच्छितो की, नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना सुध्दा सुधारित दराने कर्तव्य भत्ता व प्रशिक्षण भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव महासमादेशक होमगार्ड व संचालक नागरी संरक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून ऑक्टोबर, 2008 मध्ये शासनास प्राप्त झालेला आहे. आम्ही त्याची तपासणी करीत आहोत आणि निश्चितपणे त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला होता. पोलीस स्टेशनला इंनकमिंग दूरध्वनी देण्याचा निर्णय आणि पोलीस स्टेशनला स्टाफ भरण्यासंबंधीचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी मांडला. निश्चितपणे त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब साहेबांनी 1993 च्या बॉम्ब स्फोटामध्ये जे लोक मृत्यूमुखी पडले त्या कर्मचाऱ्यांना जे प्रोत्साहनपर अनुदान द्यावयाचे आहे त्याबद्दलचा मुद्दा उपस्थित केला. निश्चितपणे त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासंबंधी निर्णय धेण्यात येईल. या ठिकाणी त्यांनी जे.जे. हॉस्पिटलमधील शव विच्छेदन केंद्राच्या बाबततीत सुध्दा सांगितले. त्यासंबंधीचा सुध्दा निर्णय आम्ही घेत आहोत आणि त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. बरवड 17:00

(श्री. नितीन राऊत...

सन्माननीय सदस्य श्री गोपीकिसन बाजोरिया यांनी तंटामुक्ती गाव मोहिमेअंतर्गत योग्य रक्कम मिळावी अशी मागणी केली. तो विषय शासनाच्या विचाराधीन आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी 2007-08च्या साधनसामग्री पुरवठयाबाबतचे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले. ती पूरक मागणी या ठिकाणी प्राप्त झालेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी शव विच्छेदन केन्द्रातील वातानुकूलित यंत्रणा बंद असल्याचे सांगितले. ह्या गोष्टी तपासून त्याबाबतीत निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी एनएसजी प्रमाणे एमएसजी करावे असे सांगितले. तसा राज्य शासनाचा प्रस्ताव आहे. मंत्रिमंडळाने नुकताच हा मुद्दा मान्य केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अंमली पदार्थांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी देखील लक्षवेधी सूचना दिली होती. ही बाब तपासून योग्य ती कारवाई केली जाईल. दहशतवाद विरोधी पथकाच्या साधनसामग्रीच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित करण्यात आले. ते तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : आपल्या पुरवणी मागण्यांच्या पुस्तिकेमध्ये खर्च होऊ शकला नाही असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. हा खर्च न होण्याला जबाबदार असणा-या अधिका-यावर कारवाई होणे आवश्यक आहे असे मी म्हटले होते. ही कारवाई आपण करणार आहात काय यासंबंधी स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री. नितीन राऊत : मी सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते तपासून त्याबाबतीत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी नक्षलग्रस्त भागाचा मुद्दा मांडला. त्याबाबतीत योग्य तो विचार केला जाईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी देखील आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी सांगितले की, गोवा राज्यातील अवैध दारु येते ती बंद झाली पाहिजे. याबाबतीत चौकशी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : 1993च्या बॉम्बस्फोटामध्ये ज्या पोलीस अधिका-यांनी चांगले काम केले त्यांना बक्षिस देण्यासंबंधीची तरतूद करण्यात आलेली आहे. चांगले काम केले त्यांना 15 वर्षानंतर बक्षिस जाहीर करण्यात आले. परंतु या बॉम्बस्फोटातील काही आरोपी जामिनावर सुटलेले आहेत तर काही पॅरोलवर आहेत. या आरोपींना शिक्षा होण्याच्या संदर्भात शासन हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात अपील करणार आहे की नाही ?

श्री. नितीन राऊत : या मुद्याबाबत निश्चितच योग्य तो निर्णय घेतला जाईल. संबंधितांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबध्द आहे. तेव्हा गृह विभागाच्या रु.76.24 कोटीच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. भोगले... 17:05

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( ग्रामविकास,पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) सभापती महोदय, ग्रामविकास व पाणीपुरवठा विभागाच्या पुरवण्या मागण्यांवरील चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेऊन अतिशय उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी महसूल मुद्रांकाची जी आकारणी केली जाते, त्याच्या एक टक्का रक्कम जिल्हा परिषदेला दिली जाते, ती रक्कम रायगड जिल्हा परिषदेला अद्याप मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची मागणी केली आहे. ग्रामविकास विभागाची यासंदर्भातील पुरवणी मागणी मंजूर झ ाल्यानंतर ज्या ज्या जिल्हा परिषदांची ही देय रक्कम आहे ती निश्चितपणे दिली जाईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी तुळजापूर प्राधिकरणाबद्दल काही सूचना केल्या. या संदर्भात माननीय विधी व न्याय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी नुकतेच तुळजापूर देवस्थानासंबंधी उत्तर दिलेले आहे. शासनामार्फत तुळजापूर प्राधिकरणाकडे निधी पाठविला जातो. त्या निधीतून ते विकास कामे ठरवित असतात. आपल्या ज्या चांगल्या सूचना आहेत, त्या सूचना निश्चितपणे प्राधिकरणाकडे पाठविण्यात येईल.

सभापती महोदय, यशवंत ग्रामसमृध्दी योजनेचे पैसे मिळाले नाहीत अशीही तक्रार या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने करण्यात आली आहे. याबाबतीत सांगू इच्छितो की, यासंदर्भात पुरवणी मागणी सादर केली आहे, त्या मागणीप्रमाणे सर्व निधी उपलब्ध झाला तर ज्यांनी ग्रामसमृध्दी योजनेची 10 टक्के रक्कम भरली आहे. त्यांना या योजनेचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांनी या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने असे मत व्यक्त केले आहे की, जे कर्मचारी कोर्टात गेले, त्यांना सेवानिवृत्तीसाठी 60 वर्षाची सवलत देण्यात आली आहे. तशी सवलत इतर सर्व कर्मचा-यांनाही देण्यात यावी अशा प्रकारची मागणी केली.यासंबंधीची माहिती घेण्यात येईल आणि योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, पाणीपुरवठा स्वच्छता विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी सांगितले की, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान पुरस्कारासाठी जी माणसे आली होती त्यांची व्यवस्था विभागाकडून योग्य प्रकारे केली गेली नाही. सदर पुरस्काराचे वितरणाच्या ठिकाणी कोणते अधिकारी होते, यासंबंधीची चौकशी केली जाईल आणि संबंधित दोषी अधिकारी असतील त्यांचेविरुध्द कारवाई केली जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी अकोला येथे पाणी पुरवठयाची पुरेशी सोय नाही अशा प्रकारची खंत यावेळी व्यक्त केली. त्या शहरातील लोकांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागते आहे. अकोला शहरासाठी पाणी पुरवठा योजने संदर्भात सर्व्हे करण्यात येऊन एखादी नवीन पाणी पुरवठा स्कीम तयार करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, माझ्या विभागाच्या मागण्यांवर ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. ग्रामविकास विभागांच्या बाब क्रमाक 189,190,191,194,195,196,197,198,199,201, 202,203, पाणी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 367 व 368 या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. भोगले... 17:05

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील ( ग्रामीण विकास व पर्यटन मंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचा प्रचार व प्रसार व प्रसिध्दी रेल्वे, रेल्वे स्टेशन्स येथे करण्यात यावी यासंबंधी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सूचना केली आहे. सध्या आपण पर्यटन स्थळाचा प्रचार, प्रसार आणि प्रसिध्दी करीत असतो. यात निश्चितपणे वाढ करण्यात येईल. पर्यटनाच्या विकासासाठी निधी उपलब्ध झालेला आहे या कामासाठी निश्चितपणे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

त्याचप्रमाणे त्यांनी दुसरी सूचना अशी केली आहे की, महाराष्ट्रातील जेवढी तीर्थक्षेत्र विकासासाठी शासनाकडून निधी दिला जातो. त्या निधीतून त्या ठिकाणी तीर्थप्रसाद देण्याची व्यवस्था महिला बचत गटाच्या माध्यमातून केली जावी. तीर्थप्रसाद देण्याची व्यवस्था सरकारच्या वतीने करण्यात येत नाही, ती व्यवस्था देवस्थान कमिटीच्या माध्यमातून केली जात असते. तीर्थप्रसादाचे काम महिला बचत गटाकडून करुन घ्यावे अशा प्रकारचे विनंती देवस्थान कमिटीला आपल्याला करता येईल.

सभापती महोदय, कोकण विभागातील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन यावा अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी केली आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, 250 कोटी रुपये कोकणाचा विकास करण्यासाठी येणार आहेत. त्यातील काही निधी प्राप्त झालेला आहे. कोकणातील पर्यटनाचा विकास करण्याकरिता निधीची कमतरता भासणार नाही. कोकणातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकासाठी निधी अर्धवट स्वरुपात उपलब्ध करुन दिला आहे. स्मारकाचे काम पूर्ण करण्यासाठी पूर्ण निधी उपलब्ध करुन द्यावा अशी या निमित्ताने मागणी केली आहे. ही बाब संबंधित विभागाकडून तपासून घेऊ व याबाबतीत जास्तीची मदत कशी करता येईल या दृष्टीने लक्ष घालण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर, चिपळूण तालुक्यातील तीर्थक्षेत्रे आहेत, त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची चांगली व्यवस्था करण्यात यावी

4...



श्री. विजयसिंह मोहिते पाटील...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारची मागणी केली आहे. या मागणीच्या बाबतीत निश्चितपणे लक्ष घालण्यात येईल. पूर्वी तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याची कामे अपूर्ण आहेत, त्या तीर्थक्षेत्राचा प्रथम विचार करण्यात येईल. त्यानंतर दुस-या तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याकडे निश्चितपणे लक्ष घालण्यात येईल. पर्यटन विभागाच्या बाब क्रमांक 379 व 380 अशा दोन 63 कोटी 16 लाख रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

---------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 च्या हिवाळी अधिवेशनात जलसंपदा विभागाच्या एकूण 13 मागण्या सभागृहापुढे सादर झालेल्या आहेत. बाब क्र.158 व 170 द्वारे एकूण रु. 3561.90 कोटी इतक्या रक्कमेच्या एकूण 6 मागण्या योजनांतर्गत असून रु.1298.86 कोटी इतक्या रक्कमेच्या 7 मागण्या योजनेतर स्वरुपाच्या आहेत. बाब क्रमांक-164, 166, 168, 169 व 170 अन्वये योजनांतर्गत मागणी सादर केली असून यापैकी 4 मागण्या लाक्षणिक तरतुदीसाठी रुपये 1 हजाराच्या आहेत. पूर संरक्षण योजनेमध्ये रु.1296.82 लाख इतकी रक्कम प्रस्तावित आहे. योजनेतर मागण्यांमध्ये बाब क्र.158, 159, 160, 161, 162, 163 व 165 द्वारे...........

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, रु.3561 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आहेत. मग या विभागाचे 2008-09 चे मूळ बजेट किती रक्कमेचे आहे? पुरवणी मागण्या 33 टक्क्यापेक्षा अधिक आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्प ज्यावेळी मांडला जातो त्यावेळी तो शिलकी दाखविला जातो. त्यावेळी या योजना अर्थसंकल्पात येत नाहीत. अर्थसंकल्प शिलकी दाखवायचा आणि पुरवणी मागण्यांद्वारे 3 हजार कोटी रुपये घ्यायचे हा विधीमंडळ सुरु झाल्यापासूनचा विक्रम आहे. मी या निमित्ताने निदर्शनास आणू इच्छितो की, संबंधित विभागाच्या पुरवणी मागण्या पुढील अर्थसंकल्पात कमी आल्या आणि मूळ अर्थसंकल्पात तरतूद झाली तर प्रकल्प मार्गी लागतील. तेवढी काळजी घेण्यात यावी. 3 हजार कोटी रुपये पुरवणी मागणीमधून घेणे ही गंभीर व्यवस्था आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, 2008-09 चे एकूण अर्थसंकल्पीय अंदाज मी सभागृहाला सांगू इच्छितो. योजनेतर अर्थसंकल्पीय अंदाज 3287 कोटी रुपये व योजनांतर्गत अर्थसंकल्पीय अंदाज रु.5944.30 कोटी असे एकूण रु.9232.16 कोटी रुपयाचे जलसंपदा विभागाचे बजेट आहे. योजनेतर मागण्यांमध्ये बाब क्र.158, 159, 160, 161, 162, 163 व 165 द्वारे मोठे, लघु व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांचे परिरक्षण व दुरुस्तीसाठी एकूण रु.300 कोटी रुपये, स्थानिक स्वराज्य संस्थांना उपकर अदा करण्यासाठी रु.83.34 कोटी, पाणी वापर संस्थांना परिरक्षण व दुरुस्तीसाठी आकस्मिकता निधी म्हणून अग्रिम देण्यासाठी रु.113 कोटीची तरतूद केली आहे.

..2..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतक्या मागण्या पुरवणी मागण्यांद्वारे सादर झाल्या आहेत. या मागण्या मंजूर झाल्यानंतर पुढील तीन महिन्यात ही रक्कम खर्च होणार आहे का? मार्च महिन्यामध्ये बजेट येणार आहे. तीन-तीन हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या जात आहेत. नवीन बजेट येण्यासाठी दोन-अडीच महिन्यांचा काळ उरला आहे. उर्वरित काळात हा पैसा खर्च होणार आहे का? पैसा खर्च होणार नसेल तर काय व्यवस्था करणार आहात?

श्री.विजय वडेट्टीवार : जी कामे झाली आहेत त्यांची देयके प्रलंबित आहेत, त्यासाठी सुध्दा तरतूद केली जाते.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : याचा अर्थ असा की, तरतूद न करता आपण कामे दिलेली आहेत. वास्तविक बजेटमध्ये आपल्याला प्रथम लायबिलिटी बूक करायची असते. पण तसे न करता केवळ कामे दिली आणि आता निवडणुका समोर असल्याचे पाहून पैसे दिले जात आहेत.

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, केंद्रशासनाकडून काही पैसे यावयाचे होते त्यामुळे बजेट तयार करीत असताना जी कामे आपण करतो त्यात ऐआयबीपी अंतर्गत आपल्याला पैसे येत असतात, ती रक्कम यायची होती.......

डॉ. दीपक सावंत : केंद्रशासनाकडून आपल्याला पैसे आलेच नाहीत काय ?

श्री. पांडुरंग फुंडकर : जलसंपदा विभागासाठी केंद्रशासनाकडून एकूण किती रक्कम येणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, ही संपूर्ण माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

ॲड. अनिल परब : मूळ बजेटच्या किती टक्के पुरवणी मागण्या यायला पाहिजे असा काही नियम आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, यात 3432 कोटीची जी मागणी आहे ती हमी शुल्क म्हणून द्यावयाची रक्कम आहे त्याचा समावेश आहे. महामंडळाने जे रोखे काढलेले आहेत त्यापोटी ही रक्कम द्यावयाची आहे. म्हणजेच हे केवळ आदान-प्रदान असून त्यात खर्चाचा प्रश्न नाही. जे अंशदान आपण महामंडळाला देतो त्याच्या हमीपोटी आपण हे समायोजन करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, विदर्भाला यातून किती रक्कम आपण देणार आहात ?

श्री. विजय वडेट्टीवार : यात प्रकल्पनिहाय अशी माहिती आहे की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूरसाठी जे रोखे उभारण्यात आले त्यासाठी 1687.99 कोटी एवढे हमी शुल्क असून त्याच्या 2 टक्क्याप्रमाणे 221.84 लाख रुपये, त्यात शासनाने भरावयाची रक्कम 2 कोटी 75 लाख 84 हजार रुपये, हमी शुल्काची रक्कम 2 कोटी 19 लाख 08 हजार रुपये आणि दंडनीय व्याजाची रक्कम 313 लक्ष 94 हजार अशी एकूण ही रक्म होते. त्यानंतरची जी योजनेत्तर मागणी आहे त्यात पाणीवाटप संस्थांना आपण जलसंपदा विभागामार्फत जी रक्कम देतो ती म्हणजे पाणीपट्टीच्या रुपाने शासनाच्या तिजोरीत जी रक्कम जमा होते त्यातून 20 टक्के रक्कम पुन्हा जिल्हापरिषदांना द्यावयाची असते. त्यासाठी 83.35 कोटीची ही मागणी आहे. कारण जिल्हा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार ....

परिषदा राहिल्या पाहिजेत, असा उद्देश आहे. अशा प्रकारे एकूण अग्रीम निधी रु. 139 कोटीची प्रतिपूर्ती करणे व हमी शुल्कासाठी 362.32 कोटी एवढी रक्कम आहे. या सर्व मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

यानंतर आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आदिवासी विकास विभागासंदर्भात आपले विचार व्यक्त केले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार ...

सभापती महोदय, मी सभागृहापुढे सन 2008-2009 मधील आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात उभा आहे. आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सन 2004 पूर्वी आदिवासी क्षेत्रातील शाळांना शालेय शिक्षण विभागाने आदिवासी उपयोजनेतून तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. यासाठी शासनाने 6 कोटी 2 लक्ष 75 हजार रुपयांच्या पुरवणी मागणीचा समावेश केलेला आहे. आदिवासी विकास विभागाच्या एकूण 22 मागण्यांचा समावेश यामध्ये असून यापैकी योजनेतर 980.70 कोटी अशा एकूण 25 पुरवणी मागण्या व योजनेअंतर्गत 343 कोटी 53 लक्ष 72 हजार रुपये खर्चाच्या 20 पुरवणी मागण्यांचा यामध्ये समावेश आहे. आदिवासी विकास विभागामध्ये वैयक्तिक लाभार्थी क्षेत्रीय योजना कार्यरत असून सदर योजनेसाठी निधी कमी पडत असल्यामुळे निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेमध्ये शिक्षण विषयक, सार्वजनिक आरोग्य, शेती विषयक, सिंचन विषयक, आश्रमशाळा व वसतिगृह बांधकाम, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व इतर सोयीसुविधा पुरवण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षणामार्फत आदिवासी वस्ती पाडे, गावे यामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा समावेश या पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेला आहे. या महत्वाच्या योजनेसाठी आवश्यक असलेल्या खर्चासाठी पुरवणी मगण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेब तसेच डॉ.नीलम गो-हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे : आदिवासी विकास विभागाच्या शाळांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी, या शाळांना शालेय शिक्षण विभागाच्या नियमाप्रमाणे बिगर आदिवासी विभगामध्ये ज्या तारखेपासून अनुदान दिले त्या तारखेपासून अनुदान देण्यात यावे अशी मागणी केली होती त्यासंदर्भात काय निर्णय घेण्यात आलेला आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : शाळांना शालेय शिक्षण विभागाच्या नियमाप्रमाणे बिगर आदिवासी विभागामध्ये ज्या तारखेपासून अनुदान दिले त्या तारखेपासून अनुदान देण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आश्रमशाळेच्या संदर्भात विचार मांडले होते. मी सन 2004 ते 2008 या काळातील 100 कोटीच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

होता. आश्रमशाळांना गहू, तांदूळ, हरबरा डाळ पुरवली जाते त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे यासंदर्भात सुध्दा मी मुद्दे मांडले होते परंतु त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांकडून उत्तर आलेले नाही.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. डॉ. सावंत यांनी भ्रष्टाचाराच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात चौकशी करुन निकृष्ठ धान्याचा पुरवठा जर आदिवासी विद्यार्थ्यांना केला जात असेल तर त्या संदर्भात चौकशी करुन संबंधितांवर योग्य ती कडक कारवाई केली जाईल असे मी आपल्याला अश्वस्त करु इच्छितो. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी श्वेतपत्रिकेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सदर पुस्तिका ही खाजगी व्यक्तीने काढलेली असल्यामुळे त्या श्वेतपत्रिकेवर बोलण्याची आवश्यकता आहे असे मला तरी वाटत नाही. सभापती महोदय, या राज्यामध्ये जवळ पास 75 लक्ष आदिवासी बांधव राहतात.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अद्यापपावेतो विद्यार्थ्यांना गणवेश सुध्दा मिळालेले नाहीत.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, गणवेश पुरवण्याचे काम हातमाग महामंडळाला दिलेले आहे. हातमाग महामंडळाकडून गणवेश पुरवण्यामध्ये विलंब झालेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना रोज गणवेश धुऊन घालावे लागतात. पावसाळयामध्ये गणवेश लवकर सुकत सुध्दा नाही त्यामुळे आमच्या गरीब विद्यार्थ्यांनी काय करावयाचे?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत जे काही विचार मांडत आहेत त्याला फार अर्थ आहे. या विषयामध्ये मी माननीय मंत्रीमहोदयांना तर बिलकुल दोष देत नाही. चांगल्या योजनांचा सत्यानाश कसा करावयाचा, चांगल्या योजनांची अडवणूक कशी करावयाची यासाठी काम करणारा नोकरशाहीचा मोठा वर्ग मंत्रालयात बसलेला आहे. जनतेच्या मागण्या तडीस लावावयाच्या असतील तर जे योजनांना विरोध करतात, योजनांचा सत्यानाश करतात अशा लोकांना प्रथम आपल्याला तडीपार करावे लागेल. यासंदर्भातील पुराव्यानिशी उदाहरणे मी चर्चेनंतर आपल्याला देतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्याप्रमाणे भविष्यात निश्चितपणे पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, परवा मी आदिवासी विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली त्यावेळी मला त्रुटी आढळून आल्या. पुढील शैक्षणिक वर्षात शाळा सुरु होण्यापूर्वी त्या त्या शाळांमध्ये गणवेष पुरविले जातील याची मी हमी देतो. आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्यास काही गोष्टी कारणीभूत असू शकतात या आपल्या मताशी मी सहमत आहे. काही गोष्टींमध्ये पारदर्शकता आणण्याची आवश्यकता आहे. ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत त्यामध्ये सुध्दा बदल करण्याची आवश्यकता आहे. आपण चर्चा करीत असताना नेहमी सांगतो की, आदिवासी माणूस अजूनही उपेक्षित आहे त्यांच्यापर्यंत आपण अजूनही पोहोचत नाही. परंतु याबाबतीतही खबरदारी घेण्यात येईल. जे काही दोष असतील ते नक्की दूर करण्यात येतील असा विश्वास मी याठिकाणी देऊ इच्छितो.

सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी हॉस्टेलच्या तपासणीसाठी प्रकल्प अधिकारी अपर आयुक्त यांना महिन्याचे इष्टांक दिलेले आहेत त्याप्रमाणे तपासणी होत नाही असा मुद्दा उपस्थित केला. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, अधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्यामध्ये चार हॉस्टेल्स तपासण्याचा इष्टांक दिलेला आहे. हॉस्टेलच्या संदर्भात काही त्रुटी आढळून आल्यास वा आमच्याकडे लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आल्या असतील तर त्याबाबत चौकशी करुन जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. माझी सभागृहाला विनंती आहे की, आदिवासी विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आपण ठाणे जिल्ह्यातील आहात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील शाळांतील विद्यार्थ्यांची फार दुरावस्था आहे.ठाणे जिल्ह्यात दोन प्रकल्प आहेत...

**उपसभापती** : मी या संदर्भात एक उदाहरण देतो. विद्यमान माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांचेकडे तेव्हा उद्योग विभागाचा कार्यभार होता. एमएसएसआयडीसीच्या एम.डी.ने एका फाईलचा भरपूर विचका करुन टाकला होता. चांगल्या कामाचा विचका करणारे आणि अकारण त्रास देणारे एजंट कार्यरत आहेत. असे काही एजन्ट मी आपणास दाखवितो. ते एजन्ट सांगतात आम्ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उपसभापती**........

आपले काम करुन देतो त्याबद्दल इतकी इतकी रक्कम द्यावी. असे प्रकारे होत आहेत हे या शासनाचे दुर्दैव आहे. कोण कोणत्या विभागामध्ये काय करतो याची मी नावानिशी यादी देईन. दुर्दैवाने या गोष्टी आजही घडत आहेत. त्यामुळे शेवटच्या स्तरावरील व्यक्तीला आपण मदत करु इच्छित आहात तो माणूस सर्व सोयी आणि सवलतींपासून वंचित राहतो. तेव्हा सर्व मंत्रिहोदयांनी लक्ष घालून अशाप्रकारच्या काही प्रवृत्ती बाहेर कार्यरत असतील त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या संदर्भात आदिवासी आयुक्त व सर्व प्रकल्प अधिकारी यांची एक संयुक्त बैठक आपल्या दालनात घ्यावी. त्या बैठकीस आम्हाला देखील बोलवावे. माननीय मंत्रिमहोदय पुढील एक महिन्यात अशी बैठक बोलाविणार काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : होय.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन धेणे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

" कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक 18 डिसेंबर, 2008 रोजी भरलेल्या बैठकीत शुक्रवार, दिनांक 19 डिसेंबर ते सोमवार दिनांक 22 डिसेंबर 2008 पर्यंतचा विधानपरिषदेच्या कामकाजालाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार, दिनांक 19 : | 1. | पुरवणी विनियोजन विधेयक |
| | 2. | अतिरिक्त खर्चाचे विनियोजन विधेयक |
| | 3. | शासकीय विधेयके |
| | 4. | अशासकीय विधेयके ( गत सत्रातील प्रलंबित) |
| शनिवार, दिनांक 20 : | | बैठक होणार नाही. |
| रविवार, दिनांक 21 : | | सुट्टी |
| सोमवार, दिनांक 22 : | | शासकीय विधेयके |

**उपसभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** :सन 2008-2009 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(पुढे सुरु)

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) :सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग पणन या विभागाच्या पूरक मागण्यांवर दोन तीन सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडलेले आहेत त्या बाबतीत मी खुलासा करु इच्छितो.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांनी शेतक-यांच्या कर्ज माफीसंबंधीचा मुद्दा मांडला होता तो मुद्दा राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.जी काही कर्जमाफी द्यावयाची आहे त्यासंदर्भात हिशोब करण्याचे काम सुरु आहे. शक्यतो याच अधिवेशनामध्ये त्यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी को जनरेशंनचे काम जुन्या दहा कारखान्यांनी केले होते त्यांना शासनाने अंशदान किंवा भागभांडवल द्यावे अशी मागणी केलेली आहे. त्याबाबतीत विचार करुन या कारखान्यांना अंशदान किंवा भागभांडवल देण्याचा सहकार विभागाचा प्रयत्न राहील. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी 2006-2007 मधील शेतात उभा असलेला जळालेला जो ऊस आहे त्याला अनुदान देण्यात यावे अशी यापूर्वी् मागणी केली होती. त्या जळालेल्या ऊसाच्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पंचनामे करण्यात आले होते त्याबाबतीत मदत देण्याकरता मध्यंतरी तरतूद नव्हती परतु आता ही तरतूद करण्यात आलेली आहे त्यामुळे येत्या आठवडयात 2006-2007 या काळात उभ्या जळालेल्या ज्या ऊसाच्या बाबतीत जिल्हाधिका-याकडे पंचनामे करण्यात आलेले आहेत त्यांना येत्या आठ दिवसामध्ये रककम देण्यात येईल. जिल्हाधिका-यांनी ती मागणी साखर आयुक्ताकडे नोंदवली पाहिजे त्यानंतर ही रक्कम आठ दिवसात देऊ. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी सहकार खात्यात रिक्त असलेल्या जागासंबंधी एक मुद्दा मांडला होता . त्या बाबत मी सांगू इच्छितो की , सहकार खात्यात 8 हजार 850 पदे मंजूर आहेत त्यापैकी 7 हजार 798 पदे भरण्यात आली असून 1 हजार 52 पदे रिक्त आहेत. या 1 हजार 52 पदापैकी अ गटातील 63 पदे, ब गटातील 242 पदे, क गटातील 684 आणि ड गटातील 63 पदे आहेत . क आणि ड गटातील कर्मचा-यांची भरती सुरु आहे. त्याचबरोबर अ आणि ब गटातील रिक्त पदे भरण्यासाठी काही पदे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर .....

प्रमोशनने आणि काही पदे सरळ सेवा भरती व्दारे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.साळुंखे यानी कापूस आणि उस उत्पादक शेतक-यांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेले आहे. राज्य शासन नेहमीच कापूस आणि ऊस उत्पादक शेतक-याना मदत करीत असते. मागच्या दोन तीन वर्षाचा इतिहास पाहिला तर शासनाने 3 टक्क्याची जवळजळ 750 कोटी रुपयाची रक्कम दिली आहे. त्याचबरोबर लाल्या रोग आला असतांना हेक्टरी 1500 रुपये या दराने 500 कोटी रुपयांचे अनुदान शेतक-यांना दिले आहे. या वर्षीसुध्दा कापसाची नाफेड आणि सीसीआय कडून चांगल्या दराने कापसाची खरेदी करण्यात येत आहे. ऊस उत्पादक शेतक-याच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे गेल्या वर्षी ऊभ्या उसासाठी 132 कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. साखर कारखाने हे शेतक-यांचेच असल्यामुळे एक्सपोर्ट साखरेला वेगळया माध्यमातून मदत करावी लागते. सभागृहाला मी विनंती करतो की, वस्त्रोद्योग विभागाच्या 16 कोटी 89 लाख 23 हजार आणि सहकार विभागाच्या 320 कोटी 40 लाख 67 हजार रुपयांच्या मागण्या संमत कराव्यात एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सतीश पाटील (परिवहन राज्यमंत्री ): सभापती महोदय, परिवहन, जलसंधारण, मदत कार्य क्रीडा- युवक, महिला बालकल्याण खात्याच्या पूरक सादर करण्यात आल्या होत्या. त्यावर कोणीही बोलले नाही.................

श्री.दिवाकर रावते : परिवहन विभागाच्या मागण्या कोणत्या पानावर आहेत हे आम्हाला सांगावे त्या मागणीवर आम्हाला बोलावयाचे होते परंतु ती मागणी या पुस्तकात आम्हाला सापडली नाही त्यामुळे आम्हाला बोलता आले नाही.

डॉ.सतीश पाटील :बाब क्रमांक 33 असून त्यावर कोणीही बोलले नाही.

श्री.दिवाकर खाते :कोणत्या खात्याच्या अंतर्गत ती बाब आहे.?

डॉ.सतीश पाटील : मोटार वाहन विभागातील छपाईच्या संबंधी ती बाब आहे.

एक सन्माननीय सदस्य :गृह विभागामध्ये ती बाब येईल.

श्री.दिवाकर रावते :गृह विभागामध्ये मध्ये आर.टी.ओ.चा संबंध येतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 33 वर गृह विभागाची मागणी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, परिवहन विभागाशी संबंधित असलेली मागणी आम्हाला न सापडल्यामुळे याठिकाणी त्या मागणीवर बोलता आले नाही. याचे कारण परिवहन विभागामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. त्याबाबत मागील वेळी लावण्यात आलेल्या चर्चेला मी उपस्थित राहू शकलो नाही. परंतु पुढील अधिवेशनामध्ये आपल्याला या विषयाला सामोरे जावे लागेल.

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, सन 2003 सालापासून 49 देयके प्रलंबित आहेत . त्याकरिता 3 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, परिवहन विभाग गृह विभागाकडे आहे काय? याठिकाणी परिवहन विभाग असे स्वतंत्रपणे शीर्षक देण्यात आले नाही?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडे सुध्दा परिवहन खाते होते. रस्त्यावरील वहातूक नियंत्रित करण्याचे काम केले जाते त्याच्याशी संबंधित असलेले खाते गृह विभागाकडे आहे. त्यामध्ये पोलीस डिपार्टमेंटच्या बदल्या केल्या जातात, पोलिसांचे पगार काढले जातात, तसेच जो दंड वसूल केला जातो तो गृह विभागामध्ये जमा होतो. आपल्या परिवहन विभागाचा निधी गृह विभागामध्ये जमा होत नाही. त्यामुळे यामध्ये कुठेतरी गडबड आहे. याबाबत आपण पुढील वेळी सुधारणा केली पाहिजे.

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, याठिकाणी बाब क्र. 33 मध्ये 3 कोटी 8 लाख 38 हजार 340 रुपयांची मागणी केली आहे. छपाईसाठी जो खर्च करण्यात येत होता त्याच्या देयकासाठी ही मागणी केली आहे. तेव्हा याबाबत काही चुकले असेल तर आपण मला संभाळून घ्यावे आणि या मागणीला सभागृहाने मंजुरी ध्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, जलसंधारण आणि मदतकार्य विभागाच्या मागण्यांच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी आपले विचार याठिकाणी व्यक्त केले. प्रामुख्याने औरंगाबाद आणि नागपूर विभागामध्ये पिकांवर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे सांगितले. त्याकरिता चंद्रपूर जिल्हयासाठी 77.22 कोटीची मागणी होती, तेवढा निधी त्या जिल्हयाला दिला आहे. नागपूर जिल्हयासाठी 28.16 कोटींची मागणी होती, तेवढा निधी त्या जिल्हयाला दिला आहे. वर्धा जिल्हयासाठी 1.92 कोटींची मागणी होती, तेवढा निधी त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. सतीश पाटील...

जिल्हयाला दिला आहे. भंडारा जिल्हयासाठी 5.03 कोटींची मागणी होती, तेवढा निधी त्या जिल्हयाला दिला आहे. गडचिरोली जिल्हयासाठी 32.3 कोटींची मागणी होती तेवढा निधी त्या जिल्हयाला दिला आहे. लातूर जिल्हयासाठी 147.34 कोटींची मागणी होती तेवढा निधी...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयांचा उल्लेख केला होता. त्या जिल्हयातील सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना कोणतेही अनुदान मिळाले नाही. परंतु आपण याठिकाणी नागपूरहून सरळ लातूरला निघून गेलात...

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, याबाबत कृषी विभागाच्या माध्यमातून सर्व्हे करण्यात आला असून शासनाकडे जे जे प्रस्ताव आले आहेत...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अमरावती विभागामध्ये अकोला, बुलढाणा व यवतमाळ या जिल्हयांमध्ये फेर सर्व्हे करण्याची मागणी केली होती. तेव्हा माजी मुख्यमंत्र्यांनी फेर सर्व्हे करण्याचे आदेश दिले होते. तेव्हा आपण जर फेर सर्व्हे केला नाही तर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांवर अन्याय होईल. आपण जर सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्याला अनुदान दिले नाही तर हा शेतकरी मरुन जाईल. तो पुन्हा आत्महत्या करण्यास प्रवृत्त होईल. याबाबत महाराष्ट्र टाईम्समध्ये अग्रलेख प्रसिध्द झाला होता. सोयाबीन पिकविणारा शेतकरी सुध्दा आता आत्महत्या करावयास लागला असून त्यासाठी आपण तरतूद केली पाहिजे. त्यासाठी आपण स्पष्टपणे आश्वासन दिले पाहिजे. अमरावती विभागातील सर्व जिल्हयांचा सर्व्हे करुन सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येईल काय?

डॉ. सतीश पाटील : आजपर्यंत कृषी विभागाच्या माध्यमातून सर्व्हे होऊन जे जे प्रस्ताव आले आहेत त्यांना मदत देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील ....

आणि मी आपल्याला ग्वाही देतो की, जे सर्व्हे झाले त्यांना तात्काळ अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाची भूमिका राहील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या जिल्ह्यात फेर सर्व्हे करण्याचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते ते फेर सर्व्हे झाले काय ? झाले असतील तर त्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधी शासनाची काय भूमिका आहे ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, सर्व्हे होऊन जे प्रस्ताव आले त्याची यादी वाचून दाखवलेली आहे. परभणी, बीड आणि अमरावती विभागातील काही प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेले नाहीत. ते प्राप्त झाल्याबरोबर त्यांना देखील मदत देण्यासंबंधी घोषणा केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना दोष देत नाही पण त्यांनी आता जे उत्तर दिले ते गंभीर आहे. आत्महत्याग्रस्त भागातील माननीय विरोधी पक्ष नेते या ठिकाणी सांगत आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, ते सर्व्हे अजून आमच्याकडे आलेले नाहीत. यावरुन हे शासन किती गंभीर आहे हे दिसून येते. खरे तर ज्या ठिकाणी आत्महत्या वाढलेल्या आहेत त्या ठिकाणी सर्व्हे आधी यावयास पाहिजे होते. गेल्या सहा महिन्यात 282 आत्महत्या झालेल्या आहेत. तेथील सर्व्हे झालेले नाहीत असे आपण सांगितले. ज्या भागात सहा महिन्यात 282 आत्महत्या झाल्या त्या ठिकाणी प्राधान्याने सर्व्हे व्हावयास पाहिजे. आपण येत्या आठ दिवसामध्ये पाठपुरावा करुन त्याच्या पाठीमागे लागून ते करावे आणि त्यांची व्यवस्था तातडीने लावण्यास लावावे. आत्महत्या वाढू देऊ नका हा विषय आहे.

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात तात्काळ सर्व्हे करुन प्रस्ताव मागविण्यात येईल आणि त्यांना मदतीची घोषणा करण्यात येईल. मालेगाव बॉम्बस्फोटाच्या संदर्भात 4 कोटी 85 लाख रुपयांची पुरवणी मागणी आहे. राज्यात निर्माण झालेल्या टंचाईसदृश परिस्थितीच्या संदर्भात 33 कोटी रुपयांची मागणी आहे. बिहारमधील पुरग्रस्तांना मदत देण्यासंबंधी 11.20 कोटी रुपयांची मागणी आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, या मागण्यांना मान्यता द्यावी. त्याचप्रमाणे जलसंधारण विभागाच्या संदर्भात जी पुरवणी मागणी या ठिकाणी मांडण्यात आलेली आहे त्यालाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

डॉ. सतीश पाटील .....

सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो. महिला व बालविकास आणि क्रीडा विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केले. तसेच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी क्रीडा विभागाच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न विचारला. कबड्डी खेळाडूंना एस.टी. विभागाच्या माध्यमातून 50 टक्के सवलत द्यावी अशी त्यांनी मागणी केली. एस.टी. विभाग स्वायत्त आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एस.टी. चा हा विषय नाही. हा क्रीडा विभागाचा विषय आहे. मागच्या वेळी माननीय क्रीडा मंत्र्यांनी या सभागृहामध्ये विदर्भातील कबड्डी खेळाडूंना 50 टक्के सवलत देण्यास मान्यता दिली होती. त्यासंबंधीचे पत्र त्यांनी मला दिलेले आहे. परंतु अजून त्याची अंमलबजावणी होत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील खेळाडूंना सवलत मिळते. मराठवाड्यातील खेळाडूंना सवलत मिळते. उत्तर महाराष्ट्रातील खेळाडूंना सवलत मिळते. मुंबईतील खेळाडूंना सवलत मिळते. फक्त विदर्भातील खेळाडूंना सवलत मिळत नाही. तत्कालीन माननीय मंत्रिमहोदय प्रा. वसंत पुरके यांनी सवलत मंजूर केल्याबाबत आश्वासन दिले. त्यांनी पत्रही दिले होते परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जी भावना व्यक्त केली त्याबाबत सांगू इच्छितो की, क्रीडा विभागाच्या माध्यमातून परिवहन विभागाकडे प्रस्ताव गेला आहे. परिवहन विभाग आणि एस.टी. हे स्वायत्त महामंडळ आहे. तरी देखील मी सांगेन की, परिवहन विभाग आमच्याकडे असल्यामुळे यासंदर्भात 50 टक्के सवलत देण्याबद्दल निर्णय घेण्यात येईल. या सगळ्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

----

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर ( कृषी, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008-09च्या पुरवणी मागण्याच्या संदर्भात, सांस्कृतिक कार्य, कृषी आणि राजशिष्टाचार या विभागाच्या मागण्यांवर सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य बोलले. कृषी खात्याच्या संदर्भात बाब क्रमांक 68 आणि बाब क्रमांक 69 च्या संदर्भात माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी शेरीकल्चर ट्रेनिंगच्या संदर्भात मागणी केली होती. या ट्रेनिंग सेंटरचा महिला बचत गटाला देखील चांगला फायदा होऊ शकतो असेही त्यांनी सांगितले. ही बाब महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील आहे की केन्द्र शासनाच्या अखत्यारितील आहे हे तपासून पाहिले जाईल आणि त्याबाबत पाठपुरावा करुन शेरी कल्चर ट्रेनिंग सेंटरला मान्यता देण्याच्या दृष्टीकोनातून विशेष प्रयत्न केले जातील. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी बीड जिल्यामध्ये सोयाबीनच्या संदर्भात सर्व्हे झाला की नाही अशी विचारणा केली. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी देखील यासंदर्भात मागणी केली. मी सांगू इच्छितो की, जवळपास 13 जिल्ह्यामध्ये हा सर्व्हे झालेला आहे. त्यासंदर्भात 528 कोटीची मागणी आहे. त्यापैकी विविध जिल्ह्यांमध्ये 211 कोटीची मदत करण्यात आलेली आहे. जे जिल्हे मदतीचे राहिलेले आहेत त्यासाठी 322 कोटीची मागणी आहे. ज्या 13 जिल्ह्यामध्ये सर्व्हे झालेला आहे त्यामध्ये बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, वर्ध, नागपूर भंडारा, चंद्रपूर,गडचिरोली हे जिल्हे आहेत. आमच्याकडे औरंगाबाद आणि अहमदनगर जिल्हा या दोन जिल्ह्याची मागणी कृषी विभागाकडे आलेली आहे. महसूल आणि कृषी विभाग या दोन्ही विभागाची संयुक्त मागणी आमच्याकडे आलेली नाही. जर दोन्ही जिल्हयांची संयुक्त मागणी आली तर सोयाबीनच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी कापसाच्या संदर्भात मागणी केली. त्याच बरोबर केन्द्र पुरस्कृत विविध योजनांच्या संदर्भात अपुरी तरतूद आहे असे त्यांनी सांगितले. केन्द्राच्या योजनांसाठी जोपर्यन्त राज्य शासन तरतूद करीत नाही तोपर्यन्त केन्द्र शासन त्या योजनांना मंजुरी देत नाही. म्हणून सुरुवातीला टोकन ग्रॅण्ट म्हणून राज्य शासनाची काही तरी तरतूद असणे आवश्यक असते. जर केन्द्र शासनाने त्या योजनेवर जास्त तरतूद केली तर पुरवणी मागण्याच्या अनुषंगाने त्या योजनेवरील तरतूद आपण वाढवून घेत असतो. कृषी विद्यापीठाच्या संशोधन कार्यामध्ये आपण भरीव मदत केली पाहिजे असेही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठामध्ये संशोधनाचे काम वाढविण्याच्या दृष्टीकोनातून कृषी विद्यापीठाला निश्चितपणे मदत केली जाईल.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरीया यांनी देहू-आळंदी विकास आराखडयाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सिध्दपेठ या पर्यटन क्षेत्रासाठी 5 कोटीची मागणी केली. संत तुकाराम महाराजांच्या 400व्या जयंतीच्या संदर्भातही त्यांनी निधीची मागणी केलेली आहे. ही मागणी तपासून पाहून त्याबाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल.

राष्ट्रशिष्टाचार विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन, व सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी काही मुद्दे उपस्थित केले. आपण डी.व्ही.कार खरेदी करीत असताना आधीच्या खराब झालेल्या गाडया विकल्यानंतर नवीन गाड्या घ्याव्यास पाहिजेत. ही वाहने आधी निर्लेखित केली जातात, ती डेड स्टॉकमध्ये घेतली जातात आणि त्यानंतर नवीन वाहनांसाठी मागणी केली जाते. नवीन वाहनांसाठी मागणी केल्यानंतर विक्रीचे टेंडर काढण्यात येते. आजच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतलेला आहे. तेव्हा कृषी, सांस्कृतिकार्य आणि राजशिष्टाचार विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 17:50

श्री. सुरेश वरपुडकर...

माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेऊन उपयुक्त सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांची निश्चितपणे दखल घेतली जाईल. माझ्या विभागाच्या पुरवणी मांगण्या सभागृहासमोर मांडण्यात आल्या आहेत, त्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ( फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, फलोत्पादन विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात म्हणून सभागृहाला विनंती करण्यासाठी उभा आहे. खरे तर आज अनेक विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आल्या आहेत. त्यातील अनेक विभागाच्या मागण्यांवर सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. फलोत्पादन विभागाच्या कामकाजावर सर्व सन्माननीय सदस्यांनी विश्वास दाखविला त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे प्रथम आभार व्यक्त करतो. फलोत्पादन विभागाच्या 71 कोटी रुपयांच्या मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आल्या आहेत. आपण राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबवितो, त्यात महाराष्ट्र शासनाचा 15 टक्के असणारा हिस्सा, त्यासाठी पूर्वी केलेली 35 कोटी रुपयांची तरतूद आणि कमी पडणारी 7 कोटी 56 लाख रुपयांची तरतूद याचा समावेश यात करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे डाळिंबावर "तेलकट डाग" असा रोग आला, त्यासाठी केंद्र शासनाकडून 255 कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर करण्यात आले आहे. त्यात राज्य शासनाचा हिस्सा म्हणून 25 टक्के रक्कम म्हणून 57 कोटी 65 लाख रुपये एवढी तरतूद करावी लागणार आहे. याचा देखील या तरतुदीमध्ये समावेश केलेला आहे. मोसंबी पिकावर अवेळी पाऊस आणि दुष्काळामुळे नैसर्गिक आपत्ती आली. त्यासाठी आपण सी.एफ.ॲडव्हान्सच्या माध्यमातून 6 कोटी 32 लाख रुपयांचे वाटप केले आहे. ते 6 कोटी 32 लाख रुपये नियमित करणे, अशा एकूण 71 कोटी रुपयांच्या मागण्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. फलोत्पादन विभागाच्या वतीने सभागृहाला विनंती करतो की, माझ्या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 17:50

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 210, 211, 212, 213, 214, 215, 216, 217, 218, 219, 226, 229, आणि 233 अशा एकूण 14 मागण्या आहेत. या 14 मागण्यांमध्ये बाब क्रमांक 210 घर बांधणीसंबंधीची आहे. 211, 212, 226 आणि 218 या वसतिगृहासंदर्भातील चार बाबी आहेत. 214, 215, 216 आणि 217 अशा चार बाबी शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी यासंबंधीच्या आहेत. आश्रमशाळांचे परिरक्षण करावे ही 213 क्रमांकाची बाब आहे. अपंग कल्याण विभागाच्या 229 व 230 अशा दोन बाबी आहेत. ज्या सदस्यांनी या मागण्याच्या अनुषंगाने मत व्यक्त केले, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. सामाजिक न्याय विभाग सक्षम करण्यासाठी अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत. आश्रमशाळेतील लोक उपोषणाला बसले आहेत, त्यांना तात्काळ मदत करावी अशा प्रकारची विनंती सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केली. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी जास्त तरतूद करावी अशी सूचना केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्लिश मेडियम शाळा, कन्नमवार नगर या संस्थेतील विद्यार्थ्यांना परीक्षा फी आणि शिक्षण फी देण्यासंबंधी डॉ.दीपक सावंत यांनी सूचना केली आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे व श्री.मोते यांनी अपंग शाळांची अनुज्ञप्ती तीन वर्षे कराव अशी सूचना केली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांची परिस्थिती अतिशय खराब आहे, त्या वसतिगृहांची तपासणी करण्यासाठी एक समिती निर्माण करावी.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे........

त्यासाठी इन्सपेक्शन रेग्युलर व्हावे अशी सूचना केली.सन्माननीय सदस्य श्री.केळकर आणि इतरांनी या संदर्भात विविध सूचना केलेल्या आहेत. निश्चितपणे या सूचनांचा आदर करुन सामाजिक न्याय विभागातील या सर्व योजना सक्षमपणे आणि चांगल्या पध्दतीने राबविण्याचा माझा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, बाब क्र.210 अन्वये ग्रामीण घर बांधणीची योजना राबविण्यासाठी निधीची मागणी केली आहे. ही नवीन योजना असून महाराष्ट्रातील जवळजवळ 44 हजार खेड्यांपैकी 38 हजार खेड्यांमध्ये दलित वस्त्या आहेत. सन्माननीय सदस्य विविध कामानिमित्त अनेक खेडयांमध्ये फिरत असतात. दलित वस्त्यांमध्ये विविध प्रकारच्या सुविधा देऊनही राहत्या घरांची अवस्था अत्यंत दयनीय असते. कुठे कुठे कुड्यांची घरे, पार्टिशनची घरे असतात. ही नवीन योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे कॅबिनेटने या योजनेला मंजुरी दिली आणि पुरवणी मागणीद्वारे रु.292 कोटी रुपये मागितले आहेत. 1 लाख रुपयांचे घर ग्रामीण भागात बांधण्याचे सामाजिक न्याय विभागाने ठरविले आहे. ग्रामीण भागात डीआरडीए, नगरपालिका क्षेत्रात 1.5 लाखाचे घर म्हाडा या एजन्सीमार्फत बांधले जाईल. यासाठी 1.5 लाखाचे उत्पन्न असावे. मुंबईसारख्या ठिकाणी एमएमआरडीएच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रात 2 लाखाचे घर बांधण्यात येईल. मुंबई शहरामध्ये लाभार्थ्यांला 10 टक्के रक्कम द्यावी लागेल, नगरपालिका क्षेत्रात 7.5 टक्के व ग्रामीण भागात 5 टक्के स्वत:ची रक्कम द्यावी लागेल. अशा पध्दतीने मार्चअखेर 21 हजार घरे बांधण्याचा संकल्प केलेला आहे. त्यापैकी 11 हजार घरे ग्रामीण भागात, 5 हजार घरे नगरपालिका क्षेत्रात व 5 हजार घरे मुंबई शहरात बांधली जाणार आहेत. माझी या निमित्ताने सभागृहाला विनंती आहे की, पक्षभेद बाजूला ठेवून जे सामाजिक कार्यकर्ते आहेत, लोकप्रतिनिधी आहेत, एन.जी.ओ. आहेत त्यांच्या सहकार्याने ही 21 हजार घरे मार्चअखेर बांधावयाची आहेत. पुढील वर्षापासून या योजनेसाठी नियमित तरतूद करण्यात येईल. साधारणत: जागा असेल तेवढी किंवा किमान 269 चौ.फुटाची घरे बांधण्यात येतील. जिल्हयाचे समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे लाभार्थ्यांनी अर्ज करावयाचा असून सन्माननीय लोकप्रतिनिधींनी शिफारस केली तर अधिक चांगले होईल, योजना लवकर मार्गी लागेल. या योजनेचे टेंडर डीआरडीए, नगरपालिका किंवा म्हाडा आणि एमएमआरडीए यांच्यातर्फे काढले जाईल. योजना कार्यान्वित करण्यासाठी सभागृहाने मदत करावी आणि ही मागणी मंजूर करावी अशी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4B.1

श्री.चंद्रकांत हंडोरे........

सभापती महोदय, एकूण 271 शासकीय हॉस्टेल्स असून त्या हॉस्टेल्सचे परिरक्षण व इतर कामांसाठी 4 कोटी रुपयंची पुरवणी मागणी सादर केली आहे. 28 वसतिगृहे नव्याने सुरु झाली आहेत. त्यांच्या वाढीव खर्चासाठी रु.2.30 कोटीची मागणी सादर केली आहे. विद्युत देयके व भाडे यांचाही या खर्चामध्ये समावेश आहे. 72 मुलींच्या वसतिगृहांसाठी 2.39 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, बाब क्र.213 द्वारे आश्रमशाळासंबंधी तरतूद केली आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण 15 आश्रमशाळा आहेत. आदिवासी किंवा व्हीजेएनटीच्या आश्रमशाळांची संख्या हजारापेक्षाही अधिक आहे. काही आश्रमशाळा केंद्राच्या असून या शाळांना केंद्र सरकारकडून अनुदान देणे बंद केल्यामुळे त्या आश्रमशाळा शासन स्तरावर घ्याव्यात यासाठी मागील दोन वर्षात सातत्याने आमदार महोदय व विविध संघटनांच्या माध्यमातून प्रयत्न केला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुद्दा मांडला आहे की, काही संस्थाचालक व कर्मचारी उपोषणाला बसले असून त्यापैकी 17-18 लोकांना दवाखान्यात ॲडमिट केले आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे ......

अशा प्रकारे 288 ते 300 आश्रमशाळांना केंद्राने मदत देणे बंद केल्यामुळे त्या शाळातील 45 हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्याचा शासन विचार करीत आहे. त्या शाळातील कर्मचाऱ्यांचे पगार पाच-सात वर्षांपासून मिळत नाही. त्यांना मदत करावी अशी शासनाची इच्छा आहे यासंदर्भात सभागृहाने पॉझिटिव्ह भूमिका घ्यावी अशी माझी विनंती आहे तरच हा प्रश्न मार्गी लागेल. अशा प्रकारे ही 2.58 कोटीची तरतूद आहे. त्यानंतर अपंग विद्यार्थ्यांच्या परिपोषणासाठी व इतर बाकीच्या आवश्यक गोष्टींसाठी जी तरतूद केली आहे त्याला सभागृहाने मानयता द्यावी, अशी मी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री) : सभापती महोदय, बाब क्र. 194, पृ.क्र.173 स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेकरिताही तरतूद करण्यात आली असून अण्णासाहेब पाटील विकास महामंडळासाठी ही 15 कोटीची तरतूद केली असून सभागृहाने त्याला मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे (विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण मंत्री) : महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय तसेच रोजगार हमी व शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र.220 ते 225, 227 व 278 या बाबींच्या अनुषंगाने 282.87 कोटीच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मान्यतेसाठी आलेल्या आहेत, त्याला मान्यता देण्यात यावी. त्याचप्रमाणे रोजगार हमीच्या संदर्भात बाब क्र. 32 व 33 या अनुषंगाने 19.48 आणि 56 कोटी अशी जी तरतूद केली आहे त्याला सभागृहाने मान्यता द्यावी.

शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर विचार व्यक्त करताना माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी एक मुद्दा उपस्थित केला की, शिक्षण सेवक भरतीत स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे. तसेच सी.ई.टी. ची राज्यस्तरीय परीक्षा असून सर्वांना समान संधी हा विचार करुन राज्यस्तरावर ही निवड करण्यात येते. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी देखील कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांचा प्रश्न उपस्थित केला आहे. हा प्रश्न जवळपास सुटण्याच्या मार्गावर आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सुध्दा सभागृहात तसे आश्वासन दिलेले आहे. त्यांचा दुसरा मुद्दा असा आहे की, पहिली ते चवथीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय कंपल्सरी केला आहे काय, याबाबत मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात शासन स्तरावरुन कुठलेच आदेश निर्गमित झाले नाहीत. स्थानिक स्तरावरुन जर असे आदेश निघाले असतील तर त्यासंबंधीची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी देखील खाजगी शाळांना किचन शेड बांधून देणार काय अशी विचारणा केली. त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, ही योजना केंद्रशासनाची असून शासकीय अनुदानित शाळांचे सर्व ठिकाणचे शेड बांधून झाल्यानंतरच केंद्रशासनाकडून खाजगी शाळांना किचन शेड बांधण्याची परवानगी मिळू शकते. एवढे सांगून या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी विनंती करतो.

<u>( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)</u>

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे...

शिक्षकांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळावी तसेच शिष्यवृत्ती वेळेवर मिळावी अशी मागणी करण्यात आलेली आहे परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, ही योजना केवळ हुशार व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी आहे. त्यांनी शिष्यवृत्ती वेळेवर मिळण्याच्या संदर्भात जी मागणी केलेली आहे त्या प्रमाणे वेळेवर शिष्यवृत्ती देण्याचे आदेश निश्चितपणे देण्यात येतील. सर्व मुलींना सायकलीचे वाटप करावे अशी सूचना करण्यात आलेली आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, निधीची उपलब्धता आणि लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील मुलींसाठी सायकल वाटपाची योजना सुरु करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी चवथा प्रश्न रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात उपस्थित केला होता त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात निश्चितपणे कार्यवाही सुरु आहे. आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सुध्दा या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. विना अनुदानित शाळांना एमडीएम योजना सुरु करण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, हा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविण्यात आलेला असून त्यासंदर्भात निश्चितपणे निर्णय होईल. किचनशेडचा पैसा खर्च करणे, तपासणी करणे अशी कामे ग्रामशिक्षण समिती मार्फत केली जात असतात व त्यासंदर्भातच प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात कडक उपाय योजना केली जाईल. वेतनेतर अनुदानाचे समान प्रमाणात वाटप करावे असा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे त्यामुळे वेतनेतर अनुदानाचे समान प्रमाणात वाटप केले जाईल. मी आपणास सांगू इच्छितो की, माहिती, तंत्रज्ञान व दळणवळ योजनाच्या संदर्भात ग्रामीण भागाला निश्चितपणे प्राधान्य दिले जाईल, रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुध्दा निश्चितपणे करण्यात येईल. जे प्रशिक्षीत शिक्षण सेवक सेवेत दाखल आहेत त्यांना आंतरवाढ योजनेतून वगळण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय केला जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे साहेबांनी सुध्दा काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यामुळे त्यांनी ज्या सूचना उपस्थित केलेल्या आहेत त्यांच्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी परभणी जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या संदर्भातील आकडेवारी सांगितलेली आहे त्यांनी जी आकडेवारी दिलेली आहे त्याची निश्चितपणे खात्री करण्यात येईल व आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, मैंने ड्रॉप-आउट का मुद्दा उपस्थित करते समय केवल परभणी जिले के आंकड़े सदन में पेश किए हैं, लेकिन यह मुद्दा केवल परभणी जिले तक सीमित नहीं है, सम्पूर्ण महाराष्ट्र में यह समस्या है. एक सर्वे के अनुसार परभणी जिले में 2200 ड्रॉप-आउट हैं, जबकि दूसरे सर्वे के अनुसार 22,000 ड्रॉप-आउट हैं. मेरा प्रश्न यह है कि इस बारे में सही जानकारी प्राप्त करने के लिए क्या शासन पूरे महाराष्ट्र में सर्वेक्षण कराएगा ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, यासंदर्भात निश्चितपणे सर्व्हे करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : आम्ही जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यांची उत्तरे आम्हाला मिळालेली नाहीत.

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, आपले मुद्दे तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मानकर साहेबांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. प्राथमिक व माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान केव्हा देण्यात येणार असा त्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, माध्यमिक व प्राथमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भातील प्रस्ताव विचाराधीन आहे. या ठिकाणी ब-याच शिक्षक आमदारांनी शिक्षण विभागावर प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, उपसमिती जी नियुक्त करण्यात आलेली आहे त्या उपसमितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे काय ? वेतनेतर अनुदान सन 2004 पासून दिले गेले नाही ते अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, वेतनेतर अनुदान शासन देणार आहे एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो. या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी शिक्षण विभागावर प्रश्न उपस्थित केलेले आहेत व त्यांच्या ब-याचशा प्रश्नांची उत्तर सद्या माझ्याकडे उपलब्ध नाहीत तरी सुध्दा यासंदर्भात निश्चितपणे विचारपूस करुन त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आताच सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, ब-याचशा आमदारांच्या प्रश्नांना माझ्याकडे उत्तरे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ज्या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रीमहोदयांकडे सद्या उपलब्ध नाहीत त्यांना आपण लेखी उत्तरे नंतर पाठवून द्यावीत.

. . . 4 D 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना मी आता उत्तरे देऊ शकलो नाही त्यांना निश्चितपणे आम्ही उत्तरे पाठवू. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना तसेच सभागृहाला विनंती आहे की, त्यांनी शालेय शिक्षण विभागाच्या मागणी क्रमांक इ-2 व इ-3 च्या 679 कोटी 47 लाख 94 हजार रुपयांच्या पुरक मागण्या मंजूर कराव्यात.
धन्यवाद.

----------

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.शोभा बच्छाव ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभाग त्याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या पुरवणी मागण्या सन्माननीय सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि ग्राहक संरक्षण विभागाची बाब क्रमांक 206,207,208 व 209 या चार मागण्यांसाठी रुपये 5 कोटी 83 लाख 30 हजार रुपयांच्या पूरक मागण्या आहेत. या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे विचार आणि सूचना चांगल्या पध्दतीने मांडल्या. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील वितरण व्यवस्थेतील काही त्रुटी सांगितल्या. त्याबाबत निश्चितपणे तपासणी करुन काही त्रुटी असतील तर त्यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ग्राहक आयोग आणि ग्राहक मंचामध्ये महिलांचा समावेश करावा अशी सूचना केलेली आहे. तसेच कृती कार्यक्रम राबविण्याबाबत सांगितले आहे. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती आहे की, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक 282 ते 301 आहेत. यासाठी सर्वसाधारणपणे 55कोटी 35 लाख 24 हजार इतक्या रकमेची पूरक मागणी केलेली आहे. आरोग्य विभागावर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यांनी सांगितले की, मेळघाट येथे एक्स्पायरी डेट झालेल्या औषधांच्या बाटल्या आढळून आल्या. यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. याबाबत सांगू इच्छिते की, या औषधांचा पुरवठा आरोग्य विभागाने केलेला नाही...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी माझ्या भाषणात मेळघाट येथे एक्स्पायरी डेट झालेल्या औषधांच्या बाटल्या सापडल्या असा उल्लेख केला. त्यावेळी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

असेही सांगितले होते की, शासनाकडून सांगण्यात येईल की, आरोग्य विभागाने ही औषधे खरेदी केलेली नाहीत. ती औषधी व द्रव्ये विभागाने खरेदी केलेली आहेत, आय.सी.डी.एस.ने खरेदी केलेली आहेत असे सांगण्यात येईल. म्हणजे चेंडू एका कोर्टातून दुसऱ्या कोर्टात टोलाविण्यात येईल आणि त्याप्रमाणे झालेले आहे. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी ही औषधे कोणी खरेदी केली आहेत याचा तपास करावा.

डॉ.शोभा बच्छाव : सभापती महोदय, ही औषधे आय.सी.डी.एस. विभागाने खरेदी केलेली आहेत. आरोग्य विभागाने खरेदी केलेली नाहीत. ही औषधे आय.सी.डी.एस.ची असली तरी यापुढे औषधांचे योग्य पध्दतीने वितरण करण्यात येईल. तसेच जेवढी औषधांची आवश्यकता आहे तेवढीच खरेदी करण्यात येईल.

सभापती महोदय, केंद्र सरकारने पी.एस.यु.कडून औषधे खरेदी करण्याबाबत जी.आर. काढलेला आहे. आर.सी.एच. आणि एनआरएचएम या केंद्र सरकारच्या स्कीममधून 120 प्रकारची औषधे घेण्यात येतात. केंद्र सरकाच्या डायरेक्टीव्हज आहेत की, कर्नाटक, हिंदुस्थान, राजस्थान ड्रग्ज ॲन्ड फार्मा आणि बेंगाल केमिकल आणि आय.पी.बी.एल. याच्याकडून ती घेण्यात यावीत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शोभा बच्छाव...

राज्यातील प्राथमिक आरोग्य केन्द्रांना तसेच उप केन्द्राना लागणारी 80 टक्के औषधे हाफकीन कडूनच आपण खरेदी करीत असतो. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडला होता. ॲन्टीनेटल कीट 700 रुपयाला मिळत असतांना 3 ते 4 हजार रुपये एवढी किंमत लावण्यात आली होती. त्याबाबत मी सांगू इच्छिते की, सदरहू औषधे आरोग्य विभागाकडून घेतली जात नाहीत ती औषधे आय.सी.डी.एस. कडून खरेदी केली जातात . त्याचबरोबर आयुर्वेदिक औषधाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, आयुर्वेदिक औषधे मोठया प्रमाणावर खरेदी केली जातात. राज्यामध्ये एकूण 500 आयुर्वेदिक दवाखाने आहेत त्यांना मोठया प्रमाणावर आयुर्वेदिक औषधे लागतात ही औषधे धूळ खात पडलेली असतात असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल तसेच मोठया प्रमाणावर जर औषधे घेण्यात आलेली असतील तर पुढच्या काळात औषधे जास्त घेण्यात येऊ नये अशा प्रकारची सूचना देण्यात येईल.

सभापती महोदय, राज्यात पोलिओचे 3 रुग्ण आढळून आले होते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते. त्याबाबत मी सांगू इच्छिते की, 2008-2009 पर्यत पोलिओचे 2 रुग्ण आढळून आले होते. ठाणे जिल्हयातील भिवंडी येथे एक पोलिओचा रुग्ण आढळून आला होता तसेच बृहन्मुंबईतील गोवंडी येथे एक रुग्ण आढळून आला होता. पोलिओ लसीकरणाची साखळी चांगल्या प्रकारे जोपासली जात आहे. पल्स पोलिओ लसीकरणाचे प्रमाण 99 टक्क्यापेक्षा जास्त आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आणखी एक मुद्दा मांडलेला आहे. महात्मा गांधी रुग्णालयाचे जे जुने ट्रस्ट डीड आहे त्याबाबतीत त्यांनी येथे उल्लेख केला होता. ई.एस.आय.एस.ॲक्ट संबंधी दिनांक 3.6.2008 रोजी केन्द्र सरकारने अधिसूचना काढली असून त्यानुसार ट्रस्ट डीडमध्ये सुधारणा करण्याबाबत गव्हर्नींग बोर्डातील पाच सदस्यांच्या सहया झाल्या असून एका सदस्याची सही व्हावयाची आहे .ती सही झाल्यानंतर ट्रस्ट डीड बदलण्याच्या बाबत धर्मदाय आयुक्ताकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या बाब क्रमांक 282 ते 301 या मागण्या मान्य कराव्यात एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, मेळधाटमध्ये सापडलेल्या औषधाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदया अशाच प्रकारचे उत्तर देतील. हे मी माझ्या भाषणात मघाशीच सागितले होते . ज्या अर्थी सार्वजनिक आरोग्य खाते काही दवाखान्यांचा कारभार पाहते त्या अर्थी आयसीडीएसकडून काही औषधे येत असतील, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या जी.आर.च्या आधारे काही औषधाची खरेदी केली जात असेल, काही औषधाची खरेदी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून केली जात असेल परंतु यासबंधीची जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाची नाही काय ? 'शासनाचा पैसा जर निष्कारण वाया जात असेल तर या संबंधीची शासनाची जबाबदारी नाही काय ? आयसीडीएसला किंवा त्या कंपनीला सांगून ती औषधे परत पाठवावयास पाहिजे होते.. त्या बदल्यात दुसरी औषधे घ्यावयास पाहिजे काही ठिकाणी औषधे परत पाठविली होती. त्याचप्रमाणे अशा कंपनीला काळया यादीत का टाकले नाही. मघाशी उतर देतांना असे सांगण्यात आले की, यासबंधीचा जी. आर. केन्द्र सरकारने काढलेला आहे. त्याचबरोबर असेही सांगितले की, हाफकिनला 80 टक्के औषधाची ऑर्डर देतो. तेव्हा गेल्या वर्षी हाफकिनला किती कोटी रुपयांच्या औषधाची ऑर्डर दिली होती हे सांगण्यात यावे. हाफकीन संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी फक्त 50 कोटी रुपयांची गरज आहे या सभागृहामध्ये तत्कालिन आरोग्य मंत्री डॉ.विमल मुंदडा यांनी तसे सांगितले होते. त्यासंदर्भात तारांकित प्रश्नसुध्दा विचारण्यात आला होता. आरोग्य खात्याचे बजेट कोटयावधी रुपयांचे असताना हाफकिनला 50 कोटी रुपयाच्या औषधाची ऑर्डर गेल्या वर्षी का दिली नाही. ? माननीय मंत्रीमहोदयांनी ज्या जीआरचा उल्लेख केला होता तो केन्द्राने आपल्या वर लादलेला जीआर आहे त्याचप्रमाणे एनआरएचएम मधून औषधे येतात असे आपण सांगू नका.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

1 रूपयाचे औषध 5 रूपयाला बाहेर मिळत असेल आणि ते आपणास 1 रूपयामध्ये मिळाले तर त्यामुळे आपण चार लोकांना 1 रूपयाचे ते औषध देऊ शकू हा त्यामागील माझ्या भावना आहेत. आपल्यावर टीका करण्याचा त्यात अजिबात उद्देश नाही. आपण दवाखान्यात बसता आपल्याला माहिती आहे की. इंजेक्शन देताना आपण स्पिरिटचा बोळा अगोदर फिरविता. त्यासाठी जास्त खर्च करण्याची गरज नसते. पण आपण येथे काय केले आहे तर डिस्पोजेबल स्पिरिटचे बोळे घेतले. त्यावर आपण नाहक पैसे खर्च केले आहेत. त्यापेक्षा ते पैसे आपण औषध खरेदीसाठी वापरले असते तर लोकांना त्याचा अधिक फायदा झाला असता. आणि हे आपण कोणासाठी केले तर हिंदुस्थान ॲण्टिबायोटिक्स कंपनीसाठी केले. म्हणून माझे आपल्याला सांगणे आहे की, वाटल्यास आपण त्या जी.आर.चे पुनर्विलोकन करा, त्याबाबत विचार करण्यासाठी एखादी समिती नेमा. वाटल्यास आपण याबाबत आपल्या कॅबिनेट मंत्र्यांशी चर्चा करूनही तोडगा काढावा.

डॉ. शोभा बच्छाव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या निश्चितपणे तपासून घेतल्या जातील आणि जे चुकीचे असेल निश्चितपणे दुरूस्त करू.

***

.... 4जी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, वनखात्याच्या पुरवणी मागण्या येथे चर्चेला आल्या आहेत आणि साधारणत: 51 कोटी 65 लाख रूपयांच्या एकंदर सातच पूरक मागण्या आहेत. सभागृहाने या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती मी आपल्याला करणार आहे. तत्पूर्वी या पूरक मागण्यांवरील चर्चेत सहा सन्माननीय सदस्यांनी, त्यात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री राजन तेली, परशुराम उपरकर, जैनुद्दीन जव्हेरी आणि श्रीमती फौजिया खान यांनी भाग घेऊन चांगल्या सूचना केल्या आहेत. त्या सर्व सूचनांची मी नोंद घेतली आहे. सभापती महोदय, हे खरे आहे की, वनखाते अस्तित्त्वात आल्यापासून या वेळेसच केवळ सर्वात जास्त पुरवणी बजेट या खात्याला मिळाले आहे. गेल्या 5-7 वर्षांचा याबाबतचा वन खात्याचा इतिहास पाहिला तर वनखात्याला एकंदर पुरवणी बजेट हे 0.17, 0.18 या पलिकडे मिळालेले नाही. परंतु आम्ही बऱ्यापैकी काम करून चांगल्या पद्धतीने जवळपास 37 कोटी रुपयांचे पुरवणी बजेट मिळविले आहे.

सभापती महोदय, आपण आता हिवाळी अधिवेशनासाठी नागपूरमध्ये आहोत आणि तरीही एकही सदस्याने या ठिकाणी स्वेटर घातल्याचे मला दिसून आलेल नाही. तेवढा हिवाळा राहिलेलाच नाही. सभापती महोदय, मध्यंतरी काही दिवस सभागृहामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर वारंवार चर्चा होत होती आणि आजही हाते. माझ्याकडे जेव्हा हा विभाग होता त्यावेळेस म्हणजे 1992 साली मी त्यावरून म्हटले होते की, यापुढे कदाचित या राज्यामध्ये केवळ पोलिसांसाठीच बजेट करावे लागणार आहे. तसाच प्रकार आता वनाच्या बाबतीत होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे संपूर्ण निसर्गाचे ऋतुमान बदलले आहे. त्यामुळे आपल्याला एक वेळेस केवळ वनासाठीच बजेट करावे लागणार आहे. त्या शिवाय अन्य पर्यायच राहणार नाही. कारण पर्यावरणाशिवाय दुसरा पर्यायच नाही, जो पर्याय आहे तो केवळ वन हा एकच आहे. आज जगामध्ये एका शास्त्रज्ञाने सांगितले की, सर्व प्राण्यांनी एकदम प्राणवायू घेण्यास सुरूवात कली तर 7 तास पुरेल इतकाच प्राणवायू हवेमध्ये शिल्लक आहे. परंतु बाहेर जंगलामध्ये अनेक वनस्पती आहेत आणि त्या हवेतील प्राण्यांना घातक असलेले वायू स्वत: घेऊन आपल्याला प्राणवायू देतात. म्हणूनच वनाला आता महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यादृष्टीनेच या मागण्या येथे आलेल्या आहेत आणि त्यातूनही आपल्याला हे समजून येईल.

सभापती महोदय, वनामध्ये मृदसंधारणाची कामे जास्त व्हावीत यासाठी आपण प्रयत्न करीत

...... 4जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाचपुते ....

आहोत आणि त्यासाठी जास्त पैसे देण्याची व्यवस्था केली आहे. आता वन खात्यासाठी बजेट कमी आहे म्हणून डोक्याला हात लावून बसण्यापेक्षा वनामध्येच आपण वेगळ्या प्रकारे काम सुरू केले आहे. केंद्र सरकार साधारणत: 87 सालापासून दर दोन वर्षांनी सेटेलाईट मार्फत ट्री मॅपिंग आणि टॅपिंग या दोन गोष्टी करीत असते.

( श्री. सरफरे नंतर .... 4एच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ...

सद्या आपले वनक्षेत्र 20.13 टक्के असले तरी वन संरक्षण कायदा संमत झाल्यामुळे हे प्रमाण कमी होणार आहे. तरीसुध्दा आज महाराष्ट्रातील वन समृध्द आहे. चांगल्या प्रकारची अभयारण्ये आपल्याकडे आहेत, तीन व्याघ्र प्रकल्प आहेत. चांदोलीसारखा व्याघ्र प्रकल्प सुचविण्यात आला आहे. केंद्र सरकारने मॅप टॅपिंगचे काम टेक्निकल इंस्टिटयुट ऑफ डेहराडून यांच्याकडे दिले होते. मला याठिकाणी सदनाला सांगण्यास आनंद होतो की, 26 राज्यांमध्ये 1 मी. x 1 मी. वर किती झाडे आहेत याचे मॅपिंग सुरु आहे. यामुळे देशामध्ये सर्वात जास्त झाडे असलेले एकमेव राज्य हे महाराष्ट्र आहे. ही गोष्ट या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी मान्य केली आहे. याला अनेक कारणे आहेत. सिंचन विभाग आणि वन विभागाबाबत लोकांमध्ये चांगली भावना तयार झाली आहे. वन विभागातील बेकायदेशीर झाडांची कटाई कमी करण्यामध्ये आपण यशस्वी झालो आहोत. त्याकरिता आपण नवीन कार्यक्रम राबवीत आहोत.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितले की, वन्य जीव जंगलामधून बाहेर येतात, हत्ती बाहेर येतात.त्यामुळे लोकांचे शेतीचे व मालमत्तेचे प्रचंड नुकसान होत आहे असे माननीय सदस्य श्री. जव्हेरी आणि माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले. पर्यावरणाचे चक्र बिघडल्यामुळे अशाप्रकारे जंगलातील वन्य जीव वस्तीमध्ये यावयास लागले आहेत. यामुळे पाळीव जनावरांचे नुकसान झाले आहे तसेच मनुष्य हानी देखील झाली आहे. त्याकरिता यावर्षी 9 कोटी 5 लाख रुपयांची नुकसान भरपाई या शासनाने दिली आहे. संपूर्ण देशामध्ये जास्तीत जास्त नुकसान भरपाई देणारे हे एकमेव राज्य आहे ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी हत्तीबाबत याठिकाणी प्रश्न उपस्थित केला. माननीय सदस्यांवर हत्तीचे फार प्रेम असल्यामुळे ते कर्नाटकातून आपल्याकडे येत आहेत. त्यांना परत पाठविण्याची आपल्याकडे व्यवस्था नसल्यामुळे त्यांना आपल्याला इथेच थांबवून घ्यावे लागेल. सभापती महोदय, 1980 चा वन संवर्धन कायदा अस्तित्वात आल्यानंतर वनामध्ये कुणीही जायचे नाही आणि वनामधून कुणीही बाहेर यायचे नाही यासाठी "पाणी अडवा आणि पाणी जिरवा" कार्यक्रम राबवीत आहोत. पर्यावरण चक्र राखण्याचा प्रयत्न करीत आहोत. वॉटर कॉन्झर्व्हेशन करुन जंगलात वॉटर लेव्हल वाढविण्याचे काम करावयास हवे होते परंतु दुर्दैवाने वन क्षेंत्रामध्ये ही कामे झाली नाहीत. पाझर तलाव, नाला बंडींग, कॉटुरबंडींग, सॉईल कॉन्झर्व्हेशन, सी.सी.टी.,के.टी.वेअर ही कामे मोठया प्रमाणात झाली पाहिजेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. बबनराव पाचपुते ...

ती झालेली नाहीत. गेल्या दोन-तीन वर्षापासून केंद्र सरकारकडे जाऊन या कायद्यामध्ये असलेल्या अडचणी सोडविल्या आहेत. त्यामुळे ही कामे मोठया प्रमाणात सुरु होतील. आज जंगलामध्ये पाणी मिळत नसल्यामुळे वन्य जनावरे पाणी पिण्यासाठी वनाबाहेर येतात आणि त्यांची हत्या होते. गवत खाणारे आणि मांस भक्ष्य करणारे प्राणी जर जंगलामध्ये उपलब्ध झाले तर हे वन्य जीव जंगलाबाहेर येणार नाहीत. तेव्हा जंगलामध्ये जर जलसंपत्ती वाढली, जंगल वाढले तर त्याचे चांगले परिणाम दिसावयास लागतील.

सभापती महोदय, जगामध्ये वाघांची संख्या कमी होत आहे अशी महाराष्ट्र टाईम्समध्ये बातमी छापून आली आहे. मार्च महिन्यात जंगलातील वाघांची शिरगणती केली असता वाघांची संख्या 268 असून पूर्ण जंगलाचे सेन्सस झाल्यानंतर वाघांची निश्चित संख्या आपणास समजू शकेल. मागील दोन महिन्यात वाघांच्या दहा बछडयांचे सायटींग झाले.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदय चांगले उत्तर देत आहेत. परंतु ते मुद्दयावर येत नाहीत. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी त्यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, वन्य प्राणी जंगलामधून बाहेर येतात त्यामुळे पाळीव प्राणी आणि माणसांची हत्या होते. ती थांबविण्यासाठी आपण काय करणार आहात? असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला होता. त्यावर मी माझे उत्तर देत आहे. त्यामुळे मी मुद्दयावरुन गुद्दयावर येणार नाही. मी मुद्दयावरच बोलणार आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

सभापती महोदय, काहीही सांगावयाचे नसेल तर आमच्या विभागाच्या ज्या 7 मागण्या आहेत त्या मंजूर कराव्यात. आपल्याला दुसऱ्या बाजूनेही विचार करावा लागेल. आपण हिवाळी अधिवेशनासाठी आलेलो आहोत. प्राणी झुंडीने का येतात ते शोधावे लागेल. आता जागतिक पातळीवर चर्चा होते. आता ग्लोबल वार्मिंग्नाच्या संदर्भात चर्चा सुरु झालेली आहे. ते थांबवावयाचे असेल तर काय करणार ? कारखान्याचे धुरांडे बंद करा. कोळसा जाळणे बंद करा. एक टन कार्बन डायॉक्साईडचे मशीनने प्राणवायूमध्ये रुपांतर करावयाचे असेल तर 700 डॉलर खर्च येतो आणि 1 टन कार्बन डायॉक्साईडचे प्राणवायूमध्ये रुपांतर झाडापासून करावयाचे असेल तर 10 डॉलर खर्च येतो. यामध्ये 700 डॉलर आणि 10 डॉलर एवढा फरक आहे. त्यामुळे झाडाची किंमत आता आपल्याला समजावयास लागली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुद्यावर बोलावे. ज्यावेळी समुद्रमंथन झाले त्यावेळी त्यातून एक रत्न विष बाहेर आले. ते विष महादेवाने प्राशन केले म्हणून त्यांना आपण नीलकंठ म्हणावयास लागलो. आपल्या महाराष्ट्रामध्ये सव्वाकोटी चारचाकी वाहने आहेत. छोटी वाहने सुध्दा मोठ्या प्रमाणावर आहेत. ही सव्वाकोटी वाहने दररोज कार्बन डायॉक्साईड आणि कार्बन मोनाक्साईड बाहेर सोडतात. याचाही आपल्याला विचार करावा लागेल. आपण एकविसाव्या शतकामध्ये निघालो आहोत.

डॉ. दीपक सावंत : आता नॅनो कारचा प्रकल्प महाराष्ट्रात कसा आणता येईल हे आपण बघत आहात.

श्री. बबनराव पाचपुते : आपण सांगत आहात ते बरोबर आहे. आपल्याला दोन्ही गोष्टी घेऊन बरोबर जावयाचे आहे. विकासही झाला पाहिजे आणि विकासाबरोबरच पर्यावरणही राखले गेले पाहिजे. दोन्ही कायम राहू शकते. परंतु त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद तसेच आपली दृष्टी मोठी करण्याची आवश्यकता आहे. दृष्टी मोठी करावयाची असेल तर प्रचलित नियम बाजूला ठेऊन काम करावे लागणार आहे. यासाठी थोड्या वेगळ्या पध्दतीने वन विभागामध्ये सॉईल कॉन्झर्वेशन आणि वॉटर बॉडीज तयार करण्याचा कार्यक्रम घेतलेला आहे आणि उत्तम प्रकारे काम चालू आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 2000 साली कर्नाटकमधून हत्ती आले त्यावेळी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

कोकणातील लोकांनी त्यांचे स्वागत केले. सर्वांनी ढोल ताशे वाजवून स्वागत केले. आपल्या नातेवाईकांना निरोप दिला की, आमच्या गावात हत्ती पाहण्यासाठी या. जोपर्यंत हत्ती काही नुकसान करीत नव्हते तोपर्यंत स्वागत केले. हत्ती हा अत्यंत खादाड प्राणी आहे. तो 16 तास खात असतो आणि भरपूर नुकसान करतो. आतापर्यंत हत्तींमुळे 5 व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. पूर्वी आपल्याकडे हत्ती नसल्यामुळे नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था नव्हती. पण आपण जी.आर. काढला आणि देशामध्ये सर्वात जास्त नुकसानभरपाई देणारे महाराष्ट्र राज्य आहे.

ॲड. अनिल परब : हत्तीमुळे घरांचेही नुकसान होते...

श्री. बबनराव पाचपुते : आपण झाडांना नुकसान भरपाई देतो. ज्यांच्याकडे बंदुकीचे लायसन्स आहे त्यांना देत नव्हतो. सन्माननीय सदस्यांनीच याबाबतचा प्रश्न विचारला होता. हत्तींची संख्या वाढत गेली. 2 चे 4 झाले. 4 चे 7 झाले आणि नंतर 11 झाले आणि शेवटी त्यांची संख्या 23 झाली. आता ती संख्या कमी होत आहे. 1 हत्ती विहिरीत पडून मेला. 4 हत्ती तारेमध्ये अडकून मेले. एका हत्तीला निमोनिया होऊन तो मेला. एकूण 6 हत्ती मृत झाले. बाकीचे परत गेले आणि आता पाच हत्ती राहिलेले आहेत. त्यामध्ये 4 हत्ती ॲग्रेसीव्ह आहेत आणि 1 हत्ती टस्कर आहे म्हणजे बैरागी आहे. तो कोणाला विशेष त्रास देत नाही. यामध्ये तीन राज्यांचा संबंध आहे. हत्तीला परत घालविण्यासाठी गोव्याला गेलो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

त्यानंतर कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांबरोबर व वन मंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. तसेच केंद्र सरकारच्या वन मंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. त्यानंतर केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांना मध्यस्थी करण्यास सांगितले. त्यामुळे मोठया प्रमाणावर पैसा उपलब्ध झाला. जगामध्ये हत्तीसंबंधी काम करणारे डॉ.देसाई यांच्याकडे हे काम दिलेले आहे. आता हत्ती परत पाठविले जाणार नाहीत. राज्यात आलेल्या हत्तींना 3-4 महिन्यांमध्ये माणसाळविले जाईल. त्या हत्तींचा इको-टुरिझमसाठी वापर केला जाणार आहे. यासाठी 82 हेक्टर जमीन निवडली आहे. त्यांच्यासाठी पाण्याची व पैशाची व्यवस्था केलेली आहे. आता यापुढे राज्यात हत्ती आले तरी त्यांचे स्वागत केले जाईल, त्यांना पकडण्याची तयारी ठेवलेली आहे. त्यांना माणसाळविणारी टीम 8-10 दिवसात येणार आहे. त्याचप्रमाणे 90 कि.मी.अंतरावर कर्नाटक किंवा गोवा या राज्यांच्या अनेक साईड निवडून तेथे गार्ड पोल लावले आहेत, खंदक तयार केले आहेत. अशाप्रकारची मोठया प्रमाणावर व्यवस्था केलेली आहे आणि पैशाचीही व्यवस्था केलेली आहे. हत्तींनी घरांचे नुकसान केले असेल तर त्याची नुकसान भरपाई देण्याची नियमात तरतूद नाही. परंतु त्याबाबत विचार केला पाहिजे. कारण त्या व्यक्तींचा तो दोष नाही. जगा आणि जगवा या उक्तीप्रमाणे सगळयांना जगण्याचा अधिकार आहे. त्यानुसार दोघांच्याही अधिकाराची जोपासना केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबाबत सांगावयाचे झाले तर बराच वेळ लागेल. परंतु त्यांनी वन कामगारांचा महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यावेळी वन कामगारांची गरज होती काय तर होती असेच उत्तर द्यावे लागेल. सामाजिक वनीकरण, एफडीसीएम, रोजगार हमी योजना या योजनांच्या अंतर्गत वन कामगारांना ठेवले होते. 1994 सालापर्यंत ज्यांची सेवा 5 वर्षे झाली आहे त्यांना कायम करण्याचा निर्णय घेतला आहे. काही वन कामगारांची सलग 5 वर्षे झालेली नव्हती त्यांचा यामध्ये समावेश झाला नव्हता, परंतु आता त्यांचाही यात समावेश करण्याचे ठरविले आहे. एफडीसीएम, सामाजिक वनीकरण, रोजगार हमी योजना यांचे कायदे वेगळे आहेत. एफडीसीएमला दिलेल्या कर्जाचे भांडवलात रुपांतर केले आहे. वन कामगारांसंबंधी विभागाचा अहवाल तयार झाला आहे,

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.बबनराव पाचपुते....

खरे तर तो याच अधिवेशनामध्ये या महामंडळाचा अहवाल सादर होणार होता. वन कामगारांचा प्रश्न एक महिन्याच्या आत किंवा याच वर्षी सोडविण्याची माझी स्वत:ची तयारी आहे. यासाठी लागणा-या निधीसंबंधी मी माननीय वित्त मंत्र्यांबरोबर बोललो आहे. कारण यासाठी जो पैसा लागणार आहे तो द्यावाच लागेल. त्यांना कायम करुन घेतले पाहिजे. सुप्रीम कोर्टाने चेन्नईच्या प्रकरणात या वन कामगारांना बॅक डोअर एन्ट्री देऊ नये असा निर्णय दिला होता. त्यासंदर्भात ॲटर्नी जनरल यांच्या बरोबर शासनाने चर्चा केली आहे. त्यामुळे त्या कामगारांना कायम करण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.

सभापती महोदय, वन्य प्राण्यांनी नुकसान केल्यामुळे द्याव्या लागणा-या रकमेत वाढ करावी असेही सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले. परंतु याबाबत मी सांगेन की, देशात सगळयात जास्त म्हणजे 9 कोटी 5 लाख रुपये आपल्या राज्यात यासाठी रक्कम दिली जाते. ज्यांचे नुकसान झाले आहे अशांची संख्या जास्त आहे. पण ही वस्तुस्थिती आहे. ज्यांना नुकसान भरपाई मिळाली नसेल त्यांना ती दिली जाईल. त्याचप्रमाणे रानडुक्कर, हरीण व रोही या प्राण्याची शिकार करण्याची परवानगी दिली जात नाही असे सांगण्यात आले. परंतु आता त्यासाठी परवानगी दिली जाते. यासाठी तुम्ही अर्ज केला पाहिजे आणि 24 तासात परवानगी मिळाली नाही तर वन विभागाने परवानगी दिली आहे असे समजण्यात यावे अशी सुधारणा केली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 18:40

(श्री. बबनराव पाचपुते...

फक्त नंतर त्यांनी विभागाला कळवायचे, अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. मराठवाडा आणि अहमदनगर जिल्ह्यामध्ये हरीणांपासून खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. पूर्वी 20पैसे, 30 पैसे, 40 पैसे अशी नुकसान भरपाई दिली जात होती. या नुकसान भरपाईचे चेक मिडियावर दाखविण्यात आले. आता ही नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत सुधारणा केलेली असून आता कमीत कमी 500 रुपये नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतलेला आहे. 500 रु.पेक्षा अधिक नुकसान झालेले असेल तर त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : विदर्भामध्ये डुकरांमुळे शेतक-यांचे खूप मोठे नुकसान होते. विदर्भातील अनेक भागात अस्वल देखील आहेत. हे प्राणी माणसांवर हल्ले करुन त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांना देखील नुकसान भरपाई दिली गेली पाहिजे. हरीणांच्या कळपापासून आणि डुकरापासून होणा-या नुकसानीबाबतही नुकसान भरपाई दिली पाहिजे.

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्या प्रमाणे विभागाने तसा निर्णय घेतलेला आहे. अस्वलापासून झालेल्या हानीबाबत, हल्ल्याबाबत नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपल्या जिल्हयामध्ये दोन व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. त्यांना आपण हत्तीमुळे होणा-या नुकसानीप्रमाणे एका व्यक्तीला 2 लाख रु. याप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. रान डुकरापासून झालेल्या नुकसानीबाबत देखील आपण मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. जे जखमी होतात त्यांना देखील नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतलेला आहे. पूर्वी एखादी व्यक्ती जखमी झाली की जखम 10 टक्के आहे की 20 टक्के आहे हे पाहिले जात होते. परंतु आता जखमी झालेली व्यक्ती 24 तास दवाखान्यामध्ये उपचारासाठी असेल तर त्याला 50 हजार रु. देण्याचा निर्णय घेतलेला आहे. जर ती व्यक्ती दवाखान्यात जाऊन लगेच बाहेर आली तर त्या व्यक्तीला नुकसान भरपाई मिळणार नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात सूचना केली होती आणि त्यांच्या सूचनेप्रमाणे हा निर्णय घेतलेला आहे. हरीणाच्या संदर्भात आम्ही वेगळया पध्दतीने विचार करीत आहोत. 20 पैसे, 40 पैसे या प्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे आपण बंद केलेले आहे. आता 500 रु.पर्यन्त जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. औरंगाबादमध्ये हरीणांच्या प्रादुर्भावामुळे मोठा मोर्चा निघाला होता. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.2..

(श्री. बबनराव पाचपुते...

हरीणांना सोलर फेन्सिंग करुन वेगळया पध्दतीने कव्हर करता येईल का, आतमध्ये चांगल्या प्रकारचे खाद्य तयार करता येईल काय अशा प्रकारचा निर्णय आम्ही घेतोय. वनामध्ये आपण मोठ्या प्रमाणात वॉटर बॉडी तयार केली तर हरीणापासून प्रादुर्भाव होणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : कोकणामध्ये कवडे, वानर, मगरी यापासून होणा-या नुकसानीच्या संदर्भात मदत दिली गेली पाहिजे.

श्री. बबनराव पाचपुते : वानराच्या संदर्भात देखील मागे चर्चा झाली होती. वानर घरावरचे पत्रे तोडतात. वानरामध्ये दोन प्रकार आहेत. एक माकड आहे आणि एक लंगूर आहे. त्यानी केलेल्या नुकसानीच्या संदर्भात आपण जरुर विचार करु. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अफझल खानाच्या कबरीसंदर्भात येथे मुद्दा उपस्थित केला. ही कबर वनक्षेत्रामध्ये असून तेथे साधारणतः 13 गुंठ्यावर अतिक्रमण झालेले आहे. याबाबतीत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्यानंतर अतिक्रमण कायम करावे अशीही चर्चा झालेली आहे. यासंदर्भात वर्षा देशपांडे नावाच्या आमच्या एका भगिनीने हायकोर्टामध्ये पी.एल. दाखल केला आणि हायकोर्टाने 6 आठवड्यामध्ये यासंबंधीचा निर्णय करावा असे निर्देश दिले. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्याकडे चर्चा झाली. आता वनखात्याची कोणतीही जागा पाहिजे असेल तर केन्द्राकडे प्रस्ताव पाठवावा लागतो आणि केन्द्र जोपर्यन्त कॉन्झरर्व्हेशन ॲक्टनुसार मंजुरी देत नाही तोपर्यन्त वनाची जमीन वनेतर कामासाठी वापरता येत नाही. मध्यंतरी गावातील लोकांच्या हिताच्या 13 कामासाठी, म्हणजे हॉस्पिटल, घरकुल, शाळा, हायस्कूल, विहीर यासाठी एक हेक्टर पर्यन्त जागा देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्याचा उपयोग झाला नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

श्री. बबनराव पाचपुते...

यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली आणि त्यात सांगितले की, तुम्ही यासंदर्भातील प्रस्ताव दाखल करा. तो प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी गॅझेटच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, सदर गॅझेट हे 1885 या वर्षाचे आहे. त्या गॅझेटचे दोन वेळा रिप्रिंटींग झाले आहे आणि ते गॅझेट तसेच जोडलेले आहे. त्या गॅझेटमध्ये आम्ही आमच्या मनाची काहीही माहिती जोडलेली नाही. परंतु हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावयाचा होता, परंतु तो प्रस्ताव केंद्राकडे न पाठविता राज्य सरकारकडे पाठविला. यासंदर्भात मी स्वत: सातारा येथे गेलो. यासंदर्भात तेथील अधिका-यांशी चर्चा केली. त्यात काही बदल करुन तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविणार आहोत. यात कोणत्याही अधिका-याची चूक नव्हती. पूर्वीच्या गॅझेटमध्ये जे छापले होते, तसाच मजकूर पुढे छापलेला आहे. ते गॅझेट तसेच जोडले होते. वन विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेत सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि वन विभागाच्या 51 कोटी रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा प्रश्न यह है कि हिरन, डुक्कर और दूसरे जानवर जो खेती को नुकसान पहुँचाते हैं तो इस बारे में उपाय-योजना करने के लिए क्या मंत्री महोदय मराठवाडा और विदर्भ के प्रतिनिधियों की मीटिंग बुलाएंगे ?

श्री. बबनराव पाचपुते : सजेशन फॉर ॲक्शन. वन विभागाच्या 51 कोटी रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी पुन:श्च विनंती करतो.

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री. राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षण व वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, "शहाणे करुनी सोडावे सकल जन " या उक्तीप्रमाणे आपण म्हणतो. समाजाला सुशिक्षित करणे, समाज समृध्द करणे ही भूमिका प्रामुख्याने उच्च व तंत्र शिक्षण विभागाची आहे. अनेक विद्यापीठे, अनेक महाविद्यालये, आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी. आणि वैद्यकीय शिक्षणामध्ये शासनाचे सर्व वैद्यकीय महाविद्यालये अशा धोरणात्मक बाबी या विभागांशी संबंधित आहेत. 11 व्या वित्त आयोगाच्या संबंधाने माननीय पंतप्रधानांनी जे व्हीजन केलेले आहे, त्यामध्ये एक शिक्षणाचे विस्तारीकरण, दुसरे म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता आणि तिसरे म्हणजे समाजातील सर्व घटकांना विकसित करणे अशा व्हीजन स्टेटमेंटच्या अनुषंगाने या विभागांचे कामकाज केले जात आहे. आपल्या राज्य शासनाचा ग्रॉस एन्रोलमेंट रेशिओ 13 टक्के आहे. देशाचा एकंदर ग्रॉस एन्रोलमेंट रेशिओ 11 टक्के आहे. याबाबतीत आपल्यापेक्षा अनेक राज्ये पुढे आहेत. आपल्या राज्याचा ग्रॉस एन्रोलमेंट रेशिओ 20 टक्क्यांपर्यंत घेऊन जाण्याचे टारगेट आम्ही ठरविले आहे. जास्तीची महाविद्यालये निर्माण करण्याचा विषय असेल, महाविद्यालयांचा दर्जा सुधारण्याचा विषय असेल, चांगल्या पध्दतीचा सिलॅबसचा विषय असेल, परीक्षा पध्दतीचे विषय असतील, कॉलेजमध्ये ॲक्रीडेशनचे प्रमाण वाढविण्याचा विषय असेल...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..........

या सगळ्या दृष्टीकोनातून काम करण्याची विभागाची भूमिका आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे आज साधारणपणे जीडीपीच्या 2.5 टक्के बजेट आहे, ते 10 टक्क्यापर्यंत नेण्याचा निर्धार केला आहे. मागील दोन वर्षाच्या बजेटमध्ये वाढ झाल्याचे दिसून येईल. पुढे सुध्दा 6 टक्क्यापर्यंत वाढ करावयाची असेल तर पुढच्या दोन वर्षात म्हणजे 11 व्या पंचवार्षिक योजना संपण्यापूर्वी येणाऱ्या तीन वर्षात 1500 कोटी रुपये प्रत्येक वर्षी वाढ करावी लागणार आहे. जे काम पुढच्या काळात चालू राहील. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्र.346 ते 365 या रु.27 कोटीच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रु.150 कोटीच्या पुरवणी मागण्या याठिकाणी सादर केलेल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याबाबत मी उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून काही महत्वाचे इश्यू आहेत, त्यामध्ये सगळयात महत्वाचा विषय म्हणजे मोठया संख्येने रिक्त असलेली डॉक्टरांची संख्या हा आहे. या संदर्भात माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, डॉक्टरांची पदे भरण्याची प्रक्रिया एमपीएससीच्या पर्व्ह्यूमधून दूर करण्यात यावी. तरच अधिव्याख्याते, असोसिएट प्रोफेसर उपलब्ध होतील आणि अधिक जास्त पी.जी.डॉक्टर्स निर्माण करता येतील. हे नक्की आहे की, मागील 4-5 वर्षात एमपीएससीकडून पूर्ण क्षमतेने काम न झ ाल्यामुळे अधिव्याख्यात्यांची मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्याचबरोबर खाजगी मेडिकल कॉलेज असतील, खाजगी प्रॅक्टिस असेल, शासकीय मेडिकल कॉलेज असतील, स्पर्धा निर्माण झाल्यामुळे मोठया संख्येने डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. आज सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये देखील डॉक्टरांची वानवा आहे. त्याचे कारणही हेच आहे. या संदर्भात निश्चितपणे गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. आज आम्ही हाही विचार करीत आहोत की, दोन वर्षे ज्यांनी अधिव्याख्याता म्हणून काम केले आहे त्यांना सेवेत नियमित करण्याचा निर्णय घेण्याचा विचार या विभागामध्ये सुरु आहे. पी.जी.ची इनटेक संख्या वाढवित नाही तोपर्यंत आपल्याला अधिक पी.जी.स्टुडन्ट किंवा डॉक्टर्स मिळणार नाही. सुपर स्पेशालिटी क्वालिटीचे डॉक्टर्स लागणार आहेत ते देखील उपलब्ध होऊ शकणार नाहीत. म्हणून इनटेक कॅपॅसिटी वाढविण्यासाठी एम.सी.आय.शी चर्चा करुन त्यासाठी लागणारे नॉर्म्स पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार

SGB/ KGS/ KTG/ 18:50

श्री.राजेश टोपे..........

आहोत. मी स्वत: औरंगाबाद, नागपूर आणि जे.जे. या महत्वाच्या मेडिकल कॉलेजना भेटी दिल्यानंतर मला काही महत्वाच्या बाबी दिसून आल्या आहेत. आज ॲकॅडमिक काम कमी झालेले आहे. डीनसारख्या उच्च विद्याविभूषीत व्यक्तीला इतर काम मोठया प्रमाणात करावे लागते. म्हणून खाजगीकरणाच्या माध्यमातून सिक्युरिटी असेल, साफसफाईचे काम असेल, किचनसारखी व्यवस्था असेल, ही कामे खाजगीकरणातून केली तर ॲकॅडमिक कामे करण्यास डॉक्टरांना अधिक वेळ मिळेल. म्हणून याबाबत नवीन धोरण आणणार आहोत हे सांगण्यास मला अभिमान वाटतो. अनेक महाविद्यालये आणि हॉस्पिटल्समध्ये संगणकीकरण करण्याची आवश्यकता आहे. आज आय.टी.चे युग आहे. या हॉस्पिटल्समध्ये ड्रग्ज स्टोअर केली जातात. महत्वाची ड्रग्ज, ॲंटिबायोटिक्स संपल्यानंतर ऑर्डर दिली जाते आणि वेळेत पुरवठा होत नाही. म्हणून नवीन पध्दत आणणे आवश्यक आहे. मग डायनोग्स्टीक इक्वीपमेंट असतील, सी.टी.स्कॅन, एम.आर.आय. उपकरणे असतील...........

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ......

ते सुध्दा बंद पडल्यानंतर तीन तीन महिने इक्विपमेंट दुरुस्त केली जात नाहीत आणि पुन्हा वेळेत त्यामुळे सेवा मिळत नाही. म्हणून सुध्दा एक ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट अशा प्रकारे एखादी वेगळी सिस्टम केली जाणार आहे काय, की ज्या माध्यमातून अशा प्रकारे कुठल्याही प्रकारचे व्हायटल इंम्पॉर्टमेंट इक्विपमेंट बंद पडणार नाहीत आणि गरिबांना सेवा देणाऱ्या शासकीय रुग्णालयात सेवा मिळत नाही म्हणून बाहेरुन पैसे खर्च करुन सेवा घ्यावी लागणार नाही याची काळजी शासन घेणार आहे. त्याचप्रमाणे सर्व विभागाच्या ठिकाणी आपण मोठे कॅन्सर हॉस्पिटल करण्याच्या दृष्टीने निर्धार करीत असून त्या अनुषंगाने प्रयत्न होत आहेत. या सर्व गोष्टी करीत असताना आपल्याला मोठया बजेटची गरज असते व त्या अनुषंगाने 150 कोटीच्या या पुरवणी मागण्या सभागृहासमोर आलेल्या आहेत. त्यातून हे प्रश्न सोडविण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. तसेच हॉस्पिटल्सच्या डीनचे अधिकार आपण वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. जे.जे. मधील डीन आता रिटायर होत असल्यामुळे तो प्रश्न आता सुटणारच आहे, असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. अशा प्रकारे बाब क्र. 131, 132, 149 ते 151, 302 व 309 या सर्व बाबी अंतर्भूत असलेल्या मागण्या मान्य कराव्यात.

त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाच्यासंदर्भात जरी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले नसले तरी बाब क्र. 308 व 309 च्या माध्यमातून सभागृहापुढे पुरवणी मागणी आलेली आहे, ती सभागृहाने मान्य करावी.

नगरविकास विभागाचे माननीय राज्यमंत्री खालच्या सभागृहात उत्तर देत असल्यामुळे त्यांनी मला उत्तर देण्याची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने मी असे सांगू इच्छितो की, नागरी सुविधांसाठी नगरविकास विभागाची जी 38 कोटीची मागणी आलेली आहे त्याला मान्यता द्यावी. बाब क्र. 281 च्या माध्यमातून गोदाताई परुळेकर महिला विडी कामगारांसाठी बांधण्यात येणाऱ्या 10 हजार घरकुलासाठी आकस्मिक निधीतून केलेल्या खर्चासाठी 1.30 कोटीची ही मागणी असून ती सभागृहाने मान्य करावी, अशी मी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवर सभागृहाने विचार केला आहे.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2000-2001 व 2001-2002 या वर्षाच्या
खर्चाच्या अतिरिक्त विवरणपत्रावर चर्चा

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत "सन 2000-2001 व सन 2001-2002 या वर्षीच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा" दर्शविण्यात आली आहे. सन 2001-2001 व 2001-2002 यावर्षीच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या ह्या लोकलेखा समितीने केलेल्या शिफारशी अन्वये सभागृहास मंगळवार, दिनांक 16 डिसेंबर, 2008 रोजी सादर करण्यात आल्या आहेत. संसदीय प्रथेनुसार या मागण्यांवर चर्चा केली जात नाही.

सभागृहाने सन 2001-2001 व 2001-2002 यावर्षीच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर विचार केला.

----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (पाचवी सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XVI OF 2008

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.हसन मुश्रीफ ( नगर विकास राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 16 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय तत्कालीन मंत्री श्री. राजेश टोपे यांनी लक्ष्मी छाया इमारत पडली होती तेव्हा त्या संबंधिच्या चर्चेला उत्तर देतांना सांगितले होते की, आम्ही यासंदर्भात लवकरच कायदा करु. एक अधिवेशन गेल्यानंतर त्यांनी यासंदर्भातील कायदा आणल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. हा कायदा घर दुरुस्तीच्या संदर्भातील आहे परंतु या बिलामध्ये मालक या शब्दाची संज्ञा यामध्ये दिलेली नाही. ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत त्यासंदर्भातील हा महत्वाचा विषय आहे. लक्ष्मी छाया इमारत ही सुध्दा सहकारी गृहनिर्माण संस्थेची इमारत होती तसेच बांद्रयांची जी इमारत कोसळली ती सुध्दा सहकारी गृहनिर्माण संस्थेचीच होती. सहकारी संस्थांच्या इमारती दुरुस्त होत नसल्यामुळे त्या कोसळत आहेत. म्हाडाच्या अंतर्गत येणा-या घर दुरुस्ती मंडळाच्या 16000 इमारती मुंबई शहरामध्ये आहेत. तो विषय या कायद्यामध्ये येऊ शकतो का? खरे म्हणजे या इमारती सुध्दा म्हटले तर या कायद्यामध्ये येऊ शकतात. यासंदर्भात कायदा करतांना जी व्याख्या द्यावयास पाहिजे ती आपण न दिल्यामुळे घोळ होत आहे. त्यामुळे आपल्याला सर्व तरतूदी नियमामध्ये करुन घ्याव्या लागतील. म्हाडाच्या 16 हजार इमारती या कायद्यामध्ये आल्या तर फार गंभीर परिस्थिती निर्माण होईल. यामध्ये तीन भाग आहेत. मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका सुधारणा 1949 च्या इमारती सुध्दा या विधेयकाच्या कक्षेत येतात तसेच नागपूर शहर महानगरपालिका 1948 च्या इमारती सुध्दा या विधेयकाच्या कक्षेत येतात. त्या व्यतिरिक्त राहिलेल्या महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती, औद्योगिक नगरी या कक्षेतील इमारती सुध्दा या विधेयकाच्या कक्षेत येतात. म्हणजे जेथे जेथे शहरे आहेत त्या ठिकाणच्या सर्व जुन्या इमारतींच्या संदर्भात आपण हा कायदा आणलेला आहे. 30 वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर "डेट ऑफ ऑक्यूपेशन" असा उल्लेख बिलामध्ये आहे परंतु मालक राहण्यासाठी गेलेल्या दिवसापासून की, ऑक्यूपेशन सर्टीफिकेट मिळाल्यापासूनचा कालावधी आपण धरणार आहात याचा मात्र बोध या बिलातून होत नाही. मुंबईमध्ये अशा किती तरी इमारती आहेत की, मालक त्या ठिकाणी राहायला गेल्यानंतर 15-20 वर्षानंतर ऑक्यूपेशन सर्टीफिकेट मिळालेले आहे. त्यामुळे हा विषय सुध्दा आपण लक्षात घेतला पाहिजे. 10 वर्षाचा कालावधी किंवा इमारतीची स्थिती किंवा भोगवटदाराने केलेल्या दोष निवारण दुरुस्त्या लक्षात घेऊन आयुक्त निर्धारित करतील असा उल्लेख विधेयकामध्ये आहे. याचा भार आता महानगरपालिकांवर पडणार आहे. तसेच यासंदर्भातील वसूली आपण 6.25 टक्के व्याजाने करणार आहात. ही वसुली

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

महानगरपालिकेने असेसमेंटच्या माध्यमातून करावयाची आहे. खरे म्हणजे ही चांगली तरतूद आहे. या तरतूदींचे मी मनापासून स्वागत करतो. परंतु काही गोष्टींचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे त्यामुळे हे स्पष्टीकरण नियमांमध्ये केले तर बरे होईल. 30 वर्षाच्या नंतरच्या इमारतींची तपासणी आपण महानगरपालिकेच्या अभियंत्याकडून करणार की मोठया इंजिनिअरींग कन्सल्टन्सीकडून करणार ? याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. मुंबईमध्ये तर अशा प्रकारच्या जुन्या इमारती हजारोच्या संख्येने आहेत. ऑक्यूपेशन सर्टीफिकेट देऊन, भोगवटदाराचा दाखला देऊन 30-40 वर्षापूर्वीच्या हजारो इमारती आहेत त्यामुळे आपण या इमारतीची तपासणी नक्की कोणाकडून करणार आहात ? स्ट्रक्चरल ऑडीटचा मुद्दा या विधेयकामध्ये आलेला दिसत नाही. त्यामुळे कलम 3 प्रमाणे अभियंत्यांची तपासणी यामध्ये तो येणे आवश्यक आहे. ज्या इमारतीला 30 वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा इमारतींचे दर पाच वर्षांनी स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासंबंधीचा निर्णय आपण घेतला परंतु त्या इमारतींचे ऑडीट आपल्याकडे अधिकृतपणे आले पाहिजे. आपण तशा प्रकारे कन्सल्टन्सीची यादी बनवली आणि ती सर्वांना दिली तर चांगले होईल. मला ज्या त्रुटी जाणवल्या आहेत त्या मी आपल्या निदर्शनास आणून देतो. आपण या ठिकाणी सादर केलेल्या विधेयकाचे मनापासून स्वागत करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----------

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ( नगर विकास राज्यमंत्री ) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. स्ट्रक्चरल ऑडीट कोणाकडून करुन घेणार असा त्यांचा पहिला प्रश्न होता. त्याबाबत सांगू इच्छितो की, महानगरपालिकेने नोंदणी असलेल्या स्थापत्य अभियंत्यांची सूची करायची आणि त्यांच्याकडून स्ट्रक्चरल ऑडीट करुन घ्यायचे आहे. त्यांचा दुसरा प्रश्न होता की, "मालक" या शब्दाची व्याख्या स्पष्ट करण्यात आलेली नाही. त्यांनी उपस्थित केलेला बरोबर आहे. गृहनिर्माण संस्था, सहकारी संस्था, म्हाडाच्या इमारती याची नियमात तरतूद करण्यात येईल. तेव्हा सभागृहाने हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 ( दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्र.16 संमत करावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.प.वि.क्र.16 संमत झाले आहे.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सहावी सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO XVII OF 2008

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACTS 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYAT AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT,1965.)

श्री.हसन मुश्रीफ ( नगर विकास राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 17 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी आणि इतर निवडणुकांसाठी जात पडताळणी समितीने जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी मोठा गोंधळ चालविला आहे. महापौर पदाच्या निवडणुकीसाठी सुध्दा अगोदर जात वैधतेचे प्रमाणपत्र द्यायचे आहे. जातीची दिलेली प्रमाणपत्रे योग्य आहेत की नाहीत याची एवढेच काम जात पडताळणी समितीचे आहे. तीन अधिकाऱ्यांची ही समिती आहे. त्यामध्ये एक सक्षम अधिकारी तर त्याच्या हाताखाली महसूल विभाग व समाज कल्याण विभागाचा प्रत्येकी एक अधिकारी असतो. यापूर्वी या विधेयकातील खंड 5 (ब) वर बरीच चर्चा झालेली आहे. 120 दिवसांमध्ये जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र धेऊन यावयास पाहिजे अशी अट आहे. परंतु या कालावधीत अनेक नगरसेवक मुदतीत प्रमाणपत्र देऊ न शकल्यामुळे त्यांचे नगरसेवक पद रद्द झाले. त्यामुळे अनेक नगरसेवक न्यायालयात गेले.शेवटी उच्च न्यायालयाने असे निर्देश दिले की, 120 दिवसांत वैधता प्रमाणपत्र देण्याची जी अट आहे ती बंधनकारक नाही. It is not mandatory, it is direction या निर्णयामुळे बऱ्याच नगरसेवकांना पुन्हा संधी मिळाली. यापूर्वी हे विधेयक चर्चेला आले होते त्यावेळी मी मुद्दा उपस्थित केला होता की, फक्त वेळेचे बंधन घालण्यात यावे. कारण जातपडताळणी समिती फक्त नोकरीसाठी, शिक्षणासाठी आणि जे निवडणुकीसाठी उभे आहेत यासाठी वैधता प्रमाणपत्र देते.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 19=10

ॲड. अनिल परब...

महापौर पदाचा उमेदवार फक्त काही दिवसच अगोदर जाहीर केला जातो. माझ्याकडे जातीचे सर्टिफिकेट आहे तेव्हा वैधता प्रमाणपत्र मला द्यावे असे जर मी त्यांना अगोदरच सांगितले तर प्रमाणपत्र देण्यास नकार दिला जातो. मागच्या वेळी असे ठरले होते की सहा महिन्याच्या आत जर अशा प्रकारचे सर्टिफिकेट दिले तरी ते चालेल. मी गेल्या आठवडयात एका व्यक्तीला पाठविले होते आणि त्यांना सांगितले होते की जात वैधता प्रमाणपत्र घेऊन या तेव्हा जात पडताळणी कार्यालयाने त्यांना लिहून दिले होते की तीन कॅटैगरीमध्ये तुम्ही प्रमाणपत्र मागत आहात असे आपण लिहून द्यावे तरच आम्ही हे प्रमाणपत्र देऊ. याचा अर्थ असा की जो महापौरपदाचा उमेदवार आपण घोषित करु त्याला जात वैधता प्रमाणपत्र वेळेवर मिळेलच याची शाश्वती नाही. त्याच बरोबर जात पडताळणी समिती भ्रष्ट झाली असून हे प्रमाणपत्र देण्यासाठीचे दर सुध्दा ठरलेले आहेत. जात पडताळणी समितीच्या अधिका-याच्या केबिनच्या बाहेर दलाल बसललेले असून ते रेटस सांगतात त्याचबरोबर त्यांच्या कक्षेच्या बाहेर जाऊन ते निर्णय घेतात. यासबंधी मी एक उदाहरण देतो. एका प्रकरणात जात पडताळणी समितीने वैधता प्रमाणपत्र दिले होते आणि ज्या दिवशी हे सर्टिफिकेट दिले होते त्याच दिवशी संध्याकाळी पत्र देऊन त्या अधिका-याने वैधता काढून घेतली होती. वास्तविक हा अधिकार त्यांना नाही. शासनाचा असा जीआर आहे की जर वैधता रद्द करावयाची असेल तर तो अधिकार फक्त हायकोर्टालाच आहे. असे असतांना राजकीय दबावाखाली वैधता प्रमाणपत्र काढून घेण्यात आले होते......

श्री.हसन मुश्रीफ : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्य शासनाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिका इत्यादी ठिकाणी जात पडताळणी प्रमाणपत्र सक्तीचे केलेले आहे. ते प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणालाही निवडणुकीस उभेच राहता येत नाही. त्यात आपण अशी दुरुस्ती आणली आहे की, महापौर किंवा अध्यक्ष हे जनरल मधून उभे राहतात त्याला जात पडताळणी प्रमाणपत्र देता येत नाही परंतु मागासवर्गीय व्यक्तीला महापौराची निवडणूक लढवता येते. एखादी मागासवर्गीय व्यक्ती जनरल मधून निवडून आली तर त्या ठिकाणी त्याला जात पडताळणी प्रमाणपत्र दाखवावे लागत नाही

ॲड.अनिल परब :एका विशेष प्रभागातून त्याला निवडून यावयाचे असेल तर ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ :आता आपण सुरुवातीलाच हे प्रमाणपत्र देण्याचे सक्तीचे केलेले आहे.

ॲड. अनिल परब : मी त्यासंबंधीच बोलत आहे त्या सक्तीचा फायदा घेऊन जात पडताळणी समिती लूटत आहे. माझे असे मत आहे की अमुक एका दिवसामध्ये जातीच्या सर्टिफिकेटची पडताळणी करुन त्याला वैधता प्रमाणपत्र मिळेल असा कालावधी निश्चित केला पाहिजे. 1 लाख 40 हजार अर्ज अजूनही त्यांच्याकडे प्रलंबित आहेत. दोन आठवडयात हे प्रमाणपत्र पाहिजे असेल तर अमुक इतके पैसे द्यावे लागतील तीन आठवडयात प्रमाणपत्र पाहिजे असेल तर तमुक इतके पैसे द्यावे लागतील असे सांगण्यात येते. तेव्हा किती दिवसात हे प्रमाणपत्र मिळेल याचा कालावधी सांगण्यात आला पाहिजे. जिल्हा परिषदेचा उमेदवार वा महापौर पदाचा उमेदवार अगोदर जाहीर होत नाही. काही कालावधी बाकी असतानाच तो जाहीर केला जातो अशा वेळी जर ती व्यक्ती हे प्रमाणपत्र मागावयास गेली तर त्याला ते मिळू शकत नाही. एखाद्या जातीतील एखादा उमेदवार जर सक्षम असेल परंतु त्याच्याकडे वैधता प्रमाणपत्र नाही म्हणून उभे राहता येणार नाही. श्री.राजेश टोपे माझ्या मताशी सहमत होऊ शकतील ते राज्यमंत्री असतांना मी हा मुद्दा मांडला होता व त्यांनी असे सांगितले होते की, विशेष गटामध्ये ज्यांना निवडणूक लढवावयाची आहे त्यांच्या बाबतीत तीन महिन्याच्या आत प्रमाणपत्र मागितले जाईल तशाच पध्दतीची अट महापौर पदासाठी लावणार आहात काय ? अशा उमेदवाराने एक महिन्याच्या आत प्रमाणपत्र दिले पाहिजे. या समितीचे लोक यासबंधीचा अर्जच स्वीकारत नाही. ते सांगतात की तुम्ही उमेदवार कशावरुन आहात? आम्ही फक्त उमेदवारांना प्रमाणपत्र देतो त्यामुळे तुम्ही पक्षाकडून तसे लिहून आणावे परंतु कोणताही पक्ष एक महिना अगोदर असे कसे लिहून देईल की तुम्ही महापौर पदाचे उमेदवार आहात. तेव्हा याबाबतीत स्पष्टपणे खुलासा व्हावयास पाहिजे अन्यथा पुन्हा कोर्ट केसेस होतील आणि मिळालेली सर्व प्रमाणपत्रे अवैध होतील आणि सुप्रीम कोर्टापर्यत लढत असतांना त्या उमेदवाराला त्रास सहन करावा लागतो तेव्हा याबाबतीत शासनाचे शासनाचे धोरण सुस्पष्ट असले पाहिजे त्याचबरोबर जात पडताळणी समितीच्या कक्षा वाढविण्यात आल्या पाहिजेत आणि त्यांच्या कमिटया वाढविण्यात आल्या पाहिजेत. आज या कमिटयांची संख्या खूपच कमी आहे . त्याचबरोबर पोलिसांकडे व्हीजीलन्सचे काम दिलेले आहे. ते पोलीस दलाचे काम अर्धा दिवस करतात आणि अर्धा दिवस व्हीजीलन्सचे करतात तेव्हा या कामासाठी खास



VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 19=10

अशी यंत्रणा या कामासाठी राबविण्यात यावी आणि या संदर्भात शासनाने धोरण स्पष्ट करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी जात पडताळणी समितीचा उल्लेख केला आहे परंतु या समितीमुळे लोकांना जो त्रास होतो त्यामुळे ही " जाच पडताळणी समिती " आहे की काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सागितले ते खरे आहे. सर्वाना तोच अनुभव आहे. जात पडताळणी समित्या म्हणजे दुकानच झालेले आहे त्यामुळे या संदर्भात सामाजिक न्याय विभागाला सूचना देऊ या.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 19:15

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता माननीय नगरविकास राज्यमंत्री ही बाब सामाजिक न्याय विभागाकडे ढकलत असतील तर हे बंधन आपण कशासाठी लावता ? सदरहू समितीने हे प्रमाणपत्र तीन महिन्यात दिलेच पाहिजे असे आपण बंधन त्यांच्यावर करायला पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी दुसऱ्या विभागाकडे ही बाब ढकलतो आहे असे नाही तर मी हे विधेयक कशासाठी आहे हे सांगत होतो. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्या निवडणुकांसाठी आपण ही बाब बंधनकारक केलेली आहे. आता हे जे विधेयक आणलले आहे ते यासाठी आहे की, एखादी व्यक्ती जनरल वॉर्डातून निवडून आली असेल आणि ती मागासवर्गीय असेल तर जनरल वॉर्डातून निवडणूक लढविताना त्याला जातीचे प्रमाणपत्र देण्याची गरज नाही. मात्र तो जनरल वॉर्डातून निवडून आला असेल आणि त्याला महापौर पदासाठी उभे रहावयाचे असेल आणि ते पद मागासवर्गीयासाठी राखीव असेल व तो एक मागासवर्गीय उमेदवार म्हणून त्या पदासाठी निवडणूक लढवू इच्छित असेल तर त्यावेळेस मात्र त्याला जातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्याबद्दलचे हे विधेयक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जातीचे प्रमाणपत्र सादर करण्याची ही बाब तसे पाहिल्यास सर्वच पक्षांच्या दृष्टीने, उमेदवारांच्या दृष्टीने त्रासदायक आहे तेव्हा याबाबतीत आपण योग्य असे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी जात प्रमाणपत्र पडताळणीसंबंधीच्या बाबीसंबंधीचा विषय असल्याने माननीय राज्यमंत्र्यांनी सामाजिक न्याय विभागाकडे बोट दाखविले. मध्यंतरी या संदर्भात सामाजिक न्याय विभागाचे मंत्री माननीय श्री.हंडोरे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात एक बैठक घेतली होती आणि त्या बैठकीस मी देखील उपस्थित होतो. त्यामध्ये ठरल्याप्रमाणे जात पडताळणी अधिकारी ऐकत नाहीत दुसरे असे की, या समितीकडे आज लाखो अर्ज पडून आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी प्रचंड भ्रष्टाचार चालतो आहे. पैसे दिल्याशिवाय कोणालाही जात पडताळणी प्रमाणपत्र मिळतच नाही. तेव्हा ही बाब बंधनकारक करून आपण लोकांना एक प्रकारे अडचणीत आणणार आहात का ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, जवळपास प्रत्येक निवडणुकीमध्ये आता जातीचे प्रमाणपत्र बंधनकारक केलेले असल्याने त्यासाठी अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत चालली

...... 4आर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे .....

आहे. म्हणूनच या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांच्या बरोबर मध्यंतरी बैठक झाली. त्या बैठकीत जात पडताळणी समितींची संख्या वाढविण्यात यावी असा निर्णय झाला. त्याप्रमाणे 7 ऐवजी आता 15 समित्या करण्यात आल्या आहेत. पण यामध्ये महत्त्वाची अडचण अशी आहे की, सुप्रीम कोर्टाने याबाबत दिलेल्या मार्गदर्शनानुसार जॉईंट सेक्रेटरी रँकचा अधिकारी त्या समितीचा प्रमुख असला पाहिजे आणि आम्हाला अडचण तेथेच होते आहे. आपण 15 समित्या केल्या असल्यातरी पूर्वी 6 विभागांचे विभागीय आयुक्त होते त्यानंतर ॲडिशनल महसूल आयुक्त यांनाही आपण यामध्ये घेतले. नंतर आम्ही त्यात मुंबई, नागपूर, पुणे यांचे ॲडिशनल कलेक्टर जे जॉईंट कमिशनरच्या रँकचे असतात, त्यांना घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण असे केले तरीही जात पडताळणीची प्रकरणे मार्गी लागत नाहीत म्हणून मग महसूल सचिवांबरोबर आम्ही बसलो. त्यांच्याशी या संबंधात चर्चा केल्यानंतर त्यांनी आता 7 ॲडिशनल कलेक्टरची मागणी मंजूर केलेली आहे. येत्या दोन तीन दिवसांच्या आत माननीय मुख्यमंत्र्यांकडे याबाबतची फाईल सहीसाठी जाईल आणि पुढील आठवड्यामध्ये 7 ॲडिशनल कलेक्टर आपल्याला या कामासाठी मिळतील. ते मिळाल्यानंतर 7 विभागांमध्ये स्वतंत्र अशा समित्या होतील आणि त्यांना संपूर्णत: या कामाशिवाय दुसरे काहीही काम असणार नाही. यापूर्वी अडचण अशी होती की, महसूल आयुक्तांकडे आपण हे काम दिलेले होते पण ते प्रथमत: महसुलाचे काम पहात आणि नंतर ते या कामाकडे लक्ष देत असत.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण प्रत्येक महसूल विभागामध्ये किमान दोन समित्या या कामासाठी राहतील असे करावे.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, ॲडिशनल कमिशनर महसूल हे 7 विभागांमध्ये म्हणजे डिव्हिजनमध्ये आहत आणि एका महसूली विभागामध्ये 5-7 जिल्हे असतील तर 3-3 जिल्ह्यांना एक समिती याप्रमाणे आपल्याला याची रचना करता येईल. अशा प्रकारे जात पडताळणीचा प्रश्न जो अडचणीचा झालेला आहे त्यातून मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

( यानंतर श्री.सरफरे ..... 4एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, तीन भाग असलेले हे विधेयक पहिल्यांदा आले आहे त्यामध्ये तीन भाग आहेत. जातपडताळणीच्या बाबतीत मी आपणास अशी विनंती करतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी ज्यावेळी चालना दिली त्यावेळी महाराष्ट्रामध्ये सर्वच क्षेत्रात सामाजिक न्यायाच्या दृष्टीने समाज जागरुक झाला आहे. प्रत्येकाला वाटते की, आपण प्रत्येक क्षेत्रात पुढे गेले पाहिजे. त्या बाबतीत वेगवेगळी आरक्षणे आली आहेत. ती राजकीय असतील किंवा निवडणुकीची असतील त्या प्रत्येक आरक्षणासाठी जात पडताळणीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील 90 टक्के समाज जात पडताळणीकडे जात आहे. या कामाचा प्रचंड व्याप बघितल्यानंतर आपल्याला तालुका पातळीवर सुध्दा अशा समित्या निर्माण करता येतील काय हा प्रश्न आहे? कारण प्रत्येकाला सामजिक न्याय मिळवावयाचा असेल तर तो मिळविण्याकरिता या प्रमाणपत्राची गरज आहे. आपण जिल्हा पातळीवर समित्या केल्या तर आनंद आहे. परंतु हे कामच प्रचंड आहे. भ्रष्टाचार कमी करण्यासाठी आपण जास्त खिडक्या वाढवून लोकांना प्रमाणपत्र देण्यासाठी मुदत घालावी. ज्याप्रमाणे नगर विकास विभागाकडे एखादा नकाशा मंजुरीसाठी दिल्यानंतर जर त्यांनी 21 दिवसाच्या आत आपल्याला कळविले नाही तर डीम टू बी पास असे म्हणतो. आपण पहिल्यांदा आलेले सर्व अर्ज स्वीकारले पाहिजेत. फक्त निवडणुकीकरिता अर्ज दिला असेल तर तो स्वीकारीन अशी आपली भूमिका असता कामा नये. एखाद्याला प्रमाणपत्र मिळविण्याचा अधिकार आहे. आपल्याला आपल्या जातीचा दाखला मिळविणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे त्याला मिळालेला दाखला त्याने कशासाठी वापरावयाचा हा त्याचा प्रश्न आहे. आपल्याकडे सामाजिक न्याय विभाग आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न आपल्याला साकारावयाचे असेल तर ती आपली नैतिकता आहे. आपल्याला मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन त्याना काय मिळते यापेक्षा आपण त्यांना कसे देऊ शकतो याचा विचार करण्याची आपण आपल्या अधिकाऱ्यांना पहिल्यांदा समज द्यावी. सर्वत्र भ्रष्टाचार होतो हे मला मान्य आहे. तर मग एखाद्याला जर सर्वोच्च न्यायालयापर्यंत जावे लागले तर त्याची अवस्था कशी होत असेल? आपण या गोष्टींचा विचार करुन आपल्या जीवनात लोकांना सामाजिक न्याय मिळवून देण्याची मिळालेली ही सुवर्णसंधी आहे. त्या संधीचा वापर करुन आपले नाव कोरले जाईल असे काम आपण करा. मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

महानगरपालिकेचे महापौर म्हणून आपल्याला सन्मान मिळाल्यानंतर फार महत्वाचे खाते आपल्याकडे आले आहे. याबाबत मला नेहमी अभिमान वाटतो. ही फार मोठी जबाबदारी आपण पार पाडावी अशी आपणाकडून माझी अपेक्षा आहे. या विधेयकात तीन विषय असून दुसरा विषय सुध्दा फार चांगला आहे. आजही आपण शेवटच्या तारखेला कर भरतो. परंतु वेळेवर जर कर भरला तर त्याला काय सूट द्यावी या संदर्भातील ही सूचना आहे. जो सहा महिन्यांनी उशिरा कर देतो त्यापेक्षा जो सुरुवातीला कर देत असेल तर त्याला त्याचा लाभ मिळाला पाहिजे. काही लोक दोन ते तीन वर्षे कर देत नाहीत आणि मग पेनल्टी माफ करा म्हणून मागणी करतात. किंवा मग जेवढा कर असेल तेवढाच घ्या असे सांगतात. ज्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीमध्ये ज्यांनी कर्जाचे हप्ते भरले ते शिक्षापात्र झाले आणि ज्यांनी भरले नाहीत त्यांची कर्जमाफी झाली अशाप्रकारचा हा विषय आहे. यामध्ये हरित इमारतीची संकल्पना फार चांगली आहे.पावसाचे पाणी साठविणे, गांडूळ खताची निर्मिती करणे,सौर ऊर्जा निर्माण करणे्, टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करणे् असे अनेक विषय यामध्ये आहेत. यामध्ये एक वाक्य असे आहे की, "कराच्या रकमेचा यथोचित सूट देण्याचा महापालिकेला" आता यामध्ये "यथोचित सूट" म्हणजे काय? मुंबई महानगरपालिकेने जकात नाक्यावर जकात जमा करतांना निश्चित स्वरुपात किती टक्के जकात जमा करावी? याचे शेडयूल्ड सरकार बनवून देते. आणि मग तुम्ही 4 टक्क्याचें शेडयूल्ड दिल्यानंतर महानगरपालिका 1 टक्क्यापासून सुरुवात करते. आणि 15 वर्षामध्ये ती 4 टक्क्यापर्यंत जाते. तेव्हा अशाप्रकारे यासंदर्भात "कराच्या रकमेची यथोचित सूट" देण्याची महानगरपालिकेला मूभा दिली आहे. त्याचे स्वरुप कसे असावे? कोणत्या स्वरुपामध्ये असावी ? त्यांनी भरलेल्या व्याजाच्या स्वरुपामध्ये सूट असावी काय? पावसाच्या पाण्याची साठवण करणे वगैरे प्रकल्प दिले आहेत. यामध्ये गांडूळ खत प्रकल्प करणे सोपे आहे. परंतु सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आणि रिसायकलिंग करण्यासाठी लाखो रुपये लागणार आहेत

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

लाखो रुपये एखाद्या इमारतीने जर त्यामध्ये गुंतवावयाचे असतील तर आपण कोणत्या स्वरुपाची सूट देणार आहात हे नक्की या शब्दांमुळे कळत नाही. म्हणून आपण जे नियम तयार करणार त्यामध्ये याबाबत नियम करावेत असा हा विषय आहे. तिसरा जो विषय आहे तो प्रतिनिधित्वाचा आपणा सर्वांकरिता महत्वाचा आहे. त्या त्या भागामध्ये राजकीय पक्षाच्या सापेक्ष संख्याबळाच्या आधारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात आलेली आहे. ते प्रकरण कोर्टामध्ये गेले आणि जे आहेत त्यांना घरी बसवले. आता ते जे निवडून आलेले आहेत, हा कायदा पास झाल्यावर ते प्रपोर्शनेट आहेत, त्यांना मान्यता द्या. आता पैशाचा नवीन खेळ चालू होईल. त्यांना का बाद करणार ? हे कसे नेमले यावर वाद झाला म्हणून कोर्टात गेले आणि कोर्टाने ते थांबवून ठेवले. आता आपण कोर्टाने सांगितल्याप्रमाणे कायदा केला. मग त्यावेळेला ते प्रपोर्शनेटमध्ये आहेत. माझे संख्याबळ 10 असेल तर त्यानुसार 10 ला एक मिळत असेल तर मला एक मिळाला. राष्ट्रवादी पक्षाचे संख्याबळ 20 असेल तर त्यांना दोन मिळत असतील तर त्यांना दोन मिळाले. प्रपोर्शनेटमध्ये जे पूर्वी निवडून दिलेले आहेत त्यांना आता पुन्हा त्या कालावधीकरिता रिइन्स्टेट करा. त्या नगरपालिकेचा दोन वर्षापूर्वी जो कालावधी असेल त्या कालावधीकरिता करा. नाही तर पुन्हा पैशाचा खेळ सुरु होईल. नवीन येतो, जुना जातो असे सुरु होईल. या कायद्याचा दुरुपयोग होता कामा नये परंतु आता आपण कायदा करुन आणला त्याबद्दल मनापासून धन्यवाद देतो. हे चांगले विधेयक आपण आणले आणि महानगरपालिकेच्या सुधारणेमध्ये एक चांगली गतिमानता निर्माण करील अशा प्रकारे कर जमविण्याच्या बाबतीत चांगली सूचना असल्यामुळे मी त्याचे स्वागत करतो आणि पुन्हा एकदा या विधेयकाचे स्वागत करुन आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब साहेब यांनी जो मुद्दा मांडला तो अतिशय महत्वाचा आहे. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. या ठिकाणी पदाधिकारी होण्यासाठी 2(अ) क्लॉज टाकलेला आहे. उदा. एखाद्या व्यक्तीला महापौर व्हावयाचे असेल आणि तो नगरसेवक म्हणून निवडून आलेला असेल तर महापौर पदाची निवडणूक जाहीर झाल्यानंतर साधारणत: दोन तीन दिवसांमध्ये त्याचे नाव जाहीर होते आणि त्याला नामनिर्देशनपत्र भरावे लागते. महापौर पदाचा जो कोणी उमेदवार असेल तो जर मागासवर्गीय असेल, अनुसूचित जातीचा असेल किंवा अनुसूचित जमातीचा असेल पण तो खुल्या प्रवर्गाच्या प्रभागातून निवडून आलेला असेल तर त्याला नगरसेवक म्हणून निवडून येण्यासाठी जातीच्या प्रमाणपत्राची आणि वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही आणि नव्हती. त्यामुळे त्याने ते सादर केले नाही आणि तो निवडून आला. आता महापौर पद जर अनुसूचित जातीसाठी किंवा अनुसूचित जमातीसाठी राखीव असेल आणि तो निवडून आलेला नगरसेवक त्या अनुसूचित जातीचा किंवा जमातीचा असेल पण खुल्या प्रवर्गातील प्रभागातून निवडून आलेला असेल तर त्याला महापौर पदाची निवडणूक लढविण्याचा कायदेशीर अधिकार आहे. पण आपण या ठिकाणी असे म्हटले आहे की, त्या नामनिर्देशन पत्राबरोबर ते द्यावे लागेल आणि ते मिळत नाही. त्याची काय अडचण आहे याबाबत सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी सांगितले आहे. म्हणून त्याला नामनिर्देशनपत्र सादर करताना वेळेवर जात प्रमाणपत्र किंवा वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही तर अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यातून कसा मार्ग काढणार याबाबत सांगावे. एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका कायद्याच्या कलम 5 (बी) मध्ये 120 दिवसांनी त्यांनी ते सादर करावे अशी अट घातली होती. तोपर्यंत तुम्ही ते रद्द करीत नाही. कारण आपण नगरसेवकांसाठी जे मूळ बिल आणले होते त्यावेळेला मुंबई महानगरपालिका, इतर जिल्हा परिषदा यांच्या निवडणुका अतिशय जवळ होत्या म्हणून 5(बी) वरुन आपण तो कालावधी तीन महिन्यापर्यंत केला होता. आता तो जोपर्यंत रद्द करत नाही तोपर्यंत तुम्ही नवीन कायदा लावू शकत नाही. म्हणजे याच्यातील 5(बी) राहणार की, हे नवीन बिल राहणार ? याबाबतीत आपल्याला खुलासा द्यावा लागेल. कारण यामध्ये कोर्टाने डायरेक्शन्स दिलेल्या आहेत की, ते डायरेक्टीव्हज आहेत, ते मॅंडेटरी नाही. त्यामुळे त्याची कायदेशीर पूर्तता तपासून बघितली नाही तर मग उद्या याबाबतीत लिटिगेशन होईल. याबाबतीत आपण काय धोरण ठरविले आहे ?

श्री. दिवाकर रावते : शासन याबाबतीत नियम बनविणार आहे. मी आपल्याला एक विनंती करतो. कारण एक हक्कभंग आता लवकरच येईल अशी परिस्थिती आहे पण आम्ही तो आणत नाही. या ठिकाणी एक विधेयक पास झाल्यानंतर आपल्याला एक महिन्याच्या आत नियम समितीपुढे नियम घेऊन जावे लागते. या ठिकाणी एक विधेयक पास होऊन एक वर्ष झाले. अजून त्याचे नियम तयार झालेले नाहीत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मी त्याचा पाठपुरावा करीत आहे. त्यासंदर्भात कधीही विशेष हक्कभंगाचा प्रस्ताव सभागृहामध्ये दाखल होऊ शकतो. मी संबंधित सचिवांना सांगतो की, एकदा कायदा मंजूर झाला की मंत्र्यांची जबाबदारी संपते आणि खात्याची जबाबदारी चालू होते. त्यामुळे एक महिन्याच्या आत नियम समितीसमोर याबाबतचे नियम कसे जातील ते आपण पहावे. कारण हे घटनात्मक काम आहे ते वेळेवर झाले पाहिजे याची शासनाने जाणीव ठेवावी एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

-------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी या विधेयकावर बोलताना जातीच्या प्रमाणपत्राबद्दल शंका व्यक्त केलेली आहे. सभागृहासमोर जे विधेयक सादर झालेले आहे त्यातील तरतूद काय आहे ते मी वाचून दाखवितो. "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर,महाराष्ट्र अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 याच्या तरतुदींना अनुसरुन सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल." महानगरपालिकाचा नियम होता त्यात शासनाने पहिल्यांदा कायद्यात बदल केलेलाच आहे. महानगरपालिकेच्या मागासर्गीय, ओबीसी, एनटी किंवा एसटी या प्रभागामध्ये महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांमध्ये नामनिर्देशन पत्राबरोबर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक केलेले आहे. त्यामुळे आता दिवसांचा प्रश्न राहिलेला नाही. समजा मी मागासवर्गीय आहे. परंतु मी सर्वसाधारण प्रभागातून निवडणुकीला उभा राहिलेलो आहे, त्यासाठी मला प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. कारण मी जनरल जागेवर उभा राहतो आहे. परंतु मी निवडून आल्यावर मला महापौर पदाची निवडणूक लढवावयाची असेल तर जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. समजा मी महापौर पदासाठी निवडणुकीला उभा राहिलो आणि महापौर म्हणून निवडून आलो पण जातीचे प्रमाणपत्र वैध ठरले नाही तर पुन्हा महापौर पदाची निवडणूक घ्यावी लागते. हे सर्व टाळण्यासाठी या कायद्यात या विधेयकाद्वारे दुरुस्ती केली जात आहे. राज्यामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्राचा मोठा प्रश्न आहे. हे खरे आहे. पण हे जातीचे प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र नाही म्हणून निवडणूक लागली असे या राज्यातील कोणत्याच क्षेत्रात होणार नाही. सर्वसाधारण जागेवर निवडून आलेल्या परंतु इतर मागासवर्गीय, एनटी, एससी, एसटी असलेल्या उमेदवाराला आरक्षित असलेल्या जागेवरुन महापौर पदाची किंवा नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवावयाची असेल त्यासाठी ते आवश्यक आहे. जो उमेदवार सर्वसाधारण जागेवर निवडून आलेला आहे त्याला प्रमाणपत्राची गरज नाही.

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : त्यांचे अर्जच स्वीकारले जात नाही.

श्री.हसन मुश्रीफ : जात प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणालाही महापौर पदाची निवडणूक लढताच येणार नाही.

ॲड.अनिल परब : एखादा उमेदवार मागासर्गीय प्रभागातून निवडून आलेला असेल आणि त्याला महापौर पदाची निवडणूक लढवावयाची असेल तर त्याला जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय निवडणूक लढताच येणार नाही. परंतु जनरल कॅटेगरीतून निवडून आलेल्या उमेदवाराला महापौर पदासाठी निवडणूक लढवावयाची असेल तर....

श्री.हसन मुश्रीफ : आता अडीच वर्षे अगोदर आरक्षणाची चिठ्ठी टाकली जाते. तेवढया अवधीमध्ये त्यांनी ते प्रमाणपत्र सादर करावे. मागासवर्गीयांसाठी 1 वर्ष अगोदर चिठ्ठी टाकली जाते.

ॲड.अनिल परब : या खात्याचे अधिकारी उमेदवारी मिळाल्याशिवाय प्रमाणपत्र देत नाहीत. त्यामुळे आपण असे सांगावे की, इच्छुक उमेदवारांनाही आम्ही प्रमाणपत्र देऊ. मग इच्छुक उमेदवार त्यांच्याकडून प्रमाणपत्र घेतील.

श्री.हसन मुश्रीफ : तेवढे शासन करील.

ॲड.अनिल परब : महापौर पदाची निवडणूक लढवू इच्छिणा-या उमेदवारांची जात पडताळणी 3-4 महिन्यात होईल असे सांगावे.

श्री.हसन मुश्रीफ : यासाठी आपण सामाजिक न्याय मंत्री महोदयांबरोबर बसून सध्या निवडणुकीसाठी दिवसांची जी अट आहे ती रद्द करण्यास सांगू.

ॲड.अनिल परब : त्या समितीमध्ये दोन अधिकारी महसूल विभागाचे असतात आणि एकच अधिकारी सामाजिक न्याय विभागाचे असतात, यासाठी विभागीय आयुक्तांनी सांगितले पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ : हे मला माहीत आहे. जात पडताळणी समितीचे अध्यक्ष महसूल विभागाचे असले तरी त्यावर नियंत्रण सामाजिक न्याय विभागाचे आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ 19:35

श्री. दिवाकर रावते : या चर्चेच्या अनुषंगाने एक बैठक घ्यावी.

श्री. हसन मुश्रीफ : ठीक आहे. आपण बैठक लावू.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, जैसा कि सम्माननीय सदस्यों ने बताया है, यह सही है कि कास्ट सर्टिफिकेट और वैलिडिटी सर्टिफिकेट प्रदान करते समय ब्यूरोक्रेसी की ओर से गैरव्यवहार हो रहा है. अगर ब्यूरोक्रेसी के इस गैरव्यवहार के खिलाफ सरकार कोई उचित कदम नहीं उठाएगी तो इस विधेयक को लाने का उद्देश्य पूरा नहीं होगा. मैं इस विषय में परभणी का उदाहरण देना चाहूंगी. परभणी के उप विभागीय अधिकारी श्री सुनिल महेन्द्र के खिलाफ वहां के नागरिक, रिटायर्ड उप जिला अधिकारी और जनप्रतिनिधियों ने कलेक्टर से यह शिकायत की है कि वे 5-5 हजार रुपये प्रमाणपत्र प्रदान करने के लिए लेते हैं. कलेक्टर ने इस बात को स्वीकार करते हुए हमें बताया है कि मेरी नज़र में यह बात आई है और डेप्युटी कलेक्टर को मैंने इस मामले की जांच करने के लिए कहा है. मैं यह कहना चाहती हूं कि परभणी में कई विद्यार्थियों को समय पर जाति का प्रमाणपत्र न मिलने के कारण परेशानी हुई है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि जाति प्रमाणपत्र प्राप्त करने के लिए जितने अर्जे आए थें, उनकी जांच की जाए कि उनमें से कितने लोगों को जाति प्रमाणपत्र प्रदान करने से इंकार किया गया है. अगर सरकार इस मामले की जांच करेगी तो यह एक अच्छा उदाहरण साबित होगा.

**तालिका सभापति (श्री उल्हास पवार )** : मंत्री महोदय ने अभी बताया है कि वे इस संबंध में संयुक्त बैठक आयोजित करेंगे.

श्री. हसन मुश्रीफ : या विधेयकाचे स्वागत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केलेले आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. जात पडताळणी बद्दल आपली बरीच चर्चा झालेली आहे. दुसरे दोन विषय यामध्ये असे आहेत की, मालमत्ता कर हा 30 मार्चलाच भरण्याची सवय आपल्या सर्व नागरिकांना लागलेली आहे. नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या कॅश-फ्लोमध्ये पैसे उपलब्ध होत नव्हते. म्हणून या मालमत्ता करामध्ये सूट देण्यासंबंधीची तरतूद या विधेयकामध्ये आहे. पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमिमिश्रीत खत, सौर ऊर्जेचा वापर, पाण्याचा पुनर्वापर याबाबतीत जे चांगली कामे करतील त्याबाबतीत देखील त्या घरमालकाला, भोगवटदाराला करामध्ये चांगली यथोचित सूट देण्याची तरतूद केलेली आहे. यथोचित सूट म्हणजे ती किती द्यायची हे त्या नगरपालिकेने आणि महानगरपालिकेने ठरवायचे आहे. त्यासंबंधीच्या नियमामध्ये तशी दुरुस्ती

..2..

(श्री. हसन मुश्रीफ....)

करण्यात येईल. या पूर्वी नगरपालिका आणि महानगरपालिकेचे नामनिर्देशित सदस्य निवडले गेले. त्यासंदर्भात कायद्यामध्ये आपण बदल केला नव्हता म्हणून हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाने त्या संदर्भातील याचिका फेटाळली. आता आपण महाराष्ट्र नगरपालिका आणि नगरपंचायती अधिनियम कलम 9 मध्ये नगरपरिषदेच्या ऐवजी जिल्हाधिकारी हा शब्द घालत आहोत. याचे कारण असे की, आता गट प्रमुखाने जिल्हाधिका-याकडे नावे दिली की संख्याबलाच्या 10 टक्क्याच्या प्रमाणात सदस्य आपण घेणार आहोत. आता आधीच्या सदस्यांना रिइन्स्टेट करणे अवघड आहे. परंतु त्यांची नावे पुन्हा जर गटप्रमुखाने, पक्ष प्रतोदाने दिली तर त्यांचा पुन्हा समावेश होईल. त्यामुळे जी संदिग्धता होती ती या कायद्यामुळे संपलेली आहे. तेव्हा हे विधेयक सभागृहाने विचारात घ्यावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 16 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008चे वि.प.वि.क्रमांक 17 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2008चे वि.प.वि.क्रमांक 17 संमत झाले आहे.

----

...यानंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील अशंत: अनुदानित शाळांमध्ये व अंशत: अनुदानित तुकडीवर काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून मान्यता दिल्याने त्यांचे झालेले आर्थिक नुकसान.

**मु.शी.** : राज्यातील अशंत: अनुदानित शाळांमध्ये व अंशत: अनुदानित तुकडीवर काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून मान्यता दिल्याने त्यांचे झालेले आर्थिक नुकसान यासंबंधी श्री. रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

" शिक्षण सेवक योजना शैक्षणिक वर्ष 2000-2001 पासून फक्त 100 टक्के अनुदानित शाळांसाठी लागू असणे, अंशत: अनुदानित शाळांमध्ये शिक्षक सेवक योजना नसणे, माध्यमिक विभागाने शासन निर्णय निर्गमित करणे, प्राथमिक विभागाने अद्यापही शासन निर्णय निर्गमित न करणे, राज्यातील अंशत: अनुदानित शाळांमध्ये व अंशत: अनुदानित तुकडींवर काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून मान्यता देऊन त्यांच्यावर झालेला अन्याय, त्यामुळे शिक्षकांचे झालेले आर्थिक नुकसान व शिक्षकांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, राज्य शासनाने शैक्षणिक वर्ष 2000-2001 पासून या राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण सेवक योजना लागू केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या संमतीनुसार त्यामध्ये काही फेरबदल करुन, मूळ जी.आर.मध्ये बदल करुन, शिक्षण सेवक योजना लागू केली आहे. शिक्षण सेवक म्हणून प्राथमिक शाळेमध्ये काम करणा-यास 3 हजार रुपये, माध्यमिक शाळेत बी.ए.बी.एड. झालेल्या शिक्षण सेवक म्हणून काम करणा-यास 5 हजार रुपये आणि उच्च माध्यमिक शाळेत पोस्ट ग्रॅज्युएट अधिक बी.एड.झालेल्या शिक्षण सेवक म्हणून काम करणा-यास 5 हजार रुपये मानधन तीन वर्षापर्यंत देण्यात येते आणि तीन वर्षानंतर शिक्षक सेवक नियमित वेतनश्रेणीस पात्र ठरतात. तीन वर्षानंतर शिक्षण सेवकास नियमित वेतनश्रेणी दिली जाते. शिक्षण सेवकाच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी आदेश काढलेले आहेत. मूळ



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.शिगम 19:40

श्री. रामनाथ मोते....

आदेशाप्रमाणे किंवा मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार शिक्षण सेवक योजना फक्त अनुदानित शाळांसाठीच लागू आहे. ज्या शाळा विना अनुदानित तत्वावर चालत आहेत किंवा ज्या शाळा अंशत: अनुदानित आहेत, त्यांना शिक्षण सेवक योजना लागू नाही. विना अनुदानित शाळेमधील शिक्षकांचे पगार हे शासनाकडून होत नाहीत. विना अनुदानित शाळेचे पगार हे संस्थेच्या माध्यमातून दिले जातात. त्यामुळे या ठिकाणी शासनाने शिक्षण सेवक योजना लागू केलेली नाही. विना अनुदान तत्वावरील शाळा किंवा विना अनुदान तत्वावरील तुकडयांचे शासनाकडून मुल्ल्यांकन केले जाते. त्यानंतर त्या शाळा, तुकडया टप्प्याटप्प्याने अनुदान तत्वावर येतात. शासनाच्या मुल्यांकनानंतरच या शाळा व तुकडयांना टप्प्याटप्प्याने अनुदान मिळते. उदाहरणार्थ सुरुवातीला अशा शाळांना, तुकडयांना चार वर्ष अनुदान मिळत नाही. पाचव्या वर्षी 20 टक्के,नंतर 40 टक्के, त्यानंतर 60 टक्के, त्यानंतर 80 टक्के आणि साधारणत: नवव्या वर्षी 100 टक्के अनुदान त्या शाळेस वा तुकडीस अनुदान प्राप्त होते. शिक्षण सेवकाच्या संदर्भात जी.आर.निघालेले आहेत. यासंदर्भात शेवटचा जी.आर. दिनांक 10 जून, 2005 रोजी निघाला आहे. शासन निर्णय क्रमांक एसएसएन-1099/99/माध्यमिक, मंत्रालय, मुंबई-32 अशा क्रमांकाचा जी.आर.शेवटचा जी.आर.काढलेला आहे. 10 जून 2005 च्या जी.आर.मध्ये अनुदानित शाळांबरोबरच विना अनुदानित शाळांमध्ये सुध्दा शासनाने शिक्षण सेवक योजना लागू केली होती. ही चूक शासनाच्या निदर्शनास आणून दिली गेली. मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे की, विना अनुदानित शाळांना शिक्षण सेवक योजना लागू नाही...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..........

आणि म्हणून ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर शासनाने 10 जून, 2005 चा शिक्षण सेवकांचा जो जी.आर. होता या जी.आर.च्या कलम 1 मध्ये बदल केला. या संदर्भात 26 एप्रिल, 2006 रोजी शासनाने परिपत्रक काढले आणि हा 10 जून, 2005 चा जी.आर.मोडिफाय केला. त्यामधील पहिले कलम पूर्णपणे रद्द करुन त्यामध्ये बदल केला. ते मी याठिकाणी मुद्दाम वाचून दाखवितो. "शिक्षण सेवक ही योजना मान्यताप्राप्त 100 टक्के अनुदानित माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, अद्यापक विद्यालय व सैनिकी शळा यामध्ये सुरु करण्यात आलेली आहे. विना अनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या किंवा अंशत: अनुदानित शाळांना ही योजना लागू नाही. या शाळामधील सहशिक्षक पदावरील नियुक्त्या नियमित स्वरुपात राहतील." असा तो जी.आर.असल्यामुळे अशा प्रकारचे हे सुधारित आदेश निघाल्यानंतर या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये, उच्च माध्यमिक शाळांमध्ये, ज्या अंशत: अनुदानित होत्या, 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के, 80 टक्के याप्रमाणे या सर्व शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना किंवा त्या टप्प्यावर तुकड्यांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना शासनाच्या या सुधारित जी.आर.नुसार शिक्षण सेवक योजनेनुसार मान्यता न देता नियमित वेतनश्रेणीमध्ये मान्यता दिली गेली. आजही अनुदानित शाळांमध्ये, अंशत: अनुदानिक शाळांमध्ये, अंशत: अनुदानित तुकडयांवर काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक समजले जात नाही. त्याला आधार शासनाच्या 26 एप्रिल, 2006 च्या जी.आर.चा आहे. प्रश्न असा आहे की, हा जो जी.आर.निघाला तो फक्त माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, अद्यापक विद्यालय व सैनिकी शाळांसाठी निघाला. राज्यात दुर्दैवाने प्रत्येक विभागाचा वेगवेगळा जी.आर.निघावा लागतो. आज राज्यात अनेक प्राथमिक शाळा अंशत: अनुदानित आहेत. प्राथमिक शाळांना वेगळे नियम आणि माध्यमिक शाळांना वेगळे नियम करुन चालणार नाही. आपण असे करीत नाही. हा जो जी.आर. निघाला तो फक्त माध्यमिक, उच्च माध्यमिक, अद्यापक विद्यालय आणि सैनिकी शाळांना लागू करण्यात आला. प्राथमिक शाळा ज्या अंशत: अनुदानित आहेत किंवा ज्या अंशत: अनुदानित तुकड्यांवर आहेत त्या तुकडयांवर काम करणारे शिक्षक आज शिक्षण सेवक म्हणूनच काम करीत आहेत. मान्यता देणारे जे सक्षम अधिकारी आहेत त्यांचे म्हणणे असे आहे की, हा जो जी.आर.निघाला आहे तो फक्त माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, अद्यापक विद्यालय व सैनिकी शाळांसाठी लागू आहे. प्राथमिक विभागासाठी हा जी.आर.लागू नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 19:45

श्री.रामनाथ मोते.............

कारण यामध्ये प्राथमिक शाळा असा उल्लेख केलेला नाही. त्यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत शालेय शिक्षण विभागाचा प्राथमिक विभागाचा जी.आर.निघत नाही तोपर्यंत आम्ही योजना लागू करणार नाही. म्हणजे अंशत: अनुदानित शाळांमध्ये, अंशत: अनुदानिक तुकडयांवर काम करणारे शिक्षक आज मानधनावर काम करीत आहेत. ज्यांना 80 टक्के शासनाकडून वेतन मिळाले पाहिजे ते न देता 3000 रुपयाच्या 80 टक्के वेतनावर शिक्षण सेवक काम करीत आहेत. ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. शालेय शिक्षण विभागाच्या मंत्रालय स्तरावर मी पत्रव्यवहार केला. शासनाने उत्तर दिले की, अद्यापही प्राथमिक विभागाने या संदर्भात जी.आर.काढलेला नाही. म्हणून अंशत: अनुदानित शाळांना, अंशत: अनुदानित तुकडयांवर काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक योजना लागू आहे हा विरोधाभास आहे. यासाठी शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. ही एक तांत्रिक स्वरुपाची त्रुटी आहे. म्हणून या अर्धातास चर्चेच्या माध्यमातून प्राथमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

म्हणून गेल्या तीन चार वर्षांपासून प्राथमिक शाळांच्या शिक्षकांचे शोषण चालू आहे. मी या माध्यमातून शासनाला अशी विनंती करु इच्छितो की, हा निर्णय घेण्यात शासनाला कुठल्याही प्रकारची अडचण नाही. वित्त विभागाकडे जाण्याची देखील गरज नाही किंवा कोणताही आर्थिक बोजा शासनावर पडणार नाही. कारण दि. 26 एप्रिल, 2006 रोजी जो निर्णय घेतलेला आहे तो या राज्यातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि टप्पानिहाय अनुदानित तुकडयांना सुध्दा लागू होईल, अशाच स्वरुपाचे एक परिपत्रक काढावयाचे आहे. ते खरे तर आजही काढू शकते परंतु तातडीने पुढील दोन दिवसात यासंबंधीचा विषय विचारात घेऊन शासन असे परिपत्रक जारी करणार आहे काय ?

श्री. नाना पंचबुध्दे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेच्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, विना अनुदानित, अंशत: अनुदानित आणि खाजगी शाळांमधील शिक्षण सेवकांना ही योजना लागू करण्यात येईल काय अशी त्यांनी विचारणा केली. त्यासंदर्भात मी असे स्पष्ट करु इच्छितो की, विना अनुदानितचा कालावधी संपल्यानंतर तसेच अंशत: अनुदानितच्या कालावधीत सुध्दा शाळेतील चार पदांना पूर्ण वेतनश्रेणी द्यावी लागेल. तथापि ही योजना विना अनुदानित व अनुदानित शाळांना लागू करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. प्राथमिक शाळांसंबंधीचा निर्णय एक महिन्यात घेण्यात येईल, असे मी आश्वासन या निमित्ताने देऊ इच्छितो.

श्री. रामनाथ मोते : महोदय, यामध्ये धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज नाही, कारण धोरणात्मक निर्णय ऑलरेडी झालेला असून त्यानुसारच शासनाने जी.आर. काढलेला आहे, तो मी माननीय मंत्री महोदयांना दाखवितो. परंतु हा जी.आर. माध्यमिक शिक्षण विभागाचा आहे परंतु तो जी.आर. प्राथमिक शिक्षण विभागाचा जी.आर. हवा व त्यात फक्त माध्यमिक, उच्च माध्यमिक, सैनिकी शाळा, अद्यापक विद्यालय आणि त्याचबरोबर प्राथमिक शाळांना सुध्दा हा जी.आर. लागू होईल, असा बदल करुन फक्त परिपत्रक काढावयाचे आहे.

श्री. नाना पंचबुध्दे : मी सुरुवातीलाच सांगितले की, लवकरात लवकर हा निर्णय घेतला जाईल.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : महोदय, मी गेल्या चार वर्षांपासून यासाठी प्रयत्न करीत आहे व त्यासाठीच सभागृहाचा मला अर्धा तास वेळ घ्यावा लागला. फक्त यामध्ये प्राथमिक शाळा असाच बदल करावयाचा आहे.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, यामध्ये शासनाला कुठलाही आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही.

श्री. नाना पंचबुध्दे : महोदय, ताबडतोब बैठक घेऊन यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लोकसंख्येच्या आधारावर ठाणे व भिवंडी परिसरात पोलीस स्टेशनची संख्या वाढविणे

**मु.शी.**: लोकसंख्येच्या आधारावर ठाणे व भिवंडी परिसरात पोलीस स्टेशनची संख्या वाढविणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात आरोग्य विभागाचा अनुशेष असल्यामुळे रुग्णांना आरोग्य सुविधा न मिळणे

**मु. शी.** : राज्यात आरोग्य विभागाचा अनुशेष असल्यामुळे रुग्णांना आरोग्य सुविधा न मिळणे यासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"राज्यात मोठ्या प्रमाणात आरोग्य विभागाचा अनुशेष शिल्लक असणे, त्यामुळे रुग्णालयात तांत्रिक कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी तसेच पुरेशा प्रमाणात कर्मचारी नसल्याने रुग्णांचे हाल होत असणे, त्यामुळे सदर पदे तातडीने भरण्याची आवश्यकता तसेच राज्यातील रुग्ण, महिला रुग्ण यांच्यासाठी तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसाठी सदर क्षेत्रातील यांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे भरणे, उपरोक्त प्रकरणी राज्यातील आरोग्य विभागाचा अनुशेष कमी करण्याच्या दृष्टीने व आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, राज्यातील आरोग्य विभागाचा अनुशेष कमी करण्याच्या दृष्टीने मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. डॉक्टरांच्या संघटनेची फार मोठया प्रमाणात मागणी आहे की अस्थायी डॉक्टरांमध्ये कन्व्हर्ट करावे आणि 1300 रिक्त पदांवर त्यांची नियुक्ती करण्यासंबंधीचे आदेश तातडीने निर्गमित करावे, अशी त्यांनी मागणी केली आहे. दि. 5.5.2008 रोजी राज्याचे मुख्य सचिव यांच्या वतीने त्यांच्या सह सचिवांनी लेखी आश्वासन दिलेले आहे. त्यानंतर मंत्रिमंडळाची बैठक 18 सप्टेबर, 208 रोजी झाली त्यातही असा निर्णय घेण्यात आला. परंतु अद्यापही यासंबंधीचे आदेश निघाले नाहीत. अशा प्रकारे 18 सप्टेबरपासून निर्णय घेऊन देखील असे आदेश निघत नाहीत ही अत्यंत चुकीची व खेदाची बाब आहे. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार गट"अ" च्या वैद्यकीय अधिकाऱ्याची 1300 पदे ताबडतोब भरणे गरजेचे आहे. काही अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत तर आठ दिवसांपासून सहा महिन्यांपर्यंतचे पुढील कंटिन्यूच्या ऑर्डर्स देण्यात सुध्दा खंड पडतो, या अनुषंगाने लक्ष देण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

काही अस्थायी वैद्यकीय अधिका-यांच्या सेवेत 8 दिवसापासून ते सहा महिन्यापर्यंतचा पुढील आदेश प्राप्त होईपर्यंतच्या काळात खंड पडलेला आहे त्यामुळे अशा वैद्यकीय अधिका-यांना सेवेत नियमित करतांना सहा महिन्यापर्यंतचा कालावधी विचारात घेऊन त्यांना सेवेत नियमित करणे गरजेच आहे. या ठिकाणी काही बाबी स्पष्ट करणे गरजेचे आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या वैद्यकीय अधिक-यांची पदे बहुतांशी ग्रामीण भागातील असल्याने सदरील पुरस्कृत उमेदवार ग्रामीण भागात काम करण्यास इच्छुक नसतात. वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत अस्थायी वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक वेळोवेळी करावी लागते. आपल्याला ज्या जागा भरावयाच्या आहेत त्या जागांच्या संदर्भात उमेदवारांची निवड करीत असतांना मागासवर्गीयांना तसेच महिलांना आरक्षण देण्याबाबत सुध्दा दिनांक 2 जानेवारी 2008 रोजी शासनाने सूचना दिल्या आहेत. याचेही पालन या जागा भरतांना आपल्याला करावे लागेल. या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी कशी होईल हे सुध्दा आपल्याला बघावे लागेल. सदर 1300 अस्थायी वैद्यकीय अधिकारी हे सुमारे 3 ते 15 वर्षापासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत व अशा परिस्थितीत त्यांच्या अनुभवी सेवेचा फायदा न घेता त्यांची अस्थायी सेवा संपुष्टात आणणे उचित होणार नाही त्यामुळे यासंदर्भात आपल्याला फार गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. वैद्यकीय अधिकारी हे मागील 15 ते 16 वर्षापासून अस्थायी स्वरुपात काम करीत आहेत. अशा परिस्थितीत सदर वैद्यकीय अधिका-यांच्या अनुभवी सेवेचा फायदा न घेता त्यांच्या अस्थायी सेवा संपुष्टात आणणे उचित होणार नाही. त्यांच्या तारखेचा निर्णय घेण्याचा अधिकार पूर्णपणे शासनाचा आहे. आपण जर स्थायी म्हणून या वैद्यकीय अधिका-यांना सेवेत घेणार असू तर ती तारीख ठरवित असतांना पूर्वी त्यानी ज्या तारखेपासून काम करण्यास सुरुवात केलेली आहे त्या पहिल्या तारखेपासूनचा फायदा त्यांना देणे आवश्यक आहे. हे सर्व काम करीत असतांना जो विलंब लागतो तो विलंब अत्यंत अक्षम्य आहे. हा विलंब आता येथून पुढे होणार नाही याची दक्षता शासनाने घ्यावी. आणि 1300 जागा त्वरीत भरल्या जाव्यात आणि त्यांच्या सेवा कंटीन्यूशनमध्ये गृहीत धरल्या जाव्यात. खरे म्हणजे हा खूप मोठा विषय आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

आपण काही ठिकाणी पीएचसी सुरु करतो परंतु आपल्याकडे वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे ट्रॉमा केअरचा उपयोग होत नाही. यासंदर्भात मी आपल्याला फक्त एकच उदाहरण देते ते असे आहे की, टाकरवण, ता. माजलगाव, जि.बीड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे परंतु या ठिकाणी ए.एन.एम.ची 4 पदे रिक्त आहेत, एमपीडब्ल्यूच्या 3 पदे रिक्त आहेत, क्लार्कची एक जागा रिक्त आहे. शिपायांची दोन पदे रिक्त आहेत. तसेच एनआरएचएम-एलएचव्हीचे एक पद रिक्त आहे. असे जर असेल तर पीएचसी सेंटर कसे काय चालणार आहे ? म्हणून शासनाने या सर्व क्षेत्रामध्ये शासनाने तातडीने उपाययोजना करावी आणि वैद्यकीय अधिका-यांच्या संघटनेच्या 1300 जागांच्या संदर्भात या संघटनेच्या म्हणण्या प्रमाणे अपॉईंटमेंटच्या डेट पासून कंटीन्यू करण्याचे आदेश ताबडतोबीने द्यावेत अशा प्रकारची विनंती मी अर्धातास चर्चेच्या निमित्ताने करते.

--------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा बच्छाव (सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री ) : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा अर्धातास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. आरोग्य सेवा संचालनालया अंतर्गत राज्यात 26 सामान्य रुग्णालये, 98 उप जिल्हा रुग्णालये , 366 ग्रामीण रुग्णालये, 8 महिला रुग्णालये, 4 प्रादेशिक मनोरुग्णालये, 3 क्षय रुग्णालये तसेच इतर आरोग्य संस्था कार्यक्रमाअंतर्गत 1816 प्राथमिक आरोग्य केंद्र व 10579 उप केंद्रामार्फत जनतेस आरोग्य सेवा पुरवण्यात येते. मागील एक वर्षात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 1079 वैद्यकीय अधिकारी वर्ग - 2 यांची पदे भरण्यासाठी प्रयत्न करुन आता ही पदे पदस्थानेसाठी उपलब्ध झाली आहेत तसेच राज्यात 1300 अस्थाई वैद्यकीय अधिका-यांना शासन सेवेत नियमित करण्यात शासनाने मान्यता दिलेली आहे. ही दोन्ही पदे 31 जानेवारी पर्यंत शासनाच्या माध्यमातून भरण्यात येतील असे मी या ठिकाणी सांगू इच्छिते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.शोभा बच्छाव.......

त्याप्रमाणे नुकतीच वैद्यकीय अधीक्षक संवर्गातील 62 अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन त्यांची पदस्थापना करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. अजून 70 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक 30.12.2008 रोजी घेण्यात येणार आहे. तसेच विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठीसुध्दा 102 पदांसाठी दिनांक 30.12.2008 रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. जिल्हा तांत्रिक सेवा अंतर्गत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू झालेली असून 1213 पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे. ही सर्व तांत्रिक व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे 31 जानेवारी 2009 पर्यंत भरण्यात येतील.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा-तास चर्चा क्रमांक 4 बाबत**

**तालिका सभापती** ( श्री.उल्हास पवार ): सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत छाजेड यांनी आज सभागृहात उपस्थित राहू शकत नसल्याबाबत पत्र दिलेले आहे. तेव्हा त्यांनी दिलेली अर्धा-तास चर्चेची सूचना पुढे घेण्यात येईल.

अर्धा-तास चर्चा संपली आहे.

--------

**तालिका सभापती** : सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थ□ि होऊ□ उद्या शुक्रवार, दि□□ 19 डिसेंबर, 2008 रोजी स□ळी 10.00वाजता पु□ भरेल.

( सभा□हाची बैठ□ रात्री 8 वाजू□ 02 मि□ि□ं□ी, शुक्रवार, दि□□ 19 डिसेंबर, 2008 रोजीच्या स□ळी 10.00 वाजेपर्य□ स्थ□ि झाली )

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही